

रा.चिं. ढेरे

# मुसलमान मराठी संतकवी

REFBK-0016291
REFBK-0016291

৭৮৪৪

৭৩৬৯৫
৩।৩।৫৭

৭৩৬৯৫ তারিখ
৭৯৯৮ ৩।৩।৫৭

# मुसलमान मराठी संतकवी

र. चिं. ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १६२९१
ग्रंथ शाखा

REFBK-0016291

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

सात रुपये

प्रकाशक :
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ
पुणे २

●

मुखपृष्ठ :
सुधाकर खासगीवाले

●

ठसे :
व. शं. दाते
कलाभुवन, पुणे २

●

सर्व हक्क लेखकाधीन

●

प्रथमावृत्ती :
वर्षप्रतिपदा, शके १८८९
१० एप्रिल १९६७

●

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लि.
४०५ नारायण पेठ
पुणे २

प्राचीन मराठी
वाङ्मयाचे रसिक अभ्यासक
माझे स्नेही
डॉ. **यू. म. पठाण**
यांस सस्नेह समर्पण

# प्रास्ताविक

'मुसलमान मराठी संतकवीं 'चा हा साधार व्यापक परिचय मराठी वाचकांच्या हाती देताना मला निरतिशय समाधान लाभत आहे. चार-दोन मुसलमान मराठी संतकवींची स्थूल नोंद प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात झालेली असली तरी बहुतेक मुसलमान मराठी संतकवींचा प्रयत्नपूर्वक शोध घेऊन त्यांचा साधार विस्तृत परिचय घडविणारे आणि त्यांच्या अंतरंगातील आंदोलनांचे सांस्कृतिक महत्त्व विशद करणारे हे पहिलेच पुस्तक आहे. चार वर्षांपूर्वी प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी मराठी संशोधन-पत्रिकेत (वर्ष १०, अंक २-३) काही, मुसलमान कवींच्या वाङ्मयातील उतारे देऊन त्या कवींसंबंधी स्थूल टिपणे दिली होती. परंतु त्यांनी दिलेल्या परिचयटिपणांतील माहिती अत्यंत त्रोटक असून, आता नव्या सामग्रीच्या सूक्ष्म अभ्यासाने बहुतांशी बाधित ठरली आहे. मी या मुसलमान मराठी संतकवींवर विपुल नवा प्रकाश टाकला आहे. शहा मुंतोजी ब्रह्मणीसारखा मातबर मुसलमान संतकवी प्रा. प्रियोळकरांच्या दृष्टीतून निसटला आहे. या पुस्तकातील मुंतोजीवरील प्रकरणात जाणत्या वाचकांना किती तरी नवे संशोधन आढळेल आणि

त्या संशोधनातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील अनेक अज्ञात दुवे त्यांच्या हाती लागतील.

याच विषयाच्या अनुषंगाने, हिंदू संतांच्या मुसलमान अनुयायांनी उत्तरकालात आपल्या गुरूंच्या समाधिस्थानांची परिवर्तने करून त्यांच्या कबरी कशा बनविल्या, याचाहि कटू इतिहास मांडावा, अशी कल्पना होती. परंतु मुसलमान मराठी संतकवींच्या जिव्हाळ्याशी विसंवादी ठरणारा तो विषय मी हेतुतःच दूर ठेवला आहे. पुस्तकात दिलेल्या छायाचित्रांपैकीं अखेरचें राघव चैतन्याच्या समाधिस्थानाचें छायाचित्र प्रस्तुत संदर्भांत बोलकें आहे.

या पुस्तकाच्या वैशिष्ट्यांबरोबरच त्याच्या मर्यादांचेही मला भान आहे. मी आंथरलेल्या बैठकीवर यांहून अधिक मुसलमान मराठी संतकवींना अगत्याने आणून बसविण्याचे आणि त्या सर्वांचे स्पष्ट सर्वांगीण दर्शन घडविण्याचे कार्य एखाद्या अधिकारी अभ्यासकाने पुढे पूर्ण केले, तर मला अत्यंत आनंद होईल.

या पुस्तकाच्या निर्मितीत मला अनेकांचा सहयोग लाभला. अनेक वर्षे मनात घोळणाऱ्या या विषयाचे संशोधन करण्यासाठी मी १९६६ च्या जानेवारीत कल्याणी, नारायणपूर, येक्केहाळी, बिदर, तादलापूर, अष्टूर, चिटगुप्पा, कारळी, आळंद, गुलबर्गा, महागाव, शहागड, इत्यादी भागांत संशोधनयात्रा केली. या यात्रेत माझे मित्र श्री. रामभाऊ नगरकर यांनी माझी सर्व प्रकारे साथ केली. श्री. किसनराव करलगी (गुलबर्गा), श्री. वि. भा. घोलप (सातारा), श्री. वि. अं. कानोले व प्रा. नरहर कुरुंदकर (नांदेड), श्री. विठ्ठलराव गंधे (पुणे), इत्यादी मित्रांनी

व हितचिंतकांनी हस्तलिखित व दुर्मिळ ग्रंथ संशोधनार्थ दिले. महागावमठाधिपती श्रीमाणिक महाराज यांनी आलमखानाची अनेक पदे उतरून दिली. भा. इ. सं. मंडळ, पुणे, या संस्थेचे क्युरेटर श्री. ग. ह. खरे यांनी संस्थेच्या पोथीशाळेत मला मुक्तपणे वावरू दिले. श्री. दा. शं. जोशी (धुळे) यांनी समर्थ वाग्देवता मंदिरातील हस्तलिखितांतून आवश्यक ती सामग्री नकलून पाठविली. माझे आणखी एक स्नेही प्रा. अशोक कामत यांनी त्यांच्या हिंदी-मराठी ग्रंथसंग्रहालयात मला लेखनासाठी आवश्यक ती सुकरता प्राप्त करून दिली.

चित्रकार श्री. सुधाकर खासगीवाले व मुद्रक श्री. राजाभाऊ माटे यांनी पुस्तकाचे बाह्यांग आकर्षक बनविले. ज्ञानराज प्रकाशनाचे प्रमुख श्री. अशोक जोशी यांचा व माझा संबंध आभाराच्या उपचारापलीकडे आहे. त्यांनी पुस्तकाचे प्रकाशन आस्थेने केले आहे. या सर्व मित्रांचा व हितचिंतकांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्राचीन मराठी संस्कृतीच्या व साहित्याच्या मंदिरात मुसलमान मराठी संतकवींची ही उपस्थिती पाहून मराठी वाचकांना विशेष संतोष लाभेल, असा मला विश्वास वाटतो.

वर्षप्रतिपदा, शके १८८९ रामचंद्र चिंतामण ढेरे
७७ शनिवार पेठ, पुणे २

# अनुक्रम


| | |
|---|---|
| शहा मुंतोजी ब्रह्मणी | १ |
| हुसेन अंबरखान | ४२ |
| अलमखान | ५१ |
| शेख सुलतान | ६६ |
| शेख महंमद | ८४ |
| शहा मुनी | ११९ |
| आणखी काही | १३७ |
| अविंध आणि गोविंद | १५६ |
| सूची | १८७ |


★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८२८१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# शहा मुंतोजी ब्रह्मणी

### बेदरचा बादशहा

मराठी संतमंडळांत ज्याची कीर्ति 'मृत्युंजय' या नावाने गाजत आहे, त्याचे मूळ नाव शहा मुंतोजी ब्रह्मणी असे होते. बेदरच्या बहामनी घराण्यात त्याचा जन्म झालेला; परंतु त्याच्या जन्मापूर्वीच बेदरची बहामनीशाही विनाशाकडे वाटचाल करू लागली होती. इ. स. १४८१ मध्ये बेदरचा कर्तबगार वजीर महंमद गवान याचा वध झाला आणि इ. स. १५२१ च्या सुमारास महंमद बेरीदने बहामनी सत्ता नष्ट करून बेरीदशाहीची स्थापना केली. मुंतोजीचे पारंपरिक चरित्रकार त्याला 'शहा' म्हणतात आणि त्यानेहि आपल्या एका ग्रंथात आपल्या नावामागे 'शहा' हे बिरुद लावून घेतले आहे हे खरे; परंतु बहामनींच्या राज्यकर्त्या शाखेत त्याचा जन्म झालेला दिसत नाही. अर्थात् त्याच्या चरित्रासंबंधीचा

विशेष तपशील आपल्या हाती नसल्यामुळे यासंबंधी निश्चित काहीच सांगता येत नाही. पारंपरिक चरित्रकथेतील उल्लेख त्याला वेदरचा बादशहा मानतात आणि तो स्वतःला ' ब्रह्मणी ' म्हणवून घेतो, यावरून तो बहामनी राजघराण्यातला होता, असे अनुमान करायला हरकत नाही.

मृत्युंजयाचे अथवा शहा मुंतोजी ब्रह्मणीचे चरित्र स्थूलपणे जाणून घेण्याची तीन साधने उपलब्ध आहेत : ( १ ) उद्धव चिद्घन-कृत ' मृत्युंजयचरित्र '[१] ( साक्या २४ ), ( २ ) महीपति-कृत ' भक्तविजय '— अध्याय ४१ वा ( ओव्या १०१ ) व ( ३ ) हनुमदात्मज-कृत ' पूर्णानंदचरित्र '[२] – अध्याय १६ वा, ओव्या २३३–२९५. या तीनपैकी उद्धव चिद्घनाचा उपयोग महीपतीने करून घेतला आहे आणि महीपतीचा उपयोग हनुमदात्मजाने करून घेतला आहे हे खरे; परंतु प्रत्येकाने स्वतःला उपलब्ध झालेल्या माहितीची भरहि टाकली आहे. विशेषतः हनुमदात्मज हा स्वतः बिदर भागातला आणि मृत्युंजय ज्या संप्रदायाचा दीक्षित होता, त्या आनंद संप्रदायाचा अनुयायी असल्यामुळे त्याने पुरविलेल्या अधिक माहितीचे मोल विशेष आहे.

उद्धव चिद्घनाने मृत्युंजयाचे पूर्वनाम ' शहा महंमद बमणी ' असे दिले आहे, तर महीपतीने ' शांत ब्राह्मणी ' असे दिले आहे. हनुमदात्मज त्याचे पूर्वनाम न देता केवळ ' वेदरीचा बहमनी पादशा ' एवढाच नामनिर्देश करतो.

### वैराग्याचा उद्भव

मुंतोजी ब्रह्मणी वेदर येथे राजविलास उपभोगीत असताना त्याच्या जीवनात परिवर्तन घडविणारी एक घटना घडून आली. उद्धव चिद्घन आणि महीपती या दोघांनीहि ही कथा दिलेली आहे.

एकदा मुंतोजी ब्रह्मणी आपल्या पत्नीसह झरोक्यात बसून साखर-केळी खात होता. एकांताचा भंग होऊ नये, म्हणून खाली काही सेवक राखण ठेवलेले होते. ती दोघे जण केळ्यांच्या साली झरोक्यातून खाली टाकीत होती. इतक्यात एक भिकारी खाली आला आणि खाली पडलेल्या केळ्यांच्या साली चाखू लागला. हे दृश्य राणीने पाहिले आणि ते तिने आपल्या पतीला दाखविले. मुंतोजीला त्या भिकाऱ्याचा राग आला. आपल्या महालाच्या परिसरात कोणालाहि फिरकायला परवानगी नसताना हा भिकारी आत कसा आला, याचे त्याला आश्चर्य वाटले. तो राखण ठेवलेल्या सेवकांवर खवळला आणि त्याने सेवकांना

आज्ञा केली की, "त्या भिकाऱ्याला शासन करा." राजसेवकांनी त्या भिकाऱ्याला राजाज्ञेवरून अनेक लाथा मारल्या; परंतु आश्चर्य असे की, लाथांचा मार बसत असतानाहि तो हसत राहिला. हे त्याचे विचित्र वर्तन पाहून मुंतोजीने सेवकांना शांत व्हायला सांगितले. त्यावर तो विचित्र भिकारी रडू लागला. राजा आणखीच संभ्रमात पडला आणि त्याने त्या भिकाऱ्याला शेवटी त्याच्या वर्तनाचा खुलासा विचारला. मुंतोजीच्या प्रश्नाला त्या भिकाऱ्याने दिलेले उत्तर मोठे मार्मिक आहे —

साल चोखोनि पाहिली किंचित । तंव इतुकी शिक्षा पावली येथ ।
पुढें तुझी कैसी होईल गत । आश्चर्य चित्तांत वाटलें ॥
मंदिरप्रदेशीं येतां जाण । तंव इतुकें मज जाहलें ताडण ।
तूं भीतरी नित्य करितोसी शयन । चिंता दारुण मज वाटे ॥
चोखिली साल जिव्हेसी लावितां । तों निजकर्मे इतुक्या बैसल्या लाता ।
तुम्ही आतील मगज खातां । पुढें दंड कोणता कळेना ॥

(भक्तविजय, ४१. २०–२२)

भिकाऱ्याच्या या उत्तराने मुंतोजीचे हृदयपरिवर्तन झाले आणि तो सकल वैभवाचा त्याग करून कोणालाहि न कळविता घराबाहेर पडला.

मुंतोजी घराबाहेर पडल्यावर अरण्यात गेला आणि त्या ठिकाणी त्याला आषाढी यात्रेसाठी पंढरपुराकडे जाणारी दिंडी भेटली, असे महीपती म्हणतो; तर तो तडक कल्याणी नगरीला गेला आणि तेथून दिंडीबरोबर पंढरपुरी गेला, असे उद्धव चिद्घनाचे म्हणणे आहे. हनुमदात्मजाने ही कथा दिलेली नाही. त्याचे म्हणणे असे की, मुंतोजीला पूर्वसंस्कारवशात् वैराग्य प्राप्त झाले आणि तो हिंदू-मुसलमान धर्मपंडितांना परमेश्वरप्राप्तीचा उपाय विचारू लागला. मुल्ला-मौलवी त्याला सांगत : 'निमाज रोजा करीत जाय । तेणेचि खुदा प्राप्त होय ।' (पूर्णानंद-चरित्र १६·२३८). हिंदू असे सांगत की -- 'आमुचा खुदा तो जगन्निवास । पंढरी नगरीं विराजे ॥' पंढरीची कीर्ति अशा प्रकारे सतत कानी पडल्यामुळे तो परमार्थप्रवण राजपुरुष राज्य सोडून पंढरीस आला.

**गुरुबोधाची प्राप्ती**

मुंतोजी पंढरीस आला, तेव्हा त्या भूवैकुंठात वैष्णवांची अपार दाटी जमलेली होती. टाळ, मृदंग, वीणा यांच्या तालावर अनेक वारकरी गात-नाचत होते.

हरिनामाच्या गजराने आकाश कोंदले होते. पंढरीचे सर्व वातावरण भक्तीच्या मस्तीने भारले गेले होते. मुंतोजीने हे सर्व पाहिले आणि त्याचे वैराग्यप्रवण चित्त त्याकडे आकर्षिले गेले. तो आनंद, ती भक्तीची उन्मत्त अवस्था त्याला हवीहवीशी वाटली. मग —

> सकळ वैष्णवांसी करूनि नमन । दिधलें प्रीतीनें आलिंगन ।
> मग घ्यावया देवदर्शन । शेजारमंडपीं पैं आला ॥
> तों परब्रह्म उभें विटेवरी । दृष्टीं देखिलें ते अवसरीं ॥
> सद्भावें आलिंगन देऊनि उरीं । मग चरण नमस्कारी तेधवां ॥
> म्हणे जयजयाजी पुराणपुरुषा । सगुण स्वरूपा हृषीकेशा ॥
> लीलानाटकी सर्वेशा । पंढरीशा श्रीविठ्ठला ॥
> तुझी कीर्ति ऐकूनि कानीं । शरण आलों चक्रपाणी ।
> परी तुझें स्वरूप जागावया मनीं । सद्गुरु कोणी भेटेना ॥
> तरी माझे मनोरथ करीं पूर्ण । म्हणोनि द्वारीं बैसला घालोनि धरणं ।
> नेघे फल-मूल अथवा जीवन । वर्जिलें अन्न अनुतापें ॥
> त्रिरात्र लोटतां त्वरित । प्रसन्न जाहला रुक्मिणीकांत ।
> विवेकसिंधूचें पुस्तक साक्षात । दिधलें स्वप्नांत आणूनि ॥
> सहजानंदस्वामी कल्याणांत । तयाचा उपदेश घेईं त्वरित ।
> स्वप्नीं सांगतां पंढरीनाथ । मग जाहला जागृत ते काळीं ॥
>
> ( भक्तविजय, ४१·४३–४९ )

अशा प्रकारे तीन दिवसपर्यंत पांडुरंगाच्या दारी धरणे धरल्यानंतर तिसऱ्या रात्री त्याच्या हाती विवेकसिंधूची एक प्रत पडली आणि कल्याणीच्या सहजानंदांचा उपदेश घेण्याचा स्वप्नादेश प्राप्त झाला. यातील भक्तीची अद्भुतता जरी बाजूस सारली, तरी एक गोष्ट स्पष्ट आहे की; पंढरीस मुंतोजीला लाभलेला ‘ विवेकसिंधू ’सारखा सद्ग्रंथ आणि सहजानंदांचे शिष्यत्व पत्करण्याचा आदेश यांत सुसंगती आहे. ज्याने मुंतोजीला हा ग्रंथ दिला असेल, त्याला सहजानंद आणि विवेकसिंधू यांच्या आत्मीय संबंधाची स्पष्ट कल्पना असली पाहिजे. विवेकसिंधू हा सहजानंदांचा प्रिय ग्रंथ होता. त्यांच्या आणि त्यांच्या परंपरेतील अनेकांच्या विचारविश्वावर ह्या ग्रंथाचा विशेष प्रभाव होता. त्यामुळेच विवेक-

सिंधूची प्रत सद्भावनेने मुंतोजीला देणाऱ्याने त्याला सहजानंदांकडे जायचा आदेश दिला.

पंढरीस लाभलेल्या दैवी आदेशानुसार मुंतोजी तत्काळ कल्याणीस गेला; परंतु तिथे त्याला समजले की, सहजानंदस्वामी तिथे नाहीत. तो पुढे कार्तिकी यात्रेच्या वेळी पंढरीस आला आणि त्याने सहजानंदांची भेट घेऊन त्यांना पंढरीस घडलेला वृत्तान्त सांगितला. त्यांनी मुंतोजीची आर्तता जाणली आणि त्याला गुरूपदेश दिला. महीपतिबाबांनी म्हटले आहे की --

मग त्यासी उपदेश देऊनि पाहें । नाम ठेविलें मृत्युंजय ।
नारायणपुरासी वास्तव्य । जाऊनि त्वलाहें पैं केलें ।।

( भक्तविजय, ४१·५५ )

सहजानंदांनी गुरूपदेश केल्यावर मुंतोजीचे मृत्युंजय असे नाव ठेवले आणि त्याला कल्याणीजवळच्या नारायणपूर नामक गावी वास्तव्य करायला सांगितले.

**गुरुसेवा**

हनुमदात्मजाने ' पूर्णानंदचरित्रा 'त थोडी वेगळी हकीकत दिली आहे. त्याच्या मते, पंढरी ते कल्याणी आणि कल्याणी ते पंढरी असा गुरुशोध करीत असताना मुंतोजीला कल्याणी येथेच सहजानंद भेटले. त्याने त्यांना पंढरीस घडलेला वृत्तान्त सांगितला आणि तिथे प्राप्त झालेला विवेकसिंधू त्यांच्यापुढे ठेवला. त्यावर सहजानंदांनी त्याची तितिक्षा पारखण्यासाठी पोथी बाजूला ठेवून त्याला मठातील सेवाकार्य सांगितले --

अरे, मठीं नाहीं कामाठी । तूं करशील कीं काय तें काम ।।
नित्य रानास जाऊन । आणीत जाई सर्पण ।
हेंच कामाठ्याचें कार्य पूर्ण । जाल्या जाण तूं करीं ।।

( पूर्णानंदचरित्र, १६. २५२–२५३ )

राजसुखाचा त्याग करून आलेल्या मुंतोजीचे वैराग्य पारखण्यासाठी सहजानंदांनी त्याला ही सेवा करण्यास सांगितले. त्याने ' नाहीं तरी मी केवळ यातिहीन । केवीं सेवा घडे मजपासून ? ' असा मनोमन विचार करून मठात लाकडे आणून देण्याची सेवा मनापासून पत्करली. ही सेवा त्याने काही महिने केल्यावर त्याच्या सेवापरायणतेने सहजानंदस्वामी हेलावले आणि त्यांनी त्याच्या सेवेचा गौरव केला --

यापरी बोलून हर्षेंसी । विवेकसिंधू ग्रंथ त्यासी ।
सांगून, संप्रदायक्रमेंसी । ब्रह्मसाक्षात्कार त्या केला ॥

( पूर्णानंदचरित्र, १६·२६५ )

हनुमदात्मजाने दिलेला हा क्रम अधिक वास्तव वाटतो. आधी काही काळ सेवा केल्यानंतरच मुंतोजींचा पारमार्थिक अधिकार प्रत्ययास नेऊन सहजानंदांनी त्याला गुरुबोध देणे स्वाभाविक आहे.

**यवनाचा ब्राह्मण करण्याचा प्रयत्न**

वैराग्याने दग्ध झालेल्या मृत्युंजयाच्या हृदयभूमीत गुरुबोधाचे सत्त्वसंपन्न बीज पडताच ते तत्काळ अंकुरले, बहरले आणि पाहता पाहता त्याची रस-गंधमय फळाफुलांनी बहरलेली वेल बनली. हा चमत्कार पाहून मृत्युंजयाच्या गुरुदेवांनाही हर्षाचे भरते आले. त्याचे वागणे, त्याचे बोलणे त्यांना एखाद्या तपोनिधी ब्राह्मणासारखे वाटले आणि त्यांच्या मनात असा विचार तरळून गेला की, मृत्युंजय हा ब्राह्मणाहून ब्राह्मण आहे — ज्याने ब्रह्म जाणले आहे असा खराखुरा ब्राह्मण आहे; तर मग याला संस्कारपूर्वक ब्राह्मण करून घेण्यास काय हरकत आहे ?—

त्याची पाहूनि गुरुभक्ती । द्विजांप्रती स्वामी पुसती ।
त्यास ब्राह्मण करिता निश्चितीं । प्रायश्चित्त काय पैं असे ॥

( पूर्णानंदचरित्र, १६·२६६ )

सहजानंदस्वामींचे हे औदार्य विलक्षण आहे— तत्कालीन समाजस्थितीचा विचार करता क्रांतिकारक आहे. त्यांनी त्या यवनाला शिष्य म्हणून स्वीकारले; त्याला विवेकसिंधूंतील परमार्थरहस्य उलगडून दाखविले; आपल्या सान्निध्यात त्याच्याकडून सद्ग्रंथांचे अध्ययन करून घेतले; त्याला मृत्युंजय हे हिंदू अभिधान दिले; एवढेच नव्हे तर आपल्या परंपरेला साजेसे ज्ञानसागरानंद असे सांप्रदायिक नावही दिले आणि याही पुढे जाऊन त्याला ब्राह्मण करून घेण्याचा प्रयत्न केला. हा त्यांचा प्रयत्न कल्याणीतील तत्कालीन कर्मठ ब्राह्मण-वर्गाने कौशल्याने उडवून लावला, असे हनुमदात्मजाने दिलेल्या अद्भुत कथेवरून अनुमान निघते. हनुमदात्मजाने अशी कथा दिली आहे की, मुंतोजीला ब्राह्मण करून घेण्याची इच्छा सहजानंदांनी व्यक्त केल्यावर ब्राह्मण

मंडळींनी त्यांना असे सांगितले की, याला तीन वेळा अग्नीत घाला आणि जर तो वाचला, तर तो ब्राह्मणच आहे, असे समजावे. ब्राह्मणांच्या या अजब प्रायश्चित्तविधीतूनही मृत्युंजय हा मृत्युंजयच ठरला; परंतु मग ब्राह्मणांनी वेगळीच पळवाट शोधली —

ब्राह्मण म्हणती हे करणी । नव्हे मानवापासुनी ॥

(पूर्णानंदचरित्र, ४१·२७०)

अशा प्रकारे त्याला 'माणसा'तून उठवून देवत्वात ढकलले आणि ते सारे करंटे हात झटकून मोकळे झाले. सहजानंदांच्या इच्छेला पूर्तीचा आनंद काही उपभोगता आला नाही. मृत्युंजय सर्व प्रकारे हिंदू बनलेला असूनही त्याचे मुसलमानपण टिकून राहिले आणि कालांतराने मुसलमान समाजाने त्याच्या 'मृत्युंजयी' व्यक्तिमत्त्वाची निशाणी पुसून त्याला पुरता 'शहा मुतबजा कादरी' बनवून टाकले. आज मृत्युंजयाचे समाधिस्थान त्याच्या चरित्रस्मृती विसरून गेले आहे. कोणा एका मुसलमान अवलियाची कबर म्हणूनच मुसलमानांनी त्याच्यावर आपला वेगळा हक्क प्रस्थापित केला आहे.

**नारायणपूरचे वास्तव्य**

कल्याणीच्या सदानंद मठात जोवर सहजानंदस्वामी होते, तोवर मृत्युंजय 'मधुकरीची भाकरी' खाऊन गुर्वाज्ञा पाळीत मठाच्या द्वारी पडलेला असे. सहजानंद समाधिस्थ झाल्यावर तो नारायणपुरी रहायला गेला. कल्याणीच्या मठाच्या महाद्वारात त्याने 'ज्ञानसागरानंद पादशाही' अशी आपल्या नावाची अक्षरे कोरून एक पायरी बसविली होती, असे हनुमदात्मजाने लिहिले आहे.[३] अशी पायरी बसविण्यामागील मृत्युंजयाचा हेतू असा की –

आपुलें नांव तुडवीत जाणा । लोक जावे सहजानंदाचे दर्शना ।

(पूर्णानंदचरित्र, १६·२९४)

नारायणपूर येथे कुटी बांधून राहू लागल्यानंतरही मृत्युंजयाच्या पारमार्थिक जीवनात अनेक अद्‌भुत घटना घडल्या असाव्या. हनुमदात्मज म्हणतो की —

पुढें त्या मृत्युंजयापासून । पुष्कळ झालासे चमत्कार पूर्ण ।
तें विस्तारें लिहितां जाण । ग्रंथ वाढेल पल्हाळ ॥

(पूर्णानंदचरित्र, १६.२७५)

हनुमदात्मजाने केवळ विस्तारभयाने जे लिहायचे टाळले, ते सर्व आता कायमचे विस्मृत झाले आहे.

**स्थानिक लिंगायतांवर प्रभाव**

कल्याणी हे लिंगायतांचे मुख्य केंद्र होते.[४] मृत्युंजय कल्याणीजवळील नारायणपूर येथे राहूं लागल्यावर त्याच्या परमार्थबळाने प्रभावित होऊन अनेक लिंगायत लोक त्याच्या भजनी लागले, अशी एक कथा उद्धव चिद्घन व महीपतिबुवा यांनी दिलेली आहे.

कोणी एक भवराया नामक जंगम प्रथम मृत्युंजयाच्या प्रभावकक्षेत आला आणि त्याने मृयुंजयाचे शिष्यत्व स्वीकारले. गावातील दुसरा एक समुचय नामक जंगम या घटनेने चिडला. तो उघड उघड भवरायाची निंदा करू लागला –

म्हणे मृत्युंजय जातीचा यवन । तयासी किंचित् जाहलें ज्ञान ।
त्याचा उपदेश भवरायानें । नेणतां कैसा घेतला ॥

( भक्तविजय , ४१·५९ )

असे म्हणून त्याने भवरायाला ज्ञातिबाह्य ठरविले. हे सर्व भवरायाला व्यथित करणारे होते. त्याने हे सर्व वृत्त आपल्या गुरूला सांगितले. त्यावर मृत्युंजयाने आपल्या या नव्या शिष्याला इतकेच सांगितले की, " आपुला विश्वास करून जतन । निवांत करीं ईश्वरभजन । "

कल्याणीत काशीपती नामक एक स्थानिक जहागिरदार ( महीपतींनी त्याला ' भूपती ' म्हटले आहे. ) शिवभक्त होता. तो नित्य दहा हजार जंगमांना सत्कार-पूर्वक भोजन घालीत असे. एके दिवशी असा चमत्कार घडला की, सर्व जंगम पानांवर बसलेले असताना काशीपती स्वहस्ते त्यांना वाढू लागला तो त्याला एकाही जंगमाच्या गळ्यात लिंग दिसेना. ' शिव हरपोनी गेलीया जाण । जीव-रक्षण न करावें ॥ ' इतकी लिंगधारणाविषयीची लिंगायतांची कठोर निष्ठा असल्यामुळे, सर्वांच्याच गळ्यांतली लिंगे नाहीशी झाली आहेत, हे समजताच पंक्तींत हलकल्लोळ उसळला. काशीपती विचार करून जंगमांना म्हणाला की –

साधुपुरुषांची छळण कोणी । आला करूनि दिसताहे ॥
यालागीं तुम्हां सकळांवर । क्षोभोनि पळाला विश्वेश्वर ।

( भक्तविजय, ४१·८१–८२ )

काशीपतीच्या मुखातून असा उद्गार बाहेर पडताच समुच्चय जंगमाला आपले पाप खाऊ लागले. त्याने सर्वांसमक्ष कबुली दिली की, “ अविंधाचा शिष्य म्हणूनी । भवरायासी निंदिले ।। ” हे ऐकताच काशीपतीने सर्व जंगमांना सांगितले की, “ तुम्ही सर्वांनी मृत्युंजयस्वामीकडे जाऊन त्याची प्रार्थना करावी, म्हणजे तुम्हांस तुमची लिंगे परत मिळतील. ” त्यावर सर्व जण मृत्युंजयाच्या मठात आले आणि त्यांनी क्षमायाचनापूर्वक लिंगांची मागणी केली. मृत्युंजयाने स्मित केले आणि तो जंगमांना म्हणाला –

वेदान्त सिद्धान्त दोघे जण । आमुचे घरीं आहेत श्वान ।
त्यांनीं तुमचीं लिंगें हिरून । नेलीं असतील वाटतें ।।

मृत्युंजयाने त्या दोन्ही श्वानांना. बोलावले आणि त्यांनी गिळलेली दहा हजार लिंगे त्यांना परत करायला लावली. तेव्हापासून जंगम त्यांना ज्ञानसागर अय्या म्हणून मानू लागले.

या चमत्कारकथेचा अर्थ स्पष्ट आहे की, मृत्युंजयाच्या द्वारी वेदान्त व सिद्धान्त श्वानवत् सेवा करीत आहेत, याचा प्रत्यय आल्यावर हजारो लिंगायत अक्षरशः ज्ञानाचा सागर असलेल्या मृत्युंजयाला ‘ ज्ञानसागर अय्या ’ म्हणून गौरवाने संबोधू लागले.[५]

**नारायणपूरची समाधी**

दीर्घ काळपर्यंत परमानुभूतीच्या रंगात रंगून आणि त्या रंगाने अनेक परमार्थ-प्रवणांना रंगवून मृत्युंजयाने नारायणपूर येथेच स्वमठात समाधीचा स्वीकार केला. त्याची अंत्यक्रिया कदाचित् मुसलमानी पद्धतीनेच झाली असेल.

आज कल्याणीहून नारायणपुराला गेल्यावर गावाच्या पलीकडच्या बाजूस, वस्तीला लागूनच एका उंचवट्यावर मृत्युंजयाचे समाधिमंदिर आहे. हे स्थान आज ‘ मूर्तजा कादरी ’चा दर्गा म्हणून ओळखले जाते. ‘ दर्गेवाले ’ असे उपनाम धारण करणारे एक मुसलमान घराणे दर्ग्यासन्निध राहून मृत्युंजयाच्या समाधीची उपासना चालवीत असते. दर्गेवाल्यांना त्याची हिंदू परंपरा मान्य नाही. परंतु हिंदू त्याला आपला मानतात, सहजानंदांचा शिष्य समजतात आणि उरसात प्रामुख्याने हिंदूच उपस्थित असतात, ही वस्तुस्थिती श्री. रहिमानशा दर्गेवाले यांनी मला स्पष्टपणे सांगितली. मृत्युंजयाची पुण्यतिथी – म्हणजे मूर्तजा कादरीचा उरूस – २१ रमझान या दिवशी मुसलमानी पद्धतीने साजरी होते.

मृत्युंजयाच्या समाधीमागे त्याच उंचवट्यावर एक लहानसे शिवमंदिर आहे. त्याची उपासना हिंदूंकडे आहे. मृत्युंजयसमाधीच्या परिसरात अनेक हिंदू अवशेष विखुरलेले आहेत.

मृत्युंजयाच्या मृत्युंजयी व्यक्तिमत्त्वाची पार्थिव निशाणी ही एवढीच आहे. परंतु त्याने शब्दबद्ध करून ठेवलेली अपार्थिव अनुभूती मात्र हिंदू पारमार्थिकांनी लाख मोलाची मानून जतन केलेली आहे. त्याची जीवनकहाणी जरी अज्ञाताच्या अंधारात आज लुप्त होऊन गेली असली, तरी त्याच्या भक्तिरंजित दिव्य वाणीचा विलास विद्युल्लेखेप्रमाणे अंधाराचे हृदय चिरून झळाळत आहे.

म्हणूनच आता आपण त्याच्या चरित्राविषयीची जिज्ञासा आवरून त्याच्याविषयीच्या काही समस्यांची उकल करूं आणि नंतर त्याच्या ग्रंथसंपदेचे अंतरंग समजावून घेऊ या.

### गुरु आणि गुरुपरंपरा

मृत्युंजयाची गुरुभक्ती किती पराकोटीची होती, ते हनुमदात्मजाने सविस्तर सांगितले आहे. मृत्युंजयाचे एक गुरुबंधु पूर्णानंद यांनी तर त्याच्या गुरुभक्तीचा गौरव करताना असे म्हटले आहे की, " मेघामुळे जशी तीर्थे नावारूपास आली, तशीच गुरुभक्तिहि मृत्युंजयामुळेच प्रकाशली आहे. त्याने गुरुसेवनाचा परमादर्श परमार्थिकांपुढे ठेवला आहे. " स्वतः मृत्युंजयानेही --

जया संसाराची अप्रीति । गुरुदास्यीं प्रेमभक्ति ।
तत्त्वार्थाची श्रद्धा चित्तीं । तयासीचि हें ज्ञान ॥

( स्वरूपसमाधान, २४ )

अशा प्रकारे अनेकवार गुरुदास्याचे आणि तज्जन्य गुरुकृपेचे महिमान गायिले आहे. ' सद्गुरूचे वाक्य म्हणजे मुसावलेले ब्रह्म आहे ! ' अशा श्रद्धेने तो गुरुवचने जिवाचा कान करून झेलीत असे. गुरुकृपेच्या मेघवृष्टीने होणारा ब्रह्मसुकाळ त्याने अनुभवल्याच्या खुणा त्याच्या वाणीत पदोपदी जाणवतात. परंतु आश्चर्य असे की, ज्याप्रमाणे त्याने आपल्या चरित्राविषयी एक शब्दही उच्चारला नाही, त्याचप्रमाणे त्याने आपल्या गुरूचेही नाव नोंदविले नाही. ' सहजानंद सद्गुरुमूर्ति कल्याणीं सांगितला । ' असा त्याच्या गुरूचा स्पष्ट निर्देश उद्धव चिद्घनाने केलेला आहे. ' सहजानंद स्वामी कल्याणात । तयाचा उपदेश घेईं त्वरित । ' असे पांडुरंगाने मुंतोजीला सांगितल्याची कथा महीपतिबुवांनीही

दिलेली आहे. ‘ पूर्णानंदचरित्रा ’च्या निमित्ताने कल्याणीच्या आनंद संप्रदायाचा इतिहास लिहिणाऱ्या हनुमदात्मजाने सहजानंदांच्या सान्निध्यातील मृत्युंजयाचा दिनक्रम सविस्तर नोंदविला आहे. आनंद संप्रदायाचे प्रधान पीठ असलेल्या कल्याणीच्या सदानंद मठात आणि नारायणपूर येथील मृत्युंजयाच्या समाधि-मंदिरात या नात्यासंबंधी यत्किंचितही शंका नाही. मठस्थ परंपरा आणि मृत्युंजयाचे चरित्र लिहिणारे तीनही संतचरित्रकार यांची एकमुखी साक्ष ध्यानी घेता मृत्युंजयाचे गुरु हे कल्याणीच्या आनंद संप्रदायातील सहजानंदस्वामी होत, या बाबतीत संशय उरत नाही.

कल्याणीच्या आनंद संप्रदायात सहजानंद एकच होऊन गेले आणि ते सुप्रसिद्ध संतकवी शिवरामस्वामी कल्याणीकर यांचे परमगुरु ( पूर्णानंद नारायणांचे गुरु ) होते, असे अनेक विश्वसनीय पुराव्यांवरून दिसून येते. इ. स. च्या सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध हा त्यांचा काळ ठरतो. परंतु पूर्णानंदचरित्रकाराने सहजानंद आणि पूर्णानंद नारायण यांच्यामध्ये गैरसमजुतीने आणखी दोन नावे टाकल्यामुळे सहजानंदांचा काळ अकारण मागे नेण्याची प्रवृत्ती होते.

ईश ( शिव ) – दत्त – सदानंद – रामानंद – अमलानंद – गंभीरानंद – ब्रह्मानंद – सहजानंद – पूर्णानंद – ब्रह्मानंद – पूर्णानंद नारायण ( शिवरामस्वामींचा पिता व गुरु ) अशी परंपरा हनुमदात्मजाने ‘ पूर्णानंदचरित्रा ’च्या सोळाव्या अध्यायात दिलेली आहे. या परंपरेत सहजानंदांनंतर पूर्णानंद व ब्रह्मानंद ही दोन नावे चुकून पुनरुक्त झालेली आहेत. सहजानंदशिष्य पूर्णानंदाने रचलेल्या ‘ अवधूतगीताटीके ’चा रचनाकाल श. १५३२ असा आहे. पूर्णानंद नारायणांचे पुत्र शिवरामस्वामी यांचा जन्म श. १५४६ च्या सुमारास झाला. शिवरामस्वामी हे आपल्या पित्याचे सर्वांत कनिष्ठ अपत्य होय. शिवरामस्वामींचा जन्मकाळ लक्षात घेता श. १५३२ मध्ये अवधूतगीताटीका रचणारे सहजानंदशिष्य पूर्णानंद हे शिवरामस्वामींचे जनक व गुरु पूर्णानंद नारायण होत, हे उघड होईल. वरील ‘ अवधूतगीताटीका ’ रचणाऱ्या पूर्णानंदाने आपल्या गुरुगीताटीकेत शंकर – दत्तात्रय – सदानंद – रामानंद – अमलानंद – गंभीरानंद – ब्रह्मानंद – सहजानंद – पूर्णानंद ( गुरुगीता ५. ९७–१०० ) अशीच आपली परंपरा दिली आहे.[७] स्वतः शिवरामस्वामींनी ‘ गीताचंद्रिके ’च्या मंगलाचरणात पुढीलप्रमाणे गुरुपरंपरा दिली आहे —

ईश दत्त तथा **सदानंद** तयाचा शिष्य **रामानंद**
**निर्मलदेव** तो **गंभीर** गुरुरावो ।
**ब्रह्मआनंदाख्य सहजानंद** योगिराज **पूर्णानंद**
चित्तीं साठवा तुम्ही **सदानंद** ॥ ॥ २५ ॥

यातील अखेरचे सदानंद हे स्वतः शिवरामस्वामींचे सांप्रदायिक नाव आहे. शिवरामस्वामींच्या निकट माहितीप्रमाणे सहजानंद हेच त्यांचे परमगुरु असून, पूर्णानंद नारायणांपूर्वी पूर्णानंद व ब्रह्मानंद ही नावे पुनरावृत्त झालेली नाहीत. कल्याणीच्या आनंद परंपरेतील श्रीधरस्वामींनी आपल्या शिवलीलामृतात दिलेली परंपरा अशी—

श्रीधरस्वामी ब्रह्मानंद । आनंद संप्रदाय अगाध ।
संपूर्ण क्षीरसागरीं **गोविंद** । आधीं उपदेसी **कमळोदभवा** ॥
तेथोनि **अत्रिऋषी** प्रसिद्ध । पुढें पूर्णब्रोध **दत्तात्रय** अगाध ।
त्यापासोनि **सदानंद** । **रामानंद** यति तेथोनियां ॥
तेथोनि **अमलानंद गंभीर** । मग **ब्रह्मानंद** उदार ।
त्यावरी कल्याणीं राहणार । **सहजानंद** यति तो ॥
तेथोनि **पूर्णानंद** यति शुद्ध । त्यापासोनि पितामह **दत्तानंद** ।
पिता तोचि गुरु प्रसिद्ध । **ब्रह्मानंद** यतींद्र तो ॥

( शिवलीलामृत, १४. २०४–२०८ )

श्रीधरांचे परमगुरु दत्तानंद हे शके १५९० मध्ये समाधिस्थ झाले. पूर्णानंद नारायण हे श. १५७० मध्ये समाधिस्थ झाले. म्हणजे दत्तानंदांचे गुरु आणि सहजानंदांचे शिष्य असलेले पूर्णानंद हे कालदृष्ट्या पूर्णानंद नारायणच होत, हे उघड आहे.

आनंद परंपरेतील प्राचीन अधिकारी व्यक्तींनी नोंदविलेल्या माहितीवरून हे निश्चित होते की, पूर्णानंद नारायणांचे गुरु सहजानंद हेच असून, त्या दोघांमध्ये हनुमदात्मजाने दिलेल्या पूर्णानंद व ब्रह्मानंद या दोन व्यक्ती मुळीच झालेल्या नाहीत. पूर्णानंद नारायण हेच मृत्युंजयाचे गुरुबंधु होत.

मृत्युंजयाचे गुरु सहजानंदस्वामी हे एक महान साधु होते. मृत्युंजयाशिवाय कल्याणींतील आणखीही काही मुसलमान त्यांचे अनुयायी बनले होते, असे

' पूर्णानंदचरित्रा 'तील काही उल्लेखांवरून दिसते. वेदरच्या ब्रह्मनी घराण्यातील मुंतोजीला मृत्युंजयपदावर आरूढ करणाऱ्या, त्याला त्याच्या अंतरंग-अधिकारानुसार ' ज्ञानसागरानंद ' या नावाने भूषविणाऱ्या आणि अखेरीस त्याला अधिकृत ब्राह्मणत्व देऊ इच्छिणाऱ्या या महापुरुषाचा गौरव करावा तेवढा थोडाच आहे. सहजानंदांचे शिष्य पूर्णानंद नारायण यांनी ' गुरुगीताटीके 'च्या उपसंहारात गुरुगौरव करताना म्हटले आहे की—

तया महापुरुषाचें भजन । कराया मी नव्हें प्रमाण ।
केवळ ज्ञानाची मूर्ती जाण । निर्माण झाली कलियुगीं ॥
अवतार तरी मनुष्यदेहीं । परी शुद्ध वस्तुचि पाहीं ।
जयाचेनि दर्शनें उद्धरती कांहीं । महादोषीय सर्वथा ।

( गु. गी. ५. १०१–१०२ )

**विवेकसिंधू व सहजानंद यांचा संबंध**

मुंतोजीला पांडुरंगाने विवेकसिंधूचे पुस्तक देऊन सहजानंदांकडे जाण्याचा स्वप्नादेश दिला, या कथेतून सूचित होणारा सहजानंद व विवेकसिंधु यांचा संबंध चिंतनीय आहे. विवेकसिंधू हे गुरुशास्त्र समजावून घ्यायला सहजानंद हेच गुरू का सुचविले, याचा उलगडा सहजानंदशिष्य पूर्णानंद नारायण यांच्या गुरुगीताटीकेवरून सहज होतो. या ग्रंथावर विवेकसिंधूचा प्रभाव अतिशय आहे. सहज हाताशी आलेली काही साम्यस्थळे पुढे उद्धृत करीत आहे, त्यांवरून वाचकांना या प्रभावाची स्पष्ट कल्पना येऊ शकेल—

( १ ) म्यां आपुली वाणी । गुरुस्तुति केली निर्मळ मनीं ।
ही गुरुगीता वंदिली आमचे परंपरेनी । म्हणोनियां ॥

— गु. गी. ५.९६

मियां आपुली वाणी । पवित्र केली येहीं वचनीं ।

— वि. सिं. ७१.५६

( २ ) ते तरावया जनांसी । संस्कृताचि केली मराठी ऐसी ।
ते प्रीति पावो निश्चयेंसी । गुरुपरंपरा ॥

— गु. गी. ५.१०८

तेयालागीं मऱ्हाठीया युक्ति । केली ग्रंथरचना ।।
प्रीती पावो इहीं वचनीं । सर्वेश्वरु तो ।।

—वि. सिं. १२·१२३, १३६

( ३ ) यस्य देवे पराभक्ति । यथा देवे तथा गुरौ ही श्रुति ।
गुरुब्रह्मऐक्यस्थिती । बोलत असे ।।

—गु. गी. ५·१०९

यस्य देवे पराभक्ति । यथा देवे तथा गुरौ हे श्रुती ।
ईश्वरगुरूंसी यैक्यस्थिति । उपदेशीतसे ।।

—वि. सिं. १८·२४

( ४ ) मज निमिषोन्मेषाचा व्यापार । तेथें आइक (?)
या ग्रंथाचा विस्तार ।
परि फळला ब्रह्मनिर्धार । ज्ञानसागरानंदाचा ।।

—गु. गी. ५·११२

मज स्वासोन्मेषाचाहि श्रमु । तेथ कायेसा ग्रंथाचा उदेमु ।
परि फळला मनोधर्मु । सदैवाचा ।।

—वि. सिं. ७·१५४

( ५ ) तपातीर्थांचे डोंगर । श्रुतिस्मृतिभार ।
परि तारावया एक निर्धार । ऐके उमे गुरुसेवन ।।

—गु. गी. १·४४

तपातीर्थांचे डांगोरे । आणिक श्रुतिस्मृतींचे कामारे ।
तयाचें न उतरे अज्ञानकाविरें । येके ज्ञानेवीण ।।

—वि. सिं. १२·११८

( ६ ) मंत्रयंत्रादि उपदेशिती ते जाण । गुरु बहुवस असती ।।

—गु. गी. १·११

मंत्रयेंत्र उपदेशिते । गुरु घरोघरीं आहेति आयिते ।।

—वि. सिं. २·२७

( ७ ) पाहुणचारासी जाती । निरयपदासीं ।।

— गु. गी. १·१३

ते पाहुणे होती अविचार। निरयाचे ॥

— वि. सिं. २·२०

बारकाईने पाहू गेल्यास अशी साम्यस्थळे गुरुगीतेच्या ओवीओवीत आढळतात. या साम्यस्थळांवरून सहजानंदस्वामींचा आणि त्यांच्या परंपरेतील व्यक्तींचा विवेकसिंधूविषयींचा चिंतनजन्य श्रद्धाभाव स्पष्ट होतो. विवेकसिंधू आणि आनंद-परंपरेतील ग्रंथ यांचें भाषा व आशय या उभय दृष्टींनी तौलनिक अध्ययन केल्यास हा जिव्हाळ्याचा संबंध अधिक स्पष्ट होऊं शकेल. पूर्णानंद नारायणांचे प्रशिष्य ( श्रीधरस्वामींचे गुरु ) ब्रह्मानंद यांच्या ' आत्मप्रकाश ' या ग्रंथावरही विवेकसिंधूचा प्रभाव जाणवतो.[८] भाषा आणि कल्पना यांच्या साम्याचे हे एक उदाहरण पहा –

आपुलिया काजा भगीरथ। घेउन आला जान्हवीतें।
परी विश्व सुस्नात होतें। स्नानमात्रें करुनि ॥

— आ. प्र. १३. ६३

भगीरथाचेनि दैवयोगें। विश्व सुस्नातले गंगे।
तैसें जैतपाळाचेनि प्रसंगें। जग सुखिये होये ॥

— वि. सिं. ७०. १५६

विवेकसिंधू आणि आनंद संप्रदाय यांच्या आत्मीय संबंधाचा आणखीही एक दुवा आहे. आनंद संप्रदायाचे आदिगुरु दत्तात्रेय असल्यामुळे या संप्रदायांत गुरुगीतेचे महिमान अनन्यसाधारण आहे. पूर्णानंद नारायण, शिवरामस्वामी व आत्मानंदस्वामी या तिघांच्या गुरुगीताटीका उपलब्ध झालेल्या आहेत. गुरुगीता आणि विवेकसिंधू यांचा दृढ अंतरंग-संबंध मीं अन्यत्र साधार दाखविला आहे.[९]

तेव्हा गुरुतत्त्वाचे महिमान वाढविणारा व अद्वैत वेदान्ताची ठाशीव मांडणी करणारा मराठीतला हा पूर्वप्रतिष्ठित ग्रंथ आनंदसांप्रदायिकांना प्रिय झाला, तर त्यात आश्चर्य नाही. येथे आणखीहि एक बाब ध्यानी घेण्यासारखी आहे, ती ही की, मुकुंदराजांच्या परंपरेंतील एक श्रेष्ठ संत केशवस्वामी भागानगरकर हे मूळचे कल्याणीचेच होते.

श्री. वि अं. कानोले यांनी एका संदिग्ध प्रमाणाच्या आधारे मृत्युंजयाला मुकुंदराजांच्या परंपरेतील ठरविले आहे.[१०] त्यांनी मुंतोजी ब्रह्मणीला मृत्युंजयाहून

वेगळा ठरवून त्याला मृत्युंजयाचा शिष्य मानले आहे. त्यांच्या मते मुंतोजी हा मृत्युंजयांनी केलेल्या विवेकसिंधूच्या निरूपणाने परमार्थप्रवण झाला. सहजानंदांचा परंपरामान्य संबंध त्यांनीं साफ दुर्लक्षित केला आहे. "मृत्युंजयस्वामी हे श्रीमुकुंदमहाराजांच्या खास परंपरेतील एक प्रसिद्ध सत्पुरुष असून, मुकुंदराजांचे एक मोठे भक्त व उपासक होते. मुकुंदराजांची परंपरा चालू ठेवण्यात व त्यांचा विवेकसिंधू हा ग्रंथ महाराष्ट्रभर लोकप्रिय करण्यात मृत्युंजयस्वामींनी विशेष कामगिरी केली असावी, असे वाटते." श्री. कानोले यांची ही विधाने कोणा अनंत नामक ग्रंथकाराने रचलेल्या 'पंचीकरणा'च्या अखेरीस नोंदविलेल्या माहितीवर आधारलेली आहेत. "ही पोथी अलीकडे शे-पन्नास वर्षांखाली नकललेली आढळते. तीस जुनी म्हणता येणार नाही...ग्रंथाच्या शेवटच्या गुरु-परंपरेचा उतारा मृत्युंजयशिष्य अनंताच्या खास पंचीकरणातील आहे किंवा नंतर जोडलेला आहे, याचा बोध होऊ शकत नाही." असे श्री. कानोले लिहितात. तरीही त्यांनी याच पुराव्याच्या आधारावर मृत्युंजयाला मुकुंदराज परंपरेतील ठरविले आहे. या पंचीकरणाच्या अखेरीस असलेली माहिती अशी—

"**आदि श्रीआदीनाथु** ईश्वर श्रीहरिनाथे होम केला, त्यापासाव प्रगटला ॥ त्याचा उपदेश **श्रीहरिस्वामीस** ॥ त्याचा उपदेश **श्रीरामचंद्रस्वामीस** ॥ त्याचा उपदेश **श्रीमुकुंदराजस्वामीस** ॥ त्याचा उपदेश **श्रीगुरुमृत्युंजयराम-स्वामीस** ॥ पंढरपुरीं सगुण दर्शन भीमातीरीं देऊन विवेकसिंधूचे पुस्तक, आत्मउपासना, ब्रह्मबोध, ज्ञानोदय वरदप्रसन्न कर मस्तकीं (ठेविला) ॥"

पंढरपूर येथे मुंतोजीला विवेकसिंधूचे पुस्तक प्राप्त झाले आणि कल्याणीच्या सहजानंदांचा उपदेश घेण्याचा आदेशहि लाभला, ही पारंपरिक माहितीच वरील अनंताने दिलेल्या माहितीला जन्म देणारी आहे, हे उघड आहे. विवेकसिंधू हा ग्रंथ म्हणजे मृत्युंजयाचे 'गुरुशास्त्र' आहे आणि सहजा-नंद हेच त्याचे गुरू आहेत. सहजानंदांच्या विचारांवर विवेकसिंधूचा केवढा प्रभाव होता, हे आपण पूर्णानंदाच्या ग्रंथावरून पाहिलेच आहे. मृत्युंजयाला मुकुंदराजांच्या परंपरेत बसविणारा हा पंचीकरणकार अनंत मृत्युंजयाचा साक्षात शिष्य आहे, याची खात्री देता येत नाही. मूळ ग्रंथात "श्रीमृत्युंजया, कृपा करून मुक्ति दीजे। हे ब्रीद तुझे तूं सांभाळीं॥" या शब्दांत अनंताने

मृत्युंजयाकडे मुक्तीचे मागणे केले आहे; परंतु त्यावरून मृत्युंजय त्याचा साक्षात् गुरू असल्याचे दिसत नाही. ग्रंथाच्या शेवटी आलेल्या गुरुपरंपरेत (जी मूळची आहे की नंतर नकलकाराने जोडली आहे, याविषयी श्री. कानोले यांनाही शंका आहे,) त्याने मृत्युंजयामागे 'श्रीगुरू' हे पद जोडले आहे हें खरें; परंतु एखाद्या परंपरेतील उत्तरकालीन सर्व व्यक्ती गुरूपरंपरेतील सर्व महान व्यक्तींविषयी अशा प्रकारे श्रद्धाभाव व्यक्त करतांना दिसतात. प्रत्यक्ष आनंद परंपरेतही सदानंद, पूर्णानंद व शिवराम यांना उत्तरकालीनांनी 'श्रीगुरू' म्हटले आहे.

## विवेकसिंधू आणि मृत्युंजयाचे वाङ्मय

विवेकसिंधू हे मृत्युंजयाचे 'गुरुशास्त्र' असल्यामुळे त्याच्या गुरूचे विचार-विश्व विवेकसिंधूने कसे प्रभावित केले होते, हे आपण मृत्युंजयाचे गुरुबंधू पूर्णानंद यांच्या गुरुगीताटीकेवरून विस्तारशः पाहिलेच आहे. मृत्युंजयाला पंढरपूर येथे लाभलेला विवेकसिंधू पुढे सहजानंदांनी त्याला उकलून सांगितला, हेही आपण हनुमदात्मजाच्या आधारे पाहिले आहे. जर साधनेच्या प्रारंभकाळातच मृत्युंजयाला या ग्रंथाचे मर्म सहजानंदांसारख्या सद्गुरूच्या मुखाने ऐकायला मिळाले होते, तर त्याच्या समग्र विचारविश्वावर विवेक-सिंधूचा प्रभाव पडणे अटळ आहे. मृत्युंयाजचे ग्रंथ या दृष्टीने पाहू गेल्यास या प्रभावाच्या खुणा त्यांत जागोजाग आढळतात.

मी येथे मृत्युंजय-वाङ्मयावरील विवेकसिंधूचा प्रभाव स्पष्ट करणार आहे, तो केवळ प्रकाशित सामग्रीच्या आधारेच. त्याचे 'स्वरूपसमाधान' व 'प्रकाशदीप' हे दोन लघुग्रंथ आणि 'सिद्धसंकेत' नामक मोठ्या ग्रंथातील दुसरे प्रकरण (विहंगममार्ग) अशा तीनच कृती प्रकाशित झालेल्या आहेत.[११] मृत्युंजयाच्या समग्र वाङ्मयाचा विचार करता हे प्रकाशित वाङ्मय एक-चतुर्थांशाहूनही कमी आहे. परंतु 'जे बिंदूत तेच सिंधूत', असे समाधान मानून मी पुढे विवेकसिंधू व मृत्युंजय-वाङ्मय यांचा आत्मीय संबंध स्थूलपणे स्पष्ट करीत आहे.

प्रकाशित तीन कृतींपैकी तिसरी म्हणजे एका मोठ्या ग्रंथाचे एक प्रकरण

असल्यामुळे त्याचा विचार टाळला आहे. उरलेल्या दोनपैकी 'स्वरूपसमाधाना'त विवेकसिंधूच्या ६ व्या व १४ व्या प्रकरणांचा प्रभाव जाणवतो. परंतु 'प्रकाशदीपा'वर मात्र 'विवेकसिंधू'चा फार मोठा प्रभाव आहे. हा प्रभाव केवळ आशयापुरता मर्यादित नसून, मृत्युंजयाने मुकुंदराजांची शब्दावलीही स्वीकारली आहे.

'प्रकाशदीपा'चे पहिले प्रकरण मंगलाचरणाचे आहे; परंतु त्यातही मृत्युंजयाने मुकुंदराजांप्रमाणेच, आपली वचने ऐकून 'चंद्रचूड संतोषला' (प्र. दी. १·८; वि. सिं. १·१०), अशी ग्वाही दिली आहे. दुसऱ्या प्रकरणापासून मृत्युंजयाने मुकुंदराजांचे ऋण किती स्वीकारले आहे, त्याची ही काही उदाहरणे पहा—

(१) शरीरत्रयीं आवृत्त । अविद्या काम्यकर्मीं वेष्टित ।
जें चैतन्यें तापत्रइं संतप्त । तो शबलु त्वंपदार्थु गा ॥
(वि. सिं. ८·११)

स्थूळ सूक्ष्म कारणीं गुंतला । अविद्या काम्यकर्मीं वेष्टिला ।
संसारवशें दुऱ्हावला । तो शबळ त्वंपदार्थ ॥
(प्र. दी. २·१०)

(२) दोहींचा शबळांसु सांडीजे । घेईजे शुद्धांसु ॥
(वि. सिं. ८·१३)

दोहींचा शबळांश सांडिजे । शुद्ध लक्षांश घेईजे ।
(प्र. दी. २. १३)

(३) श्रवणीं शब्दु आईकणें । त्वचे स्पर्श भोगणें ।
नेत्रीं रूपातें देखणें । त्वत्सन्निधानेंचि ॥
जीव्हा रसातें चाखणें । घ्राणासी परीमळु घेणें ।
तुझियेचिनि परी तुज नाहीं करणें । कांहीं सत्य ॥
वाचेसी बोलणें । हातासी घेणें-देणें ।
पायांसी चालणें । तुझीयेनीचि ॥
शिष्णासी रति भोगणें । पायुसी मलोत्सर्गु करणें ।
अकर्ता तुं येणें । व्यापारें केवीं लिंपसी ॥
(वि. सिं. ९·५७–६०)

श्रोत्रें ऐकसी । त्वचेसी सुख भोगिसी ।
नेत्रीं रूप देखसी । तूंचि एक ॥
जिव्हेसीं रस चाखसी । नासिकीं परिमळा घेसी ।
या इंद्रियांसी जाणतोसी । तूंचि एक ॥
वाचे जें जें बोलणें । हातासी देणें घेणें ।
पायांसी चालणें । तुझेनीचि ॥
शिश्नें जें भोगणें । गुदासी मलोत्सर्ग करणें ।
इतुकें तुझेनीचि; परी नाहीं तुज करणें । इंद्रियव्यापार ॥
(प्र. दी. २·८८–९१)

(४) जैसें उदक बाबुलियेतें व्यालें । तेण्हेंचि तें कवललें ।
तैसें आज्ञानें आवरलें । तुझियें निजरूप ॥
(वि. सिं. १०·३२)

उदकापासूनि उठिली बाबुळी । आणि त्या उदकासीचि कवळी ।
तैसें तुज वेटाळी । अज्ञानबुद्धी ॥
(प्र. दी. ३. ३२)

(५) येऱ्हवीं कीर तेथचि अससि । नाथिलें अज्ञानें कवलिलासि ॥
मी नेणें यैसेया आज्ञानातें जाणसि । तोचि तुंवांचौनि सांवै कव्हणु ॥
(वि. सिं. १०·३१)

तुजपासी तूं अससी । नाथिल्या अज्ञानें कवळिला जातोसी ।
मी नेणें ऐसिया अज्ञानासी । जाणता तुजवांचूनि कवण ॥
(प्र. दी. ३·२७)

(६) स्थूल सूक्ष्म देहातें । आणि विपरीत ज्ञानातें ।
आज्ञानचि प्रसवलें म्हणौनि तेयातें । कारणदेह म्हणिजे ॥
(वि. सिं. १०·३३)

स्थूल सूक्ष्म देहातें । आणि विपरीत ज्ञानातें ।
म्हणौनि अज्ञानातें । कारणदेह म्हणिजे ॥
(प्र. दी. ३·३५)

मला वाटते, ' विवेकसिंधू ' व ' प्रकाशदीप ' यांचा ऋणानुबंध स्पष्ट व्हायला ही एवढी उदाहरणे बोलकी आहेत. यांशिवाय जिज्ञासूंनी ' विवेकसिंधू 'तील १०·३७, १०·४२, १०·५१, ११·५९–६१, ११·९, ११·१०–११ ही स्थळे ' प्रकाशदीपा 'तील अनुक्रमे ३·१०, ३·५९, ३·६८, ४·२९, ४·९ व ४·१० या स्थळांशी तुळून पहावी, म्हणजे त्यांना या साम्याचे व्यापक दर्शन घडू शकेल. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत ' विवेकसिंधू 'चा ' प्रकाशदीपा 'वर एवढा प्रभाव आहे की, मृत्युंजयाचा ' प्रकाशदीप ' हा ग्रंथ म्हणजे मुकुंदराजांच्या ' विवेकसिंधू 'ची संक्षिप्त आवृत्तीच आहे, असे म्हणायला हरकत नाही.

**मृत्युंजयाचे सांप्रदायिक नाव – ' ज्ञानसागरानंद '**

मुंतोजी किंवा मुतबजी या मूळ नावावरून मृत्युंजय हे संस्कृत नाव सहजानंदांनी आपल्या मुसलमान शिष्याला दिले, त्याचप्रमाणे त्याला आपल्या आनंद संप्रदायानुसार आनंद-पदान्त सांप्रदायिक नावहि दिले होते, असे सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध झालेला आहे. उद्धव चिद्घनाने आपल्या ' मृत्युंजय-चरित्रा 'त म्हटले आहे की ––

ज्याचे त्याचे जवळीं पुढतीं जयजयकारो केला ।
**ज्ञानसागर अय्या** म्हणुनी सकळीं पूजियेला ॥ २३ ॥

कल्याणी येथील लिंगायत मंडळींना मृत्युंजयाचे साधुत्व प्रत्ययास आले आणि ती त्याला ' ज्ञानसागर अय्या ' या नावाने संबोधू लागली, असे उद्धव चिद्घन म्हणतो. उद्धव चिद्घनाच्याच आधारे महीपतिबुवांनी ' **ज्ञानसागर अय्या** म्हणवूनी । नाम ठेविलें सकळांनीं । ' ( भ. वि. ४१·९९ ) असे म्हटले आहे. मृत्युंजयाला हे नाव शरणागत लिंगायतांनी दिले, असे जरी उद्धव चिद्घन व महीपतिबुवा म्हणत असले, तरी ते मर्यादित अर्थानेच स्वीकारायला हवे. कल्याणीच्या परिसरातील लोक त्याला ज्ञानसागर अय्या याहि नावाने ओळखत असतील आणि तो परिसर लिंगायतधर्म-प्रभावित असल्यामुळे ते नाव ( अय्या या लिंगायतविशिष्ट पदाने युक्त असे नाव ) त्याला लिंगायतांनीच दिले, अशी उद्धव चिद्घनाची समजूत झाली असावी, इतकेच. ते त्याचे सांप्रदायिक नाव आहे, असे त्याचे गुरुबंधु पूर्णानंद यांच्या गुरुगीताटीकेतील उल्लेखावरून स्पष्ट

होते. पूर्णानंदांनी हा ग्रंथ ज्ञानसागरानंदाच्या आग्रहावरून – त्याच्या उपयोगासाठी रचलेला आहे —

सहजानंददास । पूर्णानंद अवधूत उदास ।
ऊर्ध्वमठ परंपरामाजीं परेश । करी टीका गुरुगीतेची ॥
मज निमिषोन्मेषाचा व्यापार । तेथें आइक या ग्रंथाचा विस्तार ।
परी फळला ब्रह्मनिर्धार । ज्ञानसागरानंदाचा ॥
तयाचे उद्देशेंकरून । या ग्रंथाचें केलें मराठीक जाण ।
तें सेविती महंतजन । ब्रह्मामृत ॥
जैसीं मेघें तीर्थें आणिलीं नांवासी । तैसीं ज्ञानसागरानंदें गुरुभक्ति आणिली उजेडासी ।
जें नेटकें थोरासुरांसी । तें केलें प्रगट ॥
जैसें उजेडतां सूर्य काळिमा फांके । तैसें ज्ञानसागरानंदाचेनि गुरुभजन देखे ।
आणिका महानुभावांसी भजन लागे ऐके । गुरुसेवनाचें ॥
जैसें पुराणश्रवणें चित्त होय निर्मळ । तैसें गुरुगीतेनें पाप जळे सकळ ।
हें उद्धरावया केलें मूळ । ज्ञानसागरानंदें ॥

( गु. गी. ५·१११–११६ )

उद्धव चिद्घन आणि महीपतिबुवा यांनी दिलेले ‘ ज्ञानसागर अय्या ’ हे मृत्युंजयाचे नाव म्हणजे ‘ ज्ञानसागरानंद ’ या सांप्रदायिक नावाचेच लोकप्रिय रूप आहे, हे वाचकांना सहज समजू शकेल. पूर्णानंदांनी वर्णिल्याप्रमाणे मृत्युंजय हा किती एकनिष्ठ गुरुभक्त होता, हे ‘ पूर्णानंदचरित्रा ’त हनुमदात्मजाने सविस्तर सांगितले आहे. तसेच गुरूने दिलेल्या ‘ ज्ञानसागरानंद ’ या नावाला तो सर्वस्वी पात्र असल्याचे त्याच्या ग्रंथांच्या अंतरंगावरून स्पष्ट होते.

**बोळला सद्गुरु, ब्रह्मसुकाळ जाला**

सद्गुरूची कृपा झाल्यानंतर शहा मुंतोजी ब्रह्मणीला दुर्लभ परमपदाची प्राप्ती झाली आणि गुरुकृपेच्या सामर्थ्यापुढे इतर सर्व सामर्थ्ये व वैभवे कशी तुच्छ आहेत, हे त्याला स्वानुभवाने जाणवले.[१२]

दुर्लभ हो बाई,
परमपद दुर्लभ हो बाई !

असे तो पुनः पुनः बजावीत आहे. ऋद्धिसिद्धींचा लाभ होऊन त्रैलोक्यात ख्याती झाली, तरी ती सर्व ' मायेची महंती ' आहे; सृष्टिकर्त्या विधात्याचे सामर्थ्यहि ' मायेचा वडिवार ' वाढवण्याखेरीज अन्य काही करू शकत नाही, असे मृत्युंजयाचे स्पष्ट म्हणणे आहे.

रिद्धी वोळगल्या, सिद्धी प्रगटल्या,
त्रैलोक्यीं जाली ख्याती ।
सर्वही प्रपंच मायेची महंती
परी नेणे पदप्राप्ती ॥
सृष्टिकर्ता जरि जाला विधाता
मायेचाच वडिवारु ।
म्हणे मृत्युंजय ते खुण वेगळी
जरी भेटे सद्‌गुरु ॥

सद्‌गुरु भेटल्यावाचून परमानुभवाची ती ' वेगळी खूण ' कळत नाही, हे प्रदीर्घ काळ साधना केल्यानंतरच मृत्युंजय सांगत आहे. सद्‌गुरूचे वाक्य म्हणजे साक्षात् मुसावलेले ब्रह्मच आहे, असा प्रत्यय जिथे येतो, तोच सद्‌गुरु होय, ही खूणहि त्याने सांगून ठेवली आहे—

वोळला सद्‌गुरु ब्रह्मसुकाळ जाला ।
स्वानंदाचा ठेवा सर्वगत सांपडला ॥ धृ० ॥
सद्‌गुरूचें वाक्य म्हणिजे मुसावलें ब्रह्म ।
कळालिया हें वर्म कैंचें उरेल कर्म ॥ १ ॥
सद्‌गुरूचे चरणीं महानंद सुखावे ।
निमाली गुणसृष्टी दृष्टी चिद्रूपीं मिरवे ॥ २ ॥
ऐसें ज्याचें देणें तो सद्‌गुरु ओळखावा ।
विनवी मृत्युंजयो वारंवार आठवावा ॥ ३ ॥

' देहामाजीं आपण, कीं आपणांमाजीं देहो ? ' याचा निवाडा केवळ शब्दपांडित्याने होऊ शकणार नाही; प्रतीतीविना केवळ अनुमानाने बोलणे हे वाष्कळपणाचे लक्षण आहे आणि प्रतीति ही सद्‌गुरुकृपेवाचून अशक्य आहे, ही सत्ये मृत्युंजयाने निःशंक शब्दांत मांडली आहेत —

आनुमानिक बोलणें प्रतीतिविण ।
उदंड बोलती, परी ते नव्हे खुण ॥
जन हा भुलला आपणां नेणे ।
श्रीगुरु निवडी, ब्रह्म मुंतोजी म्हणे ॥

ज्या सद्गुरुकृपेचा मृत्युंजयाने मुक्तकंठाने वारंवार गौरव केला आहे, तिच्या बळावर रूप अरूपात समरसल्यानंतर त्याला देहीच विदेहता प्राप्त झाली; अनुतापाने भाजलेल्या आणि गुरुकृपेच्या मेघवृष्टीने भिजलेल्या हृदयभूमीत 'ब्रह्मसुकाळ' झाला; 'यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम' असे ज्या पदाचे वर्णन भगवंताने केले आहे, त्या अचल पदावर मृत्युंजय आरूढ झाला – त्याचे येणे-जाणे थांबले. हा विलक्षण अनुभव त्याने एका अभंगात मांडला आहे —

बीजें भाजुनि लाह्या करणें । तैसें आम्हां येणें जाणें ॥ १ ॥
आकारासी नाहीं ठाव । देहीं प्रत्यक्ष दिसे देव ॥ २ ॥
साखरेचा नव्हे ऊंस । तैसे आम्हां गर्भवास ॥ ३ ॥
कापूरदहनीं नुरे मसी । तैसें जालें मृत्युंजयासी ॥ ४ ॥

ही स्थिती प्राप्त झाल्यावर द्रष्टा-दृश्य-दर्शन, भोक्ता-भोज्य-भोग या त्रिपुटींचा निरास झाला, हे सांगण्यासाठी मृत्युंजयाने मार्मिक दृष्टान्त वापरले आहेत. आपणच सरोवर आहोत, आपणच त्यातला मासा आहोत आणि त्या माशावर झडप घालणारा कवडा पक्षीही आपणच आहोत, असा अद्भुत अनुभव मृत्युंजयाने सांगितला आहे. निक्षेपीचे धन मी आहे, ते काढू पाहणारा मांत्रिकही मीच आहे, मांत्रिकाच्या डोळ्यातले अंजनहि मीच आहे आणि मी-पणाचा बळी देऊनच मी ते गुप्त धन हस्तगत केले आहे – अशा शब्दांत तोच अनुभव त्याने पुनः व्यक्त केला आहे.

मृत्युंजय हा विठ्ठलाचा उपासक आहे. विवेकसिंधूसारखे गुरुशास्त्र आणि सहजानंदांसारखा सद्गुरु त्याला विठ्ठलाच्या कृपेनेच लाभला, असे त्याची चरित्रकथा सांगते. विठ्ठल हे भगवान् श्रीकृष्णाचे बालरूप आहे, ही मराठी संतांची श्रद्धा मृत्युंजयानेहि स्वीकारलेली आहे. ज्याच्या मुखी वेणु आहे, जो पांडवांचा साह्यकारी आहे, जो द्रौपदीचा कैवारी आहे, तोच आनंदमय परमात्मा पंढरीत नांदत आहे, – त्याचीच सेवा मृत्युंजय करीत आहे —

मृत्युंजय जयाची सेवा करी,
तो हा हरी !

विठ्ठल हे कृष्णाचे बालरूप आहे, या श्रद्धेमुळे सर्व मराठी संतांनी कृष्णाची बालक्रीडा भक्तिभराने गायिली आहे. मृत्युंजयालाही ते रूप प्रिय आहे. त्याच्या गोकुळातील लीलांच्या स्मरणाने या अविंध भक्ताचेहि हृदय प्रीतीने ओसंडून जाते. परंतु मृत्युंजयाला गोकुळातील त्या गोपालकाचे चिंतन करता करता सारे विश्वच गोकुळ बनल्याचा अनुभव येतो आणि त्या विराट् अनुभवाच्या धुंदीत तो गाऊ लागतो —

श्रीकृष्ण खिल्लारी गोधनें चारी ।
डोळस श्रीहरी बरवा वो ॥ १ ॥
बहु काळें घोंगडें नभाचिया ऐसें ।
गोपाळाच्या वेषें पांघुरला वो ॥ २ ॥
विरिंची-धनगरें विणियलें करें ।
तंतु चौपदरें घालुनिया ॥ ३ ॥
मृत्युंजय म्हणे विश्वरूप पांघुरलें ।
तया नांव ठेविलें घोंगडें रया ॥ ४ ॥

ब्रह्मयाने विणलेले हे विश्वरूपाचे विराट् घोंगडे पांघरणारा आणि सर्व स्थिरचर व्यापून दशांगुळे उरलेला हा ‘ डोळस श्रीहरी ’ मृत्युंजयाच्या अनुभव-विश्वात मात्र सामावला आहे. या भक्तवराशी अखंड जवळीक करताना प्रभूला परमसुखाचा लाभ होत आहे.

**कादरी बेदरी बाच्छा**

शहा मुंतोजी ब्रह्मणी हा प्रथम मुसलमानांच्या सूफी संप्रदायातील कादरी शाखेचा अनुयायी असावा, असे मानावयास आधार आहे. आजही मुसलमान लोक मृत्युंजयाचे नारायणपूरचे समाधिस्थान ‘ मूर्तजा कादरीका दर्गा ’ या नावाने ओळखतात. आत्मारामस्वामी येळेहाळीकरांनी आपल्या ‘ दासविश्रामधामा ’त ( ७·२४ ) त्याला ‘ कादरी बेदरी बाच्छा ’ असे म्हटले आहे. म्हणजे मृत्युंजय हा सूफींच्या कादरी शाखेचा अनुयायी असलेला बेदरचा बादशहा होता.

सूफी संप्रदायाच्या कादरी शाखेचा हिंदुस्थानात आलेला पहिला प्रचारक

महंमद गौस ( मृत्यु इ. स. १५१७ ) हा होय. देवगिरी येथे समाधिस्थ झालेला संत चांद बोधले हा या महंमद गौसच्याच परंपरेतला होता.[१३] मुंतोजी ब्रह्मणीला कादरी पंथाची दीक्षा देणारा सूफी साधु कोण, ते सांगता येत नाही. एवढे मात्र खरे की, बहामनी राजघराण्याच्या प्रारंभापासूनच, त्या घराण्याशी सूफी साधूंचा सतत संपर्क चालू होता. बहामनी राजघराण्याचा संस्थापक हसन गंगो बहामनी याला निजामोद्दीन अवलिया (इ. स. १२२६ – १३२५ ) या सुप्रसिद्ध सूफी साधूचा आशीर्वाद लाभला होता. सिराजउद्दीन जुनेदी या गुलबर्ग्याच्या सूफी साधूने बहामनी राजांच्या पहिल्या तीन पिढ्या पाहिल्या होत्या. तो प्रत्येक राज्यारोहणप्रसंगी हजर राहून राजाच्या कंबरेला स्वहस्ते तलवार बांधीत असे. तो या घराण्याचा राजगुरुच होता, असे श्री. सेतुमाधवराव पगडींनी म्हटले आहे.[१४] हसन गंगो बहामनीचा नातू फिरोजशहा ( इ. स. १३९६ – १४२२ ) याने ख्वाजा नसीरुद्दीन चिरागे-दिल्लीचा शिष्य ख्वाजा बंदानेवाज गेसू-दराज याला सन्मानपूर्वक गुलबर्ग्यात आणून स्थायिक केले होते. हा गुलबर्ग्यात इ. स. १४२३ मध्ये मरण पावला. इ. स. १५२६ मध्ये बहामनी राज्य मोडल्यानंतर बहामनी घराण्यातील पुरुष कोणत्या परिस्थितीत जगत असतील आणि त्यांचा कोणा सूफी साधूशी संबंध आला असेल, हे जाणून घ्यायला साधने उपलब्ध नाहीत. परंतु ज्या अर्थी मुंतोजी ब्रह्मणीचे 'कादरी' हे विशेषण आजही लोकरूढ आहे, त्या अर्थी त्याला कादरी शाखेतील कोणा सूफी साधूचा उपदेश लाभला असणार, हे उघड आहे.

मुंतोजी ब्रह्मणी हा प्रारंभी सूफी होता, हे सिद्ध करणारा एक निर्णायक पुरावा श्री. वि. अं. कानोले यांना उपलब्ध झालेला आहे.[१५] मुंतोजीचा पंचीकरणावरील ग्रंथ त्रुटित स्वरूपांत त्यांना सापडला आहे. " हिंदू व मुसलमानी धर्मग्रंथातील तत्त्वे व विचार एकच आहेत, असे या लहान ग्रंथात प्रतिपादिले आहे आणि हिंदुधर्माशी जुळतील अशी सूफी पंथातील तत्त्वे व साम्यस्थळे यांत विशद केली आहेत, " असे श्री. कानोले यांनी या ग्रंथाविषयी म्हटले आहे. मुंतोजी ब्रह्मणीने दक्खनी हिंदीत रचलेल्या या ग्रंथाचे अंतरंग त्याच्या पूर्वसंप्रदायाचे स्वरूप स्पष्ट करणारे आहे. या ग्रंथाच्या आरंभीच मुंतोजीनं आपला उदार हेतु निःसंदिग्ध शब्दांत मांडला आहे —

शाह मुतबजी ब्रह्मणी,
जिनमें नहीं मनामनी ।
पंचीकरणका खोज किये,
हिंदु - मुसलमान येक कर दिये ॥

**मृत्युंजय हे शहा मुतबजी ब्रह्मणीचेच संस्कृत नाव**

सुमारे दहा वर्षांपूर्वी श्री. वि. अं. कानोले यांनी ‘ श्रीमृत्युंजयस्वामींविषयी काही नवीन उद्बोधक माहिती ’ पुरविताना असा एक वाद उपस्थित केला आहे की, “ मृत्युंजयस्वामी व ज्या बहामनी मुसलमान राजपुरुषाशी त्यांचा संबंध आला तो— या दोन भिन्न व्यक्ती असाव्यात. ”[१६] हे मत आपण साधार बनविले असल्याचे त्यांनी म्हटले आहे; परंतु आश्चर्य असे की, त्यांनी आपल्या मताच्या पुष्टीसाठी एकहि आधार दिलेला नाही. महीपतिबुवांच्या पारंपरिक माहितीवर त्यांनी घेतलेले आक्षेप असे आहेत—

“ या कवीची रचना मराठी भाषेच्या दृष्टीने इतकी शुद्ध व सुसंस्कृत आहे व त्याचे हिंदुधर्मग्रंथांचे व वेदान्तविषयाचे ज्ञान इतके गहन व माहितीपूर्ण आहे की, हा कवि मूळचा मुसलमान असावा, अशी चुकूनहि मनात कल्पना येत नाही. उदाहरणार्थ, ‘ सिद्धसंकेत ’ या पद्मपुराणाधारे रचलेल्या ओवीबद्ध ग्रंथाची भाषा इतकी डौलदार, प्रासादिक व भरघोस आहे आणि वेदान्त-विवरण इतके अधिकारपूर्ण आहे की, त्यावरून मृत्युंजय हे मूळचे मुसलमान असावेत, असे सहसा वाटत नाही. महीपतीच्या माहितीचा आधार सोडला, तर मृत्युंजय किंवा मुंतोजी ब्रह्मणी हा यवन होता, असे कोणीहि कोठे उल्लेखिलेले आढळत नाही. ...तेव्हा महीपतीच्या सर्वच माहितीवर कितपत विश्वास ठेवावा, याची शंका वाटते. ”

श्री. कानोले यांचे हे दोन्ही आक्षेप फोल आहेत. ज्याचे ‘ हिंदुधर्मग्रंथांचे व वेदान्त विषयाचे ज्ञान गहन ’ आहे आणि ज्याच्या भाषेवरून तो मूळचा मुसलमान असल्याची कल्पना चुकूनहि मनात येत नाही, असा हा एकमेव मुसलमान संतकवी नव्हे. प्रायः सर्वच मुसलमान मराठी संतकवींचे ग्रंथ यावनी संस्कारांपासून मुक्त आहेत. आलमखान किंवा शेख सुलतान यांची पदे अन्य कोणाहि हिंदू संतांच्या पदांसारखीच आहेत. अंबरखानाच्या ‘ अंबरहुसेनी ’ या गीताटीकेत

कर्त्यांच्या नावाखेरीज कसलेच मुसलमानपण अस्तित्वात नाही. मग त्यांची नावे ही कोणा हिंदू संतांनी मुद्दाम स्वीकारलेली मुसलमानी नावे आहेत, असे का म्हणावयाचे? दुसरे म्हणजे मृत्युंजय हा वेदरच्या बहामनी घराण्यातील राजपुरुष होता, ही कल्पना केवळ महीपतींनी मांडली आहे आणि अन्य कोणीहि तसा उल्लेख केला नाही, हेही खरे नव्हे. महीपतिबुवांच्या पूर्वी उद्धव चिद्घनाने 'शहा महंमद तो ब्रमणी करि वेदरिची पाच्छाई' असे स्पष्ट म्हटले आहे. मृत्युं-जयाची मूलभूमी, गुरुभूमी व समाधिभूमी ज्या प्रदेशात आहे, त्याच प्रदेशात — विदर आणि कल्याणी-नारायणपूर या दोन्ही स्थानांपासून पाच-पंचवीस मैलांच्या परिसरात असलेल्या येळेहाळीचे आत्मारामस्वामी यांनीही आपल्या दासविश्रामधामांत (७·२४) मृत्युंजयाला 'वेदरचा बादशहा'च म्हटले आहे. कल्याणीच्या आनद संप्रदयाचा इतिहास ज्या ग्रंथात ग्रथित केलेला आहे, त्या हनुमदात्मज-कृत 'पूर्णानंदचरित्रा'त महीपतींनी दिलेलीच माहिती निःसंदिग्धपणे स्वीकारली आहे. या ग्रंथाचा कर्ता हनुमदात्मज हाहि याच परिसरातला आहे.

मी स्वतः कल्याणी व नारायणपूर या ठिकाणी जाऊन या शंकेचे निरसन करून घेतले आहे. कल्याणीच्या सदानंद मठात आणि नारायणपूरच्या दर्ग्यात यासंबंधी कसलीही शंका नाही. ज्याला मुसलमान मूर्तजा कादरी किंवा मुंतोजी ब्रमणी या नावाने ओळखतात, त्यालाच हिंदु मृत्युंजयस्वामी म्हणून ओळखतात.

श्री. कानोले यांच्या म्हणण्याप्रमाणे "मुंतोजी ब्रह्मणी हा ब्रहामनी राजपुरुष मृयुंजयस्वामींचा शिष्य असावा व त्यास वैराग्य प्राप्त होऊन जेव्हा तो पंढरपूर क्षेत्रास गेला, तेव्हा मृत्युंजयस्वामींनी केलेल्या विवेकसिंधूच्या निरूपणाने त्याची वृत्ती परमार्थप्रवण झाली असावी ... मुंतोजी ब्रह्मणी किंवा मृत्युंजय या नावाने जे ग्रंथ उपलब्ध आहेत, ते बहुधा मृत्युंजयस्वामींनीच रचले असावेत, ब्रहामनी राजपुरुषाचे नसावेत.... मृत्युंजयस्वामींच्या उपदेशाने व अनुग्रहाने हा ब्रहामनी राजपुरुष पारमार्थिक दृष्ट्या मोठ्या योग्यतेस चढला असावा व मराठीत उत्तम ग्रंथरचना करण्याइतके त्याचे मराठी भाषेचे ज्ञानहि वाढले असावे. मृत्युं-जयस्वामींनीच आपल्या ग्रंथात ब्रहमनी राजपुरुषाचा परमार्थ-अधिकार पाहून त्याचे नाव आपल्या नावाशी शिष्य म्हणून निगडित केले असावे."[१७]

श्री. कानोले यांची ही सर्व अनुमाने केवळ कल्पनाजनित आहेत. जर हिंदू

साधूच्या उपदेशाने व अनुग्रहाने हा बहामनी राजपुरुष पारमार्थिक दृष्ट्या मोठ्या योग्यतेस चढला असावा व मराठीत उत्तम ग्रंथरचना करण्याइतके त्याचे मराठी भाषेचे ज्ञानही वाढले असावे, हे श्री. कानोले यांना मान्य आहे, तर आज मृत्युंजयाच्या नावावर असलेले ग्रंथ पूर्वाश्रमी बेदरच्या बहामनी घराण्यातील राजपुरुष असलेल्या व्यक्तीचे मानण्यात अडचण कोणती उरते ? शिष्य आपल्या नावाशी गुरूचे नाव निगडित करतो; गुरूने शिष्याचे नाव निगडित करण्याचा प्रकार सहसा आढळत नाही. शिवाय मृत्युंजयाने मृत्युंजय व मुंतोजी ब्रह्मणी हे एकाच व्यक्तीचे दोन नामपर्याय म्हणून वापरले आहेत. जोडनावाच्या स्वरूपात त्याने या नावाचा कोठेच उपयोग केलेला नाही. आपल्या ' स्वरूपसमाधान ' या ग्रंथाच्या अखेरीस तर त्याने ' ब्रह्मणी मुंतोजी मृत्युंजया । वाया उपाधि या नावा-चिया । जो नव्हेचि एकदेशिया । सद्गुरुकृपें ॥ ' ( ओ. ३९१ ) अशा प्रकारे ही दोन्ही आपलीच नावे असल्याचे स्पष्टपणे प्रकट केले आहे. हेच सत्य असल्या-मुळे त्याच्या ग्रंथांत – एकाच ग्रंथाच्या वेगवेगळ्या अध्यायांत कधी मृत्युंजय, तर कधी मुंतोजी ब्रह्मणी अशी नाममुद्रा आढळते.

" बेदरचे शहास ( महंमद ) यांनी ( म्हणजे मृत्युंजयस्वामींनी ) विवेकसिंधूची पोथी दिली, " असा उल्लेख संतकविकाव्यसूचिकार चांदोरकरांनी केला आहे, एवढाच श्री. कानोले यांच्या शंकेला आधार आहे. परंतु श्री. चांदोरकर यांनी केलेला उल्लेखच मुळात निराधार असल्यामुळे त्यातून उभी राहिलेली शंका टिकू शकत नाही. चांदोरकरांनी आपल्या सूचीत मृत्युंजयाला ' ब्रह्मणी ' हे विशेषण लावून स्वतःच आपले विधान बाधित बनविले आहे.

श्री. कानोले यांना ' पंचीकरणा ' चे एक त्रुटित हस्तलिखित उपलब्ध झाले आहे.[१९] हिंदी गद्यात लिहिलेल्या या ग्रंथात कर्त्याचे नाव शहा मुतमर्जी ब्रह्मणी असे आहे. श्री. कानोले यांच्या मते हा ग्रंथ मृत्युंजयाहून वेगळा असलेल्या आणि मृत्युंजयाचा शिष्य बनलेल्या बेदरच्या शहाचा आहे. अर्थात् त्यांना तसे वाटते, म्हणूनच त्यांचे तसे मत बनले, इतकेच. मुंतोजी ब्रह्मणी हा मूळचा सूफींच्या कादरी शाखेचा अनुयायी होता, हे आपण पाहिले आहे. त्याने सहजानंदांचा बोध प्राप्त केल्यानंतर त्याला भारतीय परमार्थ-विचाराचा जो प्रथम परिचय घडला असेल, त्याची मूळच्या सूफी संस्कारांशी सांगड घालण्याचा प्रयत्न त्याच्या

हानून घडणे अत्यंत स्वाभाविक आहे. ग्रंथाचा विषय आणि भाषा पाहता मृत्युंजय अथवा मुंतोजी ब्रह्मणी याचा हा पहिलाच ग्रंथ असावा.

एवंच, मृत्युंजय या नावाने प्राचीन मराठी संतमंडळात प्रसिद्ध असलेला सत्पुरुष हा पारंपरिक माहितीप्रमाणे मूळचा बेदरच्या बहामनी घराण्यातील राजपुरुष असून, 'स्वरूपसमाधान', 'प्रकाशदीप' इत्यादी अनेक अध्यात्मग्रंथही त्यानेच रचलेले आहेत, याविषयी शंका घ्यायला एकहि सबळ कारण अस्तित्वात नाही. जन्माने मुसलमान असूनही त्याने मराठीत इतक्या श्रेष्ठ दर्जाची अध्यात्मपर ग्रंथरचना केली, ही घटना त्याच्या मोठेपणाची ग्वाही देणारी आहे—त्यात शंका घेण्यासारखे काहीही नाही.

## मृत्युंजयाचा काळ ✓

मृत्युंजयाचा काळ ठरविण्यास उपकारक असा एकही उल्लेख त्याच्या ग्रंथांत नाही. रमावल्लभदासांनी 'मृत्युंजय वक्त्रीं नाम गाय', असा त्याच्या निरंतर स्मरणभक्तीचा उल्लेख केला आहे.[२०] तदुत्तरकालीन अनेक संतनामावळयांत मृत्युंजयाला आदराचे स्थान लाभलेले दिसते. रमावल्लभदासांच्या ग्रंथरचनेचा काळ शके १५५० च्या आगे-मागे आहे. त्यावरून असे अनुमान करता येते की, शके १५५० पूर्वीच केव्हा तरी मृत्युंजय होऊन गेला असावा किंवा शके १५५० च्या सुमाराला संत म्हणून त्याची कीर्ति महाराष्ट्रभर पसरण्याइतकी त्याची पारमार्थिक प्रगती झालेली असावी.

या अनुमानाने आपल्या जिज्ञासेची पुरेशी तृप्ति होऊ शकत नाही. परंतु मृत्युंजयाचे गुरुबंधु पूर्णानंद यांच्या 'अवधूतगीताटीके'चा रचनाकाळ शके १५३२ (फाल्गुन शु. ५, सोमवार) असा असून, त्यांनी त्याच सुमाराला रचलेल्या गुरुगीताटीकेची निर्मिती मृत्युंजयाच्या आग्रहावरून झालेली आहे. पूर्णानंदांनी या ग्रंथात मृत्युंजयाचा सांप्रदायिक नावाने उल्लेख केलेला आहे. म्हणजे शके १५३२ च्या सुमारास मृत्युंजयाची गुरुभक्ति पूर्णांशाने फळास येऊन गुरुकुळात त्याला पूर्ण प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. यापूर्वीचा गुरुसान्निध्यातील दहा-बारा वर्षांचा काळ आणि त्याही पूर्वीचा बिदर येथील सुखी गृहस्थ जीवनाचा काळ हिशेबात घेतल्यास शके १५३२ च्या सुमारास तो ३५ ते ४० वर्षांचा तरी असावा. यावरून शके १४९७ ते १५७२ (इ. स.

१५७५ ते १६५० ) हा मृत्युंजयाचा काळ ठरतो. या पाऊण शतकाच्या कालावधीची दोन टोके पाच-दहा वर्षांनी मागे-पुढे झाली, तरी एवढे मात्र निर्विवाद सत्य आहे की, शके १५३२ (इ. स. १६१० ) मध्ये मृत्युंजयाला गुरुकुळात गौरव लाभला होता आणि तो गुरुबंधूंच्या प्रीतीला पात्र ठरलेला होता. नाथांच्या समाधीच्या सुमाराचा काळ ( श. १५२१ ) हा मृत्युंजयाच्या साधनेचा काळ ठरतो. त्यामुळे मृत्युंजयाला सारस्वतकारादी अनेक अभ्यासकांनी नाथसमकालीन मानले आहे,[२१] ते बरोबर नसून, तो नाथोत्तरकालीन ठरतो.

### मृत्युंजयाचा शिष्य मुधया

संतमालिकांतून मुधयाचे नाव मृत्युंजयाबरोबर सदैव आढळते. उद्धव चिद्घनाने तर 'मृत्युंजय राजयोगी। मुधयासंगीं परब्रह्म ॥' असा त्याच्या ब्रह्मरूपतेचा गौरव केला आहे.[२२] हा मुधया कोण– कुठला, ते इतिहासाला ज्ञात नाही. परंतु तो आपल्या गुरूच्या कृपेने परमपदावर आरूढ झाला होता, असे त्याच्या दोन उपलब्ध पदांवरून स्पष्ट होते.[२३] मृत्युंजयाप्रमाणेच त्याचा हा शिष्य सदैव परमभूमिकेवरच वावरत असलेला दिसतो. एका पदात त्याने तुरीयावस्थेला उत्कट आवाहन केले आहे—

येई वो तुरीये ब्रह्मभावने ।
तुझिये अवस्था मज ज्ञाननयने ॥ धृ० ॥
तुरीये, तूं सुंदरस्वरूप आनंददायिनी ।
ब्रह्मबोधें मज राहे आलिंगुनी ॥ १ ॥
तुरीये, तुझ्या सुखापुढें सुख तें नाहीं ।
च्यान्ही वाचा सिणल्या, परि न बोलवे कांहीं ॥ २ ॥
तुरीये, तूं गुणाची परमेश्वरी कैसी ।
तिघी जणी तुझिया घरां येऊं नेदिसी ॥ ३ ॥
म्हणे मुधया तुरीये, ऐक विनवणी ।
क्षण येक उन्मनीसी करी कां मिळणी ॥ ४ ॥

तुरीयेच्या परमलावण्यावर मुग्ध झालेला हा मुधया तिच्या विरहाने व्याकुळला आहे — तिला प्रेमपडिभराने मिठी देण्यासाठी त्याचा जीव आसुसला आहे. मुधयाच्या दुसऱ्या पदात तर परम अनुभूतीचा प्रकर्ष गाठलेला आहे.

सोहंसंकल्पें योगी जो मातला
ध्येय न देखे दुजें ।
आपणचि आपण बंधमोक्षातीत
सिद्ध सहजीं सहज रे ॥ १ ॥
लय लागलें स्वस्वरूपीं
स्थिरावला आपआपीं रे ॥ धृ० ॥

अशा योग्याचा अनुभव हा या पदाचा विषय आहे. स्वरूपज्ञानामुळे अखंड जागृत असलेल्या या योग्याला प्रपंच हा स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे—

स्वरूपज्ञानें चेइरा जाण
मिथ्या प्रपंचु स्वप्न वावो ।
अज्ञान, विपरीत ज्ञान कैचें तया
दृढ ब्रह्मास्मिभावो रे ॥ २ ॥

'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचा अनुभव अंतरंगात मुरल्यामुळे लाभलेला ब्रह्मानंद त्याच्या गात्रागात्रातून लीलया बाहेर फाकत आहे. स्व-स्वरूपाच्या अनुभवांत रंगलेली वृत्ती झाकून राहणे शक्य नाही, असे मुधयाचे म्हणणे आहे—

ब्रह्मानंद लीळा बाणली अंगीं
सर्व इंद्रियीं सुख फाके ।
स्वरूपीं वृत्ति रंगोनियां ठेली
तो रंग कैसेनि झांके ॥ ३ ॥
आनंद बोलत, आनंद चालत,
आनंद भोगें डोलत ।
आशापाशांसह छेदोनिया वृत्ति,
सहज स्वभावें वर्तत ॥ ४ ॥
आनंद फुंजे प्रारब्धावधि
सेखीं परम शांतु ।
म्हणे मुधया मृत्युंजयकृपें
अनुभवज्ञप्तीचा अंतु रे ॥ ५ ॥

मुधयाची ही अभिव्यक्ति 'आनंदाचे डोहीं आनंद तरंग ।' या तुकोबांच्या

अभिव्यक्तीचे स्मरण घडविणारी आहे. अखेरच्या कडव्यात तर मुधयाने ज्ञानदेवांच्या ' अनुभवामृता 'ची पातळी गाठली आहे. परमानुभवाची जाणीवही जिथे मुरते-जिरते, त्या परमशांतीची प्राप्ती झाल्यावाचून अशी दैवी शब्दकळा अवतरणे सुतराम् अशक्य आहे. केवळ या एकाच पदाने मराठी परमार्थ-वाङ्मयात मुधयाला चिरंजीवित्व लाभावे, एवढी त्याची अंतरंग-थोरवी आहे.

### ग्रंथसंपदा

मृत्युंजयाने :विपुल ग्रंथरचना केली असून, त्या रचनेपैकी बरीच उपलब्धही झालेली आहे. ' महाराष्ट्रीय संत-कवि-काव्य-सूची 'मध्ये श्री. गो. का. चांदोरकर यांनी मृत्युंजयाच्या नावावर पुढील नऊ ग्रंथ नोंदविले आहेत[२४]—

( १ ) सिद्धसंकेत प्रबंध
( २ ) अमृतसार
( ३ ) अद्वैतप्रकाश
( ४ ) प्रकाशदीप
( ५ ) स्वरूपसमाधान
( ६ ) अनुभवसार
( ७ ) गुरुलीला
( ८ ) विवेकोत्पत्ती
( ९ ) अनुभवामृत

महाराष्ट्र-सारस्वत-कार भावे यांनी आपल्या ग्रंथात ( १ ) अनुभवसार, ( २ ) गुरुलीला, ( ३ ) अमृतसार, ( ४ ) अद्वैतप्रकाश, ( ५ ) सीताबोध, ( ६ ) पंचीकरण, ( ७ ) स्वरूपसमाधान, व ( ८ ) सिद्धसंतकेप्रबंध असे आठ ग्रंथ दिले असून, " शिवाय काही पदे, अभंग, वगैरे किरकोळ रचनाही उपलब्ध आहे, " असे म्हटले आहे.[२५] म्हणजे सारस्वतकारांनी सूचीकारांच्या यादीतील केवळ ' प्रकाशदीप ', ' विवेकोत्पत्ती ' व ' अनुभवामृत ' ही नावे वगळली असून ' सीताबोध ' व ' पंचीकरण ' ही दोन नावे नवीन दिलेली आहेत.

खरे म्हणजे वरील दोन्ही याद्यांतील ग्रंथनामांत बराच घोटाळा आहे. ' अनुभवसार ' व ' अमृतसार ' ही दोन नावे दिसायला वेगळी असली, तरी त्या दोन्ही नावांनी ओळखला जाणारा ग्रंथ एकच आहे. ' सीताबोध ' हे ' सिद्धसंकेतप्रबंधा 'चे ( अथवा त्यातील दुसऱ्या प्रकरणाचे ) आणखी एक नाव आहे. तसेच ' विवेकोत्पत्ती ' हा स्वतंत्र ग्रंथ नसून, वरील यादीत न नोंदविलेल्या ' जीवोद्धरण ' नामक ग्रंथाचे ते पहिले प्रकरण आहे.

वरील दोन याद्या आणि विविध पोथीशाळांत सुरक्षित असलेली मृत्युंजयाची

हस्तलिखिते यांचा एकत्र विचार करता मृत्युंजयाच्या ग्रंथांची पुढील नामावळी आपल्या हाती येते--

| | |
|---|---|
| ( १ ) सिद्धसंकेत प्रबंध | ( ६ ) अमृतानुभव ( परमामृत, आत्मानुभव, त्रिपदाविवरण ) |
| ( २ ) अनुभवसार, अमृतसार ( अथवा ज्ञानामृत ) | ( ७ ) जीवोद्धरण |
| ( ३ ) अद्वैतप्रकाश | ( ८ ) पंचीकरण |
| ( ४ ) प्रकाशदीप | ( ९ ) गुरुलीला ( अनुपलब्ध ) |
| ( ५ ) स्वरूपसमाधान | (१०) पदे, अभंग वगैरे. |

यांपैकी मला समर्थ वाग्देवता मंदिरातून उपलब्ध झालेल्या पदांचा परिचय आपण मागे ‘ बोळला सद्‌गुरु, ब्रह्मसुकाळ जाला ’ या शीर्षकाच्या छेदकात करून घेतलाच आहे. आता आपण ‘ गुरुलीला ’ या अनुपलब्ध ग्रंथाशिवाय बाकीच्या ग्रंथांचा स्थूल परिचय करून घेऊ.

**सिद्धसंकेतप्रबध** — मृत्युंजयाचा हा सर्वांत मोठा ग्रंथ असून, त्याची नऊ प्रकरणे आणि सुमारे दोन हजार ओव्या आहेत. यातील नऊ प्रकरणांची नावे पिपीलिकामार्ग, विहंगममार्ग, मर्कटमार्ग, मनुष्यमार्ग, प्रपंचनिरसन, भेदखंडन, मतांतरांशनिरूपण, प्रारब्धयोगसंगरहाणी आणि उभयसमाधिगुरुचरणारविंदभक्ति-पूजन अशी आहेत. या नऊ प्रकरणांपैकी दुसऱ्या प्रकरणाच्या स्वतंत्र प्रती अनेक ठिकाणी आढळतात. त्या प्रकरणाला ‘ विहंगममार्ग ’ या नावाशिवाय ‘ सीताबोध ’, ‘ रामजानकीसंवाद ’ अशीही नावे दिलेली आढळतात.

तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथालयात या ग्रंथाच्या दोन पूर्ण प्रती उपलब्ध असून, त्यांपैकी माघ शु. १०, श. १७४५ मध्ये नकललेल्या एका प्रतीच्या मुखपत्रावर मृत्युंजय बादशहा आणि श्रीरामसीता यांची सुंदर चित्रे आहेत.[२६]

रामाने सीतेला केलेला उपदेश असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. “ तो पद्मपुराणीं अनुवादु । असे सिद्धसंकेत विशदु । ” असा ग्रंथविषयाचा मूलस्रोत ग्रंथकाराने नोंदविला आहे. गणेशशारदानमनानंतर मृत्युंजयाने सद्‌गुरूचे स्मरण केले आहे —

तंव आठवली अवचितीं । मनीं श्रीगुरूची मूर्ती ।
जो दिगंबर पूर्णस्थिती । ब्रह्मानंदु ॥ १·१५

या ओवीतील ' ब्रह्मानंद ' हे गुरुनाम असल्याचा संभ्रम होतो; परंतु " सद्गुरु हा ब्रह्मानंदस्वरूप आहे, " असे सांगण्याचा ग्रंथकाराचा हेतु आहे. दुसऱ्या सुप्रसिद्ध प्रकरणात श्रीराम जानकीला सांगतो —

मन-नयनां येकांत करावा । प्रेमभाव हृदयीं धरावा ।
सत्य विश्वास मानावा । निश्चयेंसी ॥
दिसेल इंदु-भास्करांचे परी । तोचि उभय दृष्टीं धरीं ।
त्यांत तूं प्रवेश करीं । निश्चळ मनें ॥
मयोरपत्रावरील डोळे । तैसीं दिसतीं जे वर्तुळें ।
तयांमध्यें जें नीळें । तें रूप माझें ॥
√ तयांत खोवोनि दृष्टी । तें अंजन सुवावें नेत्रपुटीं ।
मग उघडेल पेटी । ब्रह्मतेजाची ॥
ध्यानीं चित्त स्थिरावेल । तया अखंड तेज प्रकाशेल ।
मन तदाकार होईल । विसरलेनि देहातें ॥

( सिद्धसंकेतप्रबंध, २·४८–५२ )

**अनुभवसार** — ' अमृतसार ' अथवा ' ज्ञानामृत ' याही पर्यायनामांनी आढळणारा हा ग्रंथ ४२ ओव्यांचा आहे. आत्म्याचा निर्णय हा या लघुग्रंथाचा विषय आहे —

या देहाभ्यंतरीं । जो साक्षीभूत असे निरंतरीं ।
तोचि आत्मा तूं निर्धारीं । देहावेगळा ॥ ३ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंध । या विषयांचा मानिसी आनंद ।
तेथें साक्षी तूं परमानंद । स्वयंज्योति ॥ ११ ॥
तूं नव्हेसि नरनारी । साक्षी तूं देहाचा अंतरीं ।
तुज जन्ममरणाची भरोवरी । नाहींच जाण ॥ १२ ॥
या इतुकिया दृश्यावेगळा । द्रष्टा आत्मा तूं निराळा ।
विश्वव्यापक केवळा । सर्वा घटीं तूं ॥ १३ ॥

अशा निखळ तत्त्वसंवादानें भारलेले हे प्रकरण साधकांना मार्गदर्शक ठरणारे आहे.

**अद्वैतप्रकाश** — या ग्रंथाची चार प्रकरणे असून, ओवीसंख्या पाचशेच्या वर आहे. याची दोन हस्तलिखिते सरस्वती महाल ग्रंथालयात आहेत.[७] मृत्युंजयाने मतोजी, मंतोजी, मृत्युंजय अशा अनेक प्रकारांनी आपला नामनिर्देश केला आहे.

प्रकाशदीप — हा छोटा ग्रंथ श्री. वि. ल. भावे यांनी 'महाराष्ट्रकवी'-मधून प्रकाशित केला आहे. याची पाच प्रकरणे असून ओवीसंख्या (२४ + ११२ + ७८ + १०५ + ८० = ) ३९९ आहे. आपली ही 'प्रबंधकरणी' म्हणजे 'शब्दरत्नांची पुरवणी' आहे, असे मृत्युंजयाने प्रारंभीच म्हटले आहे. ज्याप्रमाणे 'कुसुमकळिके भांबावला भ्रमर। सुगंधरस भोगी चातुर।', त्याप्रमाणे श्रोत्यांनी ग्रंथरस चाखावा, अशी त्याची अपेक्षा आहे. समुद्रात बुडी मारून 'सुढाळ मोतियें' काढणाऱ्या पाणबुड्यांप्रमाणे श्रोत्यांनी विवेकरत्ने वेचून घ्यावी अथवा हंसवृत्तीने नीरक्षीरविवेक करून क्षीरपान करावे, असे त्याने श्रोत्यांना विनविले आहे आणि काकवृत्तीने चोच घालून 'डहुळाडहुळ' केल्यास नीरक्षीराचा 'निवाडा' करता येणार नाही, असेही बजावले आहे. ज्याने ईश्वरभक्ती केली आहे, त्यालाच या ग्रंथात रिघावा आहे, असे मृत्युंजयाचे स्पष्ट म्हणणे आहे. कारण हा ग्रंथ म्हणजे 'उपनिषदांचें सार। वेदशास्त्रांचें गव्हर। सिद्धान्तीचें बीजाक्षर।' आहे. म्हणूनच ज्याला 'गुरूचा सौरस' असेल आणि ज्याचा 'सकळशास्त्रीं अभ्यास' असेल, त्यालाच या ग्रंथाचा 'दंश' (रहस्य) जाणता येईल.

या ग्रंथाचे पहिले प्रकरण प्रास्ताविक असून, पुढील चार प्रकरणांत अनुक्रमे लिंगदेहनिरसन, स्थूलदेहनिरसन, महाकारणदेहनिरसन व तत्पदनिरसन हे विषय आहेत. मृत्युंजयाची विवेचनपद्धती किती स्पष्ट आणि नेमकी आहे, ते पुढील काही ओव्यांवरून विशद होईल —

> श्रवणीं शब्द ऐकणें। तेथें तुझेंचि जाणणें।
> तुजवीण कोणे। जाणतील गा ॥
> त्वचेचिया सुखदुःखासी। त्यातें तूंच जाणसी।
> तुजवीण परियेसी। तूं या वेगळाचि कीं ॥
> नेत्रीं रूप देखसी। नेत्रीं दिसे म्हणउनि तूंच जाणसी।
> म्हणउनि त्यासी। वेगळाचि पैं ॥
> घ्राणीं परिमळ। सुगंध दुर्गंध आणि अनिळ।
> तेथें जाणता केवळ। तूंचि कीं ॥

ऐसीं ज्ञानेंद्रियें पांची । यांसी जाणता तूंचि कीं ।
म्हणउनि वेगळेंचि । चैतन्य तूंचि ॥

( ' प्रकाशदीप ', २·६४–६९ )

**स्वरूपसमाधान** -- हा तीन अध्यायांचा लघुग्रंथ आहे. हाही ' महाराष्ट्र-कवी 'तून प्रकाशित झाला आहे. याची ओवीसंख्या ३९४ आहे. म्हणजे व्याप्तीच्या दृष्टीने हा ग्रंथ ' प्रकाशदीपा 'एवढाच आहे. प्रकाशदीपात ' ब्रह्मणी मुंतोजी ' अशी ग्रंथकाराची नाममुद्रा आहे, तर यात ' ब्रह्मणी मुंतोजी ' आणि ' मृत्युंजय ' अशा दोन्ही नावांचा वापर आहे. स्वस्वरूपाचे ज्ञान झाल्यावर त्रिपुटीचा लोप कसा होतो, ते सांगताना मृत्युंजय म्हणतो --

तयासि जाणिजे जया जाणणियानें । तें जाणणेंचि उपजे जयानें ।
तेणेंहि जाणों जातां सामावणें । होय तयांतचि ॥
सूर्यप्रकाश सूर्यातें पाहों जाये । तंव आपणचि हारपोनि ठाये ।
कां तिथें सूर्य येकला आहे । आपुलिया प्रकाशें ॥
दीपकाची किळा । पाहों निघाली आपलिया मूळा ।
तंव तेचि हारपे, सगळा । दीप उरे ॥
प्रकाशाचें प्रकाशस्फुरण । परतलिया स्वरूपीं होय जीर्ण ।
तेथें देखावें कवणें कवण । येकल्यानें ॥

( ' स्वरूपसमाधान ', २४–२७ )

हे ' वेदान्त-सिद्धान्ताचे गुज ' केवळ ' परमसात्त्विक आर्तभूत ' जनांनाच फावेल, असे मृत्युंजयाचे म्हणणे आहे.

**अमृतानुभव** — अमृतानुभव, आत्मानुभव, परमामृत, इत्यादी नावांनी प्रसृत झालेला हा ग्रंथ ज्ञानेश्वर व मुकुंदराज यांच्याशी असलेला मृत्युंजयाचा ऋणानुबंध सांगणारा आहे. तीनशेच्या आत ओवीसंख्या असलेल्या या ग्रंथात मृत्युंजयाने सच्चिदानंदपदत्रयाचे विवरण केले आहे. सरस्वती महाल ग्रंथालयात याच्या सात हस्तलिखित प्रती आहेत.[२८]

**जीवोद्धरण** — ' सिद्धसंकेता 'प्रमाणेच हाही ग्रंथ मोठा आहे. यात १३ प्रकरणे असून, ओवीसंख्या १२०० च्या वर आहे. याच्या दोन हस्तलिखित प्रती सरस्वती महाल ग्रंथालयात आहेत.[२९]

**पंचीकरण** — हा छोटेखानी ग्रंथ विवेचनात्मक नसून, त्याचे स्वरूप ' पंचीकरणपरिभाषेचा संस्कृत-फारसी कोश ' अशा प्रकारचे आहे. धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरात याची जी एक प्रत आहे,[३०] तिच्या प्रारंभी ' पंचीकरण-प्रमेय – अविंध भाषा ' असे ग्रंथनाम लिहिलेले आहे. ग्रंथाच्या अखेरीस ' इति मृत्युंजय – अज्ञानसिद्धनागेश – पृच्छानिश्चय ' असे संस्कृतात लिहिलेले असून, त्याच्यासमोर ' इति मृत्युंजयकु अज्ञानसिद्ध नागेश पुछाया हक ' असे त्याचा अविंध भाषेतील अनुवाद आहे. याची एक प्रत नांदेडच्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळात आहे,[३१] तिच्या प्रारंभी पुढील महत्त्वपूर्ण चार पंक्ती आहेत —

शाह मुतबजी ब्रह्मणी
जिनमें नहीं मनामनी ।
पंचीकरणका खोज किये
हिंदू मुसलमान येक कर दिये ।।

या पंक्तींतून मृत्युंजयाची उदार व समन्वयशील मनोवृत्ती उघड होत आहे.

धुळे प्रतीतील समाप्तिलेखात आलेली नोंद चिंतनीय आहे. त्या नोंदीवरून प्रस्तुत पंचीकरणकोश मृत्युंजयाने अज्ञानसिद्ध नागेशाच्या सान्निध्यात केला असावा, असे सूचित होत आहे. हे जर खरे असेल, तर अज्ञानसिद्ध नागेश हा मृत्युंजयाचा समकालीन ठरेल. अज्ञानसिद्धाच्या परंपरेतील महागाव मठातले आद्य पुरुष सिद्धराज तथा सिद्धानंद हे कल्याणी येथील सदानंद मठातल्या पुरुषांचे संबंधी होते आणि महागाव मठात कल्याणीच्या मठातल्या-प्रमाणेच ' विवेकसिंधू 'ची विशेष प्रतिष्ठा आहे, ही वस्तुस्थितीही मृत्युंजय व अज्ञानसिद्ध यांच्या संबंधाला पोषकच आहे.

हा ग्रंथ मृत्युंजयाच्या साधनेच्या प्रारंभकाळी तयार झालेला असावा. याची जी दोन हस्तलिखिते वर निर्दिष्ट केलेली आहेत, त्यांत दोन रकाने पाडलेले असून पहिल्या रकान्यात संस्कृत शब्द आणि त्यापुढल्या रकान्यात त्यांचे फारसी प्रतिशब्द दिलेले आहेत. उदाहरणार्थ—

| ॐ राम | बिस्मिल्ला |
|---|---|
| चहुं देहाचा उकला | चारो वजूदका खुलासा |
| १ स्थूळ देह १ | १ वाजबुल वजूद |
| १ लिंगदेह २ | १ ममकिनल वजूद |
| १ कारणदेह ३ | १ ममतनल वजूद |
| १ महाकारणदेह ४ | १ अरिफल वजूद |
| ४ | ४ |

गोदातीर इतिहास संशोधक मंडळात मृत्युंजयाच्या नावावर आणखी एक पंचीकरण असून, ते मराठी गद्यात आहे. ग्रंथाच्या आद्यन्ती कुठेच कर्त्याने आपले नाव नोंदविलेले नाही. प्रतलेखकाने मात्र पहिल्या दोन पानांच्या माथ्यावर 'मृत्युंजय' असे लिहिले आहे. त्यावरूनच हा ग्रंथ मृत्युंजयाचा असल्याचे अनुमान करायचे. या हस्तलिखिताचा लेखक 'तक्त-सिंहासन-पट्टाधिकारी देवलिंगय्या' असून, त्याने ज्येष्ठ वद्य १०, शके १७७३ या दिवशी लेखन संपविले आहे. पुढील उताऱ्यावरून ग्रंथाच्या शैलीची स्थूल कल्पना येईल —

" मुमुक्षु (विचारतो,) नित्यानित्य म्हणजे काय ॥ (नित्यानित्य) विवेक म्हणजे काय ॥ तरी नित्यानित्य विवेक म्हणजे सांगतों अईक ॥ नित्य म्हणजे आत्मा ॥ अनित्य म्हणिजे देह्यादी ॥ प्रपंचीं उदास होणें, आत्मयाकडे फिरणें या नांव नित्यानित्यविचार ॥ हें पहिलें साधन ॥ " (पृ. १)

सरस्वती महाल ग्रंथालयातील हस्तलिखिते मी नकलून मागवू शकलो नाही अथवा स्वतः जाऊन पाहू शकलो नाही. त्यामुळे प्रकाशित तीन प्रकरणांशिवाय अन्य ग्रंथांतील अवतरणे वाचकांना सादर करता आली नाहीत. परंतु प्रकाशित प्रकरणांतही सामान्यतः 'विवरिलेंचि विवरावें' अशीच मृत्युंजयाची प्रवृत्ती दिसते. पंचीकरण विचाराचा मृत्युंजयावर विलक्षण प्रभाव आहे. अर्थात् हा प्रभाव त्याच्या 'गुरुशास्त्रा'शी – म्हणजे 'विवेकसिंधू'शी सर्वस्वी सुसंवादी आहे. मृत्युंजयाच्या ग्रंथांचे एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य असे आहे की, तो कोठेही पारमार्थिक अनुभवाच्या शिखरावरून खाली उतरत नाही. एका परमोच्च पातळीवरूनच त्याचे विवेचन चाललेले दिसते. विषयाच्या सुगमीकरणासाठी

सुद्धा तो रसवृत्तीचा अवलंब करीत नाही अथवा श्रोत्यांचा अनुनय करण्यासाठीही विषयांतर करीत नाही. आशयाची स्पष्टता व दृढता आणि भाषेची असंदिग्धता त्याच्या ग्रंथांत सर्वत्र जाणवते. परंतु त्याच्या पदांत हे सर्व विशेष असूनही त्यांना एक आगळेच माधुर्य लाभलेले आहे. अत्यल्प उपलब्ध पदांच्या आस्वादनानेही रसिकांची हृदये रुंजी घालू लागतात आणि मग संशोधकांना अधिक पदांच्या उपलब्धीची उत्कंठा लागून राहते.

— असा हा एका थोर परंपरेतील थोर संतकवी केवळ मुसलमान मराठी संतकवींतच नव्हे, तर अखिल मराठी संतमंडळात मानाचे स्थान पावणारा आहे. उत्तरकालीनांनी ' महायोगी ' म्हणून त्याला गौरविले आहे, ते यथार्थ आहे.

## संदर्भटीपा

१. उद्धव चिद्घन-कृत मृत्युंजयचरित्र 'काव्यसंग्रहमालें'तील (क्र. ३७) 'महाराष्ट्रकवि उद्धव चिद्घन–कृत कवितासंग्रह'– संपादक ना. चिं. केळकर, १९०२, या पुस्तकांत (पृ. ९–११) समाविष्ट आहे.

२. या अप्रकाशित ग्रंथाचें हस्तलिखित मला श्री. किसनराव करलगी, गुलबर्गा, यांच्या सौजन्याने संदर्भासाठीं उपलब्ध झाले आहे. पूर्णानंदचरित्रकार हनुमदात्मजाचा परिचय श्री. ना. व. जोशी, विजापूर, यांनी याच हस्त-लिखितावरून घडविला आहे (पहा — 'इंद्रायणी', मार्च-एप्रिल १९६४. पृ. १३–१८).

३. मूळ पाठ 'अमृतानंद पादशाही' असा आहे. पण तो चुकून पडलेल दिसतो. कारण मृत्युंजयाचे आनंद–सांप्रदायिक नांव 'ज्ञानसागरानंद' असे आहे. कदाचित् 'अमृतानंद' हे 'मृत्युंजया' वरून साधलेले नाव असू शकेल (पूर्णानंदचरित्र, १६. २९३).

४. हे प्राचीन नगर उमरगा–हुमणाबाद मार्गावर उमरग्यापासून २३ मैलांवर रस्त्याच्या डावीकडे ३ मैल आत आहे. बसवेश्वर याच ठिकाणीं बिज्जल कलचूरीचा प्रधान होता. येथे लिंगायतांची अनेक प्राचीन पवित्र स्थाने आहेत.

५. ज्ञानसागर– 'ज्ञानसागरानंद' या सांप्रदायिक नावाचे संक्षिप्त रूप. अय्या– कानडी आदरार्थी पद.

६. अवधूतगीताटीकेचे हस्तलिखित भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, या संस्थेच्या पाठशाळेत (क्र. २१, ६४) आहे.

७. गुरुगीताटीकेची एक अपूर्ण हस्तलिखित प्रत माझ्या हस्तलिखितसंग्रहात असून, एक शिलामुद्रित प्रतही मला उपलब्ध झाली आहे.

८. 'आत्मप्रकाश'चा स्थूल परिचय प्रा. चिं. नी. जोशी यांनी 'श्रीधर : चरित्र आणि काव्यविवेचन' या ग्रंथात (पृ. १३८–१४३) घडविला आहे.

९. 'दत्त संप्रदायाचा इतिहास' : रा. चिं. ढेरे (द्वितीयावृत्ति, १९६४), पृ. २३६–२३७.

१०. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ वा, पृ. ५५–५९.
११. ही तीनही प्रकरणे महाराष्ट्रसारस्वतकार श्री. वि. ल. भावे यांनी आपल्या ' महाराष्ट्रकवी ' मासिकातून प्रकाशित केली आहेत.
१२. या छेदकात वापरलेली पदे समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, या संस्थेच्या संग्रहातील बाडांतून ( क्र. १३२, २४४, २५०, ३७३, १२०४, १७४२ ) नकलून आणविलेली आहेत.
१३. पहा — ' विविधा ' : रामचंद्र चिंतामण ढेरे, पृ. १३६–१४२, २३८–२३९.
१४. ' सूफी संप्रदाय ' : सेतुमाधवराव पगडी, पृ. ५५.
१५. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ वा, पृ. ५५–५९.
१६. तत्रैव.
१७. तत्रैव.
१८. महाराष्ट्रीय संतकविकाव्यसूची – गो. का. चांदोरकर, पृ. ८१.
१९. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ वा, पृ. ५५–५९.
२०. श्रीरमावल्लभदासांची गाथा : संपादक सु. गो. उभयकर, पृ. ५७.
२१. महाराष्ट्रसारस्वत ( आवृत्ती पाचवी ) : वि. ल. भावे, २४९.
२२. स्फुट संग्रह, भाग पहिला : वि. ल. भावे, पृ. ४.
२३. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, बाडांक १३२, ११४७.
२४. महाराष्ट्र संतकविकाव्यसूची : गो. का. चांदोरकर, पृ. ८१.
२५. महाराष्ट्रसारस्वत ( आवृत्ती पाचवी ) : वि. ल. भावे, पृ. २४९.
२६. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहातील मराठी ग्रंथांची वयाजवार यादी, भाग १ ला, वर्ग १ ला, वेदान्त विभाग, क्र. ४१६, ४१७,
२७. तत्रैव, क्र. ४, ५.
२८. तत्रैव, क्र. ३२, ३३, ३४, ६८, १४१, २०८, २०९.
२९. तत्रैव, क्र. १२७, १२८.
३०. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, बाडांक ११४२.
३१. गोदातीर इतिहास संशोधन मंडळ, नांदेड, या संस्थेतील हस्तलिखिते श्री. वि. अं. कानोले व प्रा. कुरुंदकर यांच्या सौजन्याने उपलब्ध झाली.

● ●

# हुसेन अंबरखान

**गीतागंगेत पावन झालेला यवन**

ज्ञानदेवांनी भगवान श्रीकृष्णाचे उदार आणि उदात्त तत्त्वज्ञान मराठी माध्यमातून मांडल्यानंतर ' इये मराठियेचे नगरी ' ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला आणि हिंदू समाजातील स्त्रिया, वैश्य, शूद्र यांच्याबरोबरच काही म्लेंछांनीही त्याचा लाभ घेतला. ज्ञानदेवांनी भगीरथप्रयत्नांनी गीतेतील विचारगंगेचे अवतरण या मराठी भूमीवर घडविल्यानंतर इथे तिच्या काठी महात्मतेचे मळे पिकले आणि त्या मळ्यांतील फुलाफळांच्या मधुर सुगंधाने आणि स्वादाने सह्याद्रीची शिखरे सुखावली.

याच विचारांच्या गंगेत हुसेन अंबरखानाने आपले अंतर्बाह्य जीवन शुचिर्भूत केले आणि गीतेवर मराठी ओवीबद्ध टीका लिहून गीतेविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त केली.

**अंबरखान हे घराण्याचे नाव**

अंबरखान हे हुसेन अंबरखानाच्या घराण्याचे नाव आहे. त्याने आपल्या गीताटीकेच्या प्रारंभी आपल्या पितामहाचा आणि पित्याचा उल्लेख केला आहे —

आधी अंबर अंबरखान। त्याचा पुत्र याकुत अंबरखान।
त्याचा सुत हुसेन अंबरखान। असे जगद्वंद्य ॥ १·६

यावरून अंबर अंबरखान – याकुत अंबरखान – हुसेन अंबरखान अशी त्याची कुलपरंपरा ठरते. हीच कुलपरंपरा त्याने एका संस्कृत श्लोकातही ग्रथित केलेली आहे —

याकूताम्बरखानोऽभूदम्बराम्बरखानतः।
तत्पुत्रोऽस्ति जगद्वन्द्यो हुसेनाम्बरखानराट्॥

हे अंबरखान घराणे कुठे नांदत होते, यासंबंधीची निश्चित माहिती उपलब्ध नाही. हुसेन अंबरखानाने आपली गीताटीका ज्या वर्षी रचली, त्यानंतर एक वर्षभरात कोणा बाळाजी त्रिमलाने चंजीमध्ये केलेली तिची नक्कल तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात आहे.[1] यावरून हा कवी तंजावरकडे होऊन गेला असावा, असा अभ्यासकाचा कयास आहे.

मला असे वाटते की, हे अंबरखान घराणे प्रारंभी दौलताबाद येथे निजामशाहीच्या सेवेत असावे. दौलताबाद येथे अंबरखान या नावाचा अधिकारी असल्याचे काही उल्लेख आढळतात. चिमणगाव ( जि. सातारा ) येथील दिवाकर घराण्याच्या जोसकुलकर्णपणाच्या वादाचा निवाडा दौलताबादच्या अंबरखान नामक अधिकाऱ्याने केल्याची नोंद एका सनदपत्रात आहे.[2] कारभारानिमित्त त्याचा मुक्काम खडकी ( औरंगाबाद ), इंदापूर, मायणी या गावी झाल्याचे उल्लेख त्याच कागदात आलेले आहेत. या निवाड्याचा दिवस कार्तिक व. १०, रविवार, श. १५४० हा आहे. या कागदावरून हे निश्चित होते की, दौलताबाद येथे श. १५४० म्हणजे इ. स. १६१८ च्या सुमारास अंबरखान नावाचा अधिकारी अधिकारावर होता.

सतराव्या शतकातील प्रसिद्ध संत रमावल्लभदास यांच्या चरित्रातही अंबरखानाचा उल्लेख येतो.[3] रमावल्लभदासांचे वडील अंबाजीपंत हे दौलताबादेस

अंबरखानाच्या पदरी नोकरी करीत होते, असे रमावल्लभदासांचा शिष्य राघवदास याने ' बिरुदावळी ' नामक प्रकरणात म्हटले आहे —

अवरंगाबादेपलिकडे। देवगिरी निजगड।
तो गड अति अवघड। पुरे कोड पाहतांचि ॥ ६ ॥
तेथें राजा म्लेंछयातीचा। अंबरखान प्रधान त्याचा।
त्यापाशीं सकळ कारभाराचा। व्यापार साचा अंबाजीपंतासी ॥ ७ ॥

इ. स. १६१८ च्या सुमारास अंबरखान दौलताबाद येथे अधिकारावर होता, हे आपण पाहिलेच आहे. यानंतर पंधरा वर्षांनी इ. स. १६३३ मध्ये (१७ जून रोजी) मोंगलांनी दौलताबाद जिंकून हुसेन निजामशहाला कैद केले आणि निजामशाहीचा अंत घडविला. यानंतर तीन वर्षेपर्यंत शहाजीने जुन्नर परिसरात आपल्या उद्योगाचे केंद्र बनवून निजामशाहीच्या नावाने मोंगलांना सळो कीप ळो करून सोडले होते. जुन्नरच्या पश्चिमेस तीस मैलांवर असलेल्या जीवधनच्या किल्ल्यात निजामशाही घराण्यातील मूर्तिजा नामक एक अल्पवयी राजपुत्र कैदेत होता, त्याला सोडवून शहाजीने आदिलशाही सरदार मुरार जगदेव याच्या उपस्थितीत इ. स. १६३३ मध्ये राज्याभिषेक केला. या राज्याभिषेकानंतर विजापूरकडे परत जाताना मुरारपंताने शहाजीच्या कुमकेकरिता अंबरखानाच्या हाताखाली पाचसहा हजार फौज ठेवल्याचा उल्लेख सापडतो.[४] या उल्लेखावरून असे दिसते की, इ. स. १६३३ मध्ये दौलताबाद मोंगलांच्या हाती पडल्यावर निजामशाहीचे पुनरुज्जीवन घडविण्याचा जो साहसी प्रयत्न विजापूरकरांच्या सहाय्याने शहाजीने केला, त्या प्रयत्नात अंबरखानाचेहि यथाशक्ती सहकार्य शहाजीला लाभले असावे. इ. स. १६३६ मध्ये शहाजहानने जातीने दक्षिणेत येऊन शहाजीच्या स्वप्नांचा चुराडा केल्यानंतर शहाजी विजापूरकरांतर्फे कर्नाटकात गेला. त्याच वेळी अंबरखानही शहजीबरोबर तिकडे गेला असावा, असे अनुमान केले तर ते वस्तुस्थितीस सोडून होणार नाही.

हा अंबरखान दौलताबादेस अधिकारी असतानाच त्या ठिकाणी चांद बोधले, जनार्दनस्वामी, रमावल्लभदासांचे वडील अंबाजीपंत यांसारखे साधु-सज्जन त्याच्या आश्रयाने नांदत होते— आपली परमार्थसाधना निर्वेधपणे आचरू

शकत होते. या वस्तुस्थितीवरून अंबरखानाच्या मानसिक घडणीची कल्पना करता येते. ज्याने अनेक उच्चवर्णीय हिंदूंना आपल्या पदरी ठेवले, त्यांना त्यांचे धर्माचरण मुक्तपणे करू दिले, एवढेच नव्हे तर त्यांना परमार्थसाधनेला स्वास्थ्य लाभू दिले, त्याचा पिंड पारमार्थिक असला पाहिजे आणि त्याच्या मनावर या हिंदु साधूंच्या सान्निध्याचे दृढ संस्कार झाले असले पाहिजेत.

कालदृष्ट्या विचार करता हा दौलताबादचा अंबरखान म्हणजेच गीता-टीकाकार हुसेन अंबरखानाचा पिता याकुत अंबरखान असावा.

## हुसेन अंबरखानाचा जन्मकाळ

हुसेन अंबरखानाच्या जन्मकाळासंबंधी एक अत्यंत विश्वसनीय पुरावा उपलब्ध झालेला आहे. हुसेनांबरखानाचा समकालीन असलेला तंजावरकडील एक ग्रंथकार वैद्यनाथ हा अंबरखानाविषयी परमादर बाळगणारा होता. त्याने अंबरखानाविषयीचा पूज्यभाव व्यक्त करण्यासाठी आपल्या अष्टावक्रावरील टीकेला ' सिद्धान्तचिदम्बरी ' असे नाव दिले आहे. या वैद्यनाथानेच अंबरखानाच्या जन्मासंबंधाने ' चिदंबरजयन्तीस्तोत्र ' नावाचे एक प्रकरण लिहिले आहे. या प्रकारणात ' म्लेंछ अंबरखान हा कलियुगांत देवाचा अवतार आहे, ' असे म्हटले असून, त्याचा अवतार ' शके १५२५ शुभकृत् नाम संवत्सर ज्येष्ठ शु. ११ मंगवार दिवा १७ घटिकेस सिंहलग्नीं झाला, ' अशी तपशीलवार नोंद केली आहे. शके १५४० च्या सुमारास दौलताबाद येथे अधिकारावर गाजत असलेल्या अंबरखानाचा हा पुत्र असणे कालदृष्ट्या अगदी संभवनीय आहे आणि परमार्थप्रवृत्तीच्या दृष्टीने तर तो या हुसेन अंबरखानाचा पिता शोभतो आहे, हे आपण पहिलेच आहे.

## हुसेन अंबरखानाचा गुरू कोण ?

हुसेनांबरखानाने आपल्या ग्रंथात गुरूच्या नावाचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. ग्रंथारंभी गुरुनमन करताना तो म्हणतो —

> जेथूनि हें विश्व होतें। जेथें मागुती लय पावतें।
> तया सच्चिदानंद श्रीगुरूतें। साष्टांग नमस्कारु ।। १·५ ।।

या ओवींतील ' सच्चिदानंद ' हा शब्द विशेषनामार्थी घ्यावयाचा, की सच्चिदानंदस्वरूपी या अर्थाने घ्यावयाचा, याचा निर्णय करता येत नाही.

काव्यसंग्रहकार ओकांनी त्याला केशवस्वामी भागानगरकरांचा शिष्य मानले आहे.[६] परंतु तसे मानण्यास निश्चित पुरावा नाही. केशवस्वामींचा दक्षिणेत संचार होता आणि शहा बेग, बाजीद पठाण, शकरगंज, इ. अनेक मुसलमान त्यांचे शिष्य बनले होते, हे खरे आहे. परंतु एवढा आधार आपल्याला पुरेसा ठरणार नाही. आणखी एक संदिग्ध दुवा आहे. हुसेन अंबरखानाच्या गीता-टीकेचा लेखकु कोणी नारायण नामक आहे आणि केशवस्वामींचा शिष्य संतराज याच्या ‘ चिंतानिवारण ’ या प्रकरणाचा लेखकु नारायण या नावाचाच आहे. हे दोन्ही नारायण एकच असतील, तर हुसेनांबरखान व केशवस्वामी यांचा पार-मार्थिक संबंध असण्याची शक्यता आहे. आज तरी यासंबंधी निर्णायक सांगण्याला काही आधार नाही.

**गीताटीका**

हुसेन अंबरखानाच्या गीताटीकेचा रचनाकाल असा आहे —

शके पंधरासें पंचेहातरि । विजय नाम संवत्सरिं ।
आश्विन शुद्धदशमी सोमवारिं । अंबरहुसेनी टीका संपूर्ण जाली ।। १८.८६

शके १५७५ च्या आश्विन शु. १० रोजी ही टीका पूर्ण झाली. या ओवीत ग्रंथकाराने आपल्या टीकेचे नाव ‘ अंबरहुसेनी ’ असे दिले आहे. अध्यायांच्या अंती येणाऱ्या पुष्पिकांमध्येहि ‘ इति श्रीमदंबरहुसेनविरचितायां अंबरहुसेनी-नामिकायां श्रीभगवद्गीताटीकायां .. ’ असेच नाव आलेले आहे. एके ठिकाणी त्याने आपल्या टीकेला ‘ गीताभावार्थदीपिका ’ ( १८.८४ ) म्हणले आहे, परंतु ते ग्रंथाचे नाव नसून, त्याच्या स्वरूपाचे दर्शन आहे.

ही टीका कुठे रचली, ते ग्रंथकाराने सांगितले नाही. परंतु रचनेनंतर एक वर्षाच्या आतच तिची एक प्रत चंजी ( तंजावर ) येथे उतरली गेली आहे, त्यावरून हा ग्रंथही तिकडेच रचला गेला असावा, असे वाटते. या प्रतीच्या शेवटी नकलकाराने स्वतःच्या नावाचा आणि स्थलकालाचा स्पष्ट उल्लेख केला आहे, तो असा —

“ श्रीशके १५७६ जय नाम संवत्सर दक्षिणायने शरदतौ आश्विन शुद्ध तृतीया भौमवासरी चंजीमध्ये लिहिलें ।। बाळाजी त्रिमलेन संपूर्ण ।। ”

म्हणजे ग्रंथरचनेला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी एक आठवडा ही प्रत तयार

झालेली आहे. तंजावरकडीलच एक ग्रंथकार वैद्यनाथ हा अंबरखानाचे जयंती-स्तोत्र लिहितो, यावरून अंबरखानाचा निवास त्या भागातच असावा, असे मानायला अडचण नाही. अंबरहुसेनीचा लेखकु कोणी नारायण नावाचा आहे, हे मागे सांगितलेच आहे. या नारायणाने ग्रंथसमाप्तीच्या प्रसंगी आपला नामोल्लेख केला आहे, तो असा —

हुसेनी अंबराचे कृपेनें । लिहिलें असे हें नारायणें ।
यांत शुद्ध अबद्ध विचारणें । संतजनीं ॥ १८·८५

## ' अंबरहुसेनी 'चे स्थूल स्वरूप

हुसेन अंबरखानाची ही गीताटीका जवळ जवळ समश्लोकी आहे. तिची ओवीसंख्या अवघी ८७१ आहे.

अच्युताश्रम-निवृत्तिनाथादिकीं । गीतेचिये प्रतिश्लोकीं ।
केली वोवी येकियेकी । परि श्लोकार्थ संपूर्ण नसे ॥ १·११

म्हणून आपण ही नवी टीका लिहायला प्रवृत्त झालो, असे हुसेन म्हणतो. ' भाष्य शंकराचार्यांचें । आणि व्याख्यान श्रीधरस्वामींचें ' ( १·१३ ) पाहूनच त्याने ही ' महाराष्ट्र ' भाषेतील टीका रचली आहे.

येथें न लिहिणे अव्ययार्थ । आणि संपूर्ण पदांचा अर्थ ।
विचारूनिया वाक्यार्थ । तात्पर्यार्थ लिहिजे ॥ १·१४

अशी त्याची टीकाविषयक भूमिका आहे. म्हणजेच प्रतिपदाचा अर्थ आपल्या टीकेत आला पाहिजे, असा त्याचा आग्रह नाही – त्याची दृष्टी केवळ तात्पर्यार्थाकडे आहे, गीतेचा भावार्थ समजून घेण्याकडे आहे. त्याचमुळे तो आपल्या टीकेचे वर्णन ' गीताभावार्थदीपिका ' या शब्दाने करतो.

केवळ तात्पर्यार्थ मांडण्यावरच हुसेनाचा भर असल्यामुळे तो विस्तार मुळीच करीत नाही. मुळातील आशय सरळ साध्या मराठीत मांडला की आपले उद्दिष्ट साधले, अशीच त्याची भूमिका आहे. विस्तार टाळल्यामुळे दृष्टान्तादिकांचे सौंदर्य या टीकेत अभावानेच आढळावे, हे स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ, पहिल्या अध्यायातील ' सीदन्ति मम गात्राणि... ' इत्यादि श्लोकांवरील ही टीका पहा—

गात्रें गलतीं माझीं समस्त । मुख कोरडें असे होत ।
शरीरीं कांप बहुत । आणि रोमांच होती ॥ २९ ॥

हातींहूनि गांडीव पडतें । त्वचा माझी जळते ।
उभें न ठाकवे, भोवतें । मन माझें ॥ ३० ॥
अपशकुन देखतों मी । केशवा जनार्दना स्वामी ।
मारुनि स्वजनांसि संग्रामीं । सुख तें न देखें ॥ ३१ ॥
न इच्छि शत्रुजयातें । राज्या आणि सुखांतें ।
राज्यभोगीं जीवितें । आम्हां चाड नाहीं ॥ ३२ ॥

नेमक्या मराठी शब्दांनी मूळ संस्कृत शब्दांचा अर्थ मराठीत आणण्याची कला हुसेनाला साधली आहे. पुढील एक श्लोक आणि त्यावरील हुसेनाची ओवी पाहता त्याची ही तात्पर्यार्थकला स्पष्ट दिसून येईल —

हतो वा प्राप्स्यसे स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
मेलासि तरि स्वर्ग पावसी । जितोनि तरि पृथ्वी भोगिसी ।
तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥
म्हणौनि कौंतेया ऊठिं युद्धासि । कृतनिश्चयें ॥ १·४६

या ओवीत शब्दाला प्रतिशब्द ठेवून मुळातील आशय सहजपणे – ओवीचा ओघ न बिघडविता मराठीत आणला आहे. गीतेच्या नवव्या अध्यायातील ‘ मया ततमिदं सर्वं... ’ इत्यादि श्लोकांवरील हुसेनाची टीका अल्पाक्षरा असूनही अर्थ स्पष्टपणे विशद करणारी आहे —

इंद्रियांसि अविषय स्वरूप ज्याचें । तेणें म्यां हें सर्व व्यापिलें साचें ।
माझा ठायिं राहणें सर्व भूतांचें । परि मी त्यांचा ठायीं नसे ॥ ५ ॥
भूतेंहि नाहींत माझां ठायीं । ऐसें मज ईश्वराचें आश्चर्य पाहीं ।
भूतें धरिता आणि पाळिताही । परि भूतीं माझें स्वरूप नसे ॥ ६ ॥
मी करूनियां न करीं । मी या सर्वभूतांतें धरूनि न धरें ।
ऐसी असंगपणाची चातुरी । पाहें अर्जुना ॥ ७ ॥
अखंड आकाशीं असे वारा । थोर सर्वत्र करी येरझारा ।
परि आकाश न स्पर्शे धनुर्धरा । कधींहि जैसा ॥ ८ ॥
तैसीं सर्वही भूतें । माझा ठायीं आहेति निरुतें ।
परि न स्पर्शती मातें । असंग म्हणौनि ॥ ९ ॥

या एवढ्या वानगीवरूनहि हुसेन अंबरखानाच्या प्रस्तुत गीताटीकेचे स्वरूप

स्पष्टपणे समजून येऊ शकेल. त्याने पूर्वसूरींच्या गीताटीका – संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांतील टीका पाहिल्या आहेत; संस्कृत भाषेचा त्याचा व्यासंग चांगला आहे; मराठी साधूंच्या चिरसहवासात त्याने वेदान्ताची परिभाषा उत्तम रीतीने अवगत केलेली आहे आणि त्याचमुळे काव्य आणि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टींनी तो काही नवीन देऊ शकला नसला, तरी स्वतःला जाणवलेला आणि परमार्थसाधनेत मार्गदर्शक ठरलेला गीतेचा तात्पर्यार्थ इतरांना सुगमतेने समजण्याची सोय त्याने आपल्या या टीकेने करून ठेवली आहे.

### हुसेन अंबरखानाचा आत्मगौरव

आपण ही टीका ' निका ब्रह्मबोध ' व्हावा म्हणून लोकांच्या उपकारार्थ रचीत आहोत, असे हुसेन म्हणतो ( १·१० ). बहुतेक सर्वश्रेष्ठ मराठी संतकवी आपला महान अधिकार लपवून श्रोत्यांपुढे विनयाने बोलतात; परंतु हुसेन अंबरखानाने मात्र आत्मगौरवाची परमावधी गाठलेली आहे. तो आपणास ' वदान्यांचा शिरोमणी । ब्रह्मज्ञानियांचा मुकुटमणी ' ( १·८ ) असे म्हणवून घेतो. ग्रंथारंभी दोन वेळां ( १·६, १२ ) त्याने स्वतःला ' जगद्वंद्य ' हे विशेषण लावून घेतले आहे. संतवाङ्मयाच्या अभ्यासकांना हा आत्मगौरव खटण्याकसारखा असला, तरी वेदान्ताचा अभ्यास करून संस्कृत गीतेचा मराठी अवतार घडविणारा हा मुसलमान तुम्हां-आम्हां मराठी जनांना वंद्य वाटण्याइतका मोठा खचित आहे. ग्रंथारंभी --

> भेदाभेदाचा आग्रह उदंड । तोचि विघ्नसमूह प्रचंड ।
> तयातें नाशिता जो वक्रतुंड । तया नमस्कारु ॥ १·१

असे गणेशवंदन करणारा हा मुसलमान साधू धार्मिक क्षेत्रातील भेदाभेदांच्या आग्रहाचा नाश करून अद्वैताच्या अधिष्ठानावर उभा आहे.

# संदर्भटीपा

१. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहातील मराठी ग्रंथांची वयाजवार यादी : भाग पहिला, वेदान्त वर्ग, अनुक्रमांक ४९, वर्ग क्रमांक ३७४. ( अनुक्रमांक ५०, ५१, ५२ अशी आणखी तीन हस्तलिखिते 'अंबरहुसेनी'चीच आहेत. ) प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी 'मराठी संशोधन-पत्रिके'च्या ऑक्टोबर १९५४ च्या अंकात 'अंबरहुसेनी'चे पहिले दोन अध्याय आणि जानेवारी १९६३ च्या अंकात नवव्या व अठराव्या अध्यायांतील एकेक उतारा मुद्रित केला आहे.

२. सनदापत्रांतील माहिती : संपादक – पुरुषोत्तम विश्राम मावजी व द. ब. पारसनीस. पृ. ६२.

३. श्रीरमावल्लभदासांची गाथा : संग्राहक – सुव्राव गोपाळ उभयकर. पृ. २२ ( पृ. २९४ च्या पुढील पृष्ठांपैकी ).

४. मालोजी व शहाजी : वासुदेव वामन खरे. पृ. २२.

५. सरस्वती महाल ग्रंथसंग्रहातील मराठी ग्रंथांची वयाजवार यादी : भाग पहिला, वेदान्त वर्ग, अनुक्रमांक १२३, पृ. ३८.

६. सत्कार्योत्तेजक सभा सुवर्णमहोत्सव ग्रंथ : संपादक गणेश शंकर देव, धुळे. पृ. २५५.

वर्ग : भाग. स्थलप्रत
क्रमांक ६३८८८ दि: ९।८५
९८८८ नों: दि: ३।३।८९

ग्रंथालय
दा: क्र: १८२७

## अलमखान

**विंध्याद्रीच्या पलीकडून**

भारतातील संतांनी भारतीय एकात्मतेचा पाया दृढ केला आहे. या संतांच्या एकात्म एकरस संस्कृतीला जातींचे, धर्मांचे, प्रदेशभिन्नतेचे, लिंगाचे, वयाचे, विद्वत्तेचे वा अन्य कसलेही बंधन नाही. या उदार आणि समन्वयशील परंपरेच्या शिल्पकारांत वडवाळसिद्ध नागनाथ या सत्पुरुषाचे स्थान विशेष आहे. नागनाथांचे चरित्र गूढतेच्या आवरणात गुंडाळले गेले असले, तरी त्यांचा वारसा सांगणाऱ्या व्यक्तींत हिंदूंबरोबर मुसलमान आहेत ; वीरशैवांबरोबर वैष्णव आहेत आणि पारमार्थिकांबरोबर शाहीरही आहेत. नागनाथांच्या कृपेला पात्र झालेल्या भाग्यवंतांतील अलमखान हा मुसलमान साधू मूळचा महाराष्ट्रीय नाही. विंध्याद्रीच्या पलीकडून तो दक्षिणेत आला आणि नागेशांच्या

कृपास्पर्शाने पावन होऊन मराठी मातीत विरून गेला. त्याची मराठी कविता त्याच्या उदार हृदयाची साक्षिणी बनलेली आहे.

अलमखानाच्या चरित्राचे एकमेव साधन म्हणजे भानजी त्रिंबक देशपांडे या नागेश-सांप्रदायिकाने श. १७७० मध्ये रचलेला ‘ नागेशलीलामृत ’ हा ग्रंथ. या ग्रंथाच्या ३९ व्या अध्यायात अलमखानाचे चरित्र स्थूलपणे वर्णिले आहे. याकडे माझे मित्र डॉ. पंडित आवळीकर यांनी एक परिचायक लेख लिहून प्रथम लक्ष वेधले.[१] भानजी त्रिंबकाला उपलब्ध झालेल्या पारंपरिक माहितीनुसार —

> विंध्याद्रीपैलप्रदेशीं । अलंखान महापूरवासी ।
> चवघे बांधव सुखेंसी । माजीं गुणरासी धाकुटा हा ॥ ४० ॥

विंध्याद्रीच्या पलीकडे असलेले महापूर नामक गाव हे अलमखानाचे मूलस्थान. चौघा भावांत हा धाकटा होता आणि सर्वांचा लाडकाही होता. परंतु असे असून-ही ‘ सदा वर्ते उदासीन । प्रपंचामाजी नाहीं मन ’ अशी त्याची वृत्ती प्रारंभा-पासूनच होती. प्रपंचाकडे त्याचे मुळीच लक्ष नसताही त्याचे बंधू त्याच्याविषयी यत्किंचितही दुजाभाव दाखवीत नसत. भावजयाही त्याचे पुत्रवत् संगोपन करीत.

एकदा त्याची थोरली भावजय डोक्यावर घडा घेऊन पाणी भरायला गेली होती. अलमखान रस्त्यात तीर मारण्याचा खेळ खेळत होता. भावजय पाणी घेऊन परत घराकडे येत असता अलमखानाचा तीर चुकून तिच्या माथ्यावरच्या घड्याला लागला —

> घटालागीं छिद्र पडलें । हें अलंखानें विलोकिलें ।
> म्हणे अवचित वाईट जालें । मनीं मानिलें खेदकारी ॥ ५१ ॥
> कीं हे आतां बंधूसी । काय सांगेल न कळे कैसी ।
> कदापि न राहूं या स्थळासी । ऐसा मानसीं उदासला ॥ ५२ ॥

अलमखानाच्या विरक्त मनःपिंडाला घडा फुटल्याचे निमित्त पुरेसे झाले आणि तो घर सोडून जायला निघाला. भाऊ-भावजयांनी त्याची नाना प्रकारे समजूत घालण्याचा प्रयत्न केला; गृहस्थाश्रमात राहूनही परमार्थ साधता येतो, हे पटविण्याचा आटापिटा केला; परंतु अलमखानाने सकल मोहांचा त्याग कर-ण्याचा निर्धारच केला होता. ‘ आम्हां ब्रह्मचाऱ्यासी । वैराग्य योग्य वनप्रवासीं ।

राहावें तुम्हीं सुखेंसी ।' ( ५९ ) असें सांगून अलमखानाने घर सोडले आणि दक्षिणेची वाट धरली —

> असो निघोनि उदास । अलेखा आला दक्षिणेस ।
> येके वनीं सावकाश । अति हर्षें पहुडला ॥ ६० ॥

**कल्याणीच्या नृपतीची भेट**

अलमखान दक्षिणेत येऊन एका वनात कंद-मूळ-फळांवर निर्वाह करून राहू लागला, असे भानजी त्रिंबकाने म्हटले आहे. हे वन बहुश: महाराष्ट्राच्या सीमे-जवळील कर्नाटकातल्या सुप्रसिद्ध कल्याणी ( बसवकल्याण ) नगरापासून जवळच असावे. अलमखान या वनात राहत असताना एकदा कल्याणीचा कोणी राम नामक एक जहागिरदार ( भानजी त्रिंबक त्याला 'रामनृपती' म्हणून संबोधतो.) तेथे ससैन्य मृगयेसाठी आला. एवढ्यात त्या रामाला परचक्राने वेढले आणि त्याचा पराभव केला. अलमखान हे सर्व दुरून पहात होता. रामावर झालेला अन्याय त्याला सहन झाला नाही. त्याने आपल्याजवळचा तीरकामठा सरसावला आणि —

> तो यवनकुलावंतस । दुरूनि पाहे तयास ।
> दीनदयेचेनि उल्हासें । परचक्रास भिडतसे ॥ ६६ ॥
> हस्तलाघव अलोलिक । बाणें भेदिले सकळ लोक ।
> महावीर पाहोनि रणमंचक । सुखी निःशंक पहुडले ॥ ६७ ॥

अलमखानाचा हा पराक्रम पाहून राम राजा मंत्रमुग्ध झाला आणि त्याने आपणास शत्रूच्या मगरमिठीतून सोडविले म्हणून राजाचे मन कृतज्ञतेने भरून आले. राजाने त्याची भेट घेऊन त्याला अधिकार देऊ केला; परंतु अलमखानाने 'नरसेवा' करण्यास नम्रपणे नकार दिला. अधिकार अर्पण करण्यात राजाचा भाव सेवा घेण्याचा नसून सेवा करण्याचाच होता —

> भूपें ऐसें ऐकून । म्हणे सेवेचें नाहीं कारण ।
> मी तुमची सेवा करीन । भयत्राता जाण तूं होसी ॥ ७० ॥

राजाच्या या भावनेला मान देऊन अलमखान त्याच्याबरोबर कल्याणीला गेला. राजाने त्याला सन्मानाने ठेवून घेतले. परंतु त्या सर्व वैभवातही अलमखान उदासीनतेनेच विचरण करीत होता. विरक्तीने त्याची हृदयशुद्धी होत होती

आणि त्या शुद्ध हृदयाच्या सिंहासनावर आरूढ होण्यासाठी त्याचा नियत सद्‌गुरू उत्कंठित झाला होता. तो अमृतक्षण लौकरच उदय पावला.

### सद्‌गुरूचे प्रथम दर्शन

कल्याणी येथे राजाने दिलेल्या निवासात राहत असताना अलमखानाचे भाग्य उदित करणारी एक अद्‌भुत घटना घडून आली —

> येकटा असता अलंखान । तेथे संन्यासरूप घेऊन ।
> प्रगटला नागेश निधान । दैदीप्यमानस्वरूप ।। ७३ ।।
> यवन उठिला पाहोनी । वेगळे बैसवी सन्मानुनी ।
> म्हणे जी निवास कोणे स्थानीं । कोणें कारणीं आगमन ।। ७४ ।।
> मी नीच यवन जाती । आपण चतुर्थाश्रमी आहेती ।
> मज दासावरी कृपा निगुती । करून दिलेंती दर्शन ।। ७५ ।।
> इच्छा असेल आपुले मनीं । ते सांगा मजलागुनी ।
> देईन छास्यादि करूनी । इच्छित वचनीं तोषवावें ।। ७६ ।।

एक हिंदू संन्यासी आपल्या निवासस्थानीं आला आहे, असे पाहताच अलमखानाला आश्चर्य वाटले. तो लगबगीने उठला आणि त्याने त्या संन्याशाला सन्मानपूर्वक ‘ वेगळे ’ बसविले. आपण यवन असूनही हिंदू संन्याशाने आपण-होऊन आपल्या घरी यावे आणि दर्शनसुख द्यावे, याचे त्याला खरोखरच नवल वाटले.

अलमखानाच्या प्राथमिक प्रश्नांना उत्तरे देताना संन्याशाने सांगितले की, वडवाळ[२] हे माझे स्थान आहे. तुझ्याकडून मला काहीही नको आहे. परंतु जर—

> तुवां ईश्वरपरायण । केलेंसि काव्य पावन ।
> तरी तूं पावसी समाधान । हेचि खुण सांगों आलों ।। ७८ ।।

स्वामींच्या या बोलण्याने अलमखानाचे हृदय भरून आले. स्वामींना ‘ भक्तिरंगरंगी अमोल ’ अशी ‘ मनःसंकल्पाची शाल ’ द्यावी, या इच्छेने तो आत गेला. इतक्यात स्वामी नाहीसे झाले. बाहेर येऊन द्वाररक्षकांना तो विचारू लागला, तर त्यांनी उत्तर दिले की, ‘ जर कोणी आत आलेच नव्हते, तर जाणार कुठून ? ’ मग अलमखानाला स्वामींचे खरे रहस्य उलगडले. वडवाळक्षेत्री गेल्या-वाचून आपले परम श्रेय आपल्याला गवसणार नाही, हे त्याने तत्काळ ओळखले

आणि राजाने त्याच्या दिमतीस दिलेल्या परिवारासह तो वडवाळकडे निघाला.

### अक्षय वाणले समाधान

वडवाळक्षेत्री आल्यावर अलमखानाने ग्रामस्थांकडे चौकशी केली की, 'आपल्या गावी कोणी संन्यासी आहे काय ?' ग्रामस्थांनी उत्तर दिले --

देउळीं संन्यासी पुसतां । तरी कोणी नाहीं तत्त्वता ।
साई गोसावी स्वामी, दैवता । येक नागनाथावीण नाहीं ॥ ८५ ॥

ग्रामस्थांच्या या उत्तराने अलमखानाच्या मनात स्वच्छ प्रकाश पडला. 'स्वामी देईल दर्शन । तेव्हां उठेन येथोनी' असा निग्रह करून त्याने गावातल्या मंदिरात ठाण मांडले. त्या रात्री असा चमत्कार झाला की, त्याचा 'मुख्याश्व' ( मुख्य घोडा ) गुप्त झाला. या चमत्काराने अलमखान उमजला की, ही सद्गुरूने केलेली संपूर्ण वैराग्याची आज्ञाच आहे. त्याने रामराजाला पत्र पाठवून सर्व परिवार व सरंजाम परत केला —

प्रपंच परमार्थ दोनी । साधावे येके ठिकाणीं ।
यासी समर्थ पाहिजे प्राणी । पूर्वीं येक करणी जनकाची ॥ ८९ ॥
तेवीं कैसेंनि लाघव । पावती अल्पमानव ।
यास्तव येक वैराग्य बरवं । दुजा उपद्रव न सोसे ॥ ९० ॥
ध्यानमंदिरीं मनदीपिका । प्रपंचवातयोगें देखा ।
चंचळ होय वोढी अनेका । स्थिर अलोलिका न होय ॥ ९१ ॥
अनेक वोढीवातेवीण । ठेऊं मंदिरीं दीपमन ।
हेंचि मज बरवें साधन । वाटलें पूर्ण राजेंद्रा ॥ ९२ ॥
यास्तव आपुलें सर्व कांहीं । परत केलें पावेल पाही ।
ऐसें लेहोन तये समयीं । सेवक सर्वही पाठविले ॥ ९३ ॥

अशा प्रकारे संपूर्ण संगरहित बनून अलमखानाने स्वामींचे अखंड ध्यान चालू ठेवले. अखेरीस 'पूर्ण सद्भक्त पाहून । दयाघन संतोषला !' —

पूर्वीप्रमाणें संन्यासी । होऊनि भेटला भक्तासी ।
सुख जाहलें असमसासी । ब्रह्मांडकुशीं न समाये ॥ ९४ ॥
नागेश वैद्यराजें मग । दूर करूनि मायारोग ।
दिव्यौषधी कृपा सुरंग । देवोनि निरोग पै केला ॥ ९५ ॥

संन्यासीरूपेंकरून । समाधानी केला अलंखान ।
अक्षय आणलें तें समाधान । न्यूनपूर्ण न होय ॥ १६ ॥

**मुगळी गावी निवास**

अलौकिक असे ' गुरुरायाचें देणें ' लाभल्यावर अलमखानाला ' मुगळीकडे विहरण करी ' अशी सद्गुरूची आज्ञा झाली. या आज्ञेत मुगळीच्या माहात्म्याचा संकेत आहे. अलमखान मुगळीस जाण्यापूर्वीच नागनाथ संप्रदायाच्या दृष्टीने मुगळीची प्रसिद्धी झालेली होती. मुगळीचा भागूजी कुलकर्णी [3] हा नागनाथांचा भक्त होता. तो अनन्य भक्तीमुळे मुगळीहून वडवाळला दर्शनासाठी नेहमी येत असे. एकदा असाच दर्शन घेऊन वडवाळहून परत जात असताना मार्गात त्याला तस्करांनी नागविले. त्याने त्या अगतिक स्थितीत नागनाथाचा धावा केला. भक्तवत्सल नागेश एका स्वाराच्या रूपाने त्या ठिकाणी प्रकटला आणि त्याने त्या भक्तपीडक तस्करांना शासन करून भागूजीला घोड्यावरून मुगळीस पोचविले. आपणास साहाय्य करणाऱ्या स्वाराचे स्वागत करावे, असे भागूजीला वाटत होते; परंतु भागूजी घरी पोचताच तो स्वार अदृश्य झाला. भागूजीने ओळखले की, हा स्वार म्हणजे साक्षात् सद्गुरू नागेशच होय. त्याने मग नागेशदर्शनासाठी अनुष्ठान मांडले. अकरा दिवसपर्यंत अन्नपाण्यावाचून काढल्यानंतर नागनाथाने त्याच स्वाराच्या रूपात भागूजीला पुनर्दर्शन दिले —

असो भागोजीलागोन । नागनाथ बोलती वचन ।
तुजें सन्निधीं आहे जाण । न लगे येणें वडवळेतें ॥ ३९ ॥
तुजे द्वारापुढें प्रमीत । खाणी वेगें खर्गतीर्थ ।
माजीं लिंग निघेल अद्भुत । अर्ची त्वरित मद्रूप ॥ ४० ॥

नागेशमुखातून हे सर्व ऐकून भागूजीला परमानंद झाला. त्याने घरापुढील खर्गतीर्थात खणले तो वडवाळक्षेत्रातल्याप्रमाणेच एक लिंग तिथे प्राप्त झाले. भागूजी भक्तिपूर्वक त्या लिंगाची पूजा करू लागला. साक्षात् नागनाथच मुगळी येथील लिंगात वास करीत आहे, याचा अनुभव अनेक भक्तांना येऊ लागला. त्यामुळे मुगळीची प्रसिद्धी वाढू लागली. ' मुगळीकडे विहरण करी, ' असा अलमखानाला गुर्वादेश प्राप्त झाला, तो मुगळीच्या या पूर्वप्रसिद्धीशी सर्वस्वी सुसंगत आहे.

मुगळी हे गाव उमरगा – हुमणाबाद रस्त्यावर उमरग्यापासून अवघे आठ मैल दूर आहे. त्या भागात मुगळी या नावाची अनेक गावे आहेत. परंतु प्रस्तुत मुगळीला ‘ जाजर मुगळी ’ असे नाव आहे. ही जाजर मुगळी कल्याणीपासून पंधरा-वीस मैलांच्या अंतरावर आहे. याचा अर्थ असा की, अलमखान विंध्याद्रीच्या पलीकडून दक्षिणेत आल्यानंतर ज्या कल्याणी नगरीत त्याचा प्रथम निवास घडला, तिथेच त्याला वडवाळच्या नागनाथ सिद्धाची देवतुल्य प्रसिद्धी कळली आणि त्याच्या मनात भक्तीचा अंकुर रुजला. वडवाळला जाऊन नागनाथांचा साक्षात्कार आणि परमबोध प्राप्त केल्यानंतर अलमखान पुनः कल्याणीकडेच आला — आपल्या पूर्वपरिचित भागातील एका नागनाथक्षेत्री आला आणि तिथे राहून स्वानंदसुखाचा अनुभव घेत राहिला. या मुगळी-निवासात त्याच्या पारमार्थिक अधिकाराची ख्याती सर्वत्र पसरली; परंतु त्याचे ज्ञातिबांधव मात्र त्याचा राग करू लागले.

### अलमखान आणि दस्तगिराचे फकीर

अलमखान हा एका हिंदू सिद्ध पुरुषाचा भक्त बनून त्याची भजने गात आहे, ही वस्तुस्थिती त्याच्या मुसलमान बांधवांना रुचली नाही. त्या वेळी बिदर-कल्याणी भागात सूफींच्या कादरी नामक उपपंथाचे अनुयायी वावरत होते. अलमखानापूर्वी कल्याणीजवळच्या नारायणपूर गावी समाधिस्थ झालेला मृत्युंजय-स्वामी अथवा शहा मुंतोजी ब्रह्मणी हा मूळचा कादरी शाखेतील सूफी होता, हे आपण पहिल्या प्रकरणात पाहिलेच आहे. मृत्युंजयाच्या मुसलमान बांधवांनी कालांतराने त्याचा आनंद संप्रदाय पुसून टाकून त्याला पुनश्च ‘ मूर्तजा कादरी ’ कसे बनविले, तेही आपण पाहिले आहे. हे कादरी शाखेतील सूफी महाराष्ट्रात एकनाथपूर्व काळापासून वावरत होते. शेख महंमद श्रीगोंदेकराचा पिता सय्यद राजे महंमद हा कादरी पंथाचाच अनुयायी होता. त्याचे शिष्य आणि जनार्दन-स्वामी व शेख महंमद यांचे गुरु चांद बोधले हेही कादरीच होते आणि मलंगवेशाने वावरत होते. या कादरी शाखेतील फकिरांना ‘ पीर – ई – दस्तगीर ’ अशी संज्ञा असल्याचे डॉ. पंडित आवळीकरांनी ‘ डिक्शनरी ऑफ इस्लाम ’च्या आधारे ( पृ. ११८ ) दाखवून दिले आहे.[४] हे दस्तगिराचे फकीर अलम-खानाला छेडू लागले —

दस्तगिराचे फकीर । तिहीं छेडिलां भक्तवर ।
तयांसि म्हणे गुरुकिशोर । चरणीं साचार काय त्याला ॥ १०५ ॥
येरू बोलती तातडी । 'दस्तगिराची आहे वेडी ' ।
भक्त म्हणे, 'तुमची भूषण वेडी । वेडी चोखडी वेगळी ते ॥ १०६ ॥
देहाभिमानाचे चरणीं । विवेकवेडी सदृढपर्णी ।
घालिजे बेडी सुदेखणी । येर ते भूषणीं दांभिक ॥ १०७ ॥
देहाभिमान गळाला । हे मज आतां दावा कळा ' ।
म्हणोनि चमत्कार सहज केला । भक्तें स्वलीला तये वेळीं ॥ १०८ ॥
बेडी अग्नींत घालून । पुढें केली तप्त करून ।
म्हणे, 'घाला देहाशा सोडून ' । ऐकतां वचन बोलती ते ॥ १०९ ॥
'आम्हांलागीं घाला म्हणतां । तुम्हीच घालून दावा आतां ' ।
अलखान जाला घालिता । वेडी तत्त्वता आपुले पाईं ॥ ११० ॥

अलमखानाची ही देहातीत अवस्था आणि त्याच्या भक्तीचे सामर्थ्य अनुभवताच ते दस्तगिराचे फकीर लज्जित झाले आणि त्यांनी 'धन्य नागेश नि धन्य अलमखानाच्या भक्तीची नवाई !' असे उद्गार काढले.

### करळी येथे महासमाधी

अलमखानाला मात्र अशा घटना नको होत्या. कारण—

आपुलें व्हावें महात्म । ऐसी इच्छा अनुत्तम ।
महत्त्वयोगें उपाधि परम । समाधि उपरम टिकों नेदी ॥ ११३ ॥

म्हणूनच त्यानें 'पूर्णसमाधी ' घेण्याचे निश्चित केले आणि मुगळीकरांना सांगितले की, 'मला तुम्ही समाधीसाठी भूमी द्यावी.' भाविक मुगळीकरांना याचा विषाद वाटला. त्या महाभक्ताचा वियोग सहन करणे त्यांना अशक्य होते. म्हणून त्यांनी भूमी देण्याच्या बाबतीत मुद्दामच विलंब लावला. अलमखानाला विलंब नको होता. त्याचे हृदय परमानंदसेवनाने तृप्त होते–परिपूर्ण होते. त्याला आता काही साधायचे नव्हते. देहाचा अडसर दूर सारून नागेशस्वरूपी विलीन व्हायला तो समुत्सुक झाला होता. आणि म्हणून मुगळीकरांना न कळविता —

देहाशेवीण भक्त । करळी क्षेत्रासी गेला त्वरित ।

अगजी महाराज वसे तेथ । अनंतचैतन्यशिष्य तो ॥ ११६ ॥
तयाजवळी समाधी । आपुली करी सुखाब्धी । ..

मुगळीपासून जवळच असलेल्या करळी गावी नागेशसंप्रदायी अगजी-महाराजाच्या समाधीशेजारी अलमखानाने समाधी घेतली.

अनंतचैतन्य[३] हा एका वणिक् स्त्रीला नागनाथांच्या आशीर्वादाने झालेला पुत्र. पुढे तो नागनाथाचा शिष्य झाला आणि स्वेच्छया सर्वत्र विहरण करू लागला. या विहरणकालात बऱ्हाणपूर ( ता. अक्कलकोट ) येथे अगजी नामक एका वणिक्पुत्राने अनंतचैतन्याचे शिष्यत्व पत्करले. अनंतचैतन्याची समाधी बऱ्हाणपूर येथेच आहे. काही काळाने अगाजीने आपल्या परमार्थबळावर 'गुरुसमत्व' प्राप्त केले आणि गुर्वाज्ञेने तो 'अचळवेट' या ठिकाणी येऊन स्थिरावला आणि अखेर तिथेच समाधिस्थ झाला —

पवित्र स्थळ तें अचळवेट । म्हणसी ऐसें आहे कोठं ।
तरी तें सागतों ऐक स्पष्ट । श्रवणीं निकट मन ठेवी ॥ २९. १०० ॥
मुळूज तरमूड चोखट । ग्राम यांमाजी अचळवेट ।
तेथें स्थिरावला ज्ञानसुभट । अगजी अवीट योगिया ॥ १०१ ॥
अचळवेटीं उत्तम । करळी नामें जालें ग्राम ।
करळीनाथासी निःसीम । भक्त परम भजताती ॥ १०५ ॥

हे अचळवेट मुळूज आणि तरमूड या दोन गावांच्या मधे आहे. ही एक टेकडी आहे. टेकडीच्या पायथ्याशी करळी गाव आहे आणि त्या गावात करळीनाथाचे स्थान आहे. या गावाला आज कारळे म्हणतात. उमरगा-हुमणाबाद रस्त्यावर उमरग्यापासून अवघ्या सहा मैलांवर, सडकेच्या डावीकडे एक मैल आत हे गाव आहे. सडकेपासूनच कारळ्याची टेकडी आणि तीवरील अगजीअप्पाचे समाधिमंदिर दिसू लागते. टेकडी फारशी उंच नाही. टेकडीच्या माथ्यावर समाधिमंदिराच्या आवाराला सर्व बाजूंनी तट बांधलेला आहे. या आवारातच अगजीअप्पाच्या समाधिमंदिराच्या उजवीकडे निंबाच्या शीतल छायेखाली अलमखानाच्या समाधीचा भला मोठा चौथरा आहे. सहृदयांना आजही त्या समाधि-चौथऱ्यात अलमखानाच्या आत्म्याचे चैतन्यमय स्फुरण जाणवल्यावाचून राहणार नाही.

### मुगळी येथील प्रसादसमाधी

समाधीसाठी भूमी द्यायला आपण विलंब लावला, म्हणून तो महासाधू आपल्याला सोडून करळी येथे समाधी घ्यायला गेला, याचे मुगळीकरांना अतीव दुःख झाले आणि आपल्या हातून साधूच्या आज्ञेचा भंग झाला याचे भयही वाटले. त्याच सुमारास मुगळीत सर्वत्र सर्प निघू लागले. हा सर्व आपल्या हातून घडलेल्या साधूच्या अवज्ञेचाच परिणाम आहे, असे जाणून मुगळीकरांनी अलमखानाची भक्तिभराने प्रार्थना केली. एवढ्यात असा चमत्कार झाला की, मारुतीच्या मंदिरातून एक महाभुजंग निघाला आणि जिथे अलमखान वसत असे, त्या ठिकाणी जाऊन गुप्त झाला. मुगळीकरांना त्या संकेताचा अर्थ समजला. त्यांनी लगेच त्या जागी अलमखानाची प्रसादसमाधी उभारली. कारळे – मुगळी भागात अलमखानाविषयीचा भक्तिभाव आजही दिसून येतो. शे-दीडशे वर्षांपूर्वी त्या भागात अलमखानाची परंपरा नांदत होती, असे त्याच भागातील समर्थसंप्रदायी साधू आत्मारामस्वामी येक्केहाळीकर यांच्या ' दासविश्रामधामा 'तील उल्लेखा-वरून दिसते —

कीर्तन केलें हो मुगळी गांवीं । श्रोते मिळाले विरक्त निःस्पृही ।
अलमखानबावाचे सांप्रदाई । ज्या बावासि नागोबा उपदेशिलें ॥
खानजी कष्टतां तो शुद्धहृदयी । नसरुद्दीन नागोबा भाळे गोसावी ।
लयलक्षयोगी जाला अनुभवी । मंडळी त्याची तैसीच ॥

( दासविश्रामधाम, १२१·१०७–१०८ )

[ नागोबा म्हणजे नागनाथ. नसरुद्दीन हे नागनाथाचे मुसलमानी नाव आहे. ]

### स्वानंदाचा लोट

अलमखानाला जे ' नागेश गुरूचें देणें ' लाभले, ते त्याने स्फुट पदांतून व्यक्त केले आहे. त्याने रचलेली शेकडो पदे मुगळी–कारळे भागातील काही भाविकांच्या संग्रहात आहेत, असे मला महागाव मठाचे विद्यमान अधिपती श्रीमाणिकमहाराज यांनी सांगितले. परंतु त्या व्यक्तींना मी भेटू शकलो नाही. खुद्द महागाव मठातील नित्योपासनेत अलमखानाच्या ज्या पदांना स्थान लाभले आहे, अशी आठ-दहा पदे श्रीमाणिकमहाराजांनी उतरून दिली; तसेच मोहोळच्या कुरडेमहाराजांनी छापलेली नागेश परंपरेतल्या साधूंची जी पदे आहेत,

त्यांत अलमखानाची दोन पदे आहेत; दासविश्रामधामात दोन पदे आहेत आणि समर्थ वाग्देवता मंदिर व भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थांच्या संग्रहातून उपलब्ध झालेली चार-सहा पदे आहेत.[६] या सर्व माध्यमांतून उपलब्ध झालेल्या पदांपैकी पुनरुक्त पदे वगळता अलमखानाची एकूण पंधरा पदे माझ्या हाती लागली आहेत. त्या पदांच्या द्वारा अलमखानाचे अनुभवविश्व आपल्याला न्याहाळावयाचे आहे.

यवनकुळात जन्मास आलेला हा संत वाक्सिद्धीसाठी शारदेला ‘जननी’ आणि ‘वेदमाता’ म्हणून तिच्या चरणी कृपाप्रेमाची याचना करीत आहे —

अवो शारदे जननी वेदमाता ।
तुझे स्मरण-कीर्तनीं गीत गातां ॥
अलमखान म्हणे आरंभासि येईं ।
आपुले कृपेचें मजला प्रेम देईं ॥

अलमखानाने समर्थ रामदासांप्रमाणे आपल्या मनाशी संवाद केला आहे. ‘नावरे आवरितां’ अशा मनाने संकल्प-विकल्पांची मायानगरी रचून भल्या-भल्यांना कसे भुलविले आहे, याचा अलमखानाला स्वानुभवाने प्रत्यय आला आणि मग तो मनाचे ‘माहात्म्य’ गाऊ लागला —

मन हा बहुरंगी । चालक तिहीं जगीं ॥
संकल्प-विकल्प करी मन । चेष्टवि विषयालागी ॥
मनें छळिले सिद्ध संन्यासी । नाथपंथी मुनि-योगी ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । नाचती मनासंगी ॥
मनें आपणांतें परतुनी पाहिलें । मग झाला बैरागी ॥...

आणि म्हणूनच अलमखान आपल्या मनाला बजावीत आहे की —

अलमखान म्हणे विनंती ऐक मना ।
गुरुचरणीं लाग वेगीं ॥

गुरुचरणांचा आश्रय घेतल्यावर जीवनाचे लक्ष्य दिसू लागले आणि भ्रांत होऊन भलत्याच वाटेने केलेल्या प्रवासातील यातना जाणवू लागल्या. या बदलाची जाणीव अलमखानाने अत्यंत आर्तपणाने आपल्या मनाला दिली आहे —

जननीजठरापोटीं, येतां जातां जालों कष्टी ।

जन्ममरणासी नव्हे तुटी रे मना ॥
आत्मज्ञानावीण कांहीं, आणिक साधन नाहीं ।
निजतत्त्व जाणूनिया राहीं रे मना ॥
लक्ष चौऱ्यांसीचे फेरीं, नाना योनी भोगिल्या जरी ।
तें दुःख तुज नाठवे अंतरीं रे मना ॥

सद्गुरूने जन्ममरणाचा फेरा चुकवून चिरंतनतेच्या पदावर स्थिर केल्यानंतर अलमखानाला गुरुविषयक कृतज्ञतेचे भरते आले. 'पूर्ण केली मज दया' आणि 'पाहतां निरसली माया', म्हणून 'आतां कुरवंडीन काया', असे तो म्हणत आहे. 'काशी आम्हांसी गुरुमूर्ति', एवढे त्याला गुरूचे माहात्म्य वाटते; एवढेच नव्हे तर 'गुरूप्रती नाहीं थोर । निश्चयें निर्धार ॥' अशी गुरूची सर्वोपरी महात्मता तो उद्घोषित करतो. गुरुकृपेने कोणते स्थित्यंतर घडले, त्याचे वर्णन अलमखान असे करतो —

मजला सांगितलें निज । ब्रह्मांडींचें बीज ॥
तें तों प्रकाशलें सहज । समाधीचें गुज ॥
मज मी माघारा मुरडलों । अंतरसाक्षी जालों ॥
स्वरूप आपुलें देखिलों । तटस्थ होउनि ठेलों ॥
निश्चय त्राणलें बिकट । मन केलें निकट ॥
होती परवस्तूची भेट । जन्मा पडली तूट ॥
निजरूप कोंदलें चिद्घन । ब्रह्मवरी परिपूर्ण ॥
अखंड अविनाश निर्वाण । आहे पुरातन ॥

गुरूने 'चौ मुक्तींवरला पंथ' दाखवल्यावर 'अलमखानाचे भाग्य उदित झाले.' गुरूने 'मस्तकीं हस्तक ठेवितांचि चिद्रूप कोंदलें.' आणि मग त्याने नयनांत ज्ञानांजन घातलें —

ज्ञानांजनें केला नयनीं प्रकाश स्वयंज्योती ।
अंतर्बाह्य लखलखाटीं उजळल्या दीप्ती ॥
चिदादित्य उगवला तिमिरें फाकती ।
अनंत कोटी सूर्य चमकुनियां राहती ॥

हे गुरुरायाचे आगळे देणे ज्याला प्राप्त झाले आहे, त्याच्या गुरुभक्तीला

अपार भरते येत राहिले, तर त्यात आश्चर्य नाही. गुरुविषयी किती आणि काय बोलू, असे अलमखानाला झाले आहे. त्याने गुरूला ओवाळण्यासाठी पंचतत्त्वांची पंचारती सिद्ध केली आहे. तिच्यात पंचवीस वाती ठेवल्या आहेत आणि अविद्येचे घृत घालून त्या पाजळल्या आहेत. अशी ही 'सहजाची आरती' सहज भावाने ओवाळताना तो म्हणतो —

ओवाळूं आरती नागनाथा श्रीगुरुनाथा ।
भावें शरण आलों चरणीं ठेविला माथा ॥

सद्‌गुरुप्रमाणेच त्याने संतांचा महिमाही उत्कटतेने गायिला आहे. जशी आपणाला 'कृपा नागेशाची' लाभली, तशीच 'संगत घडली संतांची !' असे त्याने म्हटले आहे. 'साधुसंतांची अगाध लीला' वर्णिणाऱ्या एका पदात त्याने योग्यांच्या निर्लेप जीवनाचा गौरव केला आहे —

योगी दग्धपटापरी । वर्तती संसारीं ।
असोनि निर्विकारी । विरक्त रे ॥
उदकामाजी वसे । कमळणीपत्र जैसें ।
जीवनीं अलिप्त असे । वेगळें रे ॥
मंडळीं असे भानु । घटीं बिंबला दिसे पूर्ण ।
तंव तो न लिंपे जाण । येकला रे ॥
तैसा देहीं आत्मा आहे । । सर्वां घटीं व्यापक पाहे ।
व्यापोनि निराळा राहे । नातळे रे ॥

स्वतःला लाभलेल्या या 'निर्लेप' अवस्थेला अलमखान 'नागेशप्राप्तीची खूण' म्हणतो. संतांच्या अनुभवाची गूढता केवळ संतच जाणू शकतात, हा भाव त्याने एका पदात कूट पद्धतीनें व्यक्त केला आहे —

संतांची खूण संतचि जाणती ।
येरां न पडे ठावें रे ॥
वेडियांच्या जरी गांवा गेल्या ।
ज्ञान कवणें सांगावें रे ॥
आंधळयानें आंधळयास डोळा जो घातला ।
तेथें कोणें तें पहावें रे ॥

पांगळांचा जरी मिळाला पोहा ।
तेथें मार्ग कोणें लंघावा रे ॥
मुकियानें जरी स्वप्नचि देखिलें ।
तरी काय बोलीं बोलावें रे ॥
वांजेच्या पुत्राचा विवाह होतो ।
आले चित्रींचे भूपाळ सर्व रे ॥
अलमखान म्हणे तेथें कांहींच नाहीं ।
तेंचि आपण व्हावें रे ॥

आता शेवटी आपण अलमखानाच्या एका सहजसुंदर पदाचा आस्वाद घेऊ. गुरूने कूर्मदृष्टीने अवलोकन करून मनाचे मनपण घालविल्यामुळे त्याच्या हृदयातून जो 'स्वानंदाचा पूर' लोटला आहे, त्याला शब्द देण्यासाठी अलमखानाने हे पद रचले आहे —

आज मोठा आनंद झाला माय ।
माझा मज भेटला गुरुराय ॥
कूर्मदृष्टीं करितां अवलोकन ।
तेणें गेलें मनाचें मनपण ॥
द्रष्टा दृश्य दर्शन एक झालें ।
मीतूंपण सहज मावळलें ॥
खिन्न झाली त्रिपुटी जया ठायीं ।
तेंचि भरलें दिसे अंतर्बाहीं ॥
स्वानंदाचा भरपूर लोट झाला ।
ततक्षणीं अलमखान बुडाला ॥

स्वानंदाच्या लोटात बुडालेला हा अलमखान नागनाथांच्या संपर्कामुळे आपले यवनपण हरवून मराठी महात्मतेच्या महासागरात एक बिंदुले होऊन राहिला आहे. त्याची स्मृती आम्हांला वंद्य आहे.

# संदर्भ टीपा

१. जुने वाङ्मय–नवे संशोधन : डॉ. पंडित आवळीकर. पृ. २५१–२६०. पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळात 'नागेशलीलामृता'ची जी प्रत आहे (क्र. २९, ४०४) तिच्या आधारे काहीशा विस्ताराने मी इथे अलमखानाचा पुनःपरिचय घडविला आहे.

२. वडवाळ नावाची दोन गावे आहेत : एक सोलापूर जिल्ह्यातील मोहोळजवळचे आणि दुसरे उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूरजवळचे. दोहोंचाही नागनाथाशी संबंध आहे. लातूरजवळचे वडवाळ कल्याणीला जवळचे आहे.

३. भागूजी कुळकर्ण्यांची कथा 'नागेशलीलामृता'च्या ३९ व्या अध्यायातच प्रारंभी दिलेली आहे.

४. जुने वाङ्मय–नवे संशोधन : डॉ. पंडित आवळीकर, पृ. २५६.

५. अनंत चैतन्य व त्याचा शिष्य अगजी महाराज यांची कथा 'नागेशलीलामृता'च्या २९ व्या अध्यायात आहे.

६. मृत्युंजयाच्या पदांच्या उपलब्धीची स्थाने–(१) श्रीगोविंदराज बाबा महाराज संस्थान, महागाव (ता. जि. गुलबर्गा) – श्रीमाणिक महाराज यांच्या द्वारा. (२) समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे – बाडांक ३७६ व ११५२. (३) भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३७, पृ. २७९–२८०. (४) श्रीनागनाथाचे अभंग (खरे म्हणजे, नागनाथसंप्रदायी पदे) – नागनाथ गुंडबुवा कुरुडे, मोहोळ. पृ. २३–२४ व ३६. (५) 'दासविश्रामधाम' (भाग ४ था), पृ. ९६७–९६८.

• •

# शेख सुलतान

**श्रीगोपाळनाथांच्या चरणीं**

वडवाळसिद्ध नागनाथांप्रमाणेच अठराव्या शतकात गोपाळनाथ ही महान विभूती अवतरली होती. मूळचे देवगिरीच्या परिसातले हे सत्पुरुष सातारा भागात येऊन स्थिरावले आणि साताऱ्यापासून सात-आठ मैल अंतरावर असलेल्या त्रिपुटी नामक गावी समाधिस्थ झाले. त्यांनी आपले परमार्थधन अनेक भाग्यवंतांना दिले. त्या भाग्यवंतांत जसे पुरुष आहेत, तशा स्त्रियाही आहेत; जसे उच्चवर्णीय आहेत, तसे कनिष्ठवर्णीयही आहेत; जसे कीर्तनकार आहेत, तसेच शाहीरही आहेत आणि जसे हिंदू आहेत, तसेच मुसलमानही आहेत. प्राचीन मराठीतील श्रेष्ठ पदकार म्हणून गाजलेले संत देवनाथ आणि दयाळनाथ हे त्यांच्याच परंपरेतले. अशा महान साधूच्या संजीवक सान्निध्यात शेख सुलतान नामक एका

मुसलमानाने परमानुभूतीची उपनिषदे गायिली आहेत. त्याच्या चरित्राचा विशेष तपशील उपलब्ध नसला, तरी त्याची थोडीशी रचना मात्र उपलब्ध आहे.

शेख सुलतानाविषयीच्या ओझरत्या माहितीचे एक टिपण आणि त्याची काही रचना माझे ज्येष्ठ स्नेही श्री. अण्णासाहेब घोलप ( श्रीगोपाळनाथांच्या कनिष्ठ बंधूंचे वंशज व त्रिपुटीच्या गोपाळनाथ मठाचे विद्यमान अधिपती ) यांनी पाठविल्यामुळेच मराठी शेख वाचकांना सुलतानाचे हे ओझरते दर्शन घडविणे शक्य झाले आहे.

शेख सुलतानाचे मूळ गाव कऱ्हाडजळचे कावें हे होय. तो मूळचा तुरेवाला शाहीर होता. शृंगारिक लावण्यांबरोबरच भेदिक रचना करण्यात त्याचा हातखंडा असल्यामुळे त्याला शाहिरांच्या समूहात प्रतिष्ठा लाभलेली होती तत्कालीन राज्यकर्ते शाहिरांना मुक्त आश्रय देत असत. शेख सुलतानालाही शाहू छत्रपतींचा आश्रय लाभला होता, असे म्हणतात.

एकदा शेख सुलतान सातारा दरबारी हजेरी देऊन आणि दरबारी मानमरातब अनुभवून आपल्या शाहिरी परिवारासह त्रिपुटीहून पुढे निघाला होता. गोपाळनाथ ‘ सातारमठ मंडळीसमवेत ’ बसले होते. डफावर तुरे बांधून गर्वाने चाललेला शेख सुलतान त्यांनी पाहिला आणि त्यांनी त्याला जवळ बोलावून घेतले. गोपाळनाथांचे कनिष्ठ बंधू श्यामराव तथा नाना यांनी रचलेल्या ‘ गोपाळनाथचरित्रा ’त[१] या प्रसंगाचे वर्णन आढळते. श्यामरावांनी लिहिले आहे की —

तयाप्रती श्रीनाथें । बोलाऊनी आणिलें त्वरितें ।
‘ म्हण कांहीं ’ आज्ञा करीत । तंव गण त्वरित आरंभिला ॥
तंव तयाचा अर्थ । पुसताती गोपाळनाथ ।
न कळे, विरोनि गेला तेथ । परम चकित जाहला ॥
श्रीनाथ म्हणती, ‘ सांगसी ना । का इतुका पडिला घुणा ।
त्वांच केलेंसि या गणा । सांगतां नाना संकट कां ’ ॥
मग त्यानें धरिले दृढ चरण । ‘ स्वामी, पतित कीजे पावन ’ ।
श्रीनाथ बोलले वचन । ‘ सांडी डफगाणें येथुनी ’ ॥
डफगाणें सांडउनिया । मग अनुग्रह करविला तया ।
संतोषी झाली काया । असतांच माय उडाली ॥

( गोपाळनाथचरित्र, ३२·११–१५ )

गोपाळनाथांनी काही तरी म्हणायला सांगितल्यावर शेख सुलतानाने एक ' गण ' म्हणून दाखविला. परंतु गोपाळनाथांनी त्या गणाचा अर्थ विचारल्यावर शेख सुलतान कुंठित झाला. वेदान्ताची निरर्थक पोपटपंची करून केवळ शाब्दिक खेळाने प्रतिपक्षावर मात करू पाहणे आणि तशी मात करता आली की अहंकाराने फुगून जाणे, हा प्रकार कलगीतुऱ्याच्या शाहिरीत नित्य घडत होता. शेख सुलतान अशा पठडीतलाच शाहीर होता. त्याला आपल्या रचनेचा गर्व होता. परंतु परमार्थ ज्याच्या कृतींतून आणि उक्तींतून लीलया उमलून येत असे, अशा सत्पुरुषाच्या उपस्थितीत शेख सुलतानाचे शब्दपांडित्य कुंठित झाले आणि गोपाळनाथांच्या आज्ञेप्रमाणे डफगाणे ( भेदिक गाणे ) सोडून देऊन तो गोपाळनाथांच्या चरणी लीन झाला.

### शाहिराचा कीर्तनकार

शेख सुलतान गुरुकृपेने कीर्तने कशी करू लागला, याचीही रोचक हकीकत ' गोपाळनाथचरित्रा 'त आलेली आहे —

आणखी कोणे येके काळीं । श्रीनाथ बैसले कीर्तनमेळीं ।
बोलाविलें तये वेळीं । माधवनाथ शिष्यासी ।।
तो परमगायक चतुर । ब्रह्मरसकथा करणार ।
ते श्रीनाथा निरंतर । आवडे थोर ऐकावया ।।
तया बोलावितां श्रीनाथें । कांहीं गर्व आला त्यातें ।
तये वेळीं वचनातें । श्रीनाथराज बोलिले ।।
' बरवें आता तुजवर । अविंध करीन धुरंधर ।
ज्याचिया कथेचा नवस थोर । लोक करिती ऐकावया ।।
कवित्व त्याचिया मुखींचें । नानापरी करवीन साचें ' ।
ऐसें श्रीनाथ बोलिले वाचे । सर्वां देखतां ते काळीं ।।

( गोपाळनाथचरित्र, ३२. ४–८ )

गोपाळनाथांनी माधवनाथ नामक एका शिष्याला कीर्तन करायला सांगितले असता, तो आपल्या कीर्तनकुशलतेने गर्विष्ठ झाला असल्याचे त्यांच्या ध्यानी आले आणि त्यांनी सर्वांसमक्ष त्याला बजावले की, " आता तुजवर अविंध करीन धुरंधर ! " ( एका मुसलमानाला तुझ्याहून वरचढ कीर्तनकार बनवीन ! )

त्यांच्या दृष्टीसमोर शेख सुलतानाची शीघ्र कवित्वशक्ती होती.

मग येके दिवशी ' कीर्तना । उभा राहे ' केली आज्ञा ।
हातीं घेवोनियां वीणा । वंदोनि चरणां उभा ठाके ।।
सर्व करिताती नवल । हा काय बोलेल बोल ।
समर्थकृपेची बोल । जाहलिया न होय काय तें ।।
मग हातीं घेवोनिया वीणा । करूं लागला कीर्तना ।
नाना प्रकारें कवित्वरचना । वदला जाणा ते समयीं ।।
आणखी संतमुखींचे पद । वदविले नाना प्रबंध ।
सर्वां पाहोनिया आनंद । जाहला भारी त्या काळीं ।।

(गोपाळनाथचरित्र, ३२. १६-१९)

अशा प्रकारे, हा मूळचा मुसलमान शाहीर गुरुकृपेच्या बळावर उत्तम कीर्तनकार बनला आणि परतत्त्वाच्या स्पर्शाने नटलेले ' पदप्रबंध ' रचून आपल्या गुरूला संतुष्ट करू लागला. पारंपरिक माहिती अशी आहे की, गोपाळनाथांनी आपल्या मुखातील तांबूल शेख सुलतानाच्या मुखी घातला आणि शक्तिपाताने त्याला वाक्सिद्धी दिली. शेख सुलतानाच्या कीर्तनाने गोपाळनाथ इतके संतुष्ट होत असत की, त्यांच्या संतुष्टीची स्मृती म्हणून आजही गोपाळ-नाथांच्या पुण्यतिथि-महोत्सवात वीणा घेण्याचा मान मुसलमानाकडे आहे.

### कीर्तनाचा गौरव पेशव्यांच्या दरबारात

गुरूचा आज्ञांकित बनून पडेल ती सेवा करणे, गुरूपदिष्ट मार्गाने साधना करणे आणि सद्ग्रंथश्रवणाची अनुभवाशी सांगड घालून वेदान्तावर कीर्तने करणे असा शेख सुलतानाचा जीवनक्रम बनून गेला. निरंतर गुरुसेवा घडावी, म्हणून त्याने त्रिपुटी येथेच निवास केला. त्रिपुटी येथील त्याच्या प्रशस्त बुरुजबंद वाड्याचे अवशेष आजही पहायला मिळतात. (हा वाडा लोणंदनजिकच्या कोपर्डे गावच्या गोपाळनाथानुयायी शिंदे मंडळींनी शेख सुलतानासाठी बांधून दिला होता.) शेख सुलतान गोपाळनाथांच्या शिष्यपरिवारात वयाने ज्येष्ठ असल्यामुळे त्याला सर्व जण ' आबासाहेब ' या आदरार्थक नावाने संबोधीत असत. त्याचा धाकटा बंधू छोटुभाई हाही आपल्या बंधूचे अनुसरण करून त्रिपुटीला आला आणि नाथांचा शिष्य बनला. त्याला लोक शेख दाजी तथा दाजीसाहेब म्हणत असत.

एक मुसलमान वेदान्तावर कीर्तने करतो, हे काही कर्मठांना रुचले नाही. वेदान्त ही सांप्रदायिक मक्तेदारीची बाब नसून, ती एक जीवनविषयक उदात्त विचारसरणी आहे, याचा त्या कर्मठांना विवेक उरला नव्हता. त्यांनी पेशव्यांकडे तक्रार केली. त्या तक्रारीच्या संदर्भात शेख सुलतानाला पेशव्यांचे बोलावणे आले. पुणे दरबारात पेशव्यांच्या उपस्थितीत शेख सुलतानाचे कीर्तन झाले. हे कीर्तन ऐकून पेशवे मुग्ध झाले आणि एक अविंध गोविंदाच्या गुणगौरवात इतका तन्मय होत आहे, हे अनुभवून त्यांना परम संतोष वाटला. या संतोषाचे प्रतीक म्हणून त्यांनी शेख सुलतानाचा सत्कार केला आणि पुण्याजवळील मुंजेरी हद्दीतील बाग त्याला इनाम दिला. या जागेत पुढे गोपाळनाथांचे शिष्य परमहंस यांच्या परंपरेतील एक मठ स्थापन झाला. या मठात परमहंसांचे शिष्य सहजनाथ आणि त्यांचे शिष्य व प्रशिष्य अनुक्रमे सुभाननाथ व गोपाळनाथ (दुसरे) हे राहत असत. अद्यापही त्या मठाचे स्थान पुणे येथील स्वारगेट चौकात पहायला मिळते. या मठात गोपाळनाथ-परंपरेतील काही सत्पुरुषांच्या समाध्या असून, दशभुजा देवीची सुंदर मूर्ती आहे.

### कृष्णामाई घरी आली

शेख सुलतान नित्य कृष्णास्नानासाठी माहुली क्षेत्री जात असे. परंतु पुढे वृद्धावस्थेमुळे नित्य माहुलीस जाणे त्याला कठीण होऊ लागले. हे पाहून गोपाळनाथांनी आपल्या या सत्त्वसंपन्न शिष्याला सांगितले की, "जिथे मनाचे पावित्र्य आहे, तिथे कुठेही कृष्णाजल आहेच. तुझ्या वाड्यात विहीर खण. कृष्णामाई तुझ्या घरी येईल." शेख सुलतानाने गुरूचा हा आदेश मानून वाड्यात विहीर खणली. पावसाळ्यात कृष्णेचे पाणी गढूळ झाले की या विहिरीतील पाणीही गढूळ होते, या वस्तुस्थितीमुळे कृष्णामाईच शेख सुलतानाच्या घरी आल्याचा प्रत्यय भक्तहृदयाला घडू शकतो. याविषयी राजाराम प्रसादीने 'भक्तमंजरीमाले'त[२] दिलेली हकीकत थोडी भिन्न आहे —

सच्छिष्य महाभाविक । ज्ञातीचा यवन होता येक ।
येकविध जो उपासक । सुलतान शेख नाम तया ॥
गोपाळनाथस्वामीपायीं । निःसीम भक्ती ज्याची पाही ।
माळावरी कृष्णाबाई । प्रगटविली ठायीं जयानें ॥

परिसा तयाचें कारण । संक्षेप्तयुक्तीं होईल कथन ।
आयुष्य सारिलें सेवेंत जेणें । नवविधभजन सद्‌गुरूचें ॥
सेवटीं देहावसानसमय आला । संतसमुच्चय भोवता मिळाला ।
कृष्णातीरीं समाधीला । प्रश्न केला शेख सुलताना ॥
तये काळीं शेख सुलतान । सर्वत्रांसी बोलती वचन ।
सकळ तीर्थें वसतीं जाण । नाथचरण ते ज्या ठायां ॥
तैसीयांत कोण्ही छळक । बैसला होता अभाविक ।
म्हणे ' येथें कृष्णोदक । प्रगटवा निकें या स्थानीं ' ॥
तत्काळ तेथें शेख सुलतान । माळावरी करी खनन ।
कृष्णाबाई आली जाण । यवन धन्य गुरुभक्त तो ॥
अद्यापि तेथें त्रिपुटीसी । कुंड पाहती जन दृष्टीसी ।
खडुळ पाणी येतां कृष्णेसी । कृति तैसी होय तेथें ॥
( भक्तमंजरीमाला, ४७·८०–८७ )

राजाराम प्रसादीच्या मते, हा कृष्णामाईच्या प्रकटीकरणाचा चमत्कार गोपाळनाथांच्या समाधीनंतर आणि शेख सुलतानांच्या समाधिकाळाच्या सुमारास घडला, असे दिसते.

## सद्‌गुरु-पुण्यतिथि-प्रसंगी समाधिस्थ

अशा प्रकारे गुरुसेवेचे सातत्य राखून आणि गुरुकृपेचा आनंद उपभोगून शेख सुलतान शाश्वत सुखाचा अधिकारी झाला. त्याची गुरुभक्ती इतकी उत्कट होती की, त्याने सद्‌गुरूच्या तिसऱ्या पुण्यतिथीच्या प्रसंगी सद्‌गुरुचरणांचे चिंतन करीत करीत समाधीचा स्वीकार केला. श्री. घोलप यांनी पुरविलेल्या माहितीनुसार श्रावण वद्य ३०, श. १६९१ हा शेख सुलतानाचा समाधिदिन होय.

शेख सुलतानाची समाधी त्याच्या राहत्या वाड्यातील ध्यानधारणेच्या गुंफेत असून, वर दर्शनी समाधी आहे. त्याचा बंधू शेख दाजी याची समाधी वाड्याच्या वायव्येस आहे. शेख सुलतानाच्या सद्‌गुरूंचे पुतणे विठ्ठलनाथ यांनी या महान गुरुभक्ताचा गौरव एका आरतीत शब्दबद्ध करून ठेवला आहे. ते म्हणतात —

आरती निजसंत । शेख सुलतान आबा ।
देहींच विदेहत्व । जन्मोनियां जन्म ना वा ।।
ब्रह्मावधि मुक्तबद्ध । तित मुक्त अविंध ।
वैराग्य-ज्ञान-शुक्तीं । भक्त उत्पन्न विंद ।।
पाडोनी नारायणें । निजसूत्रीं स्वच्छंद ।
ओवोनी संतग्रीवा । हार घातला नंद ।।...[3]

वैराग्य-ज्ञानाच्या शिंपल्यात तयार झालेल्या या ' अविंध ' मौक्तिकाला गोपाळनाथांनी ' विंधले ' म्हणजे वेज पाडले आणि निजसूत्रात ओवून ते संतांच्या कंठी शोभविले, हा विठ्ठलनाथांनी केलेला शेख सुलतानाचा गौरव यथार्थ आहे, असे त्याच्या वाणीवरून निश्चयाने वाटते.

### उपलब्ध हिंदी-मराठी रचना

शेख सुलतान हा मुसलमान असल्यामुळे त्याची घरातली भाषा दक्खिनी हिंदी असणार. त्यामुळे त्याने हिंदीत रचना करणे स्वाभाविकच आहे. त्याची थोडी हिंदी रचना उपलब्ध आहे. मराठी रचनेत काही कथात्मक प्रकरणे आहेत, काही पदे आहेत, तर काही आरत्या आहेत. परंतु त्याची ही हिंदी-मराठी रचना केवळ त्याचीच आहे, असे सांगता येत नाही. कारण त्याचा बंधु शेख दाजी हाही उत्तम कवी होता आणि त्याची बंधुप्रीती इतकी उत्कट होती की, त्याने आपल्या रचनेत स्वतःच्या नावाऐवजी शेख सुलतानाचेच नाव गोवले आहे. गोपाळनाथांचे पुतणे विठ्ठलनाथ यांनी रचलेल्या शेख दाजीवरील भावसुंदर आरतीत याचा स्पष्ट निर्देश आहे —

आरती संतराया । दाजी निजसखया ।
अविंधनिधींतील । बुंद अंश हे काया ।। धृ० ।।
निष्काम देहलोभा । काव्यकार उत्तम ।
अभंगीं रूढविलें । निजबंधूचें नाम ।।
कीर्तनानंद भारी । उभे राहतां हर्षे ।
गर्जना मुखाकाशीं । मेघ अध्यात्म वर्षे ।।
लक्षुनि सर्व भूतीं । गुरुनाथ संपूर्ण ।
फळला अच्युतवृक्ष । परी शिष्य लवण ।।

गोपालनाथपायां – । वीण नाना न ठावें ।
विठ्ठलावरी प्रीती । निःसीम भावें ॥ ४

या आरतीवरून स्पष्ट होत आहे की, शेख दाजी हा उत्तम काव्यकार व कीर्तनकार होता; तो आपल्या कीर्तनातून अध्यात्माची मेघवृष्टी करीत असे आणि त्याने आपल्या कवनांच्या अभंगांमध्ये (म्हणजे समाप्तिमुद्रांमध्ये) आपल्या बंधूचे म्हणजे शेख सुलतानाचे नाव रूढ केले. याचा अर्थ असा की, शेख सुलतानाच्या नावावर असलेल्या कवनांत काही कवने शेख दाजीचीही असणे शक्य आहे. ती वेगळी निवडणे अशक्य आहे आणि ज्याने आपल्या बंधूच्या नावात आपल्या नावाचा भक्तीने विलोप केला, त्याला वेगळा काढण्याचा प्रयत्न करणे इष्टही नव्हे. मात्र एखाद्या रचनेत चुकून वेगळेपणाची खूण राहून गेली आहे. उदाहरणार्थ —

गोपालनाथ नबी पीर मेरा ।
दिलमें दिखा दिया दिल चेहरा ।
शेख सुलतान उनका चेला ।
पीछे है कबर ॥

या समाप्तिमुद्रेत ' शेख सुलताना 'च्याच नावाची नोंद असली, तरी त्याची कबर गोपालनाथाच्या मागे आहे, असे म्हणणारी व्यक्ती वेगळी असली पाहिजे, हे उघड होते. ही वेगळी व्यक्ती म्हणजे ' निजबंधूचे नाम अभंगी रूढविणारा ' शेख दाजीच होय, हे आता स्पष्ट आहे. या हिंदी पदात शेख दाजीने आपल्या सद्गुरूचे निवासस्थान जे त्रिपुटी गाव त्यावर परमार्थिक रूपक बसविले आहे —

त्रिपुटी शहर ।
क्या जगा बनी सुंदर ॥ धृ० ॥

ऐसी दुनियामें नहीं जगा ।
देखत तनमनका शीण भागा ।
वहाँ सहज लगाये लगा ।
हुवा फकीर ॥ १ ॥

गैबी शहर बना है खासा ।
उप्पर साहेबका बासा ।
गोपालनाथ नबीका मोकासा ।
फकिरी शिरजोर ॥ २ ॥
बावन्न कोट बना है गहरा ।
तीनसो साठ जडे जंजीरा ।
चलती गस्त, खडा है पहरा ।
वहाँ एक सदर ॥ ३ ॥
नौ खणी उप्पर पाँच खणी ।
वहाँ रहता है एक निर्गुणी ।
देख सद्‌गुरुघरकी मोहिनी ।
किसे नहीं खबर ॥ ४ ॥...

या रूपकात शेख दाजीने आपला देह हेच त्रिपुटी नगर मानून, त्यात सद्‌गुरूचा चिरंतन निवास आणि विलास घडत असल्याचे वर्णन केले आहे. एवढी पारमार्थिक उंची गाठून शेख दाजीने आपल्या रचनेत आपले नावही उरू देऊ नये, हे त्याच्या भूमिकेला सर्वथा साजेसे आहे; परंतु आपणां संत-जिज्ञासूंना मात्र चुटपुट लावणारे आहे.

### कथात्मक प्रकरणे

शेख सुलतानाची पाच कथात्मक प्रकरणे मला पहायला मिळाली[५] : ( १ ) सती अनसूया, ( २ ) गणपतिजन्म, ( ३ ) हनुमंतजन्म, ( ४ ) कोल्हाट्याचे चरित्र आणि ( ५ ) शिवरात्रिकथा या पाचही प्रकरणांतील कथा लोक-कथांच्या पातळीवरच्या आहेत आणि रचनाही लोकगीतसरणीची आहे.

लावणी ढंगात रचलेल्या ' सती अनसूया ' या २२ कडव्यांच्या कथागीताचा प्रारंभ शेख सुलतान असा करतो —

उदरीं त्याच्या कन्या गुणवंती शीला ।
सई, अनुसया नांवें ठेवुनि तनुला ।
उपवर होतां दोघी, बोले स्त्रीला ॥

पतिव्रतेच्या गोष्टी,
श्रवणार्थ पुटीं,
आइका हो निजभावें चित्तयेकवटीं ॥ १ ॥

दोघी कन्यांसाठी योग्य वर शोधण्याचा संकल्प पिता प्रकट करतो. सईसाठी वराची निश्चिती होते, परंतु अनसूया मात्र लग्न करायला नकार देऊन जोगीण बनून वनात जाते.

कोणी तरी दुसरा वर पाहूनिया कुमरी।
आइकुनि बोल पित्याचे तंव हास्य करी।
इहलोकींचा भर्ता वरीनाच शिरीं।
भोगावें वैधव्य किती जन्मवरी ॥
मस्तकीं धुळभरी भगवी करिती चीर।
माळा, मुद्रा कानीं, तृण शेजेवर।
कंदमूळ भक्षुनि राहे प्राशीत नीर।
ऐसी बारा वरुषें वनीं ते विचरे ॥ ४ ॥

बारा वर्षे वनात काढल्यानंतर अनसूया एकदा बहिणीला भेटायला येते. रात्री जेवणखाण झाल्यावर अनसूया ओसरीवर झोपते आणि सई शेजघरात पतिसेवेला जाते. एवढ्यात गावात आग उसळते आणि एकामागून एक घरे जळू लागतात. अनसूया हे पहाते आणि सईला हाका मारू लागते. सई आतून उत्तर देते--

नारी वदे, ‘ निजलें चीर फेडुनि मी तो अशी।
सांगा त्या अग्नीतें घर वांचविसी।
उतराई मी काय होऊं कशी।
जन्मोजन्मीं तुझी होईन दासी ’ ॥ ८ ॥

आणि चमत्कार असा घडतो की, सईच्या सतीत्वाच्या प्रभावाने तिचे घर टाळून अग्नी पुढे जातो. या दृश्याने अनसूया वरमते. तिला आपले तप विफल वाटते आणि पतिव्रताधर्माचा महिमा पटल्यामुळे ती लग्न करायला सिद्ध होते. सई तिला सांगते की, “ अंबालयात जाऊन रात्री तिथे वाट पहा. सकाळच्या प्रहरी उठल्यानंतर जो प्रथम तुला भेटेल, त्याला तू माळ घाल. ” अनसूया तसे करते.

एक महारोगी तिला भेटतो. ती त्याला माळ घालते आणि पाटीत घालून चालू लागते. एवढ्यात रस्त्याने एक वेश्या जात असते. तिला पाहून त्या महारोग्याला तिच्या भोगाची लालसा उत्पन्न होते. हे अनसूयेला समजताच ती त्या वेश्येकडे जाऊन तिची सहा महिनेपर्यंत सेवा करते आणि आपल्या रोगी पतीची इच्छा पूर्ण करण्याची विनंती तिला करते. वेश्येने ते मान्य करताच अनसूया घरी येते आणि रात्रीच्या वेळी पतीला पाटीत घालून व ती पाटी डोक्यावर घेऊन लग-बगीने वेश्येकडे जाऊ लागते. वाटेत मांडव्य ऋषीला शूळावर चढविलेले असते. त्याला गडबडीमुळे अनसूयेचा धक्का लागल्यामुळे प्राणांतिक वेदना होतात आणि त्यामुळे मांडव्य ऋषी अनसूयेला संतापून शाप देतो की —

उगवतां दिन वैधव्य येईल जाती तिला ॥

मग अनसूया काय करते ? —

धरणीं ठेवी पाटी, दापित रविला ॥

अनसूयेच्या सतीत्वाच्या प्रभावाने रवी उगवत नाही. सर्व जग अंधारलेलेच राहते. देव चिंताक्रांत होतात. मग एक मार्ग निघतो. मांडव्याचे वचन खरे ठरावे म्हणून अनसूयेचा रोगी पती मरतो आणि तिचे वैधव्य चौ दिशांच्या नारींनी तत्काळ वाटून घेतल्यामुळे तो पुनः जिवंत व साजिवंत होऊन उठतो —

पूर्ण आयुष्य त्यासी, लावण्यहिरा ।
देउनि तिचे हातीं पाठवी घरा ।
नाथकृपें सुलताना निश्चय खरा ॥ २२ ॥

असे हे प्रकरण अंतर्बाह्य लोककाव्याच्या श्रेणीत मोडणारे आहे. या कथा-गीताचा सारा ढंग वगाच्या लावणीसारखा आहे.

दुसरे ‘ गणेशजन्म ’ नामक कथागीत मोरोपंतांच्या सतीगीतांप्रमाणे स्त्री-ओवीत रचलेले असून, त्याची ओवीसंख्या २८ आहे.

सिंधुपूरचा सिंधुरासुर तप करून शिवाला प्रसन्न करून घेतो आणि त्याच्याकडे ‘ मृत्युभयचिंता देहासी नसावी ’, असा वर मागतो —

‘ वर दिला तुज ’। बोले शंभुराज ।
‘ परी ऐक गुज । अंतरींचें ॥ ७ ॥
पार्वती-उदरीं । जन्मेल गणपती ।
मरण त्याचे हातीं । तुज आहे ’ ॥ ८ ॥

आपल्या मृत्यूचे हे रहस्य समजताच सिंधुरासुर चिंताक्रांत होतो. त्याचे लक्ष सदैव पार्वतीकडे लागते. काही काळाने त्याला आढळते की, पार्वती गर्भवती आहे. आपला 'मृत्यु' पार्वतीच्या गर्भात वाढत आहे, हे ध्यानी येताच तो दैत्य माया रचून गर्भातच गणेशाचा शिरच्छेद करतो. पुढे पार्वती प्रसूत होते. तो बालक शिरोविहीन असल्याचे आढळते. एवढ्यात शंकर गजासुराला ठार मारून त्याचे मस्तक कौतुकाने हाती घेऊन घरी येतो. त्याला आपल्या शिरोविहीन मुलाच्या जन्माचे वृत्त कळताच तो आपल्या हातातील गजासुराचे मस्तक त्याला जोडतो. ते शिरोविहीन बालक गजाच्या मस्तकामुळे गजानन बनते. गजानन मोठा झाल्यावर सिंधुरासुर मोठ्या सैन्यासह त्याच्यावर चाल करून येतो. गणेश त्याच्या सैन्याचा संहार करतो आणि अखेरीस त्यालाही धरणीवर लोळवितो. मरणापूर्वी तो गणेशाला विनंती करतो की —

सिंदूराची उटी । लावावी सर्वांगीं ।
निरंतर भोगी । सिंदूरासी ॥ २४ ॥
अवश्य म्हणोनि । दैत्य वधियेला ।
जयवंत जाला । गणराज ॥ २५ ॥
वाजती दुंदुभी । डोलतीं निशाणें ।
भेटताती जन । सुखरूप ॥ २६ ॥
शंभुपार्वतीसी आनंद दाटला ।
ब्रह्मानंद जाला । तिहीं लोकीं ॥ २७ ॥

शेवटी शेख सुलतानाने 'कथा सांगितली स्कंदपुराणीची', असा कथेच्या पौराणिक आधाराचा हवाला दिला आहे.

'हनुमंतजन्म' हे कथागीतही स्त्री-ओवीतच (ओव्या १७) आहे. कैकेयीच्या हातीचा पिंड घारीने उडविल्यावर तो वायूच्या हाती पडला. वायूने तो भक्षण करताच त्याच्या कुशीत गर्भ उतरला. हा दैवी गर्भ आता कुठे टाकावा, अशा विवंचनेत वनोवनी हिंडत असताना वायूला पतिव्रता अंजनी तप करताना आढळली. विप्रवेशाने तिच्याजवळ जाऊन त्याने 'अनुष्ठानीं फळ देतों तुज', असे सांगून तिच्या कानातून गर्भ आत फुंकला. अंजनीला 'जडत्व' जाणवू लागताच ती तत्काळ ओरडली की, 'तो कपटी कोण येथें ?' त्यावर —

वायो म्हणे, ' सर्व । सृष्टी मी चाळिता ।
नको करूं चिंता । गर्भालागी ॥
तुझिये उदरीं । रुद्र अवतार ।
करील संहार । दुर्जनांचा ॥
काळ काम दोनी । बांधील तोडरीं ।
कीर्ति दिगंतरीं । विस्तारील ॥
लोकीं म्हणवील । मी हो रामभक्त ।
नांव हनुमंत । ठेवी त्याचें ' ॥

असे म्हणून वायू निघून गेला आणि पुढे यथाकाल शनिवारी, स्वाती नक्षत्रावर, चैत्री पौर्णिमेच्या दिवशी हनुमंत जन्माला आला.

' शिवरात्रिकथा ' ४९ स्त्री-ओव्यांमध्ये ग्रथित केलेली आहे. व्याध आणि मृग यांची सुप्रसिद्ध कथाच शेख सुलतानाने येथे ओवीबद्ध केली आहे. पाणी प्यायला आलेल्या मृगाला व्याध मारू लागताच —

सर्वही धाउनी । आलीं मृगापाशीं ।
म्हणती हृषीकेशी । कैसें केलें ॥ ३४ ॥
मृग म्हणे नारी । राखावें या बाळां ।
चौघे जण मेळा । राहा तुम्ही ॥ ३५ ॥
बाई म्हणे, पती- । वांचून संसार ।
शून्य हें मंदिर । दीपावीण ॥ ३६ ॥
बाळ म्हणे, आम्हां । द्यावें मृत्याहातीं ।
आणिक संतती । होईल तुम्हां ॥ ३७ ॥

अशी त्या मृग-कुटुंबाची त्यागवृत्ती शेख सुलतानाने सरळ साध्या शब्दांत मांडली आहे.

' कोल्हाट्याचे चरित्र ' हे कथागीत ३२ स्त्री-ओव्यांचे असून, त्यात स्त्री-विषयक आसक्तीचे दुष्परिणाम आणि वैराग्याचे महिमान वर्णिले आहे. एक सावकारपुत्र कोल्हाटणीवर मोहित होऊन घरादाराचा त्याग करतो आणि तिच्याबरोबर खेळ करीत हिंडू लागतो. पुढे एकदा राजगृहासमोर खेळ चालू असताना राजाही तिच्यावर मोहित होतो. हे ध्यानी येताच सावकारपुत्र अंतर्मुख

होतो. एवढ्यात त्याला एका निर्मोही साधूचे दर्शन घडते आणि त्याच्या हृदयात एकदम वैराग्याचा संचार होतो. कोल्हाट्याच्या या वैराग्याने प्रभावित होऊन कोल्हाटीण आणि राजा ही दोघे त्याचे अनुसरण करतात आणि वैराग्याने शुद्ध बनलेल्या त्या तिघांचा यथाकाल उद्धार होतो— अशी या गीताची कथा आहे. 'विषयीं उदास होतां गती ऐसी,' असा या कथेचा निष्कर्ष आहे. शेख सुलतानाची सहजसुंदर निवेदनशैली पुढील उताऱ्यावरून स्पष्टपणे कळून येईल—

तया नगरींत । कोल्हाटीण खेळे ।
चंचळ हे डोळे । मीन जैसा ॥ ४ ॥
सोळाही लक्षणीं । बहु रूपवंती ।
कामातुर पहाती । पतंगन्यायें ॥ ५ ॥
सावकारपुत्र । देखावया गेला ।
बाण जो बैसला । हृदयांत ॥ ६ ॥

पूर्वजीवनांत शाहिरींत रंगलेल्या कवीचे हे परिवर्तित रूप आहे. अंतरीचा 'रंग' बदलला आहे, पण 'ढंग' तोच आहे.

### हिंदी-मराठी पदांचे अंतरंग

शेख सुलतानाची पदे अत्यल्प संख्येने उपलब्ध आहेत. त्यांवरून त्याच्या अनुभूतीच्या सर्व रंगरेखा न्याहाळता येत नाहीत. माझ्या हाती आलेली मराठी पदे तर अवघी इन-मीन-तीन आहेत. त्यांपैकी एकात त्याने 'कोणी शुद्धी सांगा मजलागी । बाई कोठे तो निजयोगी ?' असा 'निजयोग्याचा शोध' योगमार्गानेच सुरू केलेला दिसतो, तर दुसऱ्या एका पदात 'हा संसार देखिला आम्ही तैसा । हुताशन चित्रीचा धडके जैसा ।' अशा शब्दांत संसाराचे मिथ्यात्व स्पष्ट केले आहे. तिसऱ्या पदात सिद्धाचे बोलणे हे 'हुमान' म्हणजे कूट-स्वरूपाचे कसे असते, त्याचे वर्णन केले आहे. म्हणजे या तीनही मराठी पदांत शेख सुलतानाच्या भावभक्तीची उत्कटता आलेली नसून, केवळ परमार्थाच्या गहनतेचेच वर्णन आलेले आहे.

त्याने रचलेल्या दोन मराठी आरत्या[६] त्रिपुटी येथील नैमित्तिक उत्सवात म्हटल्या जातात. त्यांपैकी एक त्रिपुटीच्या पश्चिमेस असलेल्या डोंगरावरील

तुकाईची आहे आणि दुसरी पद्मावतीदेवीची आहे. या आरत्यांतही भावुकते-ऐवजी वेदान्तविचाराची पेरणीच आहे. उदाहरणार्थ, ही तुकाईची आरती पहा—

आरती निजानंदे । ब्रह्मानंदे तुकाई ।
तुळजापुरीं राहे । योगध्यान जे ठायीं ।। धृ० ।।
आकार नाहीं जेथें । तेथें निर्माण माया ।
ॐकार मूळबीज । तत्त्वें पांच पंच काया ।।
त्रिगुण रेखियेले । वस्तु आणिली ठायां ।
नादबिंदु ज्योतिरूप । देहसाक्षिणी तुर्या ।। १ ।।
ब्रह्मादि देव तिन्ही । तुझ्या पोटींचीं बाळें ।
निर्माण विश्वकर्ता । झाले त्रिदशापाळे ।।
ब्रह्मांड ब्रह्मशक्ती । केलीं सप्तपाताळें ।
इच्छिलें विश्वमायें । दृश्य ब्रह्मीच्या खेळे ।। २ ।।
भक्तिज्ञान वैराग्य । तुझी कृपा जयांसी ।
नातळे कामक्रोध । मळ धुतला काशीं ।।
अघ नाम पातकाच्या । सर्व जाळिल्या राशी ।
पाहतां सुलतान । गुरु गोपाळ अविनाशी ।। ३ ।।

पद्मावतीच्या आरतीतही ‘ सच्चित्सुखदायी ’ अशा देवीचे ब्रह्मांडव्यापी स्वरूप याच पद्धतीने वर्णिले आहे. देवीवरील या दोन आरत्यांप्रमाणेच ‘ त्रिशूळ डौर शिंगी ’ धारण करणाऱ्या ‘ भैरवजोग्या ’चे स्तवन शेख सुलतानाने एका पदात केले आहे. समर्थ वाग्देवता मंदिरातील एका बाडात ( क्र. १७३३ ) शेख सुलतानाचे एक पद आहे,[७] त्यात त्याने परब्रह्माचा रंगानुभव गूढ शैलीत मांडला आहे —

मूर्ति येकली मीं देखिली ।
मसुरेपरि रेखिली ।। धृ० ।।
आरक्त पीत वर्णी ।
श्वेतरंग भरित कारणी ।। १ ।।
कृष्णवर्ण सांवळी ।
जे का ब्रह्मांडातें गिळी ।। २ ।।

साहेबनाथें गुरुकिल्ली ।
शेख सुलताना दाखविली ॥ ३ ॥

शेख सुलतानाने हा रंगानुभव काही हिंदी कवितांमध्ये अभिनव पद्धतीने सांगितला आहे. एकेक रंगाचा शृंगार करणाऱ्या रमणींच्या रूपांत शेख सुलतान हा विविध रंगानुभव व्यक्त करीत आहे. त्याची ही अनुभूती आगळी असली, तरी अभिव्यक्ती मात्र शाहिरी संप्रदायातील आहे. ही 'लाल' रंगाने रंगलेली रमणी पहा—

सुनो जी देखे प्यारी लाल ।
साडी पहेनी लाल ।
गोदमें लिया गुलाल ।
लालजीके करना ॥
नैना लालही लाल ।
सुर्मा दिया री लाल ।
गलेमें तो मोहनमाल ।
चली लाल देखने ॥
मुखमें तंबोल लाल ।
लालस करे ख्याल ।
होरी खेलत लाल ।
बांधे बनमें झूलने ॥
भरसब रंग लाल ।
लालही खेले धुमाल ।
चतुराई किये लाल ।
शेख सुलताना ॥

बनातील 'झूलन्या'वर झुलणारी आणि आपल्या 'लाला'संगे लाल गुलालाने होरी खेळणारी ही रमणी दुसऱ्याच क्षणी 'सफेत सिनगार' करून येते, तर आणखी केव्हा तरी 'हरी' (हिरवी) अथवा 'कारी' (काळी) बनून येते—

कारी धरापर नार चली ।
तद कारीही सुरत बन मतवारी ।।
काराही कंगन काराही कजेरा ।
कारीही चोली तकरी ।।

ही अलौकिक रंगाची दुनिया अनुभवायला अलौकिक पेयाची मस्ती चढायला हवी. तशा मस्तीशिवाय साऱ्या स्थिरचराला व्यापणारा रंगोत्सव पाहता येणार नाही. ही मस्ती शेख सुलतानाजवळ पुरेपूर असल्यामुळेच तो या विविध रंगांनी रंगलेला दिसतो. त्याच्या अंतरंगात एक ' मतवाला जोगी ' एकसारखा झुलत आहे. पंचतत्त्वांची कुटी घोटून तयार केलेली ' खासी भंग ' गुरूचे नाम घेऊन प्राशन केल्यामुळे तो ब्रह्मविलासी जोगी धुंद होऊन गेला आहे--

धुंद भया जब नयन फिरावे ।
देख रहे अबिनासी ।।
सहज खेचरी मुद्रा लागी ।
निरंजनका रहिवासी ।
बैठा आपेआप अकेला ।
जोगी सदा झुले मतवाला ।।

या अशा ब्रह्मरसाच्या प्राशनाने धुंद बनलेली शेख सुलतानाची बहुतांश रचना काळाने हिरावून नेली आहे-- जी अत्यल्प आपल्या हाती लागली आहे, तिच्यावरून त्याच्या अंतरंगाचे अगदी ओझरते दर्शन घडू शकते.

# संदर्भ टीपा

१. अप्रकाशित 'गोपाळनाथचरित्रा'ची श्री. वि. भा. घोलप, त्रिपुटी, यांनी केलेली प्रत मला त्यांच्याच कृपेने पहायला मिळाली.

२. 'श्रीभक्तमंजरीमाला', खंड दुसरा : संपादक शंकर कृष्ण देव, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे.

३. 'श्रीनाथाचिये द्वारीं'– संग्राहक वि. भा. घोलप. पृ. १४.

४. 'श्रीनाथाचिये द्वारीं', पृ. २४.

५. ही पाच कथात्मक प्रकरणे व काही हिंदी-मराठी पदे श्री. वि. भा. घोलप यांनी त्रिपुटीहून पाठविलेल्या बाडांतील आहेत. जी रचना या बाडांबाहेरची आहे, तिचा स्वतंत्र संदर्भ दिला आहे.

६. 'श्रीनाथाचिये द्वारीं', पृ. १३ व १६–१७.

७. हे पद प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी 'मराठी संशोधन-पत्रिके'त (वर्ष १०, अंक ३.) आणि श्री. वा. सी. बेंद्रे यांनी 'शेख महंमद-बाबा श्रीगोंदेकर यांच्या कवितासंग्रहा'त (पृ. ६९) शेख महंमदाचे म्हणून छापले आहे.

# शेख महंमद

### कबिराचा अवतार

मराठी संतमंडळात ‘ कबिराचा अवतार ’ म्हणून शेख महंमदाची ख्याती आहे. जन्माने मुसलमान असूनही ज्याने हिंदू गुरूकडून परमबोध प्राप्त केला, हिंदू साधना स्वीकारली आणि हिंदू-मुसलमान-भेदाच्या अतीत जाऊन शुद्ध परमार्थाचा अनुभव घेतला, त्या कबिराप्रमाणेच शेख महंमदानेही महाराष्ट्रात मुक्तचिंतकाचे श्रेष्ठ स्थान प्राप्त केले. पारंपरिक चरित्रकारांनी कबीर आणि शेख महंमद यांच्यातील हे साम्य स्पष्टपणे उद्घोषिले आहे—

शेख महंमद पीर । कबिराचा अवतार ।।
तयाचे चरित्र । ऐका तुम्ही ।। १ ।।
कबिराचा अवतार । जनांसी कळेना ।
उमज पडेना । भवभ्रांति ।। ४ ।।

अखंड समाधि । गुंफेंत बैसावें ।
मनीं जीवें भावें । हरिनाम ॥ ५ ॥
मनाची स्फुरणी । सदा हरिताहे ।
अखंड लाविताहे । ध्यानमुद्रा ॥ ६ ॥
न कळे कोणासी । तयांची वैं कला ।
अवतारलीला । दाविती ते ॥ ७ ॥
अवतारलीला । दाविती अपार ।
संतसाधू थोर । वर्णीत गेले ॥ ८ ॥

अशा प्रकारे थोर संतसाधू ज्याचे चरित्र वर्णीत गेले, त्याच्या चरित्राची निखळ ऐतिहासिक साधने मात्र अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहेत. संतनामावळ्यांतून मात्र त्याचे नाव गौरवाने उच्चारलेले आढळते. कविवर मोरोपंतांनी आपल्या ' सन्मणिमाले 'त शेख महंमदाचे नाम गुंफताना म्हटले आहे की—

तारिती न कीर्तिच्या, जो न लवे, त्या मुसल-मानवा नावा ।
हर्षें सेख महामद भगवज्जन मुसलमान मानावा ॥ ८० ॥

पंतांचे म्हणणे असे की, जो मानव लवत नाही, अशा मुसळासारख्या ताठ माणसाला या भवसागरातून केवळ कीर्तीच्या नावा तारू शकत नाहीत. म्हणूनच विनम्रतेचा आदर्श असलेल्या मुसलमान भगवद्भक्त शेख महंमदाचा हर्षभराने गौरव करावा.

हे असे उल्लेख प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संभारात जागोजाग आढळत असले, तरी त्यांतून शेख महंमदाची सुसूत्र व स्पष्ट चरित्रकथा मांडणे सर्वस्वी अशक्य आहे.

परंतु त्यातल्या त्यात एक गोष्ट भाग्याची आहे. शेख महंमदाची कविता प्रायः सामग्र्याने प्रसिद्ध झालेली आहे. इतिहाससंशोधक श्री. चा. सी. बेंद्रे यांनी सहा-सात वर्षांपूर्वी शेख महंमदाचे वाङ्मय दोन खंडांत विचिकित्सित स्वरूपात विस्तृत प्रस्तावनांसह प्रकाशित केले आहे.[१] त्यांनी शेख महंमदाच्या वाङ्मयाचे आणि त्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या त्याच्या असाधारण व्यक्तिमत्त्वाचे सर्व विशेष विवरिले नसले, तरी त्यांच्या प्रयत्नांमुळे शेख महंमदाचे अंतरंग जाणून घेण्याची जास्तीत जास्त साधने आपल्याला सहज उपलब्ध झाली

झाली आहेत, ही गोष्ट महत्त्वाची आहे. मुसलमान मराठी संतकवींच्या समूहात केवळ शेख महंमदाचा अपवाद सोडून अन्य संतांना यापूर्वी संशोधकांची प्रीती जवळ जवळ अभावानेच लाभली आहे. श्री. ढेंद्रे यांनी प्रकाशित केलेल्या सामग्रीच्या प्रकाशात शेख महंमदाचे ओझरते दर्शन घेणे आता आपणांस शक्य झाले आहे.

**कुळगोत आणि मातापिता**

पारंपरिक चरित्रकाराने[२] शेख महंमदाच्या माता-पित्यांची नावे पुढीलप्रमाणे दिलेली आहेत—

राजे महंमद पिता । पुल्हलेशा माता ।
त्यांचे पोटीं संता । अवतार ॥ ३ ॥

स्वतः शेख महंमदाने आपल्या 'योगसंग्राम' नामक ग्रंथात या माहितीला पुष्टी दिली आहे. तो लिहितो—

याति गोरे ( घोरी ? ) राजमहंमद पिता । सगुण पतिव्रता फुलाई माता ।
ते प्रसवली अविनाश भक्ता । शेख महंमदालागीं ॥ ३·५०

या दोन्ही ठिकाणच्या माहितीवरून शेख महंमदाच्या पित्याचे नाव राजे महंमद आणि मातेचे नाव फुलाई असल्याचे समजते. राजे महंमदांचा निवास प्रथम धारूर ( जि. बीड ) या गावी होता. धारूरच्या किल्ल्याची हवालदारी त्यांच्याकडे होती. तेथेच त्यांची कबर आहे, असे म्हणतात. शेख महंमदाचा जन्म धारूर येथेच झाला.[3] राजे महंमद नंतर दौलताबादच्या परिसरात येऊन राहिले असावे. त्यांचे एक शिष्य चांद बोधले यांचा दौलताबादच्या परिसरात पातशाही परिवारासह सर्वांवरच विलक्षण प्रभाव होता. राजे महंमदांनी आपला पुत्र शेख महंमद याला आपल्या या प्रभावशाली शिष्याचे मार्गदर्शन प्राप्त करून दिले आणि लहानवयापासूनच त्याच्यावर परमार्थाचे शुद्ध संस्कार होतील अशी व्यवस्था करविली, असे दिसते. श्रीदासगणू यांना प्राप्त झालेल्या स्थानिक माहितीप्रमाणे चांद बोधल्यांनी शेख महंमदाला गोदातीरी ज्ञानेश्वरीची प्रत दिली. या स्थानिक माहितीचा पडताळा शेख महंमदाच्या वाणीवरील ज्ञानेश्वरी-प्रभावातून येतो आणि चांद बोधल्यांच्या सान्निध्यात शेख महंमदाने महाराष्ट्रातील पूर्वसंतांचे वाङ्मय साक्षेपाने धांडोळले असावे, असे साधार अनुमान करता येते.

गुरू आणि संप्रदाय

'कादिरी गुरुपरंपरा' ('सिजरा-जदि-कादिरी') या प्रकरणामध्ये शेख महंमदाची गुरुपरंपरा "...अब्दुल कादर जिलानी-सय्यद अब्दुल रजाक ताजोद्दीन कादरी-सय्यद महंमद गौस ग्वाल्हेरी कादरी-सय्यद चांदसाहेब कादरी-सय्यद महंमदसाहेब कादरी (शेख महंमद)" अशी दिलेली आहे.[४] 'कादिरी गुरुपरंपरे'मध्ये कादरी संप्रदायाची अगदी प्रारंभापासूनची परंपरा दिलेली आहे, परंतु मी येथे अब्दुल कादर जिलानीपासूनचीच परंपरा नोंदविली आहे. ही इराणातील सूफी संप्रदायाची एक शाखा असून, तिला अब्दुल कादर जिलानीमुळेच 'कादरी' असे नाव प्राप्त झाले. अब्दुल कादर जिलानीचा प्रशिष्य सय्यद महंमद गौस हा भारतात प्रचारार्थ आलेला पहिला कादरी सूफी प्रचारक होय. ग्वाल्हेर हे त्याच्या प्रचाराचे केंद्र होते. ग्वाल्हेर येथेच तो इ. स. १५१७ मध्ये मृत्यु पावला. तेथे त्याची कबर आहे. ग्वाल्हेर-निवासामुळेच त्याला 'ग्वाल्हेरी' असे विशेषण प्राप्त झाले.[५] शेख महंमदाचा पिता राजे महंमद हा या महंमद गौसचा शिष्य होता. पिता हा शेख महंमदाचा परमगुरू होय. राजे महंमदाचा शिष्य चांदसाहेब कादरी म्हणजे प्रख्यात हिंदू साधू चांद बोधले होय. हा चांद बोधलेच शेख महंमदाचा गुरू होय. शेख महंमदाने 'योगसंग्रामा'त आपल्या गुरूचा स्पष्ट उल्लेख केला आहे—

ॐ नमो जी श्रीसद्गुरु चांद बोधले । त्यांनीं जानोपंता अंगीकारिलें ।
जानोबानें एका उपदेशिलें । दास्यत्वगुणें ॥ (यो. सं. १५·१)

हाच संबंध त्याने एका अभंगातही पुढीलप्रमाणे स्पष्ट करून सांगितला आहे—

धन्य चांद बोधले । त्यांनी जानोपंता लोधलें ।
त्यांच्या शेषें धाले । एको जनार्दन ॥
केली भागवतटीका । उद्धार विश्वलोकां ।
तेचि दिसे सायेका । स्वामीपाशीं ॥

या दोन्ही अवतरणांतून शेख महंमद आणि जनार्दनस्वामी हे गुरुबंधू होते, ही वस्तुस्थिती उघड होत आहे. त्यांचा संबंध असा मांडून दाखविता येईल—

महंमद गौस
↓
राजे महंमद
↓
चांद बोधले
↓
↓ जनार्दनस्वामी → ↓ एकनाथ
↓ शेख महंमद

पारंपरिक समजुतीप्रमाणे जनार्दनस्वामींचे गुरू श्रीदत्तात्रेय होत. परंतु अनेक ऐतिहासिक पुराव्यांनी ही गोष्ट स्पष्ट होत आहे कीं, जनार्दनस्वामींचे गुरू पौराणिक दत्तात्रेय नसून, दत्तावतारी समजले जाणारे सत्पुरुष चांद बोधले हेच होत. ते गुरुपरंपरेने सूफी साधू असल्यामुळे सूफी वेशात म्हणजे मलंगवेशात राहत असत. नाथांच्या पारंपरिक चरित्रात मलंगवेशाने दर्शन देणाऱ्या दत्तात्रेयाचा जो उल्लेख येतो, तो दत्तात्रेय म्हणजे हे मंगलवेशात वावरणारे दत्तावतारी साधू चांद बोधलेच होत. नाथांचे एक चरित्रकार कृष्णदास जगदानंदनंदन यांनी आपल्या 'प्रतिष्ठान चरित्र' या ग्रंथात स्पष्टपणे म्हटले आहे की —

एकनाथासी करितां बोध । तंव आला चांदबोध ।
चंद्रशेखर महासाधू । अवतार प्रसिद्ध दत्तात्रयाचा ॥ (प्र. च. २·६७)

नाथांच्या परंपरेतील अनेक सत्पुरुषांनी ही वस्तुस्थिती मान्य केलेली आहे.[६] स्वतः शेख महंमदही चांद बोधल्यांना नमन करताना 'तुम्ही महावरिष्ठ दिगंबरु', 'जय जय सद्गुरु दिगंबरा' अशा शब्दांत चांद बोधल्यांचे दत्तावतारित्व सूचित करतो.

शेख महंमदाला परमबोधाचा अधिकारी बनविणारे हे चांद बोधले मोठे प्रभावशाली साधू होते. त्यांचा निजामशहावर अत्यंत प्रभाव होता. 'योग-संग्रामा'च्या पंधराव्या अध्यायारंभी शेख महंमदाने या प्रभावाची एक कहाणी संक्षेपाने उल्लेखिली आहे —

पातशहानें मना केली बगणी (?) । चांद बोधले अजमतेचे धणी ।
त्यांनी मना केली हागणी । हें विश्व साक्ष असे ॥

नृपति लागले बोधल्याचे चरणीं। मग त्यानें मोकळी केली हागणी।
मग आनंद जाला क्षेत्रभुवनीं। दरुशनें पूजिलीं ॥

(यो. सं. १५.५-६)

या उल्लेखावरून असे दिसते की, निजामशहाने एकदा चांद बोधल्यांना कसला तरी प्रतिबंध केला असता, त्यांनी त्याचे मलविसर्जनच बंद करून टाकले आणि त्याला शरण आणले. शेख महंमदाने आपल्या गुरूला ‘अजमतेचे धनी’ म्हणजे ‘सिद्धीचे स्वामी’ म्हटले आहे. या प्रभावामुळेच पुढे निजामशाहीत चांद बोधले आणि त्यांचा शिष्यपरिवार यांना विशेष प्रतिष्ठा लाभलेली दिसते. जनार्दनस्वामींनी बांधलेली चांद बोधल्यांची समाधी देवगिरीच्या पायथ्याशी आजही आहे. चांद बोधल्यांनी सूफी साधना आणि सूफी वेश स्वीकारलेला असल्यामुळे ते हिंदू असूनही त्यांचे समाधिमंदिर दर्ग्याच्या स्वरूपात आहे.

‘निमिष न लागता पातकांच्या खाणी दहन करणाऱ्या’ (यो. सं. १०.१००) सद्‌गुरूचे महिमान शेख महंमदाने मुक्तपणाने गायिले आहे. ‘दीप आपण जळे आणिकां प्रकाश। तैसे स्वयें सद्‌गुरु करिती उपदेश।’ असा त्याचा अनुभव आहे. त्याचे सर्व अज्ञानतम या अलौकिक दीपाच्या प्रकाशात नाहीसे झाले आहे. आपला ‘उदार सद्‌गुरु’ हे ‘विश्वाचे माहेर’ आहे, असे तो म्हणतो (यो. सं. ६.३८). कारण त्याने ‘हीन यातीस सगुण गुण देखिले। ते सद्‌गुरूं सन्मानें मानून घेतले!’ शेख महंमद मुसलमान असतानाही त्याला चांद बोधल्यांनी सर्व प्रकारे ‘सरते’ करून घेतल्यामुळे त्याच्या हृदयातून त्यांच्याविषयीचा कृतज्ञताभाव ओसंडून वहावा, हे स्वाभाविकच आहे. चांद बोधले संस्कारांनी हिंदू आणि गुरुपरंपरेने सूफी असल्यामुळे त्यांची परमार्थदृष्टी अधिक उदार आणि समन्वयशील बनलेली होती. त्यांनी शेख महंमदाला इस्लामचे शाश्वत मर्म सांगून त्याला अविरोधी– नव्हे सुसंवादी व सुसमावेशक असे हिंदू अध्यात्मज्ञान उपदेशिले. स्वतः शेख महंमदाने या समन्वयशीलतेच्या वारशाचा उल्लेख केला आहे, तो असा–

अविंध यातीस निपजलों। कुराण पुराण बोलों लागलों।
वळी साधुसिद्धांस मानलों। स्वहितपरहिता गुणें ॥

(यो. सं. १६.६६)

**मालोजी राजांचा आश्रय**

शेख महंमद चांद बोधल्यांच्या सान्निध्यात परमार्थवाङ्मयाचे चिंतनमनन करून आणि त्यांनी दर्शविलेल्या वाटेने परमार्थसाधना करून परमानुभवाचा अधिकारी झाला. चांद बोधले समाधिस्थ झाल्यानंतर त्याच्या या शिष्याच्या साधुत्वाचा गंध दौलताबादच्या परिसरात सर्वत्र पसरू लागला आणि त्या गंधाने मालोजी-राजांसारखा भक्तभ्रमर आकर्षून घेतला. मालोजीराजे निजामशाहीच्या नोकरीत होते. त्यांचे गाव वेरूळ दौलताबादपासून अवघ्या चार कोसांवर होते. त्यांचा मनःपिंड भक्तिपरायण होता. पीरफकिरांविषयीही त्यांची विशेष श्रद्धा होती.[७] त्यामुळे दौलताबादच्या वातावरणात ख्याती पावू लागलेल्या शेख महंमदाकडे ते आकृष्ट झाले, ही घटना स्वाभाविकच घडली. ते स्वतः आणि त्यांचे दिवाण बाळाजी कोन्हेर या दोघांनीही शेख महंमदाचे शिष्यत्व स्वीकारले आणि त्याला अतीव श्रद्धेने चांभारगोंदे अथवा श्रीगोंदे ( जि. नगर ) येथे मठ बांधून देऊन सुप्रतिष्ठित केले. याविषयीचा एक चकनामा श्री. बेंद्रे यांनी प्रसिद्ध केला आहे, त्यातील महत्त्वाचा भाग असा--

" कसबे चांभारगोंदे मजकूर याजपासून पाच चाहूर जमीन... खरीद करून त्यामध्ये पेठ मकरंदपूर वसऊन त्यामधून बारा बिघे जमीन व गज इलाहि बागाईत बादल थल चेलेकराचे त्यांतून मोजून चक बांधून दिल्हा आहे. तरी तुम्ही लेकराचे लेकरी अर्जानी करणे... **तुम्ही आमचे गुरु आहांत व आपण तुमचे शिष्य आहों.** म्हणून पाच चाहूर खरेदी जमिनीतून बारा बिघे तुम्हास इनाम मुकरर दिल्हा असे. यास जर कोणी दावा करील, तर त्यास आपण वारूं."

ही घटना इ. स. १५९५ च्या सुमारास घडली. या वेळी शेख महंमदाचे वय चाळिशीच्या सुमाराचे असावे. मकरंद हे मालोजीच्या नावाचे संस्कृत रूपांतर आहे. मकरंदाने वसविलेली पेठ म्हणून मकरंदपूर पेठ. शेख महंमद आपल्या समर्थ शिष्याने वसविलेल्या मकरंदपूर पेठेतील गुंफेत राहू लागला. त्यानंतर त्याचे परमार्थप्रसाराचे आणि परमार्थवाङ्मयनिर्मितीचे कार्य निर्वेधपणे अखेरपर्यंत चालू राहिले.

**मुसलमान याती – निपजली मती**

शेख महंमद हा कबिराच्या प्रकृतीचा असल्यामुळे त्याने लोकांच्या अंध भावभावनांशी कसलीही तडजोड केली नाही. त्याचा राम हा कबिराप्रमाणेच व्यापक होता. 'राम नव्हे दाशरथी' असे त्याने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. कबिराप्रमाणेच परब्रह्माविषयीचे त्याचे प्रेम अनेकवार उत्कटपणे व्यक्त झाले असले, तरी त्याची दृष्टी निर्गुण-निराकारावरच स्थिर झालेली होती--

अविनाशा निज निर्गुणा । माझ्या जीवाच्या जीवना ।।
देवी देवता पाखांड । धिग् जळों त्यांचें तोंड ।।
भुतें मागतीं सांडणें । नर्क त्यांच्या हो भजनें ।।
मागोन करविती हिंसा । भक्त उद्धरेल कैसा ।।
पाणी पाषाण प्रतिमा । तेथें उन्मत्त होती जमा ।।
वोळखीन ज्ञानदृष्टीं । शेख महंमद निजभेटी ।।

या ज्ञानदृष्टीमुळेच तो देवदेवतांच्या पसाऱ्यावर कठोर हल्ला चढविताना दिसतो. त्याचमुळे पंढरी आणि पांडुरंग यांविषयी त्याच्या हृदयात भक्तिप्रेमाचा सागर हेलावत असूनही तो पंढरीचा यवनांनी विध्वंस केल्यावर भक्तिदृष्ट्या उद्ध्वस्त होत नाही. कारण त्याच्या हृदयातील अनिवार पंढरीमध्ये अविनाश श्रीहरी निरंतर विराजत होता--

अनिवार पंढरी । अविनाश श्रीहरी ।
वाहीन अंतरीं । व्यापुनि अलिप्त ।।
मूर्ती लपविल्या । अविंधीं फोडिल्या ।
म्हणती दैना जाल्या । पंढरीच्या ।।
अढळ न ढळे । ब्रह्मादिकां न कळे ।
म्हणती आंधळे । देव फोडिले ।।
चराचरीं अविट । गुप्त ना प्रकट ।
ओळखावा निकट । ज्ञानचक्षें ।।
हरि जित ना मेले । आले ना ते गेले ।
हृदयांत रक्षिले । शेख महंमद ।।

शेख महंमदाचा 'ज्ञानचक्षु' अशा प्रकारे सदैव उघडा असल्यामुळे त्याने मूर्तिभंजन करणाऱ्या धर्मांध मुसलमानांवर आणि मूर्तिभंजनातून उद्‌ध्वस्त होणाऱ्या दुबळ्या हिंदूंवर वाक्प्रहार करून त्यांना शाश्वताचा शोध घेण्यास प्रवृत्त केले आहे. अंधश्रद्धेवर आणि खुळचट धर्मकल्पनांवर आघात करताना त्याच्या वाणीला दुधारी शस्त्राची धार आलेली दिसते. परंतु त्याला या निखळ विवेकदृष्टीची फारच किंमत द्यावी लागलेली दिसते. हिंदू गुरूचा, हिंदू धर्मग्रंथांचा, हिंदू संतांच्या चरित्रांचा आणि हिंदू संतवाणीचा स्वीकार केल्यामुळे त्याचे कडवे मुसलमान ज्ञातिबांधव त्याला 'काफर' समजत असत, तर हा मुसलमान असल्यामुळेच देवतानिखंदन करतो, असा हिंदूंचा अपसमज होत असे. ही कुचंबणेची अवस्था त्याने अनेकवार व्यक्त केली आहे--

> एक म्हणती हा यातीचा मलवंश । म्हणून निखंदितो आमच्या देवतांस ।
> याचा मानूं ना आम्ही विश्वास । प्रतिमा निखंदिल्या ॥
> देखत अविंध देवळे मोडिती । हा तो त्यांचाच स्वयाती ।
> येणें प्रतिमेची केली माती । आतां काय पुजावें ॥
> यवन देवतांस करिती मार । हें तंव चालिलें असे पारंपार ।
> आम्ही वंदूं ना याचें उत्तर । हा त्यांचाच गोत्या ॥
>
> (यो. सं. १६·६२-६४)

लोक खुळेपणाने 'साधुसंतांच्या याती उमगिती' (यो. सं. १६·७४) याचा शेख महंमदाला विषाद वाटत असे. अध्यात्मज्ञानाला जात नसते— 'ज्ञान कोणासारिखें नाहीं जालें ।' (यो. सं. १६·६५) हे त्याने पुनः पुनः बजावलें आहे. 'ज्याला नवाजितां ईश्वर । त्याचा शोधूं नये कुळाचार ।' (यो. सं. १६·६७) हा सिद्धान्त सांगून, त्याने त्याच्या पुष्टीसाठी अनेक पौराणिक दाखले सादर केले आहेत. हिंदू समाजातील नानाविध भेदांना आणि स्पृश्यास्पृश्यतेच्या खुळया कल्पनांना विटून त्याने कधी तरी 'बरवा झालों मुसलमान । नाहीं विटाळीं आठवण ।' असाही उद्‌गार काढला आहे. परंतु हा उद्‌गार तुकोबांच्या 'बरी केली हीन याती । नाही वाढली महंती ।' या उद्‌गाराच्या जातीतला आहे. त्यात मुस्लिमश्रेष्ठत्वाचा यत्किंचितही भाव नाही.

उलट आपण जन्माने मुसलमान असूनही-म्हणजे कडव्या धर्मांधतेच्या खाणीत निपजलो असूनही शुद्ध परमार्थाची कास धरून आहोत, अपरोक्षज्ञानाचा अनुभव घेऊन त्या अनुभवाच्या खुणा बोलतो आहोत, याचा त्याचा त्यालाही ‘ चमत्कार ’ वाटत असल्याचे दिसते. तो म्हणतो--

बाभळेच्या झाडा । आंबे आले पाडा ।
अपरोक्ष निवाडा । शेख महंमद ॥
याति मुसलमान । मऱ्हाष्ट्री वचने ।
ऐकती आवडीनें । विप्र शूद्र ॥
इंद्रावळी वेलीं । खरबुजें पिकलीं ।
ते भावें सेविलीं । सदाचरीं ॥
मुसलमान याती । निपजली मती ।
अधिकारी होती । अठरा पगड ॥

शेख महंमदाच्या या उद्‌गारांतून त्याच्या अंतःकरणातील खळबळ अत्यंत प्रांजळपणाने व्यक्त झालेली दिसते. या प्रांजळपणामुळेच अखेरीस तो महाराष्ट्रातील सकल हिंदूंचा पूजाविषय बनला. त्यांनी त्याला श्रेष्ठ मराठी संतांच्या मांदियाळीत मानाचे स्थान देऊन त्याचे स्मरण जिवंत राखले. समकालीन आणि उत्तरकालीन अनेक थोर संतांनी त्याचे नाव परमादराने उच्चारलेले आहे.

### जयरामस्वामींची भेट

शेख महंमद आणि समर्थ पंचायतनातील विख्यात साधू जयरामस्वामी वडगावकर यांचा विशेष स्नेह होता. पारंपरिक चरित्रकाराने त्यांच्या प्रथम भेटीचे वृत्त काहीशा अद्‌भुत रीतीने वर्णिले आहे. शेख महंमद हा यातीचा अविंध असूनही ‘ अवघें ब्रह्मरूप हेचि त्याची निष्ठा ’ अशी शेख महंमदाची कीर्ती कानांवर आल्यामुळे जयरामस्वामी ‘ घेऊनियां सवें पांच शत शिष्य ’ श्रीगोंद्यास आले. मकरंदपुरातील गुंफेत तो भेटला नाही. कोणी तरी सांगितले की, ‘ तो नदीकाठी ध्यानधारणेसाठी गेला आहे. ’ जयरामस्वामी नदीकाठी आले. डोक्यावर घोंगडी आणि पायात नालबंद जोडा अशा थाटात तो उभा होता. जयरामांनी त्यालाच शेख महंमदाचा पत्ता विचारला. त्याने मिश्किलपणाने सांगितले की, ‘ त्या आंब्याच्या झाडाखाली सावली खात बसला

आहे.' जयरामस्वामी तिथे जाऊन पाहतात तो तिथे एक वाघ विसावा घेत होता. ते तिथून परतल्यावर शेख महंमदाने त्यांना छेडले—

हांसोनिया साधू । बोले जयरामासी ।
तोही तूं नेणसी । सेख्या ऐसें ॥

नंतर जयरामांनी पुनः झाडाखाली जाऊन वाघाला मिठी मारली आणि वाघ व शेख सुलतान यांचे ऐक्य साक्षात अनुभवले.

ही चमत्कारकथा खरी नसावी. जयरामस्वामींच्या भेटीच्या वेळी काही चमत्कार दाखविण्याची ऊर्मि आपल्या मनात जागी झाली असता, गुरूने आपणास अंतःप्रेरणा देऊन त्या मोहातून वाचविले, असे स्वतः शेख महंमदाने म्हटले आहे. जयरामस्वामी हे महान साधू होते. ते सकल भेदांच्या अतीत बनले होते. बहिणाबाईसारख्या ब्राह्मण विवाहित मुलीला तुकोबांचा छंद त्यांनीच जडविला आणि तिच्या नवऱ्याने शूद्र गुरू करून घेण्याला कठोर विरोध केला असता जयरामांनीच तिचा निग्रह टिकविण्यासाठी तिला वज्रसूचिकोपनिषदा-सारखा प्रखर वैचारिक आधार दिला.[८] जयरामस्वामींची विवेकनिष्ठा इतकी प्रखर असल्यामुळेच त्यांनी शेख महंमदासारख्या मुक्त चिंतकाचा मुक्त स्नेहाने स्वीकार केला असावा. त्यांच्या भेटीत साधुत्वाची परीक्षा पाहून सिद्धींचे प्रदर्शन करण्याचा हेतु असणे सुतराम् अशक्य होते.

## भुजंगाने डंखिले तीनदा

शेख महंमदाला त्याच्या पारमार्थिक अधिकारामुळे असे अनेक संत सांगाती लाभले असले, तरी त्याला पाखंडी दुर्जनांचा छळही बराच सहन करावा लागलेला दिसतो. 'मज छळती दुर्जन । नानापरी बोलती मज अवलक्षण ।' अशी त्याने प्रभूजवळ तक्रारही केलेली आहे. निंदकांच्या विखाराप्रमाणेच त्याला एकदा भुजंगाच्या दंशाचाही अनुभव घ्यावा लागला. या संकटाची नोंद त्याने 'योगसंग्रामा'त करून ठेवली आहे—

पर्वकाळ रविवार दिन । तीरा गेलो तुमचे सेवेलागुन ।
तेथें कां मज लाविलें पान । सांगा स्वामी पुसतो भावें ॥
ऐसें भुजंगानें डंखिलें तीनदां । तीनदां विष दिधलें गोविंदा ॥
तुझें काय चुकलों परमानंदा । मज कळलें पाहिजे ॥

या वेगळें मज छळती दुर्जन । नानापरी बोलती मज अवलक्षण ।
इंद्रियेंहि घाले घालिती जपोन । परी चुकेच ना ।। (७·९३–९५)

ही भुजंगांची, निंदकांची आणि सामाजिक जडमूढतेची सर्व विषे शेख महंमदाने पचविली आणि सर्व भेदांना दूर सारून सदैव अमृताचीच वृष्टी केली. त्याचमुळे त्याला अमृतत्वाचा लाभ झाला. त्याचे नाव अजरामर झाले.

### समाधी आणि जीवनकाल

शेख महंमद योगी असल्यामुळे त्याला प्रदीर्घ जीवन लाभले होते. श्रीगोंदे येथे त्याने अर्धशतकाहून अधिक काळ परमार्थरंगात रंगून व्यतीत केला आणि दिव्याने दिवा लावावा, त्याप्रमाणे अनेक मुमुक्षूंच्या हृदयात परमार्थप्रीतीची ज्योत उजळून त्यांना मुक्तीचा महापथ दाखविला. या काळात त्याने ' योगसंग्राम ' नामक प्रमुख ग्रंथाशिवाय अनेक लघुग्रंथ आणि स्फुट कविता रचली. इ. स. १५९५ च्या सुमारास तो श्रीगोंदे येथे येऊन स्थिर झाला; इ. स. १६४५ मध्ये त्याने ' योगसंग्रामा 'ची रचना केली आणि इ. स. १६६० च्या सुमारास फाल्गुन शुद्ध नवमीच्या दिवशी कृतार्थपणे आपल्या गुंफेत देह ठेवला. श्रीगोंदे येथे असलेली त्याची कबर आजही त्याच्या महात्मतेची स्मृती सांभाळून आहे. त्याची निखळ भक्ती प्रत्ययास आल्यामुळे त्याच्या वार्षिक पुण्यस्मरणाच्या उत्सवात हिंदू समाज बहुसंख्येने नि उत्साहाने समरस होतो, हे दृश्य त्या महात्म्याच्या आत्म्याला निःसंशय सुखदायी ठरणारे आहे.

### वंशपरंपरा

शेख महंमद हा गृहस्थाश्रमी होता. त्याच्या पत्नीची कबर त्याच्या दर्ग्यात त्याच्या कबरीशेजारीच आहे. श्रीगोंदे येथील मठाचा अधिकार वंशपरंपरेने चालत आलेला आहे. ' कादिरी परंपरे 'त ( ' सिजरा-इ-कादिरी ' मध्ये ) शेख महंमदानंतर दावलजी, हाकीम आणि बालासाहेब ही नावे क्रमाने आलेली आहेत. जनकोजी शिंदे यांच्या एका सनदपत्रात ( २० डिसेंबर १८३६ ) बालाबावा हा शेख महंमदाचा पणतू असल्याचा उल्लेख आहे. त्यावरून दावलजी हा पुत्र आणि हाकीम हा नातू असावा, असे अनुमान संभवते. ' कादिरी परंपरा ' आणि उपरिनिर्दिष्ट सनदपत्र यांच्या आधारे शेख महंमदाची वंशपरंपरा अशी ठरते—

राजे महंमद ( + फुलाई )
↓
शेख महंमद
↓
दावलजी ( ऊर्फ लाडजी )
↓
हाकीमजी
↓
बालाबावा
↓

| मलंगबावा | हाफीजबावा |
| --- | --- |
| | मलंगबावा ( इ. स. १८३६ मध्ये हयात ) |

विद्यमान मठाधिपतींचे नावही मलंगबावा असेच आहे. शेख महंमदानंतर त्याच्या वंशजांनी इनामे व वर्षासने सांभाळून शेख महंमदाच्या पुण्यतिथीचा उत्सव यथाशक्ती चालू ठेवला आहे.

शेख महंमदाच्या वंशजांपैकी दावलजी आणि हाकीम यांनी शेख महंमदाच्या आरत्या रचल्या आहेत. दोन्ही आरत्या उदात्त भावाने भारलेल्या आहेत. दावलजीने उभे केलेले आरतीचे हे विराट दृश्य पहा —

स्तंभाविण आकाश शोभती तारा ।
चंद्रसूर्य दिवटे उजेड अवधारा ॥
पवन धूपदीप घांट वाजे शिखरा ।
दमामे गर्जती पूजा शंकरा ॥
नव नाटकशाळा रंगणीं नाचती ।
चारी वेद तेथें गायन करिती ॥
दश अवतार दर्शना येती ।
शेष शिणला म्हणतां आरती ॥

विराट परब्रह्माशी एकरूप बनलेल्या या महापुरुषाची आरती परब्रह्मरूपातच करणारा हा शेख महंमदाचा पुत्र त्याचा पारमार्थिक वारसाही जागवणारा दिसतो.

पांचां तत्त्वांची करूनि आरती ।
ज्ञानदीप लावूनि घेतली हातीं ॥
भावें वोवाळिले आम्हीं श्रीपती ।
शेख महंमद गुरु माझा तो सती ॥

अशी ही ' अविनाश आरती ' गाणारा दावलजी स्वतःला ' बहु मूढमती ' म्हणवून घेत असला, तरी त्याची आरती पाहून-ऐकून विराटात विलीन झालेला तो महापुरुष निःसंशय सुखावला असेल — त्याने आपल्या या सुपुत्रावर परमकृपेचा वर्षाव केला असेल.

हाकीमने रचलेली आरतीही अशीच परमानुभूतीच्या परिभाषेतील आहे.

ऊर्ध्वदृष्टीं बुडूनि सृष्टी तन्मयता अंतरीं ।
ज्ञानामृत वर्षती धारा पूर्ण विश्रांती ॥

ज्ञानामृताच्या धारानृत्यात न्हाऊन निघालेला हा हाकीम पूज्य-पूजक-पूजा यांच्या त्रिवेणीसंगमात नित्य विहार करीत आहे —

त्रिवेणीसंगमीं स्नान नित्य दर्शन ।
पूज्य पूजक पहातां भावें जाला आपण ॥
तूर्येचे जे अंतःकरणीं हो महदानंद ।
हाकीम महंमद आरती ऐशी भाविका छंद ॥

हा असा परमार्थाचा वारसा जागवणारे आणि जगवणारे पुत्र-पौत्र शेख महंमदाला लाभले, ही खरोखरच धन्यतेची बाब आहे.

### शिष्य आणि सांगाती

शेख महंमदाने परमानुभूतीचे गौरीशंकर गाठल्यावर, ' मोक्षाची सोडीबांधी ' करीत करीत अनेक हिंदू-मुसलमानांना परमार्थपथावर हाती धरून चालविले आणि परमपदाचे अधिकारी बनविले. त्याचा पुत्र दावलजी हा त्याचा शिष्यही होता, हे आपण पाहिलेच आहे. याशिवाय मुधा पांगूळ, दयाळदास देवंग, रघुनाथ योगी, आजम इत्यादी शिष्यांची नावे आणि स्फुट रचना आपल्याला उपलब्ध

मु. ७

झालेली आहे. मुधा पांगूळ हा रुई-वाहिरे गावचा. त्याची वृत्ती पांगुळाची.[१] 'धर्म जागो !' असा घोष करीत पहाटेच्या प्रशांत प्रहरी लोकांना जागवीत भिक्षा मागून जगणारा हा मुधा पांगूळ शेख महंमदाच्या संपर्कात आल्यावर त्याच्या हृदयातच परमधर्माची पहाट जागी झाली आणि तो 'धर्म जागो महंमदाचा' असा घोष घुमवू लागला.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा, शके १५९९ या दिवशी रुई गावी मुधा पांगुळाला शेख महंमदाचे पहिले 'दिव्य दर्शन' घडले आणि नंतर वैशाख वद्य सप्तमी, गुरुवार शके १६०० (काळयुक्त नाम संवत्सर) या दिवशी त्याला वाहिरे गावी शेख महंमदाकडून अप्रत्यक्ष साक्षात्कारी भेटीत परमबोधाची प्राप्ती झाली. सद्गुरूसारखा दाता भेटल्यामुळे दानाची परिसीमा झाली आणि हा पांगूळ त्या दानाने इतका समृद्ध झाला की, त्याला परानुभूतीचा उत्तुंग गिरी लीलया लंघून जाणे सहज शक्य झाले. शेख महंमदाविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना हा मुधा पांगूळ म्हणतो—

भावभक्ती करूनि कांहीं । सेवादान घडलें नाहीं ॥
जप तप अनुष्ठान । होम यज्ञ नेणों कांहीं ॥
कोणा पुण्यें दया केली । दाता सद्गुरूनें पाहीं ।
शेख महंमद नाम ज्याचें । मुधा पांगुळ त्याचे पायीं ॥

मुधा पांगुळाने एका 'धाव्या'त आत्मनिंदा करून सद्गुरूकडे कृपेचे दान मागितले आहे, तर दुसऱ्या एका पदात वासुदेवाची भूमिका घेऊन सद्गुरूच्या विराट रूपाचा महिमा गायिला आहे—

सद्गुरु वासुदेवा काय वर्णूं बा तुज ।
स्वर्ग मृत्यु पाताळ यांहीवेगळें गुज ॥
सप्तही सागरांचा चूळ भरिला सहज ।
एकवीस स्वर्गांवरी तूं गुरुमहाराज ॥
हरिहरब्रह्मादिक बा सोयीं लाविले ।
रामकृष्ण अवतार गुरु शरण गेले ॥
अठ्यांशीं सहस्र ऋषी गुरु वंदिते जाले ।
राजेंद्र महाशूर जयवंत त्वां केले ॥

मुधा पांगुळाप्रमाणेच दयाळदास देवंगालाही शेख महंमदाची कृपा विशेष लाभलेली दिसते. हा दयाळदास कोण, कुठला, ते निश्चयाने सांगता येत नाही. परंतु त्याच्या 'देवंग' या उपनामावरून तो कानडी कोष्टी समाजातील दिसतो. त्याने 'शेख महंमद' हा षडक्षरी मंत्र साधून रचलेले एक स्फुट उपलब्ध आहे.

शेख महंमद षडक्षरी मंत्र हा श्रेष्ठ ।
उच्चारितां अनन्यभावें हरती भवकष्ट ॥

अशी त्याने या मंत्राच्या प्रभावाची ग्वाही दिली आहे. कारण त्याने शेख महंमदाच्या चरणाश्रयाने तसा अनुभव घेतला आहे—

लजील जाला भेद, सहसा न दावी मुख ।
खटाटोप अविद्या गेली, हरलें भवदुःख ॥

असें हर्षभराने उद्घोषित करणारा हा दयाळदास देवंग कळिकाळालाही 'दे माय धरणी ठाय' करून सोडीत आहे. तो म्हणतो—

दचकुनि काळ पळे स्वरूप देखुनि अभेद ।
दयाळदास देवंगाचा शेख महंमद ॥

काळालाही भयभीत करून पळवून लावणारा शेख महंमदाचा हा शिष्य आपल्या गुरूचा महान अधिकार सूचित करीत आहे.

मुधा पांगूळ आणि दयाळदास देवंग यांच्याप्रमाणेच रघुनाथ योग्याने रचलेल्या आरतीत शेख महंमदाला 'परब्रह्मसाम्य' म्हणून संबोधिले आहे, तर आजम नामक यवन शिष्याने शेख महंमदाचे नाम हे 'षडक्षरी सावेव परब्रह्म' आहे, असे म्हटले आहे. या सावेव परब्रह्माच्या सान्निध्यात आजमने मिथ्या माया दवडली आणि दग्धांबराप्रमाणे विदेहावस्था प्राप्त केली—

दवडुनी माया मिथ्या, लक्षितां ब्रह्म निजानंद ।
दग्धांबर परि विदेह आजम वर्ते निर्द्वंद्व ॥

या चार-पाच शिष्यांशिवाय असेही काही शिष्य आहेत की, ज्यांची नावे लोप पावली आहेत, परंतु त्यांनी आपल्या गुरूला वाहिलेली आदरांजली मात्र अजूनही ताजी आहे. त्यांपैकी कुणी शेख महंमदाला 'ज्ञानसागर' आणि 'ब्रह्मविद्येचा दाता' या बिरुदांनी गौरविले आहे, तर कुणी 'डोळयांचा डोळा' आणि 'निजजनां मुक्तिदानी' या पदांनी स्तविले आहे.

वंशज आणि शिष्य यांच्याप्रमाणेच अनेक संत-सांगातीही शेख महंमदाचा गौरव गाताना दिसतात. अकबरशहा, बालाशहा, बुऱ्हानशहा, मोअज्जमशहा, शाह हुसेन फकीर हे मुसलमान साधुसंत आणि जयरामस्वामी वडगावकर, समर्थ रामदासस्वामी यांसारखे हिंदू साधू यांनी शेख महंमदाचा मुक्त कंठाने गौरव केला आहे. समर्थांनी शेख महंमदावर रचलेल्या आरतीत त्याचे 'दृश्येवीण दर्शन' अनुभवून त्याला 'क्षेमेवीण आलिंगन' दिले आहे. शेख महंमदाला परब्रह्मस्वरूप मानून समर्थांनी प्रकट केलेला विनयभाव शेख महंमदाचा पारमार्थिक अधिकार स्पष्टपणे व्यक्त करीत आहे. या आरतीच्या शेवटी समर्थ रामदास म्हणतात–

देह जरी वोवाळूं, उसनें पांचांचें ।
जीव शिव वोवाळूं, तरी देणें हें तुमचें ॥
भावभक्ती नेणें, पोसणें संतांचें ।
रामी रामदास चरणरज संतांचे ॥

शिष्यांनी आणि संतांनी एवढा गौरविलेला हा सत्पुरुष स्वतःला मात्र संतांचा किंकर समजत असे आणि विनीतभावाने त्यांच्या चरणांशी याचना करीत असे की–

लडिवाळ असे तुमचें दीन ।
आशीर्वादावे ॥ यो. सं. १. ५९

**ग्रंथरचना**

शेख महंमदाने मराठी, हिंदी, उर्दू, फारसी या भाषांत बरीच रचना केली आहे. यांपैकी मराठी रचनाच प्रधान आहे. त्याच्या प्रकाशित रचनेचा तपशील असा—( १ ) 'योगसंग्राम' ( प्रसंग १७, ओव्या २३१९ ); ( २ ) 'पवन-विजय' ( खंड ३, ओव्या ४८२–अपूर्ण ); ( ३ ) 'निष्कलंकप्रबोध' ( गीतओव्या ३००–अपूर्ण ); ( ४ ) रूपकें, भारुडें, इ. ( ५ ); स्फुट अभंग ( २२५ ); ( ६ ) हिंदुस्थानी कवित्त. प्रथम या रचनेचा स्थूल परिचय करून घेऊन, नंतर या सर्व रचनेतून व्यक्त होणारे शेख महंमदाचे विचारविश्व आणि व्यक्तिमत्त्व आपण न्याहाळू.

'योगसंग्राम' हा शेख महंमदाचा प्रमुख ग्रंथ. या ग्रंथाची रचना श्रावण शु. १५ शके १५६७, सोमवार (पार्थिव नाम संवत्सर) या दिवशी सांगता पावली. १७ प्रसंग आणि २३१९ ओव्या असलेल्या या ग्रंथात शेख महंमदाने एक व्यापक पारमार्थिक रूपक योजिले आहे. या रूपकाची प्रेरणा त्याला ज्ञानेश्वरीच्या अध्ययनातून प्राप्त झालेली असावी, असे दिसते. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात (ओ. ४६–५८) योगदुर्गाचे सांग रूपक आलेले आहे आणि नवव्या अध्यायात (ओ. २११–२१७) योगसंग्रामाचे रूपक आहे. एकनाथ हे ज्ञानेश्वरांच्या समग्र विचारविश्वाचे विस्तारक. त्यांनी आपल्या भागवतटीकेत (९·१२०–१४२) योगदुर्ग आणि तो जिंकण्यासाठी होणारा योगसंग्राम यांचे रूपक ज्ञानेश्वरांच्या संस्कारातूनच योजिले आहे. ज्ञानेश्वरी हा शेख महंमदाचे गुरु चांद बोधले, गुरुबंधू जनार्दनस्वामी आणि गुरुबंधूंचे शिष्य एकनाथ या सर्वांचा प्रिय ग्रंथ. शेख महंमदाला गुरूकडून ज्ञानेश्वरीचा लाभ झाला होता, अशी पारंपरिक माहिती आहे. आपल्या गुरुभक्तीने प्रसन्न होऊन 'कृपा केली ज्ञानदेवें।' (क. सं. २३५) असे स्वतः शेख महंमदानेच म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर, प्रस्तुत 'योगसंग्राम' ग्रंथातील योगसंग्रामाचे रूपक ज्ञानेश्वरीच्या संस्कारातून आलेले आहे, असे मानणे सयुक्तिक वाटते आणि या वाटण्याला अंतरंगपरीक्षणाने पुष्टीही मिळते.

शेख महंमदाच्या या योगसंग्रामात योद्धा आहे आत्मा. या योद्ध्याने मनाच्या वारूवर आरूढ होऊन अहंकाराशी युद्ध मांडले आहे. संकल्प-विकल्प, काम-क्रोध, आळस, इत्यादी अवगुणांनी युक्त असे अहंकाराचे सैन्य उभे आहे. या सैन्यावर मात करून आत्म्याने ब्रह्मांडशिखर गाठले की हा योग-संग्राम संपतो.

हे रूपक केवळ पहिल्या चार आणि शेवटच्या सतराव्या व अठराव्या प्रसंगांत आहे. यांमधल्या प्रसंगांत साधनेला पोषक आणि नाशक अशा इष्टानिष्ट आचारांची परखड चर्चा आहे. ही आपण संग्रामाची तयारी मानायची. प्रत्यक्ष ग्रंथात हा विषय रूपकाच्या भाषेत मांडलेला नाही. त्याच्या मांडणीत शास्त्रशुद्ध क्रम नाही. ग्रंथकाराने आपली विवेकदृष्टी जागृत ठेवून जे पाहिले, अनुभवले आणि चिंतनाच्या मुशीतून उजळून काढले, ते जसे सुचेल-स्मरेल तसे सरळ

सरळ सांगून टाकले आहे. त्याला हेतुतः अलंकृत करण्याचा प्रयत्न त्याने कुठेच केलेला नाही.

शेख महंमदाचा 'पवनविजय' हा दुसरा ग्रंथ शिव-कार्तिक-संवादात्मक संस्कृत 'शिवस्वरोदया'चा अनुवाद आहे. याचे तत्त्वसार, पवनविजय व काळज्ञान असे तीन खंड असून शेवटचा खंड अपूर्णच उपलब्ध झाला आहे. माझ्या संग्रहात ज्ञानदेवांच्या नावावरील एक 'पवनविजया'ची हस्तलिखित प्रत (वैशाख वद्य ६, शके १७८२ या दिवशी नकललेली) आहे, तिच्याशी शेख महंमदाचा 'पवनविजय' तुळून पाहिला असता असे आढळले की, या दोन्ही कृतींतील बराच भाग शब्दशः एकच आहे. उदा० दोन्ही ग्रंथांतील कर्त्यांची नाममुद्रा पाहिली की यांतील घोटाळ्याची कल्पना येऊ शकेल –

चतुरवेदांचें सत्व काढिलें । उपनिषदांचें सार घेतलें ।
शेख महंमद बोलिले । विजयो मंथन करूनियां ॥

(शेख महंमद–प. वि. १·८४)

चतुर्वेदांचें सत्त्व काढिलें । जें उपनिषांचें सार घेतलें ।
निवृत्तिकृपें ज्ञानदेव बोले । पवनविजयो मंथन करूनियां ॥

(ज्ञानदेव–प. वि. १२)

या घोटाळ्याचा उलगडा करण्यासाठी या ग्रंथाच्या आणखी काही प्रती उपलब्ध व्हायला हव्या.

'निष्कलंकप्रबोधा'त शेख महंमदाने आचाराच्या बाह्यावडंबरावर आघात करून परमार्थाचे मर्म विशद केले आहे. 'पाणी प्याल्याविण नवजाय तान । तैसें नव्हे ज्ञान प्रचेविण ॥' अशा प्रतीतिगौरवानेच या ग्रंथाचा प्रारंभ झाला आहे. क्षुद्रदेवतोपासना, त्या उपासनेचे अमंगळ स्वरूप, मठस्थ अनाचारात रंगलेले महानुभाव, जन्मजात श्रेष्ठत्वाची वृथा कल्पना, इत्यादि विषयांवरील शेख महंमदाचे विवेचन परखड आहे. जन्मजात ब्राह्मण्याच्या कल्पनेचा निरास करून, 'कल्पना मुंडिती ते ब्रह्मरूप' हा उदात्त विचार मांडताना त्याने 'निबंध उपनिषदां'चा जो हवाला दिला आहे, तो बहुतेक 'वज्रसूचिकोपनिषदा' विषयी असावा, असे वैचारिक साम्यावरून वाटते. या वाटण्याला आणखी एक आधार असा आहे की, 'वज्रसूचिकोपनिषदा'वर अभंगभाष्य रचणाऱ्या बहिणाबाईशी

शेख महंमद समकालीन असून, बहिण बाईच्या परमार्थाला प्रारंभापासून सक्रिय उत्तेजन देणारे जयरामस्वामी हे शेख महंमदाचे सांगाती होते.

## लोकनिरीक्षण आणि लोकशिक्षण

शेख महंमद हा कविराच्या प्रकृतीचा मुक्त चिंतक आणि प्रबोधक असल्या-मुळे त्याने लोकजीवनातील अनिष्टांचे सूक्ष्म निरीक्षण करून ती सर्व अनिष्टे विवेकाच्या प्रखर अग्नीत जाळून टाकली आहेत. त्याचे लोकनिरीक्षण थक्क करणारे आहे– चाकोरीतले जीवन जगणाऱ्यांना गरगरायला लावणारे आहे. दुर्धर रोगाने पछाडलेल्या माणसाला आपले रोगनिदान ऐकायचे जसे भय वाटते, तसेच भय शेख महंमदाच्या दृष्टीतून प्रकट झालेले आपले अंतरंग पाहून समाजाला वाटले असेल. त्याने हे लोकनिरीक्षण जसे निरभ्र दृष्टीतून केले आहे, तितक्याच उघड्या शब्दांतून त्याने ते व्यक्त केले आहे.

धर्माच्या नावावर चालणारे भावहीन कर्मकांड, शुद्ध परमार्थाशी विसंवादी असणारी आंधळी क्षुद्रदेवतोपासना आणि धर्मक्षेत्रातली दांभिकता यांवर शेख महंमदाचा मुख्य कटाक्ष आहे. शुद्ध परमार्थाच्या या वैऱ्यांवर त्याने एखाद्या रणधीर वीराप्रमाणे चौफेर हल्ला चढविला आहे. या बाबतीत त्याने कुणाचीही भाडभीड ठेवलेली नाही. क्षुद्र देवतांचा धिक्कार करताना तो म्हणतो—

देवता असत्या सामर्थ्यपणें । तर तोंडावर कां मुततीं श्वानें ।
प्रसिद्ध देखोनि झकलीं अज्ञानें । कनिष्ठ भजन करिती ॥
(यो. सं. १४·७२)

या क्षुद्र देवतांच्या नादी लागलेल्या सर्वसाधारण जनांची आणि त्यांच्या विशिष्ट उपासकवर्गाची शेख महंमदाला कीव येते. प्रत्येक वाराला आणि प्रत्येक तिथीला वेगवेगळ्या देवताच्या पूजेअर्चेचा सोहळा साजरा करणाऱ्या समाजाचे धर्मप्रेम किती हास्यास्पद आहे, हे त्याने विस्ताराने दाखवून दिले आहे. खोडावेडी, बगाड, इंगळांचे स्नान, पशुबली, इत्यादी भयानक प्रकारांवर त्याने कडक टीका केली आहे. मुरळ्यांच्या प्रथेवर तर त्याने आग पाखडली आहे—

ज्या मुरळ्या करिती अनाचार । चालविती उन्मत्तांचे घरचार ।
त्यांस म्हणती लावी भंडार । आपुलिया हातें ॥

पुण्य आचरण न ये मुरळ्यांच्या चित्ता । भलत्याच्या होतील कांता ।
त्यांचा हात भाळास लावितां । कोण तरला सांग बा ॥
जे आपुल्या कुळस्वामीची मुरळी । तिसी कैसे खेळती ढवाळी ।
ऐसी कलियुगीं प्रभावळी । पापाची वर्ततसे ॥
मुरळ्या कुळस्वामीच्या दासी । त्यांसी रमतां कंटाळेतना अपेशी ।
मल्हारी न करीच कांहीं त्यांसी । कां सत्त्वें सांडवला ॥
( यो. सं. १४·५४–५८ )

मुरळ्यांविषयी अशा प्रकारचा निषेध त्याने वारंवार नोंदविला आहे आणि कोवळ्या पोरांना श्वानासारखे गुरगुरत हिंडवणाऱ्या देवालाच धर्मन्यायालयात कठोरपणे उभे केले आहे. शेख महंमद हा ‘ ज्यासी रूप नाहीं रेखा ’ अशा ‘ अव्यक्ता ’चा उपासक असल्यामुळे तो सर्वच सगुणोपासनेचा निषेध करतो, असे मात्र नव्हे. त्याचा रोख आहे तो मुख्यतः अज्ञान व दंभ यांवर. अज्ञानावर ज्ञानाचा प्रकाशझोत टाकणे आणि दंभाचे बुरखे ओढणे या बाबतीत त्याच्याजवळ तडजोड नाही. ‘ तीर्थ-प्रतिमा ’ हे ‘ ओनाम्या ’चे धडे आहेत, असे त्याचे मत आहे. साधनेच्या प्रारंभकाळात सगुणाच्या उपासनेत रंगलेला साधक हा क्रमाने निर्गुण निराकारावर स्थिर होत जातो, असा त्याचा स्वानुभव आहे. सगुणनिर्गुणाचा खुळा वाद तो करीत नाही. ‘ ज्यासी रूप नाही रेखा ’ असा तो ‘ अव्यक्त सखा ’ भावभक्तीच्या सुखासाठी व्यक्त होतो, हे भक्तिसत्य त्याला मान्य आहे—

ज्यासी रूप नाहीं रेखा । तो अव्यक्त माझा सखा ।
भावभक्तीचिया सुखा । साकारला ॥
साकारला हरी । गोकुळांभीतरीं ।
गौळणी सुंदरी । मोहियेल्या ॥
बारा सोळा गौळणी । त्यांत सतरावी शहाणी ।
रखुमाई मुखरणी । अर्धमातृका ॥
चौदा भुवन हें गोकुळ । आणि पन्नास गोवाळ ।
मांडियेला खेळ । चराचरीं ॥
तेथें उन्मनी आखर । नीळारंभ तरुवर ।
मांडियेला सूर । स्वानुभवाचा ॥...

तेथें विराली वासना । आणि निमाली कल्पना ।
तेथें शेखमहंमदपणा । ठावचि नाहीं ॥

( कवितासंग्रह, १३६ )

उपासनेच्या बाबतीत ‘ भाव तैसी सिद्धि ’ ( क. सं. २१८ ) हा त्याचा सिद्धान्त आहे आणि या सिद्धान्ताच्या पुष्टीसाठी त्याने भगवद्‌वचनाची ग्वाही दिली आहे.

क्षुद्रदेवतोपासनेप्रमाणेच जन्मजात उच्चतेच्या कल्पनेवरही त्याने तीव्र आघात केला आहे. हिरण्यकशिपूच्या उदरीं जन्म घेऊनही प्रल्हाद महान भगवद्‌भक्त होऊ शकतो, हे त्याने यासारख्या अनेक दृष्टांतांनी स्पष्ट केले आहे. जो ‘ सांडूनिया द्वैत तद्रूप जाहला ’, असा भक्त ‘ भलतिये यातीचा ’ असला, तरी तो वंद्यच होय. ‘ ब्रह्म जाणे तोचि सोवळा ब्राह्मण ’ ( यो. सं. १७·१८५ ) अशी त्याची ब्राह्मणाची व्याख्या आहे. ‘ असो हीन याती । जाणे ब्रह्मस्थिती । तो ब्राह्मण संतीं । पुजावा आधीं ॥ ’ ( क. सं. १७३ ) या शब्दांत त्याने या ‘ आदर्श ब्राह्मणा ’चे वंदनीयत्व उद्‌घोषिले आहे. ब्राह्मण कुळात जन्म घेऊनही जे भक्तिविन्मुख आहेत, त्यांचे ब्राह्मण्य व्यर्थ आहे, हे स्पष्ट शब्दांत त्याने सांगितले आहे—

उत्तम कुळी काय । जाळावी विप्राची ।
जो नाहीं हरीची । बोधे भक्ती ॥

( क. सं. १७५ )

जसा त्याने हिंदूंतील उच्चनीचतेच्या कल्पनेचा धुव्वा उडविला आहे, त्याचप्रमाणे त्याने मुसलमानांनाही चार गोष्टी सुनावल्या आहेत. ज्यांचा जन्म गर्भाच्या मुसेत होतो, ते सर्वच प्राणी मुसलमान होत, अशी मुसलमानाची व्याख्या करून त्याने, ‘ काफर ’ म्हणून इतरांचा द्वेष करण्याचे कारण नाही, हे सूचित केले आहे. मुसलमान हे धर्मांधतेने सर्वत्र आसुरी थैमान मांडीत आहेत, हे दृश्य त्याच्या सदैव नजरेसमोर असल्यामुळे त्याला अनेकदा मुसलमानपणात गौणत्व वाटते आणि तो ‘ अज्ञान अविंध, ज्ञान हो ब्राह्मण ’ या शब्दांत अज्ञानाला अविंध मानतो. परंतु केव्हा तरी तो तुरुकपणावरच परमार्थाचे रूपक करून म्हणतो—

ब्रह्मपुरीचे तुरुक । द्वैत गिळोनि जालों एक ॥
अहं रोडगा भक्षिला । निजप्रेमाचा प्यालों प्याला ॥
सांडवलों आचारविचारा । कोणी भला म्हणा बुरा ॥
(क. सं. १७१)

त्याची दृष्टी अशी परिशुद्ध असल्यामुळे त्याने भेदांऐवजी सात्त्विक साम्यावर भर दिला आहे —

सचापीर कहे मुसलमान । मऱ्हाटे म्हणती सद्गुरु पूर्ण ।
परी दोहींत नाहीं भिन्नपण । आखें खोल देखो भाई ॥
(यो. सं. १७·३)

समाजात शुद्ध परमार्थ जागवण्यासाठी शेख महंमदाने केलेले समाजनिरीक्षण अत्यंत सूक्ष्म आणि व्यापक आहे. नानाविध देवदेवता, त्यांच्या उपासनेचे विधिविधान, त्यांच्या उपासकांचे वर्ग, विविध संप्रदाय, त्या संप्रदायांतील विकृतींचे स्वरूप, समाजाच्या समजुती, त्याच्या सामाजिक आचरणातील अनेकविध व्यंगे या सर्व गोष्टींचा सूक्ष्म तपशील शेख महंमदाच्या रचनेत आढळतो. या तपशिलाची बारकाईने पाहणी केल्यास तत्कालीन समाजजीवनाचे सर्वांगीण चित्र उभे करता येईल, एवढी सामग्री शेख महंमदाने आपल्या विचारांच्या पुष्टीसाठी अनुषंगाने दिलेली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांनी शेख महंमदाची कविता अवश्य धांडोळली पाहिजे, इतके तिचे या क्षेत्रातील महत्त्व आहे.

**वाणीची घडण**

भाषेच्या बाबतीत शेख महंमद समर्थांचा पूर्वगामी शोभतो. वाणीचे विविध विलास व्यक्त करणे त्याला रुचत नाही. जे म्हणायचे असेल, ते सरळ म्हणून टाकणे, हीच त्याची पद्धती आहे. त्याला अभिप्रेत असणारा श्रोतृसमाज हा संमिश्र म्हणजे सर्व थरांतील असल्यामुळे तो अनेकदा उघडी-नागडी भाषा वापरतो; अनिष्टांवर हल्ला करताना ग्राम्य शब्दांचा वापर करायलाही बिचकत नाही. लोकांत प्रचलित असलेले, त्यांच्या बहुश्रुततेच्या कक्षेत बसणारे सुगम पौराणिक आणि व्यावहारिक दृष्टान्त वापरण्यात त्याचा हातखंडा आहे. लोकाभिमुख वक्ता ज्याप्रमाणे दृष्टान्त संक्षेपाने न सांगता त्याला कथेचे स्वरूप देतो, तसेच शेख महंमदाने

केले आहे. अनादि अनंत राम हा दशरथाचा पुत्र नव्हे, हा कविराच्या निर्गुण-दृष्टीतून उद्भवलेला विचार व्यक्त करताना शेख महंमदाने ( यो. सं. १८·२३०–२४५ ) श्रावणाची कथाच विस्ताराने मांडली आहे आणि रामाच्या जन्मापूर्वीच श्रावणाला बाण लागताच त्याने जे रामनाम उच्चारले, ते दशरथपुत्र रामाचे कसे असणार, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याचे पौराणिक दृष्टान्त प्रत्यक्ष पुराणांतले नसतात, तर पुराणकथा लोकमानसात ज्या स्वरूपात प्रसृत झालेल्या असतात, त्या लौकिक स्वरूपातले असतात. उदाहरणार्थ—

अंतर्यामीं नमिला श्रीअव्यक्त हरि । अष्टदळ कमळकळिकेभीतरीं ।
ऊर्ध्व लक्षूनियां केली हेरी । अर्जुनें मत्स्य विंधिला तैसा ॥

( यो. सं. १८·२३० )

अर्जुनाने मत्स्य विंधिल्याची ही कथा महाभारतातली नसून, लोकवाङ्मयातली आहे, हे जाणत्यांना मुद्दाम सांगायला नको. शेख महंमदाच्या भाषेचे हे लौकिक स्वरूप अनेकांगांनी स्पष्ट करता येण्यासारखे आहे. परंतु येथे त्या सर्व अंगांचा विस्तार न करता, वाचकांनी मूळ ग्रंथ वाचावा, असा आग्रह करून, त्याने वापरलेल्या काही अस्सल मराठी म्हणी मी पुढे सादर करीत आहे—

( १ ) दांडा जन्मला तरुवराशरीरीं । तो रिघे कुदळी-कुऱ्हाडीभीतरीं ।
वनस्थळीचा मूळछेद करी । ऐसा अंगसंगें दावा ॥

( यो. सं. १२·२० )

—कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ.

( २ ) पहा पाथरवटें पाषाण घडिला । मग तो टांक्या सोसून मूर्तावला ।
तैसें धैर्य पाहिजे साधूला । जन निंदी ते वेळे ॥

( यो. सं. १८·१३४ )

—टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

( ३ ) वस्त्राआड नग्न । काष्ठाआड अग्न ।

( कवितासंग्रह ११५ )

( ४ ) हुरळल्या मेंढ्या । लांडग्यापाठीं लागल्या ।
त्यानें त्या भक्षिल्या । फाडफाडूं ॥

( कवितासंग्रह १९७ )

(५) न भरे पोट जया । तेणें कांट्या त्या भराव्या ॥

(कवितासंग्रह २२४)

(६) दुरूनि डोंगर । दिसती शोभिवंत ।
जवळ गेल्या आंत । कांटवण ॥

(कवितासंग्रह ८०)

—दुरून डोंगर साजरे.

(७) वडाची साल पिंपळा लावी जन ।

(यो. सं. १४·१२०)

लोकप्रसृत पुराणकथांप्रमाणेच लोकप्रचलित संस्कृत वचनांचा अनुवादही शेख महंमद अनेकवार वापरतो. अभिन्नता अथवा मिठी या अर्थाने संस्कृतात वापरली जाणारी 'तिलतंडुलकम्' ही कल्पना 'बरा तिळा तांदुळा होऊन । दाविलें शिवशक्तीचें भांडण' अशा शब्दांत 'योगसंग्रामा'मध्ये (४·१९) आली आहे. पुढे ज्ञानेश्वरीप्रभावाच्या संदर्भात उल्लेखिलेला 'नाहं वसामि वैकुंठे...' या संस्कृत श्लोकाचा अनुवाद शेख महंमदाने (यो. सं. १८·७४–८०) सात ओव्यांत केला आहे. आणखीही एके ठिकाणी या श्लोकाची छाया उतरली आहे—

प्रेमनामाचा होतसे गजर । भाविक बैसले सुरनर ।
तेथें उभा परमेश्वर । तिष्ठत असे ॥

(यो. सं. १८·२२६)

पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा गाताना शेख महंमदाने वापरलेल्या पुढील कल्पना पहा—

कटावरी कर । चंद्रभागा ठाणा ।
दावितसे खुणा । भवसिंधूच्या ॥
पतितां कडसूत्र । भाविकां पायवाट ।
दावी खुणां निकट । तटीं उभा ॥
भवसिंधूची खोली । ब्रह्मांड बुडे ऐसी ।
तळवा संतरूपी । भिजती ना ॥

(कवितासंग्रह, २३४)

शंकराचार्यांच्या नावावरील 'पांडुरंगाष्टका'तील 'प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितम्बः कराभ्यां धृतो येन तस्मात्।' (माझ्या भक्तांना भवसागर कंबरेइतकाच खोल आहे, हे दाखविण्यासाठीच त्याने कंबरेवर हात ठेवले आहेत.) या कल्पनेचा हा विस्तार आहे, हे मुद्दाम स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही.

लोकप्रचलित संस्कृत वचनांच्या अनुवादाप्रमाणेच लोकमानसाला आकर्षित करून घेणाऱ्या लोकव्युत्पत्तीचाही आश्रय शेख महंमदाने काही ठिकाणी केला आहे. उदाहरणार्थ--

वि म्हणजे विकासला। ठ म्हणजे ठसावला।
म्हणोनि विठल बोला। टीका प्रश्नीक॥

(कवितासंग्रह २३५)

ही विठ्ठलनामाची व्युत्पत्ती अथवा 'मुसलमान म्हणविलें एक्या गुणें) मुसेस नवमास वस्तीकरूपणें।' (मुसेमध्ये म्हणजे मातृगर्भात नऊ मास वस्ती केल्यामुळेच मुसलमान ही संज्ञा-- सर्व योनिज प्राण्यांना- प्राप्त झाली आहे.) अशी 'मुसलमान' शब्दाची व्याख्या करून, मुसलमानांच्या काफरद्वेषाला तो छेद देतो (यो. सं. ६·११).

**पूर्वसूरींचा प्रभाव**

शेख महंमदावर ज्ञानेश्वरीचा प्रभाव योगसंग्रामाच्या रूपकापुरताच आहे, असे नसून, त्याच्या ग्रंथांतील विचारांवर आणि अभिव्यक्तीवर ज्ञानेश्वरीचा व्यापक प्रभाव असल्याच्या खुणा जागोजाग आढळतात. उदाहरणार्थ पुढील काही साम्य-स्थळे पहा[१०]-

आतां आत्मचर्चा नीच नवी। तेचि करूनि ठाणादिवी।
जो इंद्रियांतें चोरूनु जेवी। तेयासीच फावे॥

(ज्ञा. ६. २३)

आत्मचर्चा हे नित्य नवी। ज्ञानाची करूनि ठाणदिवी।
पांचा इंद्रियांतें चोजऊनि जेवि। तोचि जेवणार॥ (यो. सं. ३. ७६)
परि तेयांपासिं पांडवा। मी हारतला गिवसावा।
जेथ नामघोषु बरवा। करिति ते माझा॥ (ज्ञा. ९. २०७)

हरि म्हणे नारदा ऐके वचन । जेथें माझ्या नामाचा घोष संपूर्ण ।
तेथें मी तिष्ठत उभा जाण । कर जोडूनियां ॥ ( यो. सं. १८·८० )
[ नाहं वसामि वैकुंठे, योगिनां हृदये तथा ।
मद्भक्ता यत्र गायन्ति, तत्र तिष्ठामि नारद ॥ ]
जाणतेन गुरु भजिजे । जेणें कृतकार्या होईजे ।
जैसें मूळसिंचनि साहाजे । निगति शाखापल्लव ॥ ( ज्ञा. १. २५ )
खोडा पाणी घालितां । पावे त्या विस्तारा ।
तैसे ते अवधारा । दृष्टान्तीं संत ॥ ( कवितासंग्रह, ८३ )
पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासिंचि त्वचेचिया पदरासि आड ।
परि ते अव्हेरूनि ते मूढ । अशुद्ध काइ सेवति ॥ ( ज्ञा. ९. ५६ )
गोचिडाचें मुख धेनूचे कासे । क्षीर चुकोन अशुद्धावर पडे कैसें ।
तैसें उन्मत्त अविद्येचे पिसे । विषयलंपट होती ॥ ( यो. सं. १३·५७ )

आशय आणि शब्दावली या उभय बाबतींतील साम्याची अशी उदाहरणे वारकाईने पाहिल्यास अनेक आढळतील. या दृष्टीने आणखी एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात ' ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं ..' या श्लोकावर व्याख्यान करताना, पुण्यवंतांचे पुण्य सरल्यावर त्यांची स्वर्गसुखाच्या आगरातून कशी अपमानाने हकालपट्टी होते, याचे वेधक चित्र चितारले आहे. त्या चित्रात रंग भरताना ज्ञानेश्वरांनी पुढील भेदक दृष्टान्त वापरला आहे–

जैसा भाडिचा कवडा वेचे । मग दारही चेपूं नैये तेयाचें ।
ऐसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काई सांगों ॥ ( ज्ञा. ९. ३ २६ )

वेश्याभोगी माणसाच्या खिशातील अखेरची कवडी खर्ची पडल्यानतर ज्याप्रमाणे त्याची वेश्यागृहातून हकालपट्टी होते आणि मग त्याला वेश्येच्या दारावर थाप मारण्याचाही अधिकार राहत नाही, त्याप्रमाणेच पुण्य संपताच पुण्यवंताची लाजिरवाणी अवस्था होते, असा ज्ञानदेवांचा अभिप्राय आहे. नेमका हाच दृष्टान्त प्रस्तुत संदर्भात शेख महंमदाने वापरला आहे–

जैसा भाग्याचा आला हरुषती वेश्या । सौभाग्य दाऊं म्हणती कैशा ।
भाग्य सरल्या मोकलती परदेशा । मग देखोनि थुंकती ॥ ( यो सं. ७· ८४ )

ज्ञानदेवांनी एका पदात[११] विश्वव्यापक शिवाची जी विराट पूजा बांधली आहे, ती प्राचीन मराठी वाङ्मयाच्या रसिकांना सुपरिचित आहे—

स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्रपाळी पिंड देखा ।
शेपासारिखी बैसका । जो आधार तिहीं लोकां ।। १ ।।
लिंग देखिलें देखिलें । त्रिभुवनीं विस्तारलें ।। धृ० ।।
मेघधारीं तर्पण केलें । तारापुष्पीं वरी पूजिलें ।
चंद्रफळ ज्या वाहिलें । वोवाळिलें रविदीपें ।। २ ।।
आत्मनैवेद्य समर्पिले । ब्रह्मानंदीं मग वंदिलें ।
ज्योतिर्लिंग मग ध्याइलें । ज्ञानदेवीं हृदयीं ।। ३ ।।

ज्ञानदेवांच्या वाक्संस्कारांनी समृद्ध बनलेल्या शेख महंमदानेही अशाच प्रकारची शिवपूजा मांडली आहे ( कवितासंग्रह ६४ ), ती पहा—

पंचक्रोशी पंचतत्त्वें । आत्मा निजलिंग स्वभावें ।
वर त्या अनंत लिंगें नांवें । शिवशक्तीला दावी सर्वें ।। १ ।।
साळोंखा धरित्री जाहीर । मेरुगिरि लिंगें वर ।
स्थावरजंगमीं चराचर । तर्पण मेघ नद्या सागर ।। २ ।।
तेज धूपदीप, पवन । घंटा अनुहातें गर्जन ।
नभ कवचाळ महिमान । मंडप तारा ग्रहगण ।। ३ ।।
भानुसोम दिवटे दोन्ही । निशिदिनीं त्रिव मेदिनी ।
त्याहुनि प्रभा निरंजनीं । शेख महंमद जुगुत ज्ञानी ।। ४ ।।

शेख महंमदाच्या वाणीवरील ज्ञानेश्वरीचा प्रभाव हा इतका सखोल आहे. ज्ञानेश्वरी डोळयांसमोर ठेवून शेख महंमदाचे वाङ्मय वाचणाऱ्या साक्षेपी वाचकाला या प्रभावाच्या खुणा जागोजाग आढळतील.

तो गीता-भागवताचा वारंवार हवाला देतो, तेव्हा त्याला गीता म्हणजे ज्ञानेश्वरी आणि भागवत म्हणजे भागवताच्या एकादश स्कंधावरची एकनाथी टीका अभिप्रेत असते, असे मानायला जागा आहे. ( पहा– यो. सं. ११·८३ ; १४·८७ ). एकनाथी भागवताचा तर त्याने उल्लेखच केला आहे, हे आपण गुरुपरंपरेच्या छेदकात पाहिले आहेच. एकनाथ हे शेख महंमदाहून सांप्रदायिक नात्याने कनिष्ठ असले ( गुरुबंधूंचे शिष्य ), तरी वयाने व अधिकाराने ज्येष्ठ

होते. नाथांच्या समाधिकाळाच्या चार-दोन वर्षेच पूर्वी शेख महंमद संत म्हणून ख्याती पावू लागला होता. हा कालसंदर्भ लक्षात घेता आणि श्रीगोंद्यास येण्यापूर्वी शेख महंमद नाथांच्या गुरुभूमीत राहत होता व त्यांच्या कर्मभूमी-पासून निकट होता, या वस्तुस्थितीचा विचार करता तो नाथप्रभावातून सुटणे अशक्य होते, हे तत्काळ पटते. शेख महंमदाचे सूक्ष्म लोकनिरीक्षण आणि उत्कट लोकशिक्षण हे जसे त्याच्या अक्खड व्यक्तिमत्त्वातून उमलले आहे, तसेच त्याला नाथांच्या संस्कारांचे खतपाणीही लाभले आहे, असे अनुमान करायला हरकत नाही.

एके ठिकाणी (यो. सं. ३·६६) शेख महंमदाने आपले गुरुबंधू जनार्दन-स्वामी यांच्या 'स्वात्मसुख' नामक ग्रंथाचा उल्लेख केला आहे—


जैसें 'स्वात्मसुख' केलें जनार्दनें ।
तैसा हा उद्गार ॥

हा ग्रंथ अजून उपलब्ध झालेला नाही. विशेष म्हणजे शेख महंमदाने नामा पाठकाच्या 'नामरत्नमाळा' या लघुग्रंथाचा गौरवाने उल्लेख केला आहे. 'देव भावाचा भुकेला,' हा सिद्धान्त ज्यात व्यक्त झालेला आहे, अशा या ग्रंथाविषयी शेख महंमद म्हणतो—


ऐका 'नामरत्नमाळे' माझारी । श्रीमुखें भक्तांचें स्तवन करी ।
हरि उणें पडों नेदी अद्यापवरी । नामा संत लडिवाळ म्हणोनियां ॥
(यो. सं. १४·६७)

कबीर हा तर शेख महंमदाचा जिव्हाळ्याचा विषय. त्याला लोक कबिराचा अवतारच मानतात, हे आपण पाहिलेच आहे. "ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका आणि कबिराचा शेखा," अशी महाराष्ट्राची धारणा आहे. प्रभूचा महिमा अपार आहे, हा विचार व्यक्त करताना शेख महंमद कबिराप्रमाणेच म्हणतो—


महीएवढा कागद थोर । लेखणीस अठरा भार तरुवर ।
मैस केलिया सप्तसागर । पूर्ण नव्हेच नाम ॥
(यो. सं. १४·९९)



शहा मुतबजी ब्रह्मणी ( मृत्युंजयस्वामी ) यांचे समाधिमंदिर ( दर्गा )
नारायणपूर–बसवकल्याण




सदानंद मठाचे प्रवेशद्वार, बसवकल्याण




अलमखानाची समाधी, करळी (जि. उस्मानाबाद)




अगजीअप्पाचे समाधिमंदिर, करळी ( जि. उस्मानाबाद )




शेख मुलतान यांची समाधी असलेल्या वाड्याचे प्रवेशद्वार, त्रिपुटी ( जि. सातारा )



शेख महंमद श्रीगोंदेकर यांचे समाधिमंदिर ( दर्गा)
श्रीगोंदे ( जि. अहमदनगर )



चांद बोधले यांचे समाधिमंदिर ( दर्गा ), दौलताबाद ( जि. औरंगाबाद )



राघव चैतन्य यांच्या समाधिमंदिराचें प्रवेशद्वार, आळंद ( जि. गुलबर्गा )

कबिराने हरिगुणांची अनंतता पूर्वी याच शब्दांत व्यक्त केलेली आहे, ती अशी—

सात समंदर मसि करैं, लेखनि सब बनराय ।
धरती सब कागद करैं, हरिगुन लिखा न जाय ॥

( कबीरग्रंथावली )

कबिराचे मन हिंदु-मुसलमान-भेदाच्या अतीत गेलेले होते. आपण हिंदूही नाही आणि मुसलमानही नाही, असे सांगून कबीर म्हणतो—

पाँच तत्त्वका पूतला, गैबी खेले माहिं ॥

( अमृतवाणी-साखीखंड ६६९ )

याच विचाराच्या पार्श्वभूमीवर शेख महंमदानेही असेच उद्गार काढले आहेत. हा महाराष्ट्राचा कबीर किंचित् शब्दभेदाने म्हणतो—

पंचतत्त्वका पुतला बनाया । वामें गैबी बोलनहार ॥

( कवितासंग्रह २११ )

या दोन्ही उद्गारांत फरक इतकाच आहे की, कबिराचा 'गैबी' ( अगम-अरूप परमात्मा ) पंचतत्त्वांच्या पुतळ्यात खेळत आहे, तर शेख महंमदाचा 'गैबी' हा त्यात वाणीचा सम्राट या नात्याने विराजत आहे.

शेख महंमदाची भाषा ही अशी विविध संस्कारांनी भारलेली आहे—तिच्या घडणीत आणि तिच्या लोकाभिमुख स्वरूपात लोकसंस्कार आणि संत-संस्कार यांचा मोठा वाटा आहे. स्वतः शेख महंमदाला आपल्या वाणीच्या सामर्थ्याची जाणीव आहे. शब्दाच्या सामर्थ्यावर त्याचा विश्वास आहे. 'शब्द सिंधूहुनि खोलपणें' हे त्याला माहीत आहे. परंतु शब्दांना सागराहूनही अधिक खोली प्राप्त होते, ती अनुभूतीमुळे, हे स्पष्ट करायलाही तो विसरत नाही. 'शब्दांचें कवित्व, अनुभव पुष्पफळें !' असे त्याने स्पष्टपणे म्हटले आहे. 'मी यातीचा मलिवंश । संस्कार न ये मऱ्हाटीस ।' असा विनय त्याने शारदेच्या चरणी व्यक्त केला असला, तरी साक्षात शारदाच ईश्वराज्ञेने या 'योग-भ्रष्टा'च्या जिव्हेवर विराजमान झाल्यामुळे शेख महंमद आत्मविश्वासाने श्रोत्यांना सांगत आहे की—

महाराष्ट्रभाषा बोलणें बोलीं । सांगेन अंतरींची सखोली ।
विवंचना करूनि वेगळाली । श्रोतीं गुह्य घ्यावें ॥
(यो. सं. १७·७६)

### गुरुतत्त्वाचा गौरव

शेख महंमदाने इतर सर्व संतांप्रमाणेच गुरुतत्त्वाचा गौरव गायिला आहे आणि निगुऱ्याच्या दुर्दशेचे विदारक चित्रण केले आहे.

अनेक विद्या शिकविती । ते जाणा विद्यागुरू बोलिजेती ।
तरी भव तारावयातें न पवती । एका सद्‌गुरूवांचूनी ॥
(यो. सं. ५·७५)

या शब्दांत त्याने विद्यागुरूंचे गौणत्व सांगून, परमार्थपथावर सद्‌गुरूची अत्यंत आवश्यकता प्रतिपादिली आहे. सद्‌गुरुकृपेला मुकलेला प्राणी अधोगतीला जातो, असे शेख महंमद म्हणतो.

दीप आपण जळे आणिकां प्रकाश । तैसे स्वयें सद्‌गुरु करिती उपदेश ।
आपुलिया यातिकुळाचा निरास । ते करूनि निमाले ॥
(यो. सं. ६·४९)

हा सद्‌गुरूचा महान उपकार तो विसरू शकत नाही. सद्‌गुरू हा 'देह-विषय' विसरून अगाध प्रचीतीने जे सांगतो, ते हृदयात साठवून आणि जीवनात मुरवून परमार्थ फुली-फळी बहरल्याचा आनंद उपभोगणारे सच्छिष्य फारच विरळा आढळतात, अशी शेख महंमदाची तक्रार आहे. सद्‌गुरू प्राणिमात्रांच्या दुःखाने दुखावतात आणि अपार करुणेने त्यांना जवळ करतात; परंतु सद्‌गुरूने ज्यांचा स्वीकार केला अशांच्या हातून घडणाऱ्या पापाचरणाची पीडा सद्‌गुरूला भोगावी लागते—

शिष्यांच्या पापें गुरु । पावती पीडा उपचारु ।
जैसा जळतां डोंगरु । पाषाण फुटती ॥
(क. सं. २०८)

सच्छिष्यांची वाण असते. आपल्या पापाचरणाने सद्‌गुरूला पीडा देणाऱ्यांचीच संख्या जास्त असते. शुद्ध भावाने सद्‌गुरूला शरण जाणाऱ्याचा उद्धार झाल्यावाचून राहात नाही, असे शेख महंमद स्वानुभवाने सांगत आहे—

सेवितां सद्गुरूचीं पाउलें । तेणें असंख्यात उद्धरले ।
शेख महंमद बोलिले । आत्महित ॥ (क. सं. ५५)

आणि म्हणूनच 'स्वामिया सद्गुरु । जीवाच्या जीवना । तुजविण मना । सखा नाहीं ॥' (क. सं. ४३) असा कृतज्ञतेचा उद्गार त्याने काढला आहे. सद्गुरूच्या भेटीसाठी आसुसलेल्या शेख महंमदाची ही आर्तता पाहा—

येईं बा सद्गुरु । माझिये भेटीस ।
तुजविण उदास । चित्त माझें ॥
माझें चित्त आहे । तुझ्या पायांपाशीं ।
तुजविण परदेशीं । हिंडे जन ॥
जन विजन एक । तव कृपा-ऐक्य ।
परब्रह्मींचें सुख । तुझेनि मज ॥ (क. सं. ४६)

**भक्ती माझी सखी**

शेख महंमदाला मुमुक्षुतेचा संस्कार पित्याच्या सान्निध्यात बाळपणीच प्राप्त झाला होता आणि पित्याच्या पुण्याईनेच त्याला सद्गुरूचाही लाभ झाला होता. चांद बोधल्यांसारखा सद्गुरू प्राप्त झाल्यामुळे शेख महंमदाची परमार्थपथावर वेगाने प्रगती सुरू झाली. हिंदू-मुस्लिम संस्कारांच्या समन्वयातून त्याच्या मूलगामी चिंतनशीलतेला सकलभेदातीत परमार्थाचे रहस्य उलगडले आणि सद्गुरूच्या प्रभावळीतील साधुसंतांच्या संगतीत त्याचा परमार्थ सर्वांगांनी बहरू लागला. त्याचे मन लौकिकाचे बंध तोडून अलौकिकाचा वेध घेऊ लागले. ज्याला 'लौकिकाची लाज' वाटते, त्याला 'मनाची कांचणी' सहन करावी लागते आणि त्यामुळे त्याची भक्ती व्यभिचारिणी बनते. म्हणूनच शेख महंमद सांगतो—

आमुचे नाचणीं । कोणी नाचूं नका ।
ज्याला असे धोका । लौकिकाचा ॥ (क. सं. ९०)

तुकोबांनी ज्याप्रमाणे 'भक्ति ते कठीण । इंगळांची खाई' असा भक्तिकाठिण्याचा इशारा दिला आहे, तसाच हा शेख महंमदाचा अभिप्राय आहे. परंतु शेख महंमदाने मात्र 'लौकिकाचा धोका' पत्करूनही भक्तीचा स्वीकार जीवेभावे केला होता—

मातेहुनि अधिक । भक्ति माझी सखी ।
तिचियाने सुखी । सर्वकाळ ॥ (क. सं. ९१)

असा भक्तिसौख्याच्या अखंडतेचा पवाडा त्याने गायिला आहे.

**नाम जीवाचे जीवन**

भक्तिसाधनेत शेख महंमदाने नामस्मरणाचे महिमान सर्वोपरी मानले आहे. 'तुझें नाम घेतां तरले असंख्यात,' म्हणूनच मला तुझ्या नामाचे 'आर्त' जडले आहे, असे तो परमेश्वराला उद्देशून म्हणतो. 'ज्यांचे मुखीं नामकीर्ति' आहे, ते 'विश्वाचे सारथी' आहेत, असा नामभक्तीने रंगलेल्या साधूंचा तो गौरव करतो–

अंतरी तत्त्वकळा । वाचे निजनाम ।
ते संत उत्तम । धर्मराज ॥
जळती पापराशी । ऐशांच्या दर्शनें ।
पतितां उद्धरणें । नामें त्यांच्या ॥
भवनदीचें तारूं । ऐसे साधुसंत ।
शेख महंमद नित्य । वंदी त्यांसी ॥ (क. सं. ८५)

ज्यांच्या मुखी नाम आहे, अशा साधूंच्या सान्निध्यात श्रीहरी क्रीडा करतो– 'साधूमागेपुढे । अंतर्बाह्य चहुंकडे । श्रीहरी क्रीडे । नामासाठीं ॥' आणि म्हणूनच शेख महंमदाला नाम अतीव प्रिय आहे—

नाम जीवाचें जीवन । भावें करितो जतन ॥
वाचा निःशब्दीं आवडी । प्रेमबोधें ध्यातो घडींघडीं ॥
आसनीं भोजनीं अनिवार । अहर्निशीं न पडे विसर ॥.
(क. सं. १००)

'जीवाचा विश्राम' असलेल्या 'गोविंदाच्या नामा'मुळे शेख महंमदाचे सर्व श्रम नाहीसे झाले; त्याच्या चौऱ्यांशीच्या भ्रमणांचा निरास झाला; यातना संपल्या; नामाच्या दिव्यौषधीने त्याच्या सकल व्याधी आणि उपाधी गळून गेल्या.

शेख महंमदाने स्वतःला शारदेच्या मुखातून 'योगभ्रष्ट' म्हणविले आहे. म्हणजेच शेख महंमदाचे पूर्वसंचित मोठे होते. या पूर्वसंचिताच्या बळावरच

त्याला 'परब्रह्मीं आवडी' निर्माण झाली आणि सद्गुरूची प्राप्ती होऊन त्या आवडीला तृप्तीचे वरदान लाभले—

आमुचे संचितीं । होतें तैसें जालें ।
परब्रह्म आलें । भावें घरां ॥
घरांत बाहेर । कोंदाटली भक्ती ।
सायुज्यता मुक्ती । होऊनि ठेली ॥
ठेली अनिवार । यावें जावें नाहीं ।
सद्गुरूच्या पायीं । ऐसें जालें ॥
जालें बोलों काय । निःशब्दीं ठकार ।
अजपा उच्चार । जप नाहीं ॥
नाहीं आहे मिथ्या । द्वैताची निरास ।
अद्वैतीं समरस । शेख महंमद ॥ (क. सं. १४१)

ही अनिर्वचनीय अनुभूतीच शेख महंमदाच्या वाणीला व्यापून राहिलेली आहे. या अनुभूतीविना असलेली वाणी ही 'पोटीं गर्भ न धरणाऱ्या कळाहीन वनिते'प्रमाणे असते, असे त्याचे म्हणणे आहे. जी सुखदुःख सोसून पुत्रवंती होते, तिलाच जगांत वरमाईपणानें मिरवता येते. म्हणूनच शेख महंमदाने हृदयात सर्वेश्वराचा गर्भ धारण केला आहे—

शेख महंमद । हृदयीं गरोदर ।
गर्भी सर्वेश्वर । सामावला ॥ (क. सं. १९९)

सर्वेश्वराचा विराट गर्भ ज्याच्या हृदयीं सामावला आहे, त्याच्या वाणीचे सामर्थ्य आम्ही पामरांनी काय वर्णावे !

# संदर्भ टीपा

१. 'शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर-कृत योगसंग्राम' आणि 'शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांचा कवितासंग्रह' : संपादक वा. सी. बेंद्रे, जून १९५९ व जून १९६१.

२. या चरित्राचा कर्ता अज्ञात आहे. हे श्री. बेंद्रे-संपादित 'कवितासंग्रहा'त (पृ. ११९–१२३) समाविष्ट आहे.

३. 'जन्मभूमिका धारूर' असा उल्लेख शेख महंमदाच्या नावावरील एका स्फुटात आहे (कवितासंग्रह, ३२३).

४. 'सिजरा-जदि-कादिरी' हे प्रकरण 'कवितासंग्रहा'त (पृ. १२३-१२४) समाविष्ट आहे.

५. 'सूफी संप्रदाय' : सेतुमाधवराव पगडी, पृ. २०.

६. 'विविधा' : रामचंद्र चिंतामण ढेरे, पृ. १३६–१४२, २३८–२३९.

७. मालोजीला शहा शरीफ नामक पिराच्या कृपेने शहाजी व शरीफजी हे दोन पुत्र झाले. (भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३८, पृ. १८०–१९३).

८. 'विविधा' : रामचंद्र चिंतामण ढेरे, पृ. १५९–१६६.

९. 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' : रामचंद्र चिंतामण ढेरे, पृ. ११६-१२०.

१०. येथे दिलेले अध्याय-ओव्यांचे संदर्भ राजवाडे-संपादित ज्ञानेश्वरीतील आहेत.

११. 'श्रीज्ञानदेवमहाराज यांच्या अभंगांची गाथा' : संपादक– त्र्यंबक हरी आवटे. अभंग क्र. ४७, पृ. ७१.

# शहा मुनी

**यातीने कडू भोपळा**

धर्माने मुसलमान आणि संप्रदायाने महानुभाव असूनही मराठी जनमानसावर आपल्या चरित्रचारित्र्याचा आणि वाणीचा प्रभाव गाजविणारा संतकवी म्हणून शहा मुनीची ख्याती विशेष आहे. त्याचा ' सिद्धान्तबोध '[1] हा ग्रंथ महाराष्ट्रातील सर्व भक्तभाविकांना प्रिय असून चातुर्मासात त्या ग्रंथाचे सामुदायिक वाचन महाराष्ट्रात सर्वत्र चालते. आपण मुसलमान कुळात जन्म घेतला आहे, याची हिंदू परंपरेच्या प्रेमामुळे शहा मुनीला खंत वाटते. कारण मुसलमान हे हिंदू परंपरेचे विध्वंसक म्हणूनच भारतात नांदत राहिले, याची त्याला स्पष्ट जाणीव आहे—

नव्हे यातीचा ब्राह्मण । क्षत्रिय वैश्य नोहे जाण ।
शूद्रापरीस हीन वर्ण । अविंधवंशीं जमलों ।।
ज्यांचा शास्त्रमार्ग उफराटा । म्हणती महाराष्ट्रधर्म खोटा ।
शिवालयें मूर्ति भंगिती हटा । देवद्रोही हिंसाचारी ।।
जयांच्या सणाच्या दिवशीं । वधितां गो उल्हास मानसीं ।
वेदशास्त्र पुराणांसी । हेळसिती उद्धट ।।
ऐसे खाणींत जन्मलों । श्रीकृष्णभक्तीसी लागलों ।
तुम्हां संतांचे पदरीं पडलों । अंगीकारावें उचित ।।
(सि. बो. २·१२९–१३२)

शहा मुनीने आपल्या अविंध म्हणजे मुसलमान वंशाला शूद्राइतके हीन मानले आहे आणि हिंदू परंपरेच्या सापेक्षतेने त्याचे 'उफराटेपण' स्पष्ट शब्दांत व्यक्त केले आहे. महाराष्ट्रधर्माला खोटा म्हणणाऱ्या, मूर्ति-मंदिरांचा विध्वंस करणाऱ्या, हिंदू देवदेवतांचा द्वेष करणाऱ्या, मुद्दाम गोवध करून आपला सण साजरा करणाऱ्या, वेदशास्त्रपुराणांची हेळणा करणाऱ्या अशा 'हिंसाचारी' खाणींत जन्मूनही आपण श्रीकृष्णभक्तीस लागलो, याचे शहा मुनीला मनोमन आश्चर्य वाटत आहे आणि आपला प्रेमाने स्वीकार करणाऱ्या गुरुविषयी व संतांविषयी त्याच्या हृदयातून कृतज्ञतेचा ओघ ओसंडून वाहत आहे. आपण 'यातीने कडू भोपळा' असलो (सि. बो. ४.२२), तरी गोपाळाने आपल्याला गोड करून घेतल्यामुळे आपल्या कवितेला अनुभवाची 'चव' आली आहे, असेही त्याने म्हटले आहे.

**वंशवेलीची मांडणी**

शहा मुनीने आपल्या ग्रंथात जे स्थूल कुलवृत्त नोंदविले आहे, त्यावरून असे दिसते की, त्याचे घराणे तीन-चार पिढ्यांपासून हिंदू परंपरेत मुरलेले होते. सिद्धान्तबोधाच्या छत्तिसाव्या अध्यायाच्या आरंभी (ओ. २–१२) त्याने नोंदविलेले कुलवृत्त या बाबतीत अगदी बोलके आहे—

आतां नमूं वंशावळी । जन्म घेतला ज्यांचे कुळीं ।
पणजा आमुचा मुळीं । नाम त्याचें शहाबावा ।।

महाराष्ट्र आणि पारशी । उभयपक्षीं विद्या त्यासी ।
आराधिलें होतें शिवासी । एकनिष्ठ उपासना ॥
आमिना होती त्याची अंगना । परम पतिव्रता सत्य जाणा ।
ती प्रसवली पुत्ररत्ना । नाम तयाचें जनाजी ॥
तो करी विष्णूची भक्ती । मंजूबाई तयाची प्रकृती ।
ती प्रसवली पुत्र सुमती । नाम तयाचें मनसिंग ॥
त्याची भार्या नाम आमाई । लोक म्हणती तिला ताई ।
ती आम्हांसी जाहली आई । जन्मविलें पवित्र कुशीतें ।
पिता होता गणेश-उपासक । पोटीं आजा आला नामधारक ।
हें जाणोनि कौतुक । नाम ठेविलें शहाबावा ॥
पणजापाशीं होतें भक्तीचें बीज । तोचि अंकुर विस्तारला सहज ।
म्हणोनि संतचरणींचें रज । प्राप्त जाहलें दैवानें ॥
पणजा जन्मला प्रयागतीर्थीं । आजा जन्मला अवंतिकेप्रती ।
सिद्धटेक ज्यास म्हणती । जन्म पित्याचा त्या ठायीं ॥
भीमातटीं पेडगांव शहर । पूर्वेस सरस्वतीसंगम साचार ।
ताईमातेचें पवित्र उदर । जन्म दिला आम्हांसी ॥
पणजा होता वैराग्यखाणी । रत्नें प्रसवलीं तेथोनी ।
वंशवेलीची मांडणी । निवेदीं तुम्हां सज्जन हो ॥
होतें पदरीं वडिलांचें पुण्य । लाधलों तुम्हां संतांचे चरण ।
जाहलें पापाचें खंडण । चुकलों जन्ममरणांसी ॥

या माहितीवरून शहा मुनीच्या घराण्याचे अनेक विशेष आपल्या ध्यानी येतात. एक म्हणजे या घराण्यात चार पिढ्यांपासून हिंदू देवदेवतांची भक्ती चालत आलेली होती; हे घराणे काहीसे भटक्या वृत्तीचे होते—शहाबावाच्या जन्मापर्यंत प्रयाग, उज्जयिनी, सिद्धटेक, पेडगाव असे या घराण्याचे स्थलांतर झालेले दिसते; तसेच ज्या स्थानी रहावयाचे, तिथल्या प्रख्यात देवतेच्या उपासनेत रंगून जायचे, अशी या घराण्यातील व्यक्तींची प्रवृत्ती दिसते.

शहा मुनीच्या पणजाचे नाव शहाबावा आणि पणजीचे नाव आमिना. पणजाचे मातापिता प्रयाग येथे रहायला कुठून आले, ते सांगता येत नाही; परंतु त्यांचा

मुक्काम प्रयागतीर्थी असतानाच शहा मुनीच्या पणजाचा जन्म झाला, हे खरे. हा शहाबावा पुढे आपली पत्नी आमिना हिच्यासह उज्जयिनी (अवंतिका) येथे रहायला आलेला दिसतो. कुठे प्रयाग आणि कुठे उज्जयिनी! कोणत्या व्यवसायाच्या निमित्ताने हे स्थलांतर घडले, ते कळायला मार्ग नाही. शहाबावा उज्जयिनीस रहायला आला आणि उज्जयिनी हे एक प्रख्यात ज्योतिर्लिंग असल्यामुळे तेथील शिवभक्तीने भारावलेल्या वातावरणात तोही शिवभक्तीत रंगून गेला. आपला पणजा म्हणजे वैराग्याची खाण होती; त्याची शिवोपासना एकनिष्ठ होती आणि तो मराठी व फारशी या उभय विद्यांत पारंगत होता, असा शहा मुनीने त्याचा गौरव केलेला आहे. उज्जयिनीत राहणारा हा शहाबावा फारसीबरोबरच मराठी विद्येचाही अवलंब करतो. याचा अर्थ त्याचे माळव्यातील आगमन मराठ्यांनी माळव्यात सत्ताविस्तार केल्यानंतर किंवा त्या सुमारास (इ. स. १७२८) घडले असावे. शहाबावाचा पुत्र जनाजी याचा जन्म उज्जयिनी येथे झाला. त्याची पत्नी मंडूबाई. हा जनाजी विष्णुभक्त होता. शिवभक्त पित्याचा विष्णुभक्त पुत्र—ही वस्तुस्थिती या घराण्याच्या सहिष्णू वृत्तीची, औदार्याची आणि 'महाराष्ट्रधर्मा'शी सुसंवादित्व राखण्याच्या कलाची स्पष्ट द्योतक आहे. जनाजीच्या विष्णुभक्तीचे मूळ कदाचित त्याच्या एखाद्या वैष्णव क्षेत्रातील निवासात असावे. उज्जयिनी सोडून तो केव्हा आणि का महाराष्ट्रात आला, ते कळायला साधन नाही. कदाचित माळव्यातील मराठ्यांचे आणि महाराष्ट्रधर्माचे प्रभुत्व पाहूनच त्याला महाराष्ट्राच्या गाभ्यात यावेसे वाटले असेल. त्याचा मुक्काम सिद्धटेक (ता. कर्जत, जि. अहमदनगर) येथे असतानाच त्याला मनसिंग नामक पुत्र झाला. हा मनसिंगच शहामुनीचा पिता होय. सिद्धटेक हे अष्टविनायकक्षेत्रांपैकी एक असल्यामुळे तेथील वातावरणात मनसिंगाला गणेशभक्तीची गोडी लागणे स्वाभाविक होते. मनसिंगाच्या पत्नीचे नाव अमाई ऊर्फ ताई होय. याच जोडप्याच्या पोटी भीमा-सरस्वती-संगमाच्या निकट पेडगाव (ता. श्रीगोंदे, जि. अहमदनगर) येथे शके १६७०-च्या सुमारास शहामुनीचा जन्म झाला. आपला वैराग्यसंपन्न आणि भक्तिपरायण आजोबाच आपल्या उदरी जन्मास आला आहे, या समजुतीने मनसिंगाने मुलाचे नाव शहाबावा असे ठेवले. शहामुनीने दिलेल्या या हकीकतीवरून त्याचा वंशवेल रेखाटता येतो, तो असा—

शहाबाबा (+ आमिना)
↓
जनाजी (+ मंझूबाई)
↓
मनसिंग (+ आमाई ऊर्फ ताई)
↓
शहाबाबा
[ शहा मुनी ]

शहाबावाचे जन्मस्थान असलेले पेडगाव हे शेख महंमदाच्या श्रीगोंद्यापासून दक्षिणेस अवघ्या दहा-बारा मैलांवर आहे.

शहाबाबाला आपल्या घराण्याच्या भक्तिपरायणतेचा गौरव वाटणे स्वाभाविक आहे. 'वडिलांचे पदरी पुण्य होते,' म्हणूनच आपल्याला 'संतांचे चरण' लाभले, याची त्याला कृतज्ञतायुक्त जाणीव आहे. त्याने चार पिढ्यांचा भक्तीचा वारसा सांभाळला, वाढवला आणि एका बृहद् ग्रंथात तो समृद्ध वारसा शब्दबद्ध करून ठेवला. त्याच्या या महनीय कार्यामुळे त्याने आपल्या पूर्वजांचे ऋण फेडून त्यांना धन्यतेचे देणे देऊन टाकले आहे.

## मुनीने उपदेशिले शहास

शहाबावाचा जन्म भीमातीरी पेडगावी झाला, एवढेच त्याने स्वतःच्या चरित्राविषयी सांगितले आहे. परंतु गणेशभक्त पित्याचा हा पुत्र पुढे परमार्थपथावर कशा प्रकारे वाटचाल करीत राहिला, याविषयी कसलीच माहिती उपलब्ध नाही. त्याचे 'शहा मुनी' हे लोकप्रसिद्ध नाव 'एका जनार्दन' या नावाप्रमाणे जोडनाव आहे. शहा हे त्याचे नाव आणि मुनी हे त्याच्या गुरूचे नाव. मुनी हे शहाबावाचे बिरुद नव्हे. तशी शंका कोणास येण्याचा संभव असल्यामुळे त्याने मुद्दाम स्पष्टीकरण केले आहे—

कोणी घेईल मुनीची कल्पना । मुनि नाम गुरूचे जाणा ।
तयाचे कृपेनें रचना । या ग्रंथाची होतसे ॥ १·१५१

'सिद्धान्तबोधा'च्या प्रारंभीही 'मुनींद्रस्वामी गुरु पूर्ण । त्याचा सेवक शहा जाण ।' (१·१९) असा उल्लेख त्याने केला आहे. हे मुनी अथवा मुनींद्रस्वामी

दत्तात्रेयाचे अनुगृहीत होते. 'सिद्धान्तबोधा'च्या अखेरच्या अध्यायामध्ये शहाबावाने आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती अशी—

मुनींद्र नाम परमहंस । दत्तें उपदेश केला त्यास ।
तो श्रीगुरु शहास । म्हणोनि नाम शहा मुनी ॥
दत्ताचा उपदेश मुनीस । मुनीनें उपदेशिलें शहास ।
अवलंबून योग्यतेस । केली कृपा गुरुरायें ॥ ५०. ३५२-३५४

यावरून दत्तात्रेय– मुनींद्रस्वामी– शहाबावा अशी शहा मुनीची परंपरा ठरते. शहाबावाला मुनींद्रस्वामींचा उपदेश प्राप्त झाला तो सुदूर वाराणशी येथे. या गुरुबोधाच्या क्षणाचे आणि गुरुबोधाने आपल्या हृदयात उजळलेल्या दिव्य दीपाच्या प्रकाशाचे वेधक वर्णन शहा मुनीने केले आहे—

वाराणसींत गंगातीरीं । प्रहर रात्र लोटल्यावरी ।
आयुष्यमान् योग रेवती नक्षत्रीं । अनुग्रह केला स्वामीनें ॥
नाहीं पाहिलें यातीकडे । ज्ञान सांगितलें उघडें ।
अवघें उगविलें कोडें । सोडिलें विरडें अविद्येचें ॥
मंत्र फुंकोनि कर्णीं । दीप लाविला हृदयभुवनीं ।
गेली भ्रांती निरसोनी । स्वयें प्रकाशलों स्वरूपीं ॥
ब्रह्मास्मि ठसावला बोध । तोही निरसोनि केला आनंद ।
आनंदाचाही फुंद । जिरोनि केला निवांत ।
मजमाजीं मी आटलों । आपआपणांत दाटलों ।
माझा मी गोठलों । सुटलों बांधलों दोन्ही मिथ्या ॥
गगनीं गगन सामावलें । समुद्र समुद्रासि भेटले ।
सूर्यबिंबीं सूर्य बैसले । चंद्रें चंद्र आलिंगिला ॥
निःशब्दीं शब्द बुडाला । जीव शिव शब्द उडाला ।
सरला तूर्येचा गलबला । स्फुरणीं स्फुरण तटस्थ ॥
कैंचा पूर्वपक्ष उत्तरपक्ष । उडालें लय आणि लक्ष ।
भेदाभेदास न दिसे साक्ष । दक्षता मोक्ष कोण पुसे ॥
नाहीं गुरुशिष्याचें नांव । अर्धमात्रेचा पुसला ठाव ।
ओंकार त्रिगुण उद्भव । हेही उदकींचीं अक्षरें ॥

या रीतीनें जाहला उपदेश । अवघा दाविला ब्रह्मविलास ।
ठाव नुरे मीपणास । नामरूप दिसेना ॥ ५०. ३५५–३६४

शहा मुनीने ब्रह्मास्मिभावाने भारलेला हा गुरुबोधाचा क्षण इतक्या प्रभावी शब्दांत मांडला आहे की, त्यातून त्याच्या हृदयातील परमानुभवाची दीप्ती सहजतया झळाळताना जाणवून जाते. शहा मुनीला ब्रह्मविलासात रमविणारे हे मुनींद्रस्वामी 'परमहंस' म्हणजे संन्यासी होते.

शहा मुनीने आपल्या गुरूविषयीचा कृतज्ञताभाव जागोजाग व्यक्त केला आहे. 'गुरूपाशीं ज्ञान । गुरूपाशीं समाधान । गुरूपाशीं आत्मदर्शन ।' (सि. बोध ३२·११७) हे त्याला स्वानुभवाने जाणवलेले असल्यामुळे त्याने मुमुक्षुजनांना गुरुचरणांची कास धरायला सांगितले आहे. 'श्रीमुनींद्रगुरूच्या वचनें' केवळ आपले नव्हे, तर 'झालें सर्वांचें कल्याण'! आणि म्हणूनच 'त्या स्वामींस विसरोन ! आणिक काय जोडावें'? (सि. बो. ३१·२०२) असे उद्गार त्याने काढले आहेत. शेहेचाळिसाव्या अध्यायाच्या प्रारंभीं (ओ. १३–१६) त्याने आपल्या ग्रंथरचनेचे सर्व श्रेय श्रीगुरूला अर्पण केले आहे—

मुनींद्रगुरूचा उपदेश । यालागीं शहा मुनी नाम असे ।
कल्पना सांडून चतुर पुरुषें । अर्थ मनासी आणिजे ॥
कल्पनेच्या नाना जाती । मारिल्या मेखा बहुपंथीं ।
वळकट बैसली भेदभ्रांती । अद्वैतसूत्र उमजेना ।
नामरूप ही कल्पना । जगास समजावया जाणा ।
सत्य आत्मा एकचि जाणा । पूर्ण खुणा गुरूच्या ॥
गुरुकृपाप्रतापप्रौढी । रची ग्रंथाची परवडी ।
उभवीन अनुभवाची गुढी । परमगोडी रहस्य जें ॥

पुढे सत्तेचाळिसाव्या अध्यायातही (ओ. १०२–१०६) शहा मुनीने श्रीगुरूच्या ऋणाचा असाच मुक्तमनाने उच्चार केला आहे—

मुनींद्रस्वामी गुरु पूर्ण । तो परमहंस नारायण ।
तेणें अंगीकार करून । अनुग्रह दिधला ॥
होतें पूर्वींचें पुण्य शुद्ध । म्हणोनि लाधलों पाय अगाध ।
स्वामीनें केला पूर्ण बोध । भ्रांति निरसिली मनाची ॥

तो मुनिस्वामी परमहंस। दैवें भेटला आम्हांस।
नाहीं पाहिलें यातीस। केला अंगीकार समर्थें॥
जो स्वयें मुक्त पुरुष। त्यासी विश्वचि ब्रह्म दिसे।
भेद्वादी काल्पनिकास। भिन्नाकार भासत॥
मुनि नाम गुरुस्वामीस। शहा शरण असे त्यास।
म्हणोनि शहा मुनी नामास। प्रसिद्ध ग्रंथीं मांडलें॥

मुनींद्रस्वामींनी शहाबावाला ‘ एकीं अनेक अनेकीं एक ’ असे कौतुक दाखवून ‘ जगचि आहे जगदीश ’ असा प्रत्यय घडविला. त्यामुळे शहाबावाची वृत्ती चिद्रूपाच्या ठायी रंगून गेली आणि त्याचा संसार सफळ झाला. मग स्वानंद-पद्वीवर आरूढ होऊन त्याने सद्गुरूचे माध्यम बनूनच या ग्रंथाची निर्मिती केली.

**शहा मुनीची समाधी**

शहाबावा आपल्या वाडवडिलांप्रमाणेच भ्रमणशील दिसतो. त्याच्या ग्रंथात जे जनजीवनाचे व्यापक आणि सूक्ष्म अंतरंग प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे प्रतिबिंबित झाले आहे, त्यावरूनही त्याच्या निरीक्षणाची व्याप्ती जाणवते आणि हे निरीक्षण त्याच्या भटक्या प्रवृत्तीमुळेच शक्य झाले असावे, असेही अनुमान करावेसे वाटते. त्याचा पणजा शहाबावा प्रयाग येथे जन्मला; त्याचा आजा जनाजी उज्जयिनीस जन्मास आला; त्याचा पिता मनसिंग याने महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात सिद्धटेक येथे जन्म घेतला; खुद्द शहामुनीचा जन्म भीमानदीच्या काठी पेडगाव येथे शके १६७० च्या सुमारास झाला; शके १७०० च्या सुमारास त्याला काशी येथे मुनींद्रस्वामींकडून गुरुबोध प्राप्त झाला आणि शके १७१७ मध्ये त्याने आपला ‘ सिद्धान्तबोध ’ हा प्रख्यात ग्रंथ सातारा जिल्ह्यातील चांबळी गावाजवळील पठारीमंडण येथे रचला. म्हणजे शहाबावाच्या घराण्यातील चारही पिढ्यांतील पुरुषांची जन्मस्थाने निरनिराळ्या भूभागांतील आहेत. आणि स्वतः शहा मुनीचेही जमस्थान, गुरुबोधस्थान, ग्रंथरचनास्थान आणि समाधिस्थान वेगळे आहे. बीड जिल्ह्यात बीड-औरंगाबाद मार्गावर बीडपासून तीस मैल अंतरावर गोदावरीच्या काठी शहागड नामक जे गाव आहे, तिथे शहा मुनीने समाधीचा स्वीकार केला ( शके १७३० चा सुमार ). शहागड येथे गावाबाहेर गोदामाईच्या प्रवाहाच्या अगदी सन्निध, तटबंदीने युक्त असे एक उंच टेकाड

आहे. या स्थानाला किल्ला असेच म्हणतात. या किल्ल्यात शहा मुनी चिर-विश्रांति पावला आहे. कदाचित जीवनाच्या अखेरीस तो या ठिकाणी मठ बांधून राहत असावा. शहागडच्या किल्ल्यात त्याच्या समाधिमंदिरासन्निध त्याच्या अनुयायांची पाच मुसलमान घराणी सध्या राहतात आणि समाधीची नित्य सेवा करतात. शहामुनीच्या पुण्यतिथीचा उत्सव प्रतिवर्षी चैत्र वद्य ७-८ या दिवशी साजरा होतो. ही पाचही घराणी मुसलमान असूनही शहा मुनीच्या परंपरेला अनुसरून मद्यमांसादी वर्ज्य मानतात; कृष्णोपासना करतात आणि महानुभाव महंताकडून गुरूपदेश घेतात. या घराण्यांतील विद्यमान मंडळी महंत कपाटेश्वर बाबांची उपदेशी आहेत. महानुभावांचा 'मारग' (महंत आणि त्यांचा सांप्रदायिक परिवार) येथे अधूनमधून उतरतो. पुण्यतिथीच्या उत्सवात या पाच अनुयायी घराण्यांखेरीज गावातील अन्य मुसलमान भाग घेत नाहीत.[२]

### शहा मुनीचा संप्रदाय

शहा मुनीची ही विद्यमान परंपरा त्याला महानुभावपंथीय ठरविते. ज्या अर्थी त्याचे स्थान मुसलमान अनुयायांच्या स्वाधीन असूनही त्यांनी त्याला 'मुसलमानपण' न देता कृष्णोपासनेची परंपरा अव्याहत राखली आहे, त्या अर्थी सध्याच्या अनुयायांची धारणाही शहा मुनीच्या मूल संप्रदायाशी संबद्धच असली पाहिजे, असे मानणे भाग पडते. तसेच शहा मुनीचा 'सिद्धान्तबोध' हा ग्रंथ महानुभावांच्या संग्रहात आढळतो.[3] महानुभावपंथीय लोक अन्यपंथीयांच्या ग्रंथाला आपल्या संग्रहात कधीही स्थान देत नाहीत, हे ध्यानी घेता त्याच्या महानुभावपंथीयत्वाला पुष्टीच मिळते. प्रत्यक्ष 'सिद्धान्तबोधा'तही त्याने आपल्या संप्रदायाचे अप्रत्यक्ष सूचन घडविले आहे, ते असे—

(१) 'सिद्धान्तबोधा'च्या पहिल्या सोळा अध्यायांत आणि पुढेही शहा मुनीने ब्रह्मा-विष्णु-महेश यांना गौण मानले आहे. हे तीनही देव परमेश्वराहून कनिष्ठ श्रेणीतले आहेत, असे त्याने ऋषींच्या संवादातून व्यक्त केले आहे.

ब्रह्मादिक हरिहर । हे ब्रह्मींचे अवतार ।
ऐसें बोलतां शास्त्रांतर । ते नेणोनि वर्म विवादती ॥
तोचि सृजिता प्रतिपाळिता । शेवीं तोचि संहारिता ।

ऐसी करिती जे वार्ता । ते स्वप्नन्यायें चावळती ॥
उत्पत्ति आणि संहार । हा तो स्वरूपीं नाहीं व्यवहार ।
तो अकर्ता परमेश्वर । कर्तव्यता असेना ॥ २०·४७–४९

(२) क्रमांक १७ ते ३० या चौदा अध्यायांत शहा मुनीने महीभट्ट (माहिंभट्ट) आणि परमेश्वर (चक्रधर) यांच्या संवादातून अत्यंत विस्ताराने महानुभाव तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे आणि अद्वैत विचाराचे खंडन केले आहे.

(३) कृष्ण आणि दत्त ही त्याची उपास्य दैवते आहेत. तो स्वतःला 'कृष्णोपासक' (१०·११९) म्हणवून घेतो आणि आपल्या समग्र स्फूर्तीचे श्रेय दत्तात्रेयाच्या कृपेला देतो. त्याचा कृष्ण हा विष्णूचा अवतार नाही, तसेच त्याच्या दत्ताचाही विष्णूशी अथवा ब्रह्मा-विष्णु-महेशांशी संबंध नाही. कृष्ण आणि दत्त यांच्याविषयीची शहा मुनीची ही दृष्टि महानुभाव विचारांशी सुसंगत आहे.

(४) चोविसाव्या अध्यायाच्या आरंभी त्याने अव्यक्त, हंस, दत्त, कृष्ण आणि चक्रधर या पंच कृष्णांना नमन केले आहे—

जो निर्विकार निरंजन । सच्चिदानंद स्वरूपाहूनि भिन्न ।
विश्वरूप करी ज्याचें ध्यान । तयासी नमन पैं माझें ॥
जो अष्टभैरवांसी अलक्ष । महाविष्णूसी न कळे ज्याचा पक्ष ।
महाविष्णु महेश्वर साक्ष । करिती ज्या स्वरूपाची ॥ ...
ऐसिया अव्यक्तस्वामीतें । अष्टभावें नमन निगुतें ।
जयाचे कृपेनें मातें । संशयवार्ता स्पर्शेना ॥
आतां नमूं हंसमूर्ती । उगविल्या ब्रह्मादिकांच्या गुंती ।
सनकादिकां मुक्तपंथीं । स्वरूपस्थिती दाविली ॥
जेणें निर्मिलें हंसगीतेसी । उघडिलें परमार्थभांडारासी ॥
तो कृतयुगीच्या अवतारासी । त्या स्वरूपासी पैं नमो ॥
आतां नमूं त्या पुरुषासी । जो जन्मला अनसूयेचे कुसीं ।
चमत्कार दावूनि गोरखियासी । नवनाथ सिद्ध जिंकिले ॥
तया दत्तात्रेय प्रभूसी । अनन्यभावें नमूं चरणांशीं ।
जो सिंहाद्रीचा रहिवासी । सर्वां ठायीं व्यापक ॥ ..

जो चैतन्यमायेचा स्वामी। सर्वव्यापक अंतर्यामी।
तया श्रीकृष्णाचे पादपद्मीं। मस्तक ठेवी सहस्रदा ॥
आतां नमू परमपुरुष। जेणें भट्टास केला उपदेश।
सांगितला पूर्ण ज्ञानाचा रस। उघड केली ब्रह्मविद्या॥ (२४.१-१८)

पुढे तिसाव्या अध्यायातही (६१-६३) त्याने पंचकृष्णांपैकी हंस, दत्त, कृष्ण व चक्रधर यांचा उल्लेख परमेश्वरमुखाने करून चक्रधराचा महिमा गायिला आहे—

कृतीं हंस, त्रेतीं दत्त। द्वापारीं कृष्ण समर्थ।
कलीमाजी अनंत। चक्रधर नाम माझें ॥
या चक्रधर नामाची प्रौढी। ज्याचे वाचेमाजीं गडबडी।
तो उभवील मोक्षाची गुढी। कली त्यासी बाधीना ॥
या चक्रधर नामापुढें। भूतपिशाच पळे बापुडें।
देवतांचें विघ्न उडे। अंगीं जोडे ज्ञानकवच ॥

या सर्व अंतर्गत पुराव्यांचा विचार करता शहामुनी हा महानुभावपंथीय होता, यात संशय उरत नाही.

## शेवटी अद्‌वैतबोधाची वाट

परंतु शहा मुनीने महानुभावपंथीय राहूनही शेवटी अद्वैतमताचा स्वीकार केलेला दिसतो. त्याने पहिल्या तीस अध्यायांत ज्या विचारांची विस्ताराने मांडणी केली आहे, त्यांना पूर्वपक्ष मानून पुढे (अ. ३१-५०) अखेरचा सिद्धान्त म्हणून अद्वैत सिद्धान्ताची मुक्त कंठाने भलावण केली आहे. त्याला प्राप्त झालेल्या गुरुबोधाचा परिचय करून घेताना आपणास त्याच्या 'ब्रह्मास्मिभावा'चे दर्शन घडले आहेच. हाच भाव अखेरीस त्याच्या जीवनाला अंतर्बाह्य व्यापून राहिलेला दिसतो. 'यालागीं अद्वैतभक्ती। करिता लाभे सुखविश्रांती।' (३५·२४७) असे सांगून, अन्य मराठी संतांप्रमाणें 'जनचि दिसे जनार्दन' (३५·१०९), 'विश्वीं विश्वंभर पूर्ण' (३९·११३), 'जगीं जगदीश परिपूर्ण' (४४·३१३) असा अद्वैतानुभव त्याने ठायी ठायी व्यक्त केला आहे. अगदी शंकराचार्यांच्या निश्चयात्मक शब्दांत 'अद्वैत खरें, भेद मिथ्या' (४२·६२) असे सांगून,

त्याने ‘ अद्वैत भक्तांचें भूषण ’ या शब्दांत ( ४५·३५ ), अद्वैताचा जयजयकार केला आहे. या बाबतीत त्याने सकल संशयांचा निरास करण्यासाठी अगदी स्पष्ट शब्दांत श्रोत्यांना सांगितले आहे की—

या ग्रंथाचें हें निजबीज। समान पाहणें समाधिशेज।
अद्वयबोधीं संतोषिजे। या सिद्धान्तीं ‘ मी ब्रह्म ’ ॥
अद्वैतबोधीं समाधिसुख। ज्यांत निमग्न सनकादिक॥
हेंचि वर्म गीतेंत बदला वैकुंठनायक। वेदमर्नीचें नवनीत॥
सर्प वाकडा तिकडा फिरत। वारुळांत नीट उतरत।
तैसा कवि बहु प्रकारें वदत। शेवटीं सिद्धान्त अद्वैतचि॥
म्यांही ‘ सिद्धान्तबोधां ’ त। लिहिला मतभेद द्वैत बहुत।
शेवटीं अद्वैतबोधाची मात। बेरीज केली एकचि॥ (४५.९२–९५)

**परब्रह्म उभे विटेवरी**

शहा मुनीला परंपरागत लाभलेल्या महानुभावीय विचारांवर मात करणारा हा अद्वैतबोध कसा आणि केव्हा लाभला, ते कळायला मार्ग नाही. तो या बोधाचे श्रेय गुरूलाच देत असल्यामुळे त्याचा गुरूच परमार्थक्षेत्रात काहीसा उदारमनस्क असावा, असे मानायला जागा आहे. ते काहीही असो, शहा मुनीच्या ठायी अद्वैतबोध बाणला होता आणि त्याने मराठी भक्तिभीमरथीच्या अथांग जलराशीत मनसोक्त अवगाहन केले होते, यात शंका नाही. आपल्या ग्रंथात त्याने दोन वेळा अद्वैतभक्तीने भारलेल्या ज्ञानदेवादी संतमंडळींना भक्तिभावाने वंदन केले आहे ( ३४. ६८–७२ व ३५. ३७–६३ ). तसेच अडतिसाव्या अध्यायाच्या आरंभी पंढरी आणि पांडुरंग यांचे महिमान अत्यंत भावमय शब्दांनी गायिले आहे. “ कलियुगात पापे फार झाल्यामुळे प्रभूने पंढरीची पेठ वसविली आणि त्या पेठेत होळी पेटवून तीत दोषांच्या गोवऱ्या जाळल्या. पंढरी हा पापसागराला ग्रासून टाकणारा अगस्तीच आहे किंवा भवसर्पाला छिन्नभिन्न करून टाकणारा गरुडच आहे. ” अशा रीतीने पंढरीचा गौरव करून शहा मुनी म्हणतो—

मिळे संतांची मंडळी। वाजे स्वानंदाची टाळी।
कीर्तनघोषाची आरोळी। पळे काळ पाहोनी॥

भीमरथी दक्षिणतीरीं । परब्रह्म उभें विटेवरी ।
कर ठेवोनि कटांवरी । ध्यान दिगंबर साजिरें ॥
चंद्रभागावाळवंटीं । होय पवित्र यात्रेची दाटी ।
एकमेकां भेटती । पायीं मिठी पडतसे ॥
सर्वांनीं देवास भेटावें । ऐसी कोठें चाल घडे, सांगावें ।
न लगे दाढीमिशील भादरावें । तीर्थउपासना तीहि ना ॥
ऐसी नामाची गर्जना । त्रैलोक्यांत नाहीं जाणा ।
अठरा वर्णांचा पाहुणा । करी उंच नीचासी ॥
सर्वांमुखीं नामाची कडकी । त्रैसे कृतांतासी धडकी ।
पाप जगावया जागा हुडकी । जाहलीं रडकीं .इतर तीर्थें ॥
अभिमान पळे सीमेबाहेरी । प्रेम संचरे अंतरीं ॥
अश्रु स्रवती नेत्रीं । विस्मय सुरनरां होतसे ॥
पंढरीस संतांचा आखाडा । रोगदारिद्र्य जाय पीडा ।
देव दर्शन देतो रोकडा । तुटे झगडा कर्मांचा ॥

(३८. १–११)

महानुभावपंथीय पंढरी आणि पांडुरंग यांच्याविषयी प्रारंभापासून गौणत्वाचा भाव बाळगून असतानाही शहा मुनीने त्या संप्रदायाची दीक्षा-शिक्षा डावलून वारकरी संतांच्या भावुकतेने पंढरी आणि पांडुरंग यांचा महिमा गावा, हे विशेष आहे. याचमुळे त्याच्या ग्रंथाला महाराष्ट्रात सार्वत्रिक लोकप्रियता लाभू शकली.

**तोचि हेलावला ' सिद्धान्तबोध '**

आतापर्यंतची शहा मुनीची जीवनरेखा, त्याला प्राप्त झालेला गुरुबोध, त्याचा संप्रदाय, स्वसंप्रदायाच्या विचारसरणीवर मात करणारी त्याची अद्वैतप्रीती आणि त्या अद्वैतप्रीतीतून स्वभावतः उमलून आलेला पांडुरंगभक्तीचा जिव्हाळा यांचा परिचय आपण शहा मुनीच्या ' सिद्धान्तबोध ' नामक ग्रंथाच्या आधारेच करून घेतला आहे. आतापर्यंतच्या सर्व संदर्भांत ' सिद्धान्तबोधा 'चे अंतरंग अनेकांगांनी प्रकट झाले आहेच.

या ग्रंथाची अध्यायसंख्या ५० असून, ओवीसंख्या ९८५८ म्हणजे ज्ञानेश्वरीहूनही अधिक आहे. याच्या रचनेचा स्थलकालसंदर्भ असा—

शके सत्राशें सत्रा जाण । ग्रंथ समाप्त जाहला पूर्ण ।
चांवळी ग्रामाकडे पटारीमंडण । तेथें लिहिला हा ग्रंथ ॥
शहा मुनीचा शिष्य जाण । लेखक भगवंत नारायण ।
उपनाम पांढरकामा जाण । वास्तव्य पाडळी धायगुडे ॥

या ग्रंथाच्या मुद्रित प्रतीत शके १७१७ ऐवजी १७०० असा रचनाकाल छापला गेला आहे.

या ग्रंथाविषयी हरिभक्तिपरायण ल. रा. पांगारकरांनी दिलेला अभिप्राय विशेष गौरवयुक्त आहे : "मराठी भाषेतल्या पहिल्या प्रतीच्या ग्रंथांत मोडण्यासारखा हा ग्रंथ आहे; पण आमच्या अरसिकतेमुळे त्याचे योग्य स्थान त्याला अद्याप मिळाले नाही. भिन्न भिन्न पुराणांतल्या उत्कृष्ट कथा, रामायण-भारतांतली सुंदर आख्याने अतिसंक्षिप्त तऱ्हेने, मोठ्या मार्मिकपणाने, शब्दरचना अतिसमर्पक, अतिसुबोध व अत्यंत प्रासादिक करून सारा ग्रंथ श्रेष्ठ नीतितत्त्वांनी व वेदान्तविचारांनी विणून काढला आहे. याची रचना इतकी सुबोध व चित्ताकर्षक आहे, याची मांडणी एखाद्या साध्या गद्यग्रंथासारखी इतकी सहज व सरळ झालेली आहे की, गंगेच्या ओघाबरोबर जसे पुष्प झरकन् वाहत जाते, त्याप्रमाणे अंतःकरण याच्या अस्खलित विचारप्रवाहाबरोबर वाहत जाते. या ग्रंथात चित्त भारून टाकणारे, अन्य व्यवसायांची पुरी विस्मृती पाडणारे व आपल्या दिव्य प्रभेने दशेंद्रियांची एकतानता करणारे असे अद्भुत सामर्थ्य आहे की, त्याचे यथार्थ वर्णन वाणीला करता येत नाही... यात चित्तचातुर्य वाढविणारे, जीवशिवांचे निर्णय सांगणारे, गुरुमहिमा वाखाणणारे, संतमाहात्म्य वर्णन करणारे प्रसंग अनेक आले आहेत. प्राचीन संतांच्या व ईश्वरावतारांच्या कथा साऱ्या अध्यात्मतंतूत ओवल्या आहेत. तात्पर्य, मराठी वाङ्मयाच्या खाणीतला हा एक अत्यंत तेजस्वी हिरा आहे व 'जरि उकिरड्यांत पडला, मळला न हिरा तथापि सामान्य' या पंतांच्या उक्तीप्रमाणे मराठी वाचकांनी जरी याची किंमत केली नाही, तरी याची प्रभा याच्या सन्निध जाणाऱ्याला दिपविल्याशिवाय राहणार नाही."[४]

ह. भ. प. पांगारकरांच्या या अभिप्रायामध्ये म. भा. भू. आजगावकरांना "रतिमात्र अतिशयोक्ती वाटत नाही." त्यांच्या मते, "शहा मुनीची वाणी

इतकी रसवती, स्पष्टभाषिणी, प्रासादिक आहे की, तिच्या तेजस्वितेमुळे वाचकांचे मनश्चक्षू दिपून गेल्याशिवाय राहत नाहीत. कर्त्याची विद्वत्ता मोठी अगाध होती, असे दिसत नाही. पण त्याच्या वाणीचे तेज इतके उज्ज्वल आहे की, केवळ परमेश्वरी प्रसादाचेच ते फल होय, असे म्हटल्याशिवाय राहवत नाही."[५]

स्वतः शहा मुनीने आपला हा ग्रंथ प्रासादिकच मानला आहे—

गुरुकृपेनें जाहला बोधु । हृदयीं भरला ज्ञानसिंधु ।
तोचि हेलावला सिद्धान्तबोधु । आनंदलहरी विस्तारल्या ॥
( ५०·४७३ )

हे अभिप्राय श्रद्धामय दृष्टीचे अतिशयोक्त परिणाम मानले, तरी सारस्वतकार भावे म्हणतात, तसे हे 'अठरा धान्यांचे कडबोळे'[६] मात्र नाही.

शहा मुनीची अन्य रचना उपलब्ध नाही. त्याच्या काही अनुयायांनी रचलेले पारमार्थिक विषयांवरील प्रश्नोत्तरात्मक अभंग छापले गेले आहेत.[७]

## यवनयातीचा प्रकार

शहा मुनीची प्रकृती आणि निरीक्षणशक्ती शेख महंमदासारखीच आहे. कबिराला त्याने गुरुस्थानी मानले आहे. कबिराला त्याने 'सत्यस्वरूप अवतार', 'ज्ञानाचा कोंभ', 'ब्रह्मींचा पुतळा', इत्यादी विशेषणांनी गौरविले आहे. ( ३९·१–२० )—

ऐसा कबीर जगीं धन्य । मातें स्वप्नीं दिलें दर्शन ।
तोही गुरु माझा पूर्ण । जपें त्यासी अहर्निशीं ॥ ३९·२०

अशा रीतीने शहा मुनीचा कबिराच्या चरित्राशी आणि विचारविश्वाशी भावबंध निर्माण झालेला होता. कबीर हा समन्वयशील सत्यसंशोधकांचा एक प्रकारे मार्गदर्शकच बनलेला होता. ज्या सत्त्वशील मुसलमानांनी हिंदू परंपरेशी तादात्म्य साधले, त्या सर्वांनाच कबीर हा गुरुस्थानी वाटणे स्वाभाविकच आहे.

शेख महंमदाने 'जो मुसेमध्ये जन्मला तो मुसलमान' अशी मुसलमानाची व्याख्या करून, काफर कल्पनेचाच निरास केला आहे, हे आपण पाहिलेच आहे. शहा मुनीने हिंदू-मुसलमान द्वेषाच्या वस्तुस्थितीवर एक काल्पनिक कथा रचून, द्वेषभावनेची निरर्थकता दाखवून दिली आहे : दिल्व आणि काफेव

या नावाचे दोन ऋषी होते. दि्ल्व हा महाविष्णूचा (वैकुंठवासी विष्णूहून भिन्न असलेल्या क्षीरसागरीच्या विष्णूचा) भक्त होता, तर कार्फव हा शिवाचा उपासक होता—

दिल्व निंदी शिवासी । कार्फव निंदी महाविष्णूसी ।
यापरी दोही ऋषींसी । द्वंद्व वाढलें परस्परें ॥

एकदा कार्फवाची धेनू दिल्वाच्या मशिदीत जाऊन उभी राहिली. आपल्या पूजास्थानी आपल्या विरोधकाची धेनू उभी राहिलेली पाहून दिल्व संतापला आणि दंड हाती घेऊन तिला मारू लागला. इतक्यात त्या धेनूने दिल्वावर धाऊन जाऊन आपल्या शिंगांनी त्याला मारून टाकले. दिल्व ऋषीचा पुत्र मुसळ ऋषी हा 'क्रूर' आणि 'बहुतामसी' होता. त्याने पित्याच्या मृत्यूचा सूड म्हणून त्या धेनूला ठार मारले आणि तिचे मांस भक्षण केले. या 'क्रूर' आणि 'बहुतामसी' मुसळ ऋषीचे जे वंशज, तेच मुसलमान होत, असे शहा-मुनीने म्हटले आहे. कार्फव ऋषीचे वंशज ते काफर होत. त्याचमुळे मुसलमान काफरांचा द्वेष करतात आणि मुद्दाम गोहत्या करतात, असे शहा मुनीने दिलेले स्पष्टीकरण आहे. त्याच्या मते 'यवनयातीचा प्रकार' हा असा आहे. (२३. १९६–२१०). 'ब्राह्मण जाय दावलमलका।' (२५. २१२) हा प्रकार शहा मुनीला रुचत नाही. 'शिवालये भंगिति अविंध।' (३०. १२४) या गोष्टीचा त्याला खेद होतो.

आणखीही एके ठिकाणी (१८.९७–११७) त्याने हिंदू-मुसलमानांच्या द्वेष-भावनेच्या मुळाविषयी काही काल्पनिक स्पष्टीकरण केले आहे. मुसलमानांचा एकेश्वरवाद त्याच्या अनन्यनिष्ठेला जवळचा असल्यामुळे त्याने महानुभावीय देवताविचारांच्या बैठकीवर 'महाविष्णु लक्ष्मीवर । तयापासून पीर पैगंबर ।' असे मानले आहे आणि क्षीरसागराच्या महाविष्णूपासूनच म्लेंछधर्म निर्माण झाला, असे म्हटले आहे. हिंदूंच्या बहुदेवतामंडलातून सर्वसाधारण जनता जी भ्रांत बनली आहे, तिचा त्याला उबग आहे. त्याचमुळे 'जितुका दिसे महाराष्ट्र-धर्म । याचा हरिहरापासी प्रेम' असे सांगून—

शेषशायी नारायणाला । यवन म्हणती थोर अल्ला ।
हरिहर त्या तळीं राहिला । म्हणून द्वेषिती देवांसी ॥

असे यवनांच्या महाराष्ट्रधर्मविरोधाचे कारण त्याने दिले आहे. ' मऱ्हाष्ट्रधर्मांची राहाटी। अविंध मानिती उफराटी। ' आणि ' यवनलोकांची राहाटी। विपरीत वाटे या लोकां॥ ' या परस्परविद्वेषाविषयी शहा मुनीला खेद वाटतो आणि सर्वव्यापक परमेश्वराचे भान घडल्यावर या द्वेषभावनेला थारा उरणार नाही, या गोष्टीकडे तो सर्वांचे लक्ष वेधतो. व्यापक अनुभवातून या द्वेषाची आणि श्रेष्ठ-कनिष्ठभावाची व्यर्थता जाणवल्यामुळेच त्याचा जन्मजात उच्चनीचतेवर विश्वास नाही. या बाबतीत त्याने विचारलेला प्रश्न अत्यंत मार्मिक आहे—

देवाची भक्ती चोखामेळा करी। त्यास लोक धरिती दुरी।
वैकुंठीं महारवाडा वेगळा करी। नांदावया तयासी ?॥
उंच-नीच नदींत शिरोन। बाहेर निघति कुंभ भरोन।
मग म्हणती, 'स्पर्शों नको, चला दुरोन'।
उदकांत उभयतां उर्मी होतीं॥ (५०·४००-४०१)

हे सर्व भेद व्यर्थ आहेत, हे ' समजोनि अंतरी ' शहामुनीने ' स्वजात-परजात पेच भारी। नाहीं आणिले मनात॥ '

हे अशाच प्रकारचे उदार आणि समन्वयशील विचार त्याने दहा सहस्र ओव्यांत मांडले आहेत. वाचकांनी मूळ ग्रंथ अवश्य वाचावा, असा आग्रह करून मीही शहा मुनीच्या शब्दांत आपला निरोप घेतो की—

आतां फार बोलों काई। पायांवरी ठेवितों डोई।
कृपा करी कृष्णाबाई। पुरवी मनोरथ मनींचे॥ (५·१७१)

# संदर्भ टीपा

१. हा ग्रंथ प्रथम गणपत कृष्णाजीने इ. स. १८७० मध्ये (आषाढ शु. ४, श. १७९२) छापला. त्यानंतर पंढरीनाथ विनायक पाठक यांनी जगदीश्वर प्रेस, मुंबई, येथे छापला. शहा मुनीच्या चरित्राचा एकमेव आधार हाच आहे.

२. ही माहिती मी शहागड येथे प्रत्यक्ष जाऊन जानेवारी १९६६ मध्ये मिळविली.

३. पहा — 'महानुभावीय मराठी वाङ्मय': डॉ. य. खु. देशपांडे (द्वितीयावृत्ति, १९६०), पृ. ८०–८२.

४. 'महाराष्ट्र–कवि–चरित्र', भाग दुसरा : ज. र. आजगावकर, पृ. ७७–७८ वर उद्धृत.

५. तत्रैव, पृ. ७८–७९.

६. 'महाराष्ट्र–सारस्वत'– वि. ल. भावे (पाचवी आवृत्ती, १९६३), पृ. ६२१.

७. 'शहामुनीचे प्रश्नोत्तर अभंग' : ताडदेव बुक डेपो प्रकाशन, मुंबई ७.

# आणखी काही

**काही अज्ञात व अल्पज्ञात**

ज्यांच्या चरित्राविषयी थोडेफार सांगता येण्यासारखे होते, अशा सहा मुसलमान मराठी संतकवींचा परिचय आपण गेल्या सहा प्रकरणांत करून घेतला. परंतु यांशिवाय असे कितीतरी मुसलमान मराठी संतकवी आहेत की, ज्यांचे केवळ नावच शिल्लक आहे आणि चरित्र व काव्य लुप्त झाले आहे. तसेच, असेही काही आहेत की, ज्यांचे चरित्र अज्ञात आहे, परंतु काव्यमात्र कमी-अधिक प्रमाणात उपलब्ध आहे. अशा अज्ञात वा अल्पज्ञात मुसलमान संतकवींची नोंद करणें, त्यांचे अल्पस्वल्प काव्य आस्थेने पहाणे आणि त्यांची स्मृती जागवून त्यांच्याविषयीच्या अधिक संशोधनासाठी पार्श्वभूमी तयार करणे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यभावनेपोटीच इथे अशा

काही मुसलमान संतकवींची, स्थूल का होईना, नोंद करीत आहे—ज्यांच्याविषयी एखादी आख्यायिका उपलब्ध आहे, तीही देत आहे. कारण जिथे सर्वच अंधार आहे, तिथे आख्यायिकेचा मिणमिणता प्रकाशही आशादायी वाटतो.

### केशवस्वामींचे तीन मुसलमान शिष्य

दास पंचायतनातील एक थोर संत केशवस्वामी हे मूळचे कल्याणीचे, परंतु त्यांचे बहुतेक वास्तव्य भागानगर (द. हैद्राबाद) येथे झाले आणि त्यांनी समाधिही त्याच ठिकाणी स्वीकारली, त्यामुळे ते भागानगरकर केशवस्वामी म्हणूनच ओळखले जातात. ते मुकुंदराजांच्या परंपरेतील रंगबोधाचे शिष्य होते. आदिनाथ–हरिनाथ–रघुनाथ–नरसिंहभारती–जगन्नाथ–सहजबोध–रंगबोध– केशवस्वामी अशी त्यांची परंपरा आहे. 'पूर्ण स्वानंदाचे लेणे' केशवस्वामींनीं प्राप्त केले होते आणि ते अन्य मुमुक्षूंना लेवविण्याचे कार्यही त्यांनी अविरत चालू ठेवले होते. त्यांच्या परीस-स्पर्शाने ज्यांच्या जीवनाचे सोने झाले, त्यांत तीन मुसलमानांची नावे मिळतात. एक बाजीद पठाण, दुसरा शहाबेग आणि तिसरा शक्करगंज.

> सुविरक्तें बाजीदें प्रभुतें चिंतूनि संतत पठाणें।
> वैकुंठीं बैसविलें, करुनि जगीं धन्य संत, तप ठाणें ॥
>
> ('सन्मणिमाला', ७१)

अशा शब्दांत मोरोपंतांनी कविवर बाजीद पठाणाचा गौरव केला आहे. उद्धव चिद्घन, जयरामसुत, इत्यादींनी आपल्या 'संतमालिकां'तून या पठाणाचे नाव गुंफले आहे. महीपतिबुवांनी 'भक्तलीलामृता'च्या एक्केचाळिसाव्या अध्यायात (ओ. ६४–८७) बाजीदाचे अल्पवृत्त नोंदविले आहे.

महीपतिबुवांच्या माहितीप्रमाणे बाजीद हा विजापूरच्या आदिलशाहीत एका सुभ्याचा अधिकारी असून, त्याच्या स्वाधीन पंचवीस हजार सैन्य होते. घरी आजा-आजी, माता-पिता, बंधू-भगिनी, कांता-पुत्र, इ. सर्व गणगोत होते. यश आणि संपत्ती त्याच्या घरी उतास आली होती. तो एकदा मोहिमेहून परत येत असताना वाटेत द्रव्याच्या भाराने त्याचा एक उंट उरी फुटून मेला. सारवानाने उंटावरील ओझे खाली उतरविले आणि तो मागून येणाऱ्या धन्याची

वाट पाहत रस्त्याच्या कडेला बसून राहिला. बाजीद तेथे येताच त्याने सारवानाला विचारले कीं, ‘ अरे, तू इथे कशाला थांबलास ? ’

‘ साहेब, उंट मेला आहे—’

बाजीदाला मृत्यूचा अनुभवच नव्हता. त्यामुळे त्याने सारवानाचे म्हणणे ऐकून न घेता त्याला हुकूम सोडला की—

‘ अरे, पाहतोस काय ! उठव त्या उंटाला आणि ओझें त्याच्या पाठीवर टाकून चल पुढ ! ’

धन्याने असे दरडावून सांगितल्यामुळे सारवानाने चार मेढी जमिनीत रोवून, त्यांच्या आधाराने उंटाला उभा केला आणि त्याचे चारी पाय त्या मेढींना बांधून उंटावर द्रव्याचे ओझे लादले. परंतु एवढे करूनही तो मेलेला उंट कसा चालणार ?

मृत्युलोकीं जीवासी मरण असे । हें तो तयासि विदित नसे ।
पूर्वपुण्याचेनि लेशें । विषयींच असे निमग्न तो ॥
यास्तव सारवानासी म्हणे । उंट हाका चला त्वरेनें ।
ते म्हणती, चालवितें चैतन्य । तें गेलें निघोन सत्वर ॥
तुमचें भय वागवोनि फार । खजिना घातला प्रेतावर ।
परी निघोनि गेला चालविणार । यासी विचार कोणता ॥

( भक्तलीलामृत, ४१·७६–७८ )

अशा प्रकारे देहाच्या क्षणभंगुरतेचा उत्कट प्रत्यय आल्यामुळे बाजीदाच्या चित्तात अनुतापाची वेल अंकुरली. त्याने त्या वेलीला सर्वसंगपरित्यागाचे खत घातले आणि तो केशवस्वामींना सर्वभावे शरण गेल्यावर त्याच्या कृपामृताचे सिंचन होऊन ती वेल फुली-फळी बहरली ! केशवस्वामींनी त्याला रामोपासनेचा मंत्र दिला आणि भक्तिभावनेच्या अभिव्यक्तीसाठी कवित्वाची शक्तीही दिली.

महीपतिबुवांनी बाजीद पठाणाच्या कवित्वासंबंधी केलेले उल्लेख महत्त्वाचे आहेत. त्यांच्या माहितीप्रमाणे बाजीदाने पाचशे हिंदी साक्या आणि अनेक मराठी पदपदांतरे रचली, परंतु त्या पदपदांतरांत त्याने स्वतःचे नाव न नोंदविता आपल्या गुरूचीच नाममुद्रा उठविली. महीपतींनी त्याच्या दोन हिंदी साक्या उद्धृत केल्या आहेत—

भज मन तो रामके बैठता काममों ।
दिनों चारका रंग मिलेगा खाकमों ॥
गले तुलसीकी माल, सुमरन श्यामको ।
येकही वेर भोजन आपके हातको ॥

वाजीदाने गुरूच्या नावात आपल्या नावाचा विलोप केल्यामुळे त्याच्या मराठी पदपद्यांतरांचा शोध घेणे अशक्य आहे. केशवस्वामींच्या कवितासंभारात काही पदे अशी आढळतात की, त्यांच्या अखेरीस केशवस्वामींविषयी गुरू म्हणून परमादर व्यक्त केलेला आहे, आणि कर्त्याने आपले नाव मात्र नोंदविलेले नाही. अशी ही पदे वाजीदाची तर नसतील ना ? विदेही मुक्तावस्थेचा देहीच अनुभव घडविणाऱ्या गुरूची अद्‌भुत करणी वाखाणणारे हे एक पद पाहा—

मानस माझें भुललें आजीं वो ।
पूर्वस्थिती पालटली माझी वो ॥ ध्रु० ॥
दीनानाथें केली वो झडपणी ।
आतां कैसें करूं मी साजणी ॥
देहीं देहभावना न कळे ।
द्वैताद्वैत संकल्प मावळे ॥
नवल केशवस्वामीची करणी ।
निर्विकल्प स्थापिलें चरणीं ॥[१]

महीपतिबुवांनी केलेल्या उल्लेखाच्या प्रकाशात मला तरी ही अशी पदे त्या थोर गुरुभक्ताची — वाजीद पठाणाचीच जाणवतात.

शहावेग हा केशस्वामींचा दुसरा मुसलमान शिष्य. याची काही सुरस मराठी पदे केशवस्वामींच्या कवितेच्या बाडात आहेत.[२] कठोर वैराग्य आणि अपार गुरुभक्ति हे त्याच्या पदांचे[3] विशेष आहेत.

काळ पसरुनि मुख विशेष । आला खात त्रैलोक्य केलें वोस ।
उठा पळा जंव आहे अवकाश । नाहीं तरी करील एक ग्रास जी ॥

असा काळाच्या सर्वभक्षकतेचा इशारा देऊन, शहावेगाने काळाच्या मगरमिठींतून मुक्तता करून घेण्यासाठी गुरूचे पाय धरण्याची विनवणी लोकांना केली आहे—

काळापासूनि सोडवी पाहे । तोचि सखा बंधुबाप माय ।
ब्रह्मादिकां दुर्लभ ज्याचे पाय । पायीं राहिल्या मग भय काय जी ।।
केशवस्वामी केवळ सौख्यराशी । मनोभावें शरण रिघा त्यासी ।
पदोपदीं सहज जोडे काशीं । म्हणे शावेग समाधी अनायासीं ।।

जो केवळ सौख्यराशी आहे आणि ज्याच्या पावलोपावली पुण्यराशी काशी आहे, तो आपला गुरू साक्षात् शिवावतारच आहे, अशी श्रद्धा शहावेगच्या हृदयात नांदत होती. ही श्रद्धा व्यक्त करणारे त्याचे हे पद पहा—

ब्रह्मादिकां न कळे अंत ज्याचा ।
अहो तो आज्ञाधारक योगियांचा वो ।। धृ० ।।
तरायाची जरी चाड जीवीं माय ।
चित्तपुष्प चरणीं त्याचे वाहे वो ।
भवअंतक निज संत निर्विकार ।।
तो सहज शंकर अवतार ।।
केशवस्वामी संपूर्ण अंगें जालों ।
म्हणे शावेग तरायासी आलों ।।

केशवस्वामींचा तिसरा मुसलमान शिष्य शकरगंज याची मनोवृत्ती गुरु-बोधाच्या मदिरेने धुंद होऊन ‘ परपुरुषा ’च्या प्रीतीची गीते गात होती, असे त्याच्या एकमेव उपलब्ध गीतावरून जाणवते. आपल्या धुंद अवस्थेला त्याने ‘ चेटकीण ’ म्हटले आहे—

चेटकनी बाला, लटकती आवे ।
बोधका प्याला लेकर बेशक होकर गावे ।।
दुनियाका धंदा सारा छोड दिया भाई ।
यखत्यारसुं नजर बडे साहेबसुं लाई ।।
निजानंदमदसु भुली बिसर चेली काया ।
दिल जहांसु धनीकु मिली अब कहांकी माया ।।
मकर बिना ख्याल करे हालमें मस्त माई ।
शकरगंज आजे केशवराज प्रभुपाई ।।[४]

गुरुभक्तीचे मूर्तिमंत पुतळे असलेले आणि गुरुकृपेने परमपदाचे अधिकारी

बनलेले हे केशवस्वामींचे शिष्य तुमच्या-आमच्या जिज्ञासेला हुलकावणी देऊन अज्ञाताच्या गुंफेत ध्यान लावून बसलेले आहेत. त्यांचे पूर्ण दर्शन ज्या दिवशी घडेल, त्या दिवशी संतचरित्रांच्या रसिकांना एक अमोल ठेवा सापडेल, यात संशय नाही.

**शहा नवरंग**

केशवस्वामींशी सांप्रदायिक नाते जोडणाऱ्या आणखी एका मुसलमान कवीचे एक पद मला अलीकडेच मिळाले आहे. ते पद असे–

सद्‌गुरू बाप माझा आणिक न पुससी कांहीं रे ।
तुझिया नेत्राची साई तेचि माझी आई रे ।। ध्रु० ।।
विश्वव्यापक स्वामी बिंदू पाही रे ।
शोधितां ठाव कोठें त्यावीण नाहीं रे ।। १ ।।
मी-तूंपणाची वार्ता जेथें नाहीं रे ।
पुसुनी चौघां जणां विचारें घेई रे ।। २ ।।
शहा नवरंग रंगातीत पाही रे ।
पूर्णब्रह्म हें नांव सांगावें काई रे ।। ३ ।।

या पदाच्या कर्त्याला मी 'शहा नवरंग' हे नाव दिले आहे खरे; परंतु अखेरच्या दोन ओळींतील सूचक नावांचा विचार करता, हा शहा केशवस्वामींचे गुरू रंगबोध यांचा प्रशिष्य आणि पूर्णबोधाचा शिष्य दिसतो. जिथे मी-तूपणाची वार्ता सरते, अशा विश्वव्यापक पूर्णब्रह्माच्या रंगात रंगलेला आणि तरीही रंगातीत असलेला हा शहा कुतूहलाचा विषय आहे.

**जंगली फकीर सय्यद हुसेन**

वडवाळसिद्ध नागनाथांना गुरुस्थानी मानणाऱ्या एका मुसलमान सत्पुरुषाचे– अलमखानाचे चरित्र आणि कवित्व आपण मागे पाहिले आहे. त्याचा एक गुरुबंधू जंगली फकीर सय्यद हुसेन याने पौराणिक कथेवर रचलेले प्रदीर्घ ओवीबद्ध काव्य [६] समर्थ वाग्देवता मंदिरात आहे. या काव्यातील ओवी अनघड स्वरूपाची असून, ओव्यांना क्रमांक नाहीत. वडवाळसिद्ध नागनाथाचा उल्लेख कवीने वारंवार केला आहे—

प्रथम नमूं देवा सीद वडवाळ नागेस्वर ।
तो मज प्रसन्न जाला कृपेचा सागर ।
त्याचे प्रसादें ग्यान जालें हृदयामाझार ।
आतां सांगेन साचार आयकिजे ॥...
वों नमू **सिरी सीद वडवाळ** नागनाथ ।
तो मज प्रसन्न जाला दिधली ग्यान मात ।
तयाचे प्रसादें ग्यान जालें हृदयांत ।
आतां सांगेन त्वरित मासियाचें कथन ॥

'जंगली फकीर' हे या कवीचे विशेषणात्मक टोपण नाव आणि सय्यद हुसेन हे त्याचे खरे नाव दिसते. त्याने आपल्या काव्यात या दोन्ही नावांचा वापर केला आहे—

**जंगली फकीर** म्हणे साधुसंगत धरावी चातुरा । ...
**जंगली फकीर** म्हणे आईका देऊन चित्त ॥...
**सैद हुसेन** म्हणे पुढें सांगेन मासियाचि वार्ता ॥

जंगली फकिराच्या काव्याचा काही अंश मी नकलून मागविला आहे, त्यात दुंदुभी व गजासुर यांच्याशी शिवाने केलेले युद्ध, कार्तिकेयजन्म, गणेशजन्म, गणेशाचे गजमस्तक, इत्यादी कथा आलेल्या आहेत. 'पुढल्या प्रसंगीं वधु होईल तारकासुरा,' अशी तारकासुरवधाच्या कथेची सूचनाही आहे. गणेश-जन्माच्या कथेसाठी 'हे गणेशाची उत्पत्ती। लिंगपुराणीं बोलती।' असा लिंगपुराणाचा हवाला दिला आहे. जंगली फकिराची प्रसंगवर्णनपद्धती प्रत्ययकारी आहे. सर्व कथाप्रसंग नारद कृष्णार्जुनांना सांगत आहे, असा निवेदनाचा थाट आहे.

गजासुर शंकरादी सर्व देवांना अजिंक्य बनून त्रैलोक्यात उत्पात मांडू लागल्यावर शंकराने वीरभद्राला गजासुरावर पाठविले, त्या प्रसंगाचे वर्णन करताना जंगली फकीर लिहितो—

वीरभद्रें गजासुर पाचारिला ।
मग तो सामुरा चालिला ।
दोघां संग्रामु कैसा जाला ।

अद्‌भुत वहिला देखा श्रोते हो ॥
येक काळु दुसरा महाकाळु देखा ।
दोघां जाला आदळु आणीका ॥
दुमदुमिला ब्रह्मगोळु आणिका ।
पळ सुटला त्या पनका तेणें नादें ॥
गजासुर नासरोचि आला देखा ।
तव हाणितलें वीरभद्रें वळखा ।
सन्मुख चालिला आइका ।
वीरभद्रावरी देखा देखा ( श्रोते हो ) ॥

वीरभद्रालाही गजासुर आटोपत नाही, असे पाहिल्यावर शंकर स्वतः गजासुरावर धावून गेला आणि त्याने त्रिशूळाने त्याचे शिर उडविले. हेच गजासुराचे शिर गणेशाच्या धडावर चढून तो गजमुख कसा बनला, याचे वर्णन जंगली फकिराने रोचकपणे केले आहे—

गजासुराचें शिर करीं घेतला ।
येतु असे त्रिपुरारी वहिला ।
तव तो महाद्वारीं पावला ।
तव तो नरू देखिला बैसला ॥
तेणें आडकाठी घातली त्रिपुरारी ।
संभूसी येऊं ना दे भीतरीं ।
नाहीं आग्न्या जी अवधारी ।
पार्वतीची अहो त्रिपुरारी ॥
मग कोपला त्रिपुरारी ।
सीर हानीतलें तये अस्वसरीं ।
गेलें स्वर्गावरी उडुनी ॥
रोंड नाचत असे राय अंगणीं ।
तव पार्वतीनें देखिलें नयनीं ।
शक्ती म्हणे शंकरालागुनी ।
हें काय केलें शूळपाणी ॥

हा पुत्र असे आपुला ।
दारवठा होता बैसविला ।
तो कैसा देवा मारिला ।
नाहीं विचारिलें मनीं ॥
हातीं शिर होतें गजासुराचें ।
रोंड नाचत होतें रायाअंगणीं साचें ।
तयातें शिर लाविलें गजासुराचें ।
सत्य जाणी ॥
तयाचें नांव ठेविलें नरकुंजर ।
संग्रामु वीरभद्रासी जाले साचार ।
तेणें दांतु तोडिला होता चराचर ।
येकु उतरला मुखासी ॥
म्हणती तयासी येकदंतु ।
चौदा विद्या प्रसिद्धा साक्षात ।
आणिक वेदान्त सिद्धान्त ।
गुणां सकळां प्रसिद्ध तो ॥...
चौदा विद्यांचें भांडार ।
कविजनांचें माहेर ।
दिधलें आभरण सेंदुर ।
महेश्वरीं ॥

या प्रदीर्घ उताऱ्यावरून जंगली फकिराच्या कथाकथनाचें सरळ साधें स्वरूप स्पष्ट होईल.

**शहा हुसेन फकीर**

शहा हुसेन फकीर हे नाव प्राचीन मराठी संतमंडळात वारंवार गौरवाने उच्चारले जाते. उद्धव चिद्घन इत्यादींनी त्याला संतमालिकांमध्ये आवर्जून स्थान दिले आहे. मोरोपंतांनी त्याच्या मृदु-मधुर-मनोहर वाणीचा गौरव मुक्तकंठाने केला आहे—

बोले मधुर, मनोहर, मृदु शाह हुसेन नामक फकीर ।
तेंवि न वाणीचाही, कंठीं नसतांहि लेश कफ, कीर ॥
('सन्मणिमाला', १००)

[ शाह हुसेन नामक फकिराची वाणी मधुर, मनोहर व मृदु आहे. ज्याच्या कंटात कफाचा लेशही नाही, असा साक्षात् सरस्वतीचा शुकही त्याच्या वाणीची बरोबरी करू शकणार नाही. ]

पंतांसारख्या सोज्वळ रसिकाने ज्याच्या वाणीचा एवढा गौरव केला आहे आणि संतभक्त कवी ज्याचे नाव विसरले नाहीत, असा हा शहा हुसेन फकीर आज अज्ञाताच्या जवनिकेआड लपून राहिला आहे आणि त्याच्या 'मृदु-मधुर-मनोहर' वाणीचे काही अस्पष्ट स्वर मात्र आपल्या कानी येत आहेत.

याचे नाव त्याच्या रचनेत व अन्यत्र शहा हुसेन फकीर, शाह हुसेन फकीर, शहा फकीर, शाहू फकीर, शाहुसेन फकीर, शहा हुसेन फकीर अलादा, इत्यादी नाना प्रकारांनी आढळते. मला त्याचे एकमेव मराठी गीत आणि दहा-बारा हिंदी पदे मिळाली आहेत.[८] या एवढ्या अत्यल्प रचनेवरूनही शहा हुसेनच्या मृदु मधुर वाणीचे स्वरूप आपल्या ध्यानी येऊ शकते.

शहा हुसेनने आपल्या एकमेव मराठी 'मुक्त' पदात नंदाघरी खेळणाऱ्या हरीची क्रीडा तन्मयतेने वर्णिली आहे—

श्रीहरि माझा नंदाचे घरिं खेळतो ॥
वत्सपुच्छ करिं धरुनि धावतो,
चरणिं घागऱ्या घुळघुळ वाजति,
गळां सांखळी, डोईवर कुंची,
रूप सांवळें सगुण चांगलें,
चिमणा बाळ तो माय पहातसे,
शब्द तोतरा 'अले अले' म्हणती ।

आई ज्याला 'अले अले' म्हणून हाक मारीत आहे, असा तो चिमणा बाळ संवगड्यांबरोबर बोरे चोरायला जातो; ते सर्व संवगडी एकमेकांना बुक्क्या मारतात; डोळे झाकून चिमटे घेतात; गोट्या, चेंडू, विटीदांडू खेळतात. अशा प्रकारे—

नाना परिच्या मौजा करिती,
इच्छा त्यांची पूर्ण मनांतील करणें सर्वहि,
हरि व्यापक तो,
ब्रह्मादिक स्तविती ज्याला ॥
श्रुतिस न कळे, वेदां अगोचर,
बाळ होउनि द्वारीं रांगे,
माखणसाठीं हात पसरितो,
येश्वदेच्या स्तनासि झोंबे,
दूध तियेचें घटघट घोटी,
लुढुलुढु पळतो,
पटपट पडुनी गडबड लोळे,
सदनामध्यें रुदन करितसे ॥

असे हे वात्सल्यचित्र शहा हुसेनने विस्ताराने चितारले आहे. गोपाळांसवे गाई चारायला जाणारा, त्यांना 'हैक हैक' म्हणून चुचकारणारा, त्यांना हाताने थापटून त्यांचे भवभय निवारणारा, हाती काठी घेऊन यमुनातटी विहरणारा, घरोघरी दहीदूध चोरणारा, गोपवधूंच्या मुखांना लोणी माखणारा, गोपींच्या मस्तकांवरील घडे चिमखड्याने फोडणारा आणि इतक्या खोड्या करूनही असुरकुळाचे मर्दन केल्यामुळे सर्वांना प्रिय झालेला मुरारी शहा हुसेनलाही अत्यंत प्रिय वाटतो—

परि तो मुरारी कवतुक करितो,
दुखासि हरुनी सुखासि देतो,
शहा फकीर नाम स्मरतां परगट होतो,
कीर्ति जयाची शिवासि प्रियकर,
नारद गुण गातो ॥

शहा हुसेनचे मुक्त छंदातील हे गीत त्याच्या निर्मळ कृष्णप्रीतीचे प्रत्यंतर घडविणारे आहे. या मराठी पदात त्याने आपल्या प्रभूचे दर्शन वत्सलभावाने घेतले आहे. तसेच काही हिंदी पदांत त्याने त्याला शृंगारभावातही पाहिले आहे. कधी 'जमुनाके तीर बासुरी बजानेवाला' प्रियतम त्याच्या हृदयरमणीला मंत्र-

मुग्ध करतो, तर कधी ती हृदयरमणी 'तुम फासा हम सारिया' असे म्हणून त्याच्याशी मुलखावेगळा 'चौसर' म्हणजे सारीपाट खेळू पाहते. 'दो दिनका मेहमान जीवडा,' याचे त्याला भान असल्यामुळे त्या सर्वव्यापक हरीचे हृदयकमलात ध्यान करण्याची त्याची वृत्ती आहे. कर्मकांडाची व्यर्थता त्याला पुरेपूर जाणवली आहे. त्याचमुळे त्याचे अंतर्मुख हृदय काहीशा बेपर्वाईच्या सुरात गर्जून उठते--

तीरथ कौन करे ।
हमारो तीरथ कौन करे ।। धृ० ।।
मनमों गंगा मनमों जमुना ।
मनमों ध्यान धरे ।। १ ।।
मनमों मुद्रा, मनमों आसन ।
उन्मनि ध्यान धरे ।। २ ।।
शाह हुसेन फकीर कहता है ।
भटकत कौन फिरे ।। ३ ।।

असा हा एकीकडे सुरदासाच्या भावुकतेशी, तर दुसरीकडे कबिराच्या उन्मुक्त बेफिकिरीशी जवळीक साधणारा मुसलमान मराठी संतकवी कधी काळी अज्ञाताच्या जवनिकेमागून प्रगट झाला, तर त्याच्या समग्र दर्शनाने संतसाहित्य-रसिकांना परमानंद लाभेल.

**'मुरली-मुग्ध' सय्यद महंमद**

ज्याच्या चरित्रासंबंधी अवाक्षरही बोलता-लिहिता येत नाही, असा हा कवी आहे. सय्यद महंमद त्याचे नाव आणि त्याचे एकमेव पद[८] आहे कृष्णाच्या वेणूच्या प्रभावाविषयी. भूमिका गोपीची आहे आणि सय्यद महंमद तन्मयतेने गात आहे--

तुझ्या वेणुवाच्या नादें ।
मी भुललें रे कान्हा ।।
सारी रात्र वैरियाची ।
आजि सगुणनिधाना ।।

जैं त्वां वेणुवाचा नाद ।
माझें मीपण विसरलें ॥
डेरा जैं फेडिलास ।
सेजारिणीनें देखिलें ॥
चित्र ठाईंच चंचळ ।
मन गोविंदीं गुंतलें ॥
सातशें गौळण्यांच्या ।
मध्यें तूंचि येक ब्ररी ॥
त्यास्तव दान मागों आलों ।
आपण नंदाचा हरी ॥
पाण्या मी येत होतें ।
सखये गे साजणी ॥
याचें काय सांगूं सखये ।
मज मोठा मोठा म्हणुनी ॥
मावेचा कान्हया ।
आपण झालासे दानी ॥
विनवी सय्यद महंमद ।
अखंड कृष्णचरणीं ॥

शेख महंमद श्रीगोंदेकर हाही 'सय्यद महंमद' म्हणून ओळखला जातो. म्हणून हे गीत शेख महंमदाचे तर नसेल ना ?

**शेख सलीमहंमद**

शेख सलीमहंमद नामक एका कवीचा एक कूटात्मक अभंग[१] उपलब्ध आहे. तो म्हणतो--

आम्ही जातीचे ब्राह्मण । आमचे सोयरे मुसलमान ॥
स्नानसंध्या बोळविली । महारासी सोयरिक केली ॥
शेख सलीमहंमद भला । सुन टाकुनि सासुसी गेला ॥
तिच्या पोटीं कन्या जाली । ते फिरून बाईल केली ॥

अशा प्रकाराची कूटात्मक रचना मराठी संतसाहित्यात ज्ञानदेवांपासून तुकारामापर्यंत अनेक संतांनी केलेली आढळते.

**रामभक्त लतीफशाह**

रामभक्तीची नौबत वाजविणाऱ्या या भक्तिवेड्या साधूची भक्तिविजयगाथा महीपतिबुवांनी आपल्या भक्तविजयात गायली आहे. महीपतिबुवांना त्याच्या चरित्राचा कसलाच तपशील उपलब्ध झालेला नसला, तरी त्याच्या भक्तिसंपन्न चारित्र्याचा सुगंध मात्र त्यांच्यापर्यंत येऊन पोचला होता आणि तो त्यांनी आपल्या भावमोळ्या शब्दांच्या कुपिकेत साठवून ठेवला आहे.

लतीफशाह मुसलमान । परमभाविक वैष्णव जन ।
गीताभागवत करी श्रवण । श्रीरामभजन अहर्निशीं ॥
सांडोनि आपुला यवनधर्म । कीर्तनीं लाविलें अद्‌भुत प्रेम ।
अर्चन पूजा नित्य नेम । करीत निःसीम आवडी ॥

(भ. वि. ५५. १७८–१७९)

अशा प्रकारे यवनधर्म सोडून अहर्निश रामभजनात धुंद असणाऱ्या आणि गीताभागवताच्या श्रवणात रंगून जाणाऱ्या या वैष्णवाचा त्याच्या धर्मांध बांधवांनी छळ न केला, तरच नवल! त्यांनी यवन राजाकडे तक्रार केली की, 'लतीफशाह आपला धर्माचार सोडून हिंदूंच्या देवाची भक्ति करीत आहे.' हे ऐकताच राजाने तत्काळ दूतांना आज्ञा केली की, 'तुम्ही ताबडतोब जाऊन लतीफशाहाचा आश्रम उद्‌ध्वस्त करून टाका!' राजाज्ञेनुसार त्याचे दूत लतीफशाहाकडे आले, परंतु आश्चर्य असे की, या परमभागवताचे दर्शन घडताच त्यांना विपरीत राजाज्ञेचा विसर पडला आणि ते सारे जण लतीफशाहाचे अनुयायी बनले.

अनुताप जाहला त्यांचे चित्ता । म्हणती राजसेवा न करावी आता ।
श्रवण करीत भगवद्‌गीता । येथेच निरंतर असावें ॥

(भ. वि. ५५.१८३)

आपण पाठविलेल्या दूतांपैकी अजून कोणीच परत येत नाही, हे पाहून बादशहा स्वतः लतीफशाहाचा छळ करण्यास निघाला. तो लतीफशाहाच्या आश्रमात येऊन पाहतो तो त्याला वेगळेच दृश्य दिसले. तिथे सर्वत्र स्वच्छता

आणि प्रसन्नता नांदत होती. घराचे आंगण गोमयाने सारवलेले होते. घराभोवती सुगंधी पुष्पांचा परिमळ दरवळलेला होता. अंगणात तुळसीवृंदावन विराजत होते. घराच्या भिंती चुन्याने सारवलेल्या होत्या आणि त्यावर दशावतारांची चित्रे नानाविध रंगांनी रंगविलेली होती. वृंदावनावर राधा-कृष्णाचे चित्र काढलेले होते. त्या चित्रात राधा कृष्णाला विडा देत आहे, असे दृश्य चितारलेले होते. लतीफशाह जवळच भागवत वाचीत बसला होता आणि बादशहाने पाठविलेल्या त्या दूतांसह अनेक श्रोते तन्मयतेने श्रवण करीत होते.

हे दृश्य पाहून बादशहा क्रोधायमान झाला आणि त्याने लतीफशाहाची परीक्षा घेण्याचा प्रयत्न केला; परंतु लतीफशाहाच्या भक्तिसामर्थ्यातून एक अद्‌भुत चमत्कार घडून येताच बादशहाही या रामभक्तापुढे विनीत झाला, अशी कथा महीपतिबुवांनी आपल्या नेहमीच्या शैलीत दिलेली आहे.

वृंदावनावरील राधाकृष्णाचे चित्र पाहून बादशहाने लतीफशाहाला विचारले–

" अरे, या राधेच्या हाती काय आहे ? "

" ती कृष्णाला विडा देत आहे. " लतीफने श्रद्धायुक्त मनाने उत्तर दिले.

" तर मग तुझा तो कृष्ण तो विडा का खात नाही ? "

बादशहाने असा प्रश्न विचारताच लतीफ वृंदावनाजवळ जाऊन कृष्णाला विनंती करू लागला की, ' प्रभो ! राधिका विडा हाती घेऊन प्रेमाने आपल्याजवळ उभी आहे– आपण तिचा विडा कृपा करून स्वीकारावा. '

आपल्या भक्ताचा प्रेमभाव पाहून प्रभूने मायालाघव केले आणि ते पाहून बादशहाला अनुताप झाला.

कृष्णाचे चित्र होते लिहिले । त्याने तत्काळ मुख पसरिलें ।
राधिकेनें विडा ते वेळे । मुखीं घातला त्वलाही ॥
तेथें साक्ष ठेविली कोणती । विडा होता राधिकेचे हातीं ।
तो हिरवा रंग अवचितीं । पुसोन गेला तेधवा ॥

( भ. वि. ५५·१९९-२०० )

महीपतिबुवांनी दिलेली ही चमत्कारकथा खरी असो–नसो; परंतु तिच्यातून लोकस्मृतीने श्रद्धेने जतन केलेला लतीफशाहाच्या भक्तीचा सुगंध दरवळत आहे, यात संशय नाही.

सिद्धचैतन्य आणि रंगनाथस्वामी निगडीकर यांनी रचलेल्या ‘ संतमालिकां ’त लतीफशाहाचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. कविवर मोरोपंतांनी तर आपल्या ‘ सन्मणिमाले ’ त लतीफाचा मुक्तकंठाने गौरव गायिला आहे. ते म्हणतात :

ख्यात, तुकारामस्तुत, साधुसभाप्राणवल्लभ, लतीबा ।
हृदया ! स्मर त्यासि असो श्रीभगवद्भक्त जाति भलती बा ॥
(सन्मणिमाला, ९७)

मोरोपंतांनी त्याला ‘ साधुसभाप्राणवल्लभ ’ म्हटले आहे, आणि तो ‘ भलत्या जाती ’चा असला तरी भगवद्भक्त असल्यामुळे त्याचे स्मरण करण्यासाठी त्यांनी आपल्या हृदयाला आवाहन केले आहे.

पंतांनी वरील आर्येत लतीफाला ‘ तुकारामस्तुत ’ म्हटले आहे. तुकाराम आणि रंगनाथस्वामी निगडीकर यांच्या स्तुतीला पात्र झालेला हा भक्त अर्थातच सतराव्या शतकापूर्वी होऊन गेला असावा. स्वतः त्याने एका हिंदी पदात कबीर आणि मीराबाई यांचा उल्लेख केला आहे. यावरून असे निश्चयपूर्वक अनुमान करता येते की, कबीर-मीराबाईनंतर आणि तुकाराम-रंगनाथस्वामींपूर्वी म्हणजे इ. स. चे सोळावे शतक हा लतीफशाहाचा काळ ठरतो.

लतीफाने आपल्या भक्तीने रंगलेल्या हृदयाचा आविष्कार ज्या गीतांतून केला असेल, ती आज उपलब्ध नाहीत. धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात त्याची तीन हिंदी आणि एक मराठी अशी अवघी चारच पदे उपलब्ध आहेत.[३०] परंतु या मोजक्या पदांतूनहि त्याच्या भक्तीची प्रगाढता आणि पारमार्थिक उच्चता स्पष्टपणे दिसून येते. एका हिंदी पदात त्याने रामनामाची नौबत वाजविणाऱ्या भक्तवरांचा गौरव करून आपणहि त्यांच्या कार्यात अल्पस्वल्प वाटा उचलल्याचे विनयाने म्हटले आहे—

रामराम नौबत बजाई ॥
पहिली नौबत नारद तुंबर ।
दुसरी नामा-कबीर सुनाई ॥ १ ॥
तिसरी नौबत सुदामाकी ।
प्रल्हादकी जीने राखी बडाई ॥ २ ॥

चौथी नौबत जनजसवंताकी ।
धना जाट और मीराबाई ॥ ३ ॥
कहत लतीपा सुन मेरे भाई ।
उनमों मैं कछु तनिक बजाई ॥ ४ ॥

लतीफाला रामनामाइतकाच रामभक्तांचा संग प्रिय आहे. ज्यांनी विकल्प-विकारांवर मात केली आहे आणि जे आपण तरून इतरांना तारतात, अशा हरीच्या उपासकांना लतीफ खास मराठी पद्धतीने 'रामराम' करीत आहे—

रामनाम तिनकु, हमारी रामराम तिनकु ॥
जे नर प्राणी हरिके उपासक ।
आप तरे, तारे औरनकु ॥ १ ॥
आशा मनसा पंचही प्राण ।
छोड चले उनकु ॥ २ ॥
कहे लतीप मैं पूजूं उनकु ।
सुमरत मुरलीधरकु ॥ ३ ॥

संतांच्या संगतीत परमसुखाचे रहस्य अनुभवल्यामुळे लतीफाला, वाट चुकलेल्या बहुसंख्य जीवांची कीव वाटते आहे. सदैव भ्रांतीने वेढलेल्या आणि दंभाने आत्मवंचना करणाऱ्या जगाविषयी लतीफ म्हणतो—

भूला जग आंधा, बाबू भूला जग आंधा ॥
ऊपर न्हावे अंदर मैला ।
जावे वारानसी-गंगा ॥ १ ॥
झूटेके अंदर साधुकी निंदा ।
बडा गुन्हेगार बंदा ॥ २ ॥
कहे लतीब मैं फकरी चंदा ।
लगा दुनीकु धंदा ॥ ३ ॥

लतीफाची मराठी रचना एकमेव उपलब्ध आहे, परंतु तिच्यात त्याने आपला परमानुभव साठवून ठेवला आहे. सर्व स्थिरचरांत 'अवघाचि गोविंद' भरून राहिला आहे, अशी दिव्य अनुभूती प्राप्त झाल्यानंतर पूज्यपूजकभाव लुप्त

होतो आणि पूजा करू जाता, ती कोणी, कोणाची आणि कोणत्या पूजाद्रव्यांनी करावयाची, याविषयी एक दिव्य कोडे निर्माण होते—हा भाव लतीफाने मराठी अभंगांत व्यक्त केला आहे. त्याची ही 'परापूजा' हृदयाच्या डोळ्यांनीच पहायला हवी—

आतां पूजा कोठें वाहूं । पाहतां देहींच जाला देवु ॥ ध्रु० ॥
भावें पूजन करितां । देहीं देव जाला तत्त्वतां ॥ १ ॥
तोडूं गेलों तुळसीपान । तेथें अवघा मधुसूदन ॥ २ ॥
अत्र गंध पुष्प धूप । अवघें विठ्ठलस्वरूप ॥ ३ ॥
फळ तांबूळ नैवेद्य । पाहतां अवघाचि गोविंद ॥ ४ ॥
म्हणे लतीफ ब्रह्मज्ञानीं । अवघा पाहतां चक्रपाणी ॥ ५ ॥

असा हा लतीफशाह परमानुभवाचा अधिकारी असल्यामुळे त्याची रामभक्ति कोणत्याही सांप्रदायिक मर्यादेने बंदिस्त राहिलेली नाही. राम, कृष्ण, विठ्ठल ही सर्व त्या एकाच परमतत्त्वाची नावे आहेत, याचे यथार्थ भान त्याला आहे. उदार आणि उदात्त मराठी भक्तिधारेशी तो समरस होऊन गेलेला आहे. त्याचे चरित्र अभावानेच हाती यावे आणि एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीहि त्याची रचना मिळू नये, याचा विषाद वाटल्यावाचून राहत नाही.

लतीफशाहाची समाधि मंगळवेढे येथे भुईगल्लींत (वार्ड नं. ३) आहे.[११] त्याची परीक्षा पाहणारा यवन बादशहा म्हणजे औरंगजेब होय, अशी पारंपरिक माहिती मंगळवेढ्यात रूढ आहे. औरंगजेबाने लतीफशाहास दिलेले इनाम आजही त्याच्या समाधीचे सेवक उपभोगतात. परंतु खेदाची गोष्ट अशी की, आज त्याच्या मुस्लिम उपासकांनी त्याच्या वैष्णवत्वाची खूण यत्किंचितहि उरू दिलेली नाही; आणि राम-कृष्णांच्या भक्तीत रंगलेल्या या भक्तोत्तमाला हिंदूही विसरून गेले आहेत.

— अशा किती जणांची नोंद करायची? 'दुनिया रंगी, दुनिया छंगी, दुनिया है दो रंगी,' असे म्हणून दुनियेच्या बहुरंगीपणाची जाणीव देणारा सयदुलाल,[१२] 'प्यारा जागो रे, प्यारा जागो रे!' असे म्हणून जागल्याच्या भूमिकेने अज्ञानांध जनांना जागवणारा बंदा फकीर,[१३] माणसांच्या जगाचा त्याग करून

व अंगाला राख फासून वनात जाणाऱ्यांना 'सोही कच्चा रे' असे विरुद बहाल करणारा बुऱ्हानशहा[१४] आणि आणखी किती तरी! यांपैकी कुणालाच विसरता येणार नाही. हे सर्वच जण मानवाच्या अंतर्हित सत्तत्त्वाची ग्वाही देत आहेत. त्यांच्या स्मृतीला नम्र अभिवादन !

# संदर्भ टीपा

१. 'श्रीकेशवस्वामींची कविता' : संपादक–नरहर सदाशिव जोशी, खरशीकरशास्त्री. पदांक २०७, पृ. ६२.

२. हे बाड हैद्राबादचे बॅ. श्रीधर वामन नाईक यांच्या संग्रहात असल्याचे श्री. खरशीकरशास्त्रींनी लिहून ठेवले आहे.

३. 'श्रीकेशवस्वामींची कविता' या पुस्तकात शहावेगचे एक पद 'संपादकाच्या हृद्गता' च्या प्रारंभी असून, आणखी एक पद पृ. २७२ वर आहे.

४. 'श्रीकेशवस्वामींची कविता', पदांक ६११, पृ. १९०.

५. हे पद मला माझे मित्र श्री. म. वि. निखळ, पुणे, यांच्या संग्रहातील बाडात मिळाले.

६. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, बाडांक १६३७.

७. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. मराठी पद– बाडांक ४ ( हे भा. इ. सं. मंडळ, पुणे, याच्या पोथीशाळेत मुजुमदार संग्रहातील एका बाडात आहे.) हिंदी पदे–बाडांक ६८१, ७७८, ७९३, ११७४, १५०६, १५११, १६१४, १६३९, १९६६.

८. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. बाडांक १२१८.

९. मराठी संशोधन-पत्रिका, वर्ष १०, अंक ३, पृ. ३०.

१०. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. मराठी पद–बाडांक १०,६२,१३५,१६६.

११. 'श्रीसंत दामाजीपंतांचे मंगळवेढे' : रा. ग. करंदीकर. पृ. ३६.

१२. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. बाडांक ५११.

१३. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. बाडांक ५९७.

१४. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे. बाडांक १४४९.

# अविंध आणि गोविंद

**अविंध आणि गोविंद**

केतकीला बाहेरून काटे असले, तरी तिच्या आत सुगंधाची खाण असते; फणसाअंगी बाहेरून काटेरीपण असले, तरी त्याच्या अंतरंगात अमृताचे साठे असतात; नारळ वरून कठीण असला, तरी त्याच्या हृदयात शीतल जीवन हेलावत असते; तद्वतच, शेख महंमदाने म्हटले आहे की, मी अविंध असलो, तरी माझ्या हृदयात गोविंद नांदत आहे—

शेख महंमद अविंध। त्याचे हृदयीं गोविंद ॥

शेख महंमदाने अविंध आणि गोविंद यांचा संबंध काहीशा नवलाईच्या भाषेत व्यक्त केला आहे. या संबंधाविषयी त्याचे त्यालाच एक प्रकारे आश्चर्य

वाटत आहे आणि जनसामान्यांना हा संबंध पटावा, खरा वाटावा, म्हणूनच त्याने तळमळीने ही ग्वाही दिली आहे.

अविंधातील ही ‘ जिव्हाळ्याची जाती ’ मी अगदी लहानपणीच अनुभवली आहे. उस्मानभाई नावाचा एक मुसलमान माझ्या आजोळच्या गावी राहत असे. तो काझी असला, तरी गावकीचे अडू नये म्हणून मुलाण्याचे काम करायचा; परंतु त्यात त्याला विशेष रस नव्हता. महीपतिबुवांनी आपल्या प्रासादिक वाणीने गायिलेल्या भक्तकथा ऐकाव्या; त्या मनी-मुखी घोळवाव्या ; जमेल तेव्हा त्या इतरांना ऐकवाव्या ; त्यांतील शाश्वत मूल्यांशी सुसंवादी ठरेल असे वागावे आणि रात्री मंदिरात रंगणाऱ्या भजनरंगात रंगून जावे, हे त्याच्या आवडीचे विषय. हिंदू सणाउत्सवांत त्याचा उत्साह उतास यायचा. त्याचे मुसलमानपण हिंदूंच्या जातिविशिष्ट वा व्यक्तिविशिष्ट आचारधर्माप्रमाणे उंबरठ्याच्या आतच मर्यादित झाले होते. त्याच्या पोषाखात, वर्तनात आणि वाणीत कसलाही वेगळेपणा नव्हता. हिंदू-मुसलमान संबंधाविषयीही तो बोलायचा— पण तेही संतांच्याच आधाराने, मानवधर्मावर भर देऊन. भजनरंग उसळला की त्याची प्रतिभा जागी व्हायची आणि मग तो सहजपणे अभंग रचायचा— तुकोबांच्या नाममुद्रेने. हा अभंग मी रचला आहे, अशी नोंदही त्याला नको असायची.

जुनी आठवण म्हणून भूतकाळी उल्लेख केला आहे इतकेच. उस्मानभाई आज विद्यमान आहे. त्याला मी लहानपणी उस्मानमामा म्हणून संबोधीत असे. आजच्या बदलत्या काळात त्याचे ते निरागस सत्त्वसंपन्न मन कितपत टिकाव धरून आहे, ते मला निश्चित माहीत नाही. गेल्या वीस वर्षांत तो मला तीन-चारदा भेटलाही. त्या प्रत्येक भेटींत शेख महंमदाच्याच भाषेत त्याने आपले समाजसापेक्ष मन माझ्यापुढे उघडे केले होते.

या उस्मानभाईचे वृद्ध चुलते पुण्यात राहतात— माझ्या निवासापासून जवळच. त्यांच्याजवळ काही कागदपत्रे आणि एक ताम्रपट असल्याचे उस्मान-भाईकडूनच मला कळले होते. त्या सामग्रीच्या मोहाने मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी माझे जिव्हाळ्याने स्वागत केले. पहिल्याच भेटीत त्यांनी आपली हृदय-व्यथा अगदी मोकळेपणाने व्यक्त केली. ते म्हणाले—

“ हे पहा ढेरे, माझा सारा जन्म तुम्हा लोकांच्यात गेला. आमच्या

घराण्याचं वागणं-बोलणं सुधारलं ते या चांगल्या वातावरणामुळे– तुमच्याशी मिळून-मिसळून राहिल्यामुळे. पण आज आमचं जग बदलू लागलं आहे. पुण्यात रहायला आलो पोटापाण्याच्या सोयीसाठी. मुलाला इथलं वळण लागलं. इथं राहून तो पाकिस्तानच्या गोष्टी करू लागला. त्यानं आपल्या पोरांना हट्टानं उर्दू शाळेत घातलं. काय संबंध आमचा उर्दूशी? नुसतं उर्दू शिकून आम्हांला काय पाकिस्तानात जायचंय् का इथं पाकिस्तान आणायचंय्? माझा जीव तिळतिळ तुटू लागला. एक दिवस मी सरळ मुलाला सांगितलं की, 'तुला काय करायचं ते कर, पण या कोवळ्या पोरांचं मी नुकसान होऊ देणार नाही!' आमच्या जुन्या वर्गातल्या एका मास्तरांना मी भेटलो अन् त्यांच्या ओळखीनं नातवंडांना मराठी प्राथमिक शाळेत घातलं. मुलं मराठी शिकू लागली, तेव्हाच मला बरं वाटलं."

— उस्मानभाईने आणि त्याच्या वृद्ध चुलत्याने मला मुसलमान मराठी संतकवींच्या मानसिक घडणीचे रहस्य प्रत्ययास आणले.

### एकात्मतेचा पूर्वरंग

अविंध आणि गोविंद यांचे नाते जडण्याचा इतिहास चौदाव्या शतकाइतका जुना आहे. तसा महाराष्ट्रातल्या इस्लामचा परिचय झाला तो इस्लामच्या प्रारंभकाळातच. अरब व्यापारी इस्लामच्या जन्मापूर्वीपासूनच महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारानिमित्त उतरत असत. राष्ट्रकूटांच्या राज्यकाळात एखाद-दुसऱ्या अरबाला शासनातही अधिकार मिळाल्याचे उदाहरण इतिहासाला ज्ञात आहे.[१] अरबांनी इस्लामचा स्वीकार केल्यानंतरही पूर्वीचा व्यापारिक संबंध चालू राहिला. त्यांना हव्या त्या सवलती हिंदू राज्यकर्त्यांनी दिल्या. त्यांची धर्ममंदिरेही इथे सुखेनैव उभी राहिली आणि इथल्या कनिष्ठ जाती-जमातींतील स्त्रियांशी त्यांची लग्ने होऊन त्यांची संख्यावृद्धी होऊ लागली. हिंदू समाजापासून ते अलिप्त होते; परंतु तसा काही संघर्षही नव्हता.

उत्तरेत आठव्या शतकापासून इस्लामचे विध्वंसनकारी राजकीय आक्रमण सुरू झाले होते. महंमद कासम आणि महंमद गझनी यांच्या स्वाऱ्यांनी सिंध-गुजराथमध्ये प्रलयंकार थैमान मांडले. परंतु महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत इस्लामच्या राजकीय आक्रमणाचा अनुभव आला नाही.

पश्चिम किनाऱ्यावर स्थायिक झालेले नवायत मुसलमान, काही अरब प्रवासी आणि काही धर्मप्रचारक यांचा संबंध मात्र सातव्या-आठव्या शतकापासूनच आलेला होता. यांपैकी धर्मप्रचारकांचे मार्ग सरळ नव्हते. हे प्रचारक विचारांनी जरी हिंदू वेदान्ताशी साधर्म्य राखणाऱ्या सूफी संप्रदायाचे अनुयायी होते, तरी ते विचार त्यांतील फारच थोड्यांच्या जीवनांत मुरलेले असल्यामुळे ते अन्य मुसलमानांच्याप्रमाणेच कडवेपणा बाळगून होते.

डोणगाव (ता. अंबड, जि. औरंगाबाद) येथे समाधिस्थ झालेला नुरुद्दीन हा महाराष्ट्रात आलेला पहिला ज्ञात सूफी प्रचारक होय. हा इजिप्तहून येथे आला; प्रथम राक्षसभुवन येथे स्थिरावला; परंतु तेथील लोकांच्या विरोधामुळे तो राक्षसभुवन सोडून डोणगावी गेला आणि तिथेच समाधिस्थ झाला. नुरुद्दीन-नंतर आणि अल्लाउद्दिनाच्या स्वारीपूर्वी दक्षिणेत सूफी प्रचारकांचा संचार बराच असावा, असे मानायला आधार आहे. श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी 'सूफी संप्रदाय' या पुस्तकात नुरुद्दीनप्रमाणेच मोमीन आरिफ (दौलताबाद), जलालुद्दीन गंज रवां (खुल्ताबाद), बाबा शर्फुद्दीन (हैद्राबाद), बाबा शम्सुद्दीन (हैद्राबाद), हयात कलंदर (मंगरूळपीर-विदर्भ), हिसामुद्दीन (गुलबर्गा), शेख शहीद (तालिकोट), शेख सरमस्त (सगर-शहापूर), शहादुला रहमान (एलिचपूर), इत्यादी प्रचारकांची नामावळी नोंदविली आहे.[२] यांपैकी बरेच जण यादवांच्या शासनकाळात आणि शासनकक्षेत धर्मप्रसाराचे कार्य करीत होते, हे विशेष होय.

पुढे इ. स. १२८४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर आक्रमण केले आणि अल्पावधीतच देवगिरीच्या वैभवशाली राज्याचा विनाश घडवून आणला. धार्मिक क्षेत्रातील निःसत्त्व कर्मकांडाने व सामाजिक विषमतेने पुरुषार्थहीन बनलेली प्रजा आणि राजकीय परिस्थितीचे व कर्तव्यांचे भान नसलेले करंटे राज्यकर्ते इस्लामच्या झंझावाती आक्रमणापुढे सर्वस्वी निष्प्रभ ठरले. आंतरिक तेजस्वितेच्या अभावामुळे सर्व बाह्य वैभव मातीत मिळाले.

या राजकीय आक्रमणाच्या हातात हात घालूनच सूफींचे धार्मिक आक्रमण मोठ्या प्रमाणात घडून आले. दिल्लीत स्थिर झालेल्या निजामोद्दीन अवलिया नामक सूफी प्रचारकाने इ. स. १३०० मध्ये शेख मुंतजबोद्दीन ऊर्फ जर्जरीबक्ष

याला आणि तो इ. स. १३०९ मध्ये मृत्यू पावल्यानंतर त्याचा भाऊ बुऱ्हाणोद्दीन गरीबशहा याला प्रत्येकी सातशे सहकारी प्रचारकांसह दक्षिणेत पाठविले. चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात या चौदाशे सूफी प्रचारकांनी देवगिरीच्य परिसरात आपले प्रधान केंद्र ठेवून सारा महाराष्ट्र व्यापला आणि इस्लामच्या बलात्कारी विस्ताराची मोहीम उघडली. मुस्लिम राज्यकर्त्यांप्रमाणेच यांनी मठमंदिरांचा विध्वंस केला, सक्तीने धर्मांतर घडविले आणि सिद्धींच्या प्रदर्शनाने हजारो हिंदूंना नादी लावले.

### कित्येक दावलमलकास जाती

सूफींचा लोकजीवनावर किती प्रभाव पडला होता, याचे स्पष्ट प्रत्यंतर दावल मलिकाच्या उपासनेच्या इतिहासात सापडते. शाह दावल मलिक[3] हा गुजराथ-काठेवाड भागातील सूफी प्रचारक. अबू मसऊद हे त्याचे मूळ नाव होय. याला 'दावल्मुल्क' (देशप्रभु) अशी पदवी असल्यामुळेच हा लोकांत 'दावल मलिक' या अपभ्रष्ट नावाने ओळखला जात असे. हजरत शाह आलम नामक अवलिया त्याचा गुरू होता.

याला रोगनिवारण करण्याची सिद्धी लाभली होती, असे म्हणतात. यासंबंधी एक कथा प्रचलित आहे, ती अशी : हा अत्यंत गुरुभक्त होता. गुरूच्या हयातीच्या अखेरपर्यंत त्याने निष्ठेने गुरुसेवा केली. एकदा नमाजापूर्वी तो आपल्या गुरूला 'वजू' करवीत होता (गुरूच्या हातापायांवर पाणी घालीत होता). इतक्यात एक रोगी तिथे आला आणि हजरत शाह आलमला विनंती करू लागला की, " माझ्या रोगाचे निवारण व्हावे म्हणून आपण अल्लाची प्रार्थना करून मला आशीर्वाद द्या. " शाह आलमने आपले 'वजू' संपल्यानंतर उरलेले पाणी त्या रोग्याच्या अंगावर शिंपडले आणि त्याचा रोग तत्काळ नाहीसा केला. तो माणूस आनंदाने निघून गेल्यानंतर शाह आलम अबू मसऊद ऊर्फ शाह दावल मलिक याला म्हणाला की, " ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांच्याकडेही असेच अनेक रोगी येत असत ; परंतु ते अशा आधिव्याधिग्रस्त लोकांना हजरत सय्यद सालार मसऊद गाजी यांच्याकडे सोपवून मोकळे होत. आता मलाही या लोकांची अशीच काही व्यवस्था करायला हवी. "

गुरूचे हे बोलणे ऐकून सर्व शिष्य अपेक्षेने गुरूकडे पाहू लागले. एवढ्यात दावल मलिकाकडे वळून शाह आलमने म्हटले की, "हा अधिकार मी तुला देत आहे; परंतु त्यासाठी तुला अखेर बलिदानालाही सिद्ध रहावे लागेल!" या क्षणानंतर लोकांच्या व्याधी दूर करण्याची सिद्धी शाह दावल मलिकाला प्राप्त झाली.

ही सिद्धी प्राप्त झाल्यानंतर दावल मलिकाने आपल्या धर्माच्या प्रचारासाठी साऱ्या दक्षिणेत भ्रमण केले. सिद्धिसामर्थ्याच्या बळावर त्याने हजारो हिंदूंना आपल्या भजनी लावले. महाराष्ट्रात त्याच्या प्रभावाच्या खुणा सर्वत्र आढळतात.

दावल मलिकाची अखेर त्याच्या गुरूच्या म्हणण्याप्रमाणेच घडली. महंमद बेगड्याच्या शासनकालात तो कामरूनचा ठाणेदार म्हणून काम करीत होता. त्या जागेवर काम करीत असताना गिरासिया जमातीतील एका व्यक्तीने हिजरी सन ८८९ (इ. स. १४८४) मध्ये काही खाजगी कारणावरून त्याला ठार मारले.

इ. स. चे पंधरावे शतक हा दावल मलिकाचा जीवनकाल होय. या शतकात त्याने मराठी लोकजीवनावर एवढा प्रभाव गाजवला की, त्याच्या मृत्यूनंतर लोकांनी जागोजाग त्याच्या नावाची स्मृतिचिन्हे (चिल्ले) उभारली. दक्षिणेत दावल मलिकाच्या नावाचे ३६० चिल्ले आहेत, असे म्हणतात.

मराठवाड्यात औरंगाबादेच्या तटाजवळ, तसेच वेरूळ, बाभुळगाव, पिंपळवाडी या ठिकाणी असे चिल्ले आहेत. वेरूळचा चिल्ला विशेष प्रसिद्ध आहे. तेथे त्याच्याबरोबर त्याच्या आईचाही चिल्ला ('माँसाहिब का चिल्ला') आहे. विशेष म्हणजे मराठी भक्तिपरंपरेचे एक महान केंद्र असलेल्या पैठणच्या परिसरातही असे चिल्ले आहेत. पैठणचे संत एकनाथ दावल मलिकाच्या काळाला जवळचे. आपल्या जन्म-कर्म-भूमीच्या परिसरातील हजारो हिंदू या दावल मलिकाच्या उपासनेत गढले आहेत, ही वस्तुस्थिती नाथांना खटकली होती. त्यांनी एका 'जोहारा'त आपल्या असंतोषाला वाचा फोडली आहे—

दावल मलिकाची पूजिती गदा।
वर्षांतून फकिर होतां एकदां॥

मग डोला होतां थंडा, खाती मलिदा ।
हिंदू तुर्कांचें खरकटें कीं ।।४

वर्षातून एकदा फकीर बनून दावल मलिकाच्या नावाने भिक्षा मागणे आणि दावल मलिकाच्या स्मृतिस्थानी पौरोहित्य करणाऱ्या मुजावराने दिलेला अन्न-प्रसाद भक्षण करणे नाथांना नापसंत होते. नाथांनी निषेधिलेली ही दावल मलिकाची उपासना अजूनही विदर्भ-मराठवाड्यात काही प्रमाणात चालूच आहे.

मराठवाड्यात दावल मलिकाची प्रसिद्धी प्रामुख्याने नेत्ररोग-निवारणाच्या बाबतीत आहे. डोळयांचा किंवा अन्य काही शारीरिक त्रास होऊ लागला की, भाविक लोक दावल मलिकाचे बोलावणे आले आहे असे समजून यात्रेच्या तयारीला लागतात. ज्याला रोग झाला असेल असा मनुष्य हाती निळया कापडाची झोळी आणि एक फावडे घेतो आणि बऱ्याच मोठ्या परिवारासह यात्रेला निघतो. वाटेत जिथे जिथे वस्ती भेटेल तिथे तिथे तो 'दोम दोम दावल मलिक' असा घोष करीत भिक्षा मागतो. या भिक्षेतून मिळणाऱ्या धान्यावरच निर्वाह करायचा असतो आणि उरलेल्या धान्याचा शेवटी भंडारा करायचा असतो. इष्ट स्थळी पोचल्यावर झोळी आणि फावडे एका तिकाटण्यावर ठेवतात; मुजावरला दक्षिणा देतात; त्याच्याकरवी दावल मलिकाच्या स्मृतिस्थानाची पूजा करतात आणि भिक्षा मागून आणलेल्या धान्याचा भंडारा घालतात. एवढे झाल्यावरही यात्रिकांना परत फिरता येत नाही. दावल मलिकाने रोग बरा करण्याचे आश्वासन देऊन परत फिरण्याचा स्वप्नादेश दिल्याशिवाय परत फिरायचे नाही, असा संकेत आहे. हा स्वप्नादेश मिळेपर्यंत यात्रिकांना जेवढा काळ काढावा लागेल, तेवढ्या काळात त्यांची दावलभक्ती दृढ करण्यासाठी मुजावर त्यांना दावल मलिकाच्या नाना चमत्कारकथा ऐकवीत असतो.

मराठवाड्याप्रमाणेच विदर्भातही उपराई (ता. एलिचपूर, जि. अमरावती), गिरड (ता. हिंगणघाट, जि. वर्धा), इत्यादी ठिकाणी दावल मलिकाचे चिल्ले आहेत. तिकडचे लोक माणसांच्या आजाराप्रमाणेच गुरांच्या आजारांच्या निवारणासाठीही दावल मलिकाला नवस करून त्याची यात्रा पार पाडतात. असल्या अडचणीच्या प्रसंगी दावल मलिकाच्या कृपेचा आश्रय घेण्याचे ठरले

की मुजावराकडून दीक्षेचा नाडा बांधून घेऊन दावल मलिकाची उपासना एक कायमचा कुळाचार म्हणून पत्करावी लागते. या उपासनेचे दोन प्रकार आहेत : एक 'बैठी कंदुरी' (आपल्या घरीच दावल मलिकाच्या नावाने भंडारा घालणे) आणि 'फिरती कंदुरी' (दावल मलिकाच्या स्थानापर्यंत समूहाने भिक्षा मागत जाऊन तिथे भंडारा घालणे). विदर्भात फिरत्या कंदुरीच्या वेळी सर्व जण भगव्या कापडाची झोळी, वाळलेल्या दुध्या भोपळ्याचे अर्धे शकल (याला 'पतर'–पात्र–असे म्हणतात), एक लहानशी काठी आणि लाकडी फावडे जवळ बाळगतात. ही उपासक मंडळी दावल मलिकाच्या स्थानाकडे जात असताना, वाटेतील गावांतून काही श्रद्धावान व्यक्ती त्यांना आपल्या शक्त्यनुसार भोजन घालतात. याला 'पतर पुजण्या'ची उपासना म्हणतात. नाथांनी 'दावल मलिकाची पूजिती गदा' असे याच प्रकाराला उद्देशून म्हटले आहे. गदा म्हणजे भिक्षा. पतर हे भिक्षापात्रच असते. विदर्भातील दावलभक्त अखेरची 'कंदुरी' दावल मलिकाच्या स्वप्नादेशानुसार कोंबड्या-बकऱ्याची करतात.

दावल मलिकाच्या उपासनेचा हा प्रकार धनगर, तिळोले, धनोजे कुणबी, तेली, भोई, महार, मांग या वर्गांत तर रूढ आहेच, परंतु कित्येक उच्चवर्गीय समजले जाणारे लोकही ही उपासना करतात. महाराष्ट्रात 'दावलभक्त' या आडनावाची ब्राह्मण घराणी आजही आहेत. मराठी लोकमानसावरील दावल मलिकाचा हा अद्भुत प्रभाव नाथांप्रमाणेच समर्थांनीही नोंदविला आहे—

> कित्येक दावल मलकास जाती । कित्येक पीरांस भजती ।
> कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेनें ॥[५]

**कित्येक पीरांस भजती**

दावल मलिकासारख्या अवलियांच्या सिद्धिप्रभावाने जसे अनेक हिंदू त्यांच्या नादी लागले होते. त्याचप्रमाणे अनेक पीरही हिंदूंच्या भक्तीचे विषय बनले होते. पीरांची भक्ती केवळ सामान्य जन करीत होते, असे नव्हे; तर त्यांत कित्येक मान्यवरांचाही समावेश होत होता. अहमदनगर येथील शहा शरीफ नामक पीराला मालोजीराजे भोसले आणि त्यांची पत्नी दीपाबाई यांनी पुत्र-

प्राप्तीसाठी नवस केला होता, हे सर्वज्ञात आहेच. मल्हार रामराव चिटणिसांनी शिवछत्रपतींच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात यासंबंधी लिहिले आहे की—

"आपणास संतती नाहीं म्हणोन संतानवृद्धी व्हावी यास्तव दीपाबाई यांणीं बहूत नवस मानसीं केले व देव-धर्म-अनुष्ठानें केलीं. यांत नगरचे पीर शाहा शरीफ बहूत चमत्कारिक आहेत त्यांस नवस केला : पुत्र जाले म्हणजे तुमचें नांव ठेऊं."[६]

तंजावरच्या बृहदीश्वरमंदिराच्या भिंतींवर जे 'भोसलवंशचरित्र' खोदलेले आहे, त्यात दिलेल्या हकीकतीनुसार[७] स्वतः मालोजीराजेच शहा शरीफाकडे गेले होते. त्या वेळी शहा शरीफ पीरवस्त झालेला नसून हयात होता. मालोजींने पुत्रप्राप्तीसाठी त्याची प्रार्थना केल्यावर त्याने काही वेळ ध्यान करून नंतर मालोजीला आशीर्वाद दिला की, "तुम्हांस दोघे पुत्र होताती. ते दोघे महशूर परमभाग्यवंतही होतील. ... त्या दोघा पुत्रांसही आमचे नांवे ठेवा." या वेळी शहा शरीफाने मालोजीला नागीण व पन्नीण या नावांच्या दोन तल्वारी, एक लंगोट, एक कलदरा आणि एक पंचा अशा पाच वस्तू प्रसाद म्हणून दिल्या.

शहा शरीफच्या कृपाप्रसादाने आपणास दोन पुत्रांचा लाभ झाला, म्हणूनच मालोजींने त्यांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली, हे शिवभारतकार परमानंदानेही नोंदवून ठेवले आहे. तो म्हणतो—

तौ शाहश्च शरीफश्च सिद्धनामाङ्किताबुभौ ।
ववृधाते श्रिया सार्धं कुमारौ कुलदीपकौ ॥ ( शिवभारत, १·९० )

[ सिद्धपुरुषाची नावे धारण करणारे असे ते कुलदीपक पुत्र शहाजी आणि शरीफजी वैभवासह वाढू लागले. ]

शहा शरीफचा दर्गा अहमदनगर किल्ल्याच्या शेजारी भिंगारच्या हद्दीत असून त्याला 'दायरे दर्गा' असे म्हणतात. या दर्ग्याला अजूनही उत्पन्न चालू असून, त्याची वहिवाट शेख पीरजादे यांच्याकडे आहे. ऊद-फूल, चिराग-रोषणाई, फकीर-फकडा व उरूस यांच्या खर्चासाठी कोनवसी व येकलहारे ही दोन गावे आणि काही रोख रक्कम लावून दिल्याबद्दलचे शाहू छत्रपतींच्या काळापासूनचे

अनेक कागद[८] उपलब्ध आहेत. त्यांपैकी एक महत्त्वपूर्ण सनद येथे उद्धृत करीत आहे—

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ विलंबी संवत्सरे मार्गशीर्ष बहुल द्वितीया भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वसानिधि राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान यासि आज्ञा केली ऐसी जे दरगाह हजरत शाह शरीफ मु॥ अहमदनगर यास इनाम मौजे कोनोसी पा॥ सेवगाऊ, मौजे येकलारे पा॥ संगमनेर हे दोन गाव इनाम दिल्हे आहेत. तरी तुम्ही बिलाकुसुर पीराकडे चालवणे. कोण्ही उपसर्ग देईल त्यास ताकीद करणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा. मर्यादेयं विराजते.

या सनदेवरून पीरांविषयीच्या सार्वत्रिक श्रद्धाभावाची आणि त्या श्रद्धाभावाची जपणूक करण्यात राज्यकर्त्यांनी दाखविलेल्या दक्षतेची कल्पना येईल. अशी स्थाने आजही महाराष्ट्राच्या सर्व भूभागांत– विशेषतः नगर विभाग, मराठवाडा व विदर्भ यांत– हिंदू यात्रिकांच्या वर्दळीने गाजती आहेत.

**संतसाहित्यातील प्रतिक्रिया**

या प्रलयंकर आक्रमणाने सर्व महाराष्ट्र दिङ्मूढ झाला. या आक्रमणाच्या प्रारंभकाळापासूनच सुरू झालेला मराठी भक्तिपरंपरेचा प्रवाह समाजाचे सत्त्व राखण्यात बऱ्याच प्रमाणात उपयुक्त ठरला. नाना भेदांनी बुजबुजलेल्या समाजाला एका सूत्रात बांधण्यासाठी संतांची विचारधारा प्रभावी ठरली आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या समाजाने दबलेल्या अवस्थेत का होईना धर्मनिष्ठा जिवंत ठेवली.

संतसाहित्यातील इस्लामविषयीची प्रतिक्रिया प्रथम कलियुगकल्पनेने[९] व्यक्त झालेली आहे. संत नामदेवाने म्हटले आहे की—

राजे भ्रष्ट यवन झाले। ठायीं ठायीं दोष घडले।
मग इहीं अवतार घेतले। कलिदोष हरावया ॥
नामा म्हणे पुढें हे जन। यवनसंसर्गें कठीण।
होतां, गाती हरिचे गुण। ते उद्धरती सर्वथा ॥

हरीचे गुण गात गात हा ' कठीण यवनसंसर्ग ' कोठपर्यंत सहन करायचा ? तर —

कलीचिये अंतीं होणार कलंकी ।
मारील म्लेंछ कीं घोड्यावरी ॥
फिरून धर्माची उभारील गुढी ।
कृतयुगप्रौढी करी तोचि ॥
तोंवरी साधन हरिनामकीर्ती ।
संतांची संगती, नामा म्हणे ॥

अगदी असेच विचार पुढे अनेक साधुसंतांनी मांडले आहेत. या काळात देवही आपल्या दुबळया भक्तांच्या शक्त्यनुसार आपले सत्त्व कसेबसे राखून होता. त्याला कधी सेना न्हाव्यासाठी सेन्याचे रूप घेऊन बादशहाची क्षौरसेवा करावी लागत होती, कधी विठू महार बनून दामाजीसाठी बादशहाला मुजरा करावा लागत होता, तर कधी दत्ताजी पाडेवार बनून दासोपंतांना सोडविण्यासाठी बादशहाच्या खजिन्यात दोन लाखांचा भरणा करावा लागत होता. शिवसमर्थांच्या उदयापूर्वीची स्थिती ही अशी होती. या काळी महाराष्ट्रात शौर्य होते, पण स्वाभिमान नव्हता; धर्मनिष्ठा होती, पण धर्मरक्षणाची जिद्द नव्हती; अन्यायाची चीड होती, पण न्यायप्रस्थापनेचा आत्मविश्वास नव्हता; दुःखाचे कारण समजत होते, पण दुःखनिवारणाचा मार्ग सापडत नव्हता — म्हणजेच पारतंत्र्याविषयी असंतोष होता, परंतु स्वातंत्र्याची आकांक्षाही अशक्य कोटीतील वाटत होती.

**बदलू लागलेले चित्र**

महाराष्ट्रात तघलक सुलतानांची सत्ता बुडून बहामनी राज्याची स्थापना झाल्यानंतर हिंदूंचे नष्टचर्य संपले नसले, तरी दक्षिणेतील मुसलमान राज्यकर्ते प्रादेशिक अभिमान बाळगू लागले होते. इराणी वा तुर्की मुसलमानांशी त्यांचे जमेनासे झाले. दक्षिणी मुसलमानांची सर्व शासनयंत्रणा हिंदूंच्या सहकाराने चालत होती. हिंदू सरदारांच्या आणि सैनिकांच्या आश्रयाने ते परकीय मुसलमानांशी झगडू लागले होते. त्यांच्या कारभारांत इथल्या भाषेला आणि लिपीलाही स्थान लाभले होते. हिंदू साधुसंतांचे

आशीर्वाद त्यांना सत्तास्थैर्यासाठी आवश्यक वाटत होते. याच आवश्यकते-पोटी ते अनेकदा हिंदू संतांच्या मठमंदिरांना इनामे व वर्षासनेही देत होते. एखादा बादशहा 'महाराष्ट्रधर्मा 'विषयी विशेष सहानुभूती बाळगून स्वकीय मुल्लामौलवींच्या रोषाची पर्वा न करता नरसिंह सरस्वतींसारख्या साधूंची पूजा करण्यात धन्यता मानीत होता. सूफी प्रचारकांतील जे थोडे साधुत्वाप्रत पोचले होते, ते हिंदू साधूंशी स्नेहसंबंध राखून पारमार्थिक अनुभवांची देवाण-घेवाण करीत होते. परंतु तरीही हे स्नेहाचे दुवे कच्चे होते. हिंदूंचे दौर्बल्य आणि मुसलमानांची कृपा यांतील तो स्नेह होता. त्याला चिरस्थायी आणि सच्चे स्वरूप यायला अजून अवकाश होता.

**शिव-समर्थांचा उदय**

शिव-समर्थांच्या उदयाने या चित्राचे रंग अगदी बदलून गेले. त्यांनी हिंदूंचे दौर्बल्य नष्ट केले; त्यांचा पुरुषार्थ जागा केला आणि जे मुसलमान या भूमीशी, या समाजाशी, या परंपरांशी जिव्हाळा साधू शकणार नाहीत, अशा आक्रमक व केवळ भोगशील प्रवृत्तीच्या मुसलमानांना धडा शिकविला. या प्रयत्नांशी विसं-वाद राखणाऱ्या मातबर हिंदूंचीही त्यांनी गय केली नाही. शिवप्रभूंनी अफजल-खान आणि शाइस्तेखान या यवनांना जसे वध्य मानले, तसेच चंद्रराव मोरे आणि बाजी घोरपडे या कुलवंत मराठ्यांनाही वध्य ठरविले. त्यांचा सर्व जीवनव्यापार व्यापक न्यायतत्त्वावर उभा राहिलेला होता. त्याचमुळे त्यांना बाजी-तानाजीइतकेच दौलतखान व मदारी मेहतर प्रिय वाटले; रामदास-तुकारामाइतकेच रत्नागिरीकडचे बाबा याकूब पूज्य वाटले. जे हृदयाने आमचे बनले, त्यांना आम्ही आमच्या हृदयात कायमचे स्थान दिले आणि जे भेद राखून राहिले, ते आमच्या द्वेषाला पात्र ठरले—हा शिवप्रभूंच्या एतद्विषयक भूमिकेचा गाभा आहे.

समर्थांचीही भूमिका अशीच होती. 'उदंड मातलेल्या' म्लेंछांचा संहार होताना पाहून त्यांना हर्षाचे भरते येत असे, हे खरे. परंतु म्लेंछ हे केवळ म्लेंछ आहेत, म्हणून त्यांनी त्यांचा द्वेष केला नाही. मसूरच्या रामनवमीच्या उत्सवात यवन अधिकाऱ्याला ठाकेठीक करणारे समर्थ शमना मीरसारख्या साधूविषयी जिव्हाळा बाळगीत आणि शेख महंमदाच्या साधुत्वाची आरती मुक्तकंठाने गात.

त्यांच्या परंपरेत मुसलमानांनाही स्थान होते. कल्याणस्वामींच्या शिष्यमंडळात एक वली महंमदही होता.[१०]

शिवप्रभूंच्या कार्यामुळे महाराष्ट्रात इंग्रजांची भेदनीती सुरू होईपर्यंत हिंदु-मुसलमान-संघर्ष संपलेला होता. इथला मुसलमान समाज आपल्या समाजव्यवस्थेचा एक घटक बनून गेलेला होता. ग्रामीण जीवनात तर त्याला एका बलुतेदाराचे ✓ स्थान लाभले होते. दुरावा संपला होता आणि एकात्मतेच्या भावाला नवनवे धुमारे फुटत होते. मुसलमान मराठी संतकवींची जीवने आणि कवने या एकात्मतेची ग्वाही देत आहेत.

## संगीतसाहित्यशिरोमणि खलजी-वंशीय मुंतोजी

मुसलमानांनी मराठीत संतकाव्याशिवाय आणखीही अनेक प्रकारची रचना केली आहे. ज्याप्रमाणे बहामनी वंशातील मुंतोजीने मराठीत वेदान्तावर स्वानुभवसंपन्न ग्रंथरचना केली, त्याचप्रमाणे खलजी वंशातील मुंतोजीने मराठीत संगीत व ज्योतिष या विषयांवर पांडित्यपूर्ण ग्रंथरचना केली. हा मुंतोजी कोण-कुठला ते निश्चयाने सांगता येत नाही. परंतु तो स्वतःला 'वजिरुल्मुल्क' या बिरुदाने उल्लेखितो, आपल्या पित्याचे नाव जिया दौलतखान असे देतो आणि आपणास 'खळचिवंशवर्धन' म्हणवितो. त्याने 'संगीतमकरंदा'वर मराठी ओवीबद्ध टीका[११] लिहिली असून, 'विजयभैरव' नामक ज्योतिषविषयक ग्रंथ[१२] मराठी गद्यात लिहिला आहे.

'संगीतमकरंदा'वरील टीकेच्या अखेरीस त्याने "सकलविद्वदग्रेसर-सारस्वतसाम्राज्यधुराधौरेय-श्रीमन्महाराजाधिराज–श्रीसंगीतसाहित्यशिरोमणि-श्रीखळचिवंशवर्धन– जिया दौलतखानाचा नंदन मुतोजि वजिरुल्मुल्क तेन कृता संगीतमकरंदस्य टीका प्राकृतभाषायां विद्वद्धितार्थाय..." अशा प्रकारची समाप्तिमुद्रा लिहिली आहे. या मुद्रेवरून हे स्पष्ट होते की, मुंतोजी हा कुठे तरी राजकीय महत्पदावर नांदत असून, त्याला आपल्या साहित्य-संगीत-प्रावीण्याचा अभिमान अत्यंत होता.

'विजयभैरव' या ग्रंथात पंचांग, शकुन, अंगस्फुरणादी लक्षणांची शुभाशुभ फले, तसेच भूमी, बल, यात्रा, वृष्टी, इत्यादीसंबंधीचे भविष्य हे विषय आलेले आहेत. या ग्रंथाचा उपक्रम मुंतोजीने पुढीलप्रमाणे केला आहे—

" महेंद्राचार्य परमेश्वराच्या प्रसादास्तव सर्वजनांचें अज्ञानपण निरसावया, ज्ञानबोध व्हावया बरवीं वाक्यें करून विजयभैरव ग्रंथ करितों ॥ "

या उपक्रमात प्रारंभीच उल्लेखिलेला महेंद्राचार्य हा मुंतोजीचा गुरू दिसतो. 'विजयभैरवा'च्या समाप्तिमुद्रेतही त्याने आपणास 'श्रीसकळविद्याविशारद-श्रीमन्महेंद्राचार्यचरणांबुजशिष्य' असे विशेषण लावले आहे.

सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या मते मुंतोजी हा माळव्याच्या खिलजी घराण्यातील असावा आणि इ. स. १४३५ ते १५५० या दरम्यान तो होऊन गेला असावा.

## मुसलमान मराठी शाहिरी

मराठी संतकाव्याच्या क्षेत्रात मुसलमान कवींनी जसे महनीय स्थान प्राप्त केले आहे, तसेच मराठी शाहिरी काव्याच्या क्षेत्रातही मुसलमान कवी अग्रभागी राहिले आहेत; कलगी-तुऱ्याच्या शाहिरीत कलगी पक्षाचा म्हणजेच शक्ति-पक्षाचा अध्वर्यू म्हणून शहा अलीचे नाव आजही गाजते आहे. शहा अलीचे चरित्र उपलब्ध नाही; परंतु त्याचा शिष्यसंप्रदाय आजही मराठवाड्यात नांदत असल्यामुळे तो पेशवाईच्या काळात मराठवाड्यातच होऊन गेला असावा असे वाटते.[१३] तुकनगीर तुरेवाल्याचा प्रतिस्पर्धी म्हणून त्याची विशेष ख्याती आहे. कलगी-तुऱ्याच्या शाहिरीबरोबर त्याचे नाव सुदूर उत्तरेतही पोचले आहे.

नारू बापू नामक शाहिराने शके १७९९ मध्ये रचलेल्या एका 'मुजऱ्या'त-

शहा अली कादर डफपर कलगी-
निशाण फडके जरी ॥

असा त्याचा सादर उल्लेख केला आहे.[१४] या उल्लेखावरून त्याचे पूर्ण नाव 'शहा अली कादर' असे असल्याचे समजते. कलगी पक्षावर सूफी मताचा विशेष प्रभाव आहे, त्यामुळे " शाह अली सूफी दर्शनसे प्रभावित थे। " हे प्रा. त्रिलोकीनारायण दीक्षित यांचे विधान यथार्थ वाटते.[१५] प्रस्तुत संदर्भात प्रा. प्र. भा. मांडे म्हणतात :

" सूफी मत व कलगीवाल्यांची विचारसरणी यांत साम्य असल्यामुळे म्हणा किंवा काही सूफी संप्रदायातील साधूंनी कलगी-तुऱ्याच्या आध्यात्मिक चर्चेत रस

घेतल्यामुळे म्हणा, परंतु सूफी मताचा आध्यात्मिक शाहिरीवर– विशेषतः कलगी-वाल्यांच्या रचनेवर– परिणाम झाला आहे, हे निश्चित. (कारण कलगी व सूफी हे दोन्ही पंथ अद्वैती आहेत.) कलगीवाल्यांचे काही हिंदी छंद, ज्यांवर उर्दू भाषेचा खूपच प्रभाव पडलेला आहे – ज्यांना 'मुसलमानी छंद' असे म्हणतात, उपलब्ध झाले आहेत. यावरून रचनेवर इस्लामी प्रभाव स्पष्ट आहे.

कहो बिसमिल्ला सबका मालिक अल्ला है ।

हा छंद, तसेच शहा अली वस्ताद यांच्या छंदातील खालील ओळी—

पढो तुम कलमा महंमदका ।
इस कलमेका पडे उज्याला उमेद रसूलका ॥
कलमा का है यह रोशन ।
इशरके दिन तुझे पूछेंगे करो बयान ॥
कलमा पढो वो जिसने ।
जन्नत है ये मखबूल हाक उठे रौशने ॥...

अशा कितीतरी ओळी दाखविता येतील की, ज्यांत मुरशद कवींनी शाहिरी काव्यात मुसलमानांची तत्त्वे ग्रथित केली आहेत."

शहा अलीच्या परंपरेतील शाहिरांनी शहा अलीच्या नामाचा डंका सतत झडविला आहे—

— शहा अली वस्ताद कहे जा सत्‌गुरूके चरण धरो ।
— शहा अली मुरशद कहे...
— शहा अली वस्ताद पीर हमारे लेवन सरिनारे ।
— शहा अलीकी चोट चली लान्यालोन्या चमारका ।
तुझे पकडकर बकरा बनाऊ शहा अलीके सुन घरका ॥
— तुकनगीरपर सवाई सोटा बाजे शहा अली फकीरका ।
शहा अली शाहीर खुद है ग्यानी, सवाल सुनो रणजितसिंगका ॥

शहा अली हा प्रतिभासंपन्न शाहीर असला पाहिजे. कारण त्याने उसन्या भांडवलावर जगणाऱ्या वेगडी शाहिरांवर तीव्र हल्ला चढविला आहे. तो म्हणतो–

छंद पराये चुरा ला,
अपनी छाप लगाते हैं ॥
अगरचे ऐसे कुरोंको,
हम आइना दिखलाये तो क्या ॥
अंधेको आइना दिखे,
ये समजमें आना मुश्किल है ॥
सिवा इल्मके किताबोंसे
छंद गाना मुश्किल है ॥
लाख लडे कायर शूरोंसे,
फताहका पाना मुश्किल है ॥[१६]

शहा अली हा सूफी मतानुयायी असल्यामुळे त्याला मधुराभक्तीचे विशेष वेड असावे, हे स्वाभाविकच आहे. श्रीकृष्णाच्या मुरलीनादाचा प्रभाव वर्णन करणारी त्याची दोन कवने उपलब्ध झालेली आहेत. आध्यात्मिक गूढतेने भारलेले आणि दामयमकांनी सजलेले हे त्याचे कवन पहा—

काला कृष्णजी खडा जमुनापे
जिधर खडी सब ब्रिजबाला ।
बालापनमें बिरहकी ज्योत
जगावे वो नंदलाला ॥
लाला नंदका बजाके बन्सी
बन्सीमें जादू डाला ।
डाला जादू मोहनने धर दी
गलेमें मोहनमाला ॥
माला गलेमें डाल चकोर चित्-
चोट लगी करने चाला ।
चाला करने लगा और
मार दिया मोहका भाला ॥
भाला भयभीत लगा सखी री
जरा नहीं देखा भाला ।

काला कृष्णजी खडा जमुनापे
जिधर खडी सब ब्रिजबाला ॥[१७]

मुरलीची मोहिनी वर्णन करणारे शहा अलीचे दुसरे कवन नादमधुर आहे. गोपललनांची सुधबुध नाहीशी करणारा तो मुरलीनाद ऐकण्यासाठी शहा अलीची हृदयगोपीही यमुनातीरावर गेली आहे आणि त्या दिव्य नादाच्या श्रवणाने त्या गोपींची सर्व भ्रांती नष्ट झाली आहे—

चल जमनाके तीर ।
बाजत मुरली री, मुरली री ॥ धृ० ॥

मुरली सुन कान्हाकी नीकी ।
नगरनारी सगरी चौंकी ।
सुध न रही वाके तनकी ।
मगन भई नारी गोकुलकी ।
अब तुम सुनो री, सुनो री ॥ १ ॥

सगरी चली जल जमनाकु ।
सिरपर घगरी ले पणियाकु ।
हसती चली छोड लडकनकु ।
टेर सुन मुरलीकी मनकु ।
व्याकुल भई री, भई री ॥ २ ॥

कृष्ण अवतार विष्णुजी के ।
नित वो सेवा संभुजीके ।
छंद बजावत मुरलीके ।
चरवैया गौ और बछरनके ।
ब्रिंदाबनमों री, बनमों री ॥ ३ ॥

जब शंकरकी किरपा भई ।
तब कान्हा मुरली बजाई ।
शहा अली कहते, अब गई ।
भ्रांत मनकी री, मनकी री ॥ ४ ॥[१८]

भेदिक कवनांच्या स्पर्धेत नाना प्रकारची गणिते मांडून प्रतिपक्षाला चकित करण्याची एक तऱ्हा आहे. शहा अलीने शरीराच्या निरनिराळ्या भागातील हाडांचा तपशील देऊन, त्यांची संख्या तीनशे साठ असल्याचे एका गणिती कवनात– ‘हाडांच्या पदा’त– सांगितले आहे.[१९] त्या पदाच्या अखेरीस तो म्हणतो—

ऐसी तीनशें साठ हाडें ।
पिंडीं केली जडाजड ।
त्याचा केला पहा निवाड, शास्त्रमतें ।।

उत्तरखंडीचं बोलणं ।
तुम्ही ऐका चित्त देऊन ।
शंकर पार्वतीलागुन, सांगतसें ।।

त्यांतील उच्छिष्ट वेचुन ।
शहा अली फकीर जाला मग्न ।
संत ऐकुनियां कान, संतोषले ।।

शहा अलीच्या परंपरेत अनेक कलगीवाले मुसलमान शाहीर होऊन गेले. ‘वैरी पाहुन कांपे थरथर’ अशा आक्रमकतेने स्पर्धेत उतरलेला मदशाचा शिष्य लाडनशा; ‘काय नवल मी सांगु तुम्हांला माशीवर बसला हत्ती’ अशा गूढ स्वप्नाची वार्ता सांगणारा महंमदशा फकीर, प्रतिपक्षावर मात करण्यासाठी मांत्रिक प्रयोग करणाऱ्या राणो कोंडू केरूचा गुरू दावतखान सुलतान, इत्यादी मुसलमान शाहिरांची नावे मराठवाड्यातील कलगी-तुऱ्याच्या शाहिरीत आढळतात.

पश्चिम महाराष्ट्रातही अनेक मुसलमान शाहीर होऊन गेले. कोणा हुसेनखान शाहिराची एक लावणी मला पहायला मिळाली आहे.[२०] त्या लावणीतील नायिका नायकाला म्हणते—

नको जाऊं लष्करा सजणा,
कैक गेले मरून ।
घरीं राहूं मौजा करून ।।

जळों चाकरी मुलूखगिरीची,
जीव माझा वेजार ।
मेल्यांच्या छावण्या दूर ॥...
उत्तम भोजन तुम्हां वाढीन,
तूप पोळ्या सेवया ।
उन उन पाणी देतें न्हाया ॥
वेळा लवंगा चिकणसुपारी,
शीतळ चटसाया ।
पानाच्या विड्या खाया ॥...

हुसेनखानाने गायलेला हा 'ख्याल' पेशवाईतील वातावरणाशी सुसंवादी असाच आहे. अशा प्रकारचा भाव व्यक्त करणाऱ्या अनेक लावण्या शाहिरी कवनसंभारात आढळतात.

पश्चिम महाराष्ट्रातील प्रख्यात मुसलमान शाहीर सगनभाऊ हा होय. पेशवाईच्या उतरत्या काळात उदयास आलेला हा शाहीर मूळचा जेजुरीचा. त्याचा जन्म इ. स. १७७८ मध्ये झाला. त्याचा पिढीजात धंदा शिकलगारीचा. परंतु त्याने जेजुरी सोडली; शिकलगारीचा धंदाही सोडला आणि हत्यारे पाजळून त्यांना धार देत बसण्यापेक्षा शब्दांना धार देण्याची शिकलगारी त्याने पत्करली. त्याच्या मनाची मुरली पुण्यातल्या गुणीजनांना खंडोबा मानून त्यापुढे नाचू-गाऊ लागली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत त्याने स्वतःचा फड काढला आणि होनाजीसारख्या पहिल्या श्रेणीचा शाहिराशी टक्कर दिली. सिदू रावळ हा नाथपंथी शाहीर सगनभाऊचा गुरू होय. जातीने मुसलमान असला, तरी त्याचा पिंड अस्सल मराठी मातीवर पोसलेला होता. मराठी बोलीचा आणि परंपरेचा त्याला अभिमान होता. ग्यानबातुकोबांच्या वाणीचा रस त्याने चाखला होता. पंढरीच्या पांडुरंगाच्या चरणांचे त्याला वेड होते. मराठ्याच्या मुलूखगिरीची गौरवगाणी गाताना त्याची छाती अभिमानाने फुगत असे. त्याचमुळे मराठी तक्ताचा तोल ढळू लागताच तो दुःखाने खचून गेला—

राजा कुणिकडे, प्रजा कुणिकडे,
काय अशी आग पाखडली ।
अन्न विसरलों, पाणि विसरलों,
वाळवंटिं जशी मासोळी पडली।
तसेंच काय हो–चहुंभवल्या फौजा,
भयभीत झाल्या आभाळांत ।
जरिपटक्याचा हत्ती अमुचा,
रुतला गाळांत ॥

सर्वच मराठी शाहिरांप्रमाणे सगनभाऊनेही प्रीतीची गाणी दिलखुलासपणाने गायली आहेत. त्याला रामजोशीची रुणझुणती रसवंती लाभली नव्हती आणि होनाजीची जरतारी जडणघडणही जमली नव्हती; पण त्याच्या मनाचे पाखरू जातिवंत प्रीतीच्या राज्यात मोकाटपणाने भिरभिरत राहिले आणि कंठ फुटेपर्यंत उत्कटपणे प्रीतीची गाणी गात राहिले. 'तूं प्राणहंस, मी कांचनकायाकुडी। तूं कल्पवृक्ष, मी छाया तुज तळवटीं ॥' अशा अभिन्नभावाने प्रियावर अनुरक्त झालेली प्रेयसी रंगविणारा सगनभाऊ तिच्या विरहार्त अवस्थेतचे चित्रण करताना म्हणतो—

माझा जीवप्राण लागला झुरणी ।
सख्या रे, मी झुरतें मोरावाणी ॥
जीवनावेगळी मासोळी,
उल्हाळ घेती प्रीती करून ।
मी चातक तुम्हि मेघ,
लक्षवर बिंदू सोडा वरून ॥

या अशा सहज सुंदर प्रीतिकवनांनी सगनभाऊ मराठी शाहिरी वाङ्मयात मानाचे स्थान पावला आहे.

अलीकडच्या काळातही जानमहंमद भाई ( सातारा ), लहरी हैदर ( कोल्हापूर ), सुलतानभाई पिंजारी ( मलवडी ), अमीनभाई ( बारामती ), इत्यादी अनेक मुसलमान शाहिरांनी आपले नाव गाजवले आहे.

## मुसलमान मराठी लोकसाहित्य

संतकाव्यात काय अथवा शाहिरी कवनांत काय, मुसलमान कवींनी आपल्या मुसलमानपणाचा विलोप केला आहे आणि आपल्या हिंदू बांधवांच्या जीवनसरणीशी, भावभावनांशी, रीतीभातींशी आणि श्रद्धासंकेतांशी तादात्म्य साधले आहे. याविषयी शिकंदरलाल आतार या मराठी इतिहाससंशोधकाने म्हटले आहे की, "हे जे पूर्वकाळी मराठी भाषेचे मुसलमान साहित्यसेवक होऊन गेले. ते सर्व किंवा त्यांपैकी बहुतेक विठ्ठलभक्तीने प्रेरित झालेले असल्यामुळे त्यांची कविता बहुतेक विठ्ठलभक्तिपरच आहे. आमच्या ह्या कवींनी वैष्णव कवींचे अनुकरण करून ही रचना केली आहे. त्यामुळे ती एक प्रकारे हिंदूंचीच ग्रंथसंपत्ती आहे, हे उघड आहे. तीत मुसलमानांच्या विचारांचे, भावनेचे किंवा संस्कृतीचे प्रतिबिंब नाही. यामुळे त्या साहित्याला मुसलमानांचे जातीय साहित्य म्हणता येत नाही. ती रचना मुसलमानांनी केली आहे, म्हणून त्याला मुसलमान साहित्य म्हणजे मुसलमानद्वारा निर्माण झालेले साहित्य हवे तर म्हणता येईल. पण ते आमचे जातीय साहित्य नव्हे."[२१]

महाराष्ट्रातील मुसलमानांचे जे अल्पस्वल्प 'जातीय साहित्य' उपलब्ध झालेले आहे, ते लोकसाहित्याच्या श्रेणीत मोडणारे आहे. श्री. आतार यांनीच अठरा मुसलमान कवींच्या शहायरी रिवायतींचे (मोहरमच्या सणात म्हणावयाच्या गीतांचे) एक बाड शोधून काढले आहे. या बाडातील "मुसलमान कवींनी हिंदू शाहीरवर्गाचे अनुकरण करून मोहरमच्या सणात 'करबल'-मध्ये म्हणण्याकरिता 'रिवायती' म्हणून एक प्रकारची कवने रचलेली आहेत. ती पद्ये नाना प्रकारच्या चालींवर केलेली असून, त्यांमध्ये करुण व वीर हे रस भरलेले आहेत. त्यांत अली खलिफांचे पुत्र व महंमद पैगंबराचे नातू हसन-हुसेन यांनी करबलाच्या रणक्षेत्रावर यजदाशी जंग करून धारातीर्थी देह ठेवला, त्याचे चित्ताकर्षक हृदयंगम वर्णन आहे...आपल्याइकडे मोहरमच्या सणामध्ये मुसलमान लोक ताबूत काढतात व कोठे कोठे, त्याबरोबर नालपीर व पंजेही बसवितात. या मोहरमच्या दहा दिवसांत सोंगे, खेळ, मेळे, वगैरे काढतात. मोहरमातील हे मेळे म्हणजे 'करबल'चा खेळ होय. त्या करबलात टिपऱ्यांच्या

तालावर, हसन-हुसेन यांनी यजिदाशी जो युद्धप्रसंग केला, त्याच्या वर्णनाची पद्ये म्हणतात. अरबी भाषेत करबला येथील रणसंग्रामाचे यथातथ्य वर्णन करणारे 'जंगनामा' म्हणून एक वीर-करुणरसप्रधान काव्य आहे. त्याचे उर्दूतही भाषांतर झालेले आहे. त्या काव्यावरून आमच्या महाराष्ट्रीय मुसलमान कवींनी ह्या रिवायती रचलेल्या आहेत ... ह्या रिवायती आपणाला भाषेच्या, काव्याच्या, इतिहासाच्या, समाजसंस्काराच्या व अध्यात्म-शास्त्राच्या अशा सर्व दृष्टींनी उपयोगी होतील. यांची भाषा म्हणजे मुसलमानी-मराठी अशी खिचडी भाषा आहे. काव्य कारुण्य व वीर ह्या रसांनी भरलेले असे आहे. त्याने सामान्य श्रोत्यांस तर चटका लावून सोडलाच आहे; पण गोषातील मुसलमान स्त्रीसमाजावरही त्याचा काही थोडा परिणाम झालेला नाही. त्याही त्यांचे श्रवण करून ढळाढळा अश्रू गाळतात. इतिहासाच्या दृष्टीने पाहता महंमद पैगंबर, अली खलिफा आणि त्यांचे कुळ यांचा समग्र इतिहास यांत ग्रथित झालेला आहे. समाजसंस्काराच्या दृष्टीने पाहता त्यात पितृप्रेम, पुत्रप्रेम, भ्रातृप्रेम, मातृप्रेम, कर्तव्यप्रेम, इत्यादी उच्च भावनांचा किती तरी परिपोष झालेला आहे. अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने पाहता त्यांत कित्येक गूढ प्रमेये प्रतिपादिलेली आहेत व त्यांचे रहस्य कथन केले आहे."

या मराठी रिवायतींची रचना अब्दुल, गरीब अब्दुल, बाबन, महंमद हनीफ, आबालाल, दारा, फतिशा, बाबासाहेब, शेख मिराजी, जोव्हारशा, राजे बापू, नबी महंमद, सुलतान, दादा आतार, करीम, कासम, इत्यादी कवींनी केलेली आहे. या रिवायतींचा विषय मुसलमानी असला, तरी त्यांवर हिंदू प्रभाव पुष्कळच आहे.

कवी अब्दुलने 'श्री प्रथम बिसमिल्ला। वंदितो मी भगवानाला। परमेश्वराच्या मित्राला, दरुद सलीम बिसमिल्ला॥' या शब्दांत नमनाची रिवायत सुरू केली आहे, तर गरीब अब्दुलने फकिराच्या भूमिकेतून रिवायतीला आरंभ केला आहे. तो म्हणतो—

प्रथम सलाम सर्वां। लहानथोर साऱ्या सभेला॥
चित्त देऊन ऐका ह्याला। सत्तगुरुच्या वचनाला॥
फकीर झालों मी मोहरमचा। प्रवरती शाहे हुशेनीचा॥

निवरती आहे निरंजनाचा । फकीर मी सात दिवसांचा ।।
घालून विरक्ताचा लंगोटा । घेऊन हिमतीचा हातीं सोटा ।
ध्यान नामाचा आहे मोठा । भक्ति जपमाळ घेऊन बोटां ।।
सयली आमची पंचरंगी । झोळी हजार ठिगळांची ।।
लाउनि राख दर्शनाची । धुनी लाविली मीपणाची ।।
मीपणाची केली धुनी । मोडुन घेतल्या सात शेणी ।।
पंच रात्र करूनिया अग्नी । निरंकार पेटली धुनी ।।
इरादा एक आहे आमुचा । निवुन करवला जाण्याचा ।।
हुकुम घेऊन नबाबाचा । अंतरीं भेद समज ह्याचा ।।
गरीब अब्दुल असें म्हणी । ध्यावें गुरुपुत्रा समजोनी ।।
आरेकाच्याच्याहो ( ? ) मैदानीं । येऊं आला बा खेळुनी ।।

गरीब अब्दुलचा गुरू शाह हुसेन नामक असून, त्याची ही फकिरी नाथपंथी जोग्याच्या वळणाची दिसते. यजिदाच्या बाणाने तहानलेल्या हुसेनाचा प्राण घेतल्यावर त्याच्या मातेने जो शोक केला, त्याचे हृदयद्रावक वर्णन कागवाडच्या अब्दुल्लाने केले आहे. हा अब्दुल्ला प्रख्यात भेदिक शाहीर शहा अलीचा शिष्य होय. हुसेनच्या मातेचा विलाप अब्दुल्लाने किती करुणरम्य भाषेत प्रकट केला आहे, तो पहा--

तीर लागुन प्राण बाळाचा हो गेला ।
दुःख झालें हो साऱ्या लोकांला, साऱ्या लोकांला ।।
लाऊन गळयाला गळा, माता हो रडती मारुन उराला ।।
आंगरखें टोपडें न्हाइलें खुंटीला ।
रंगीत पाळणा हालऊं कोणाला, हालऊं कोणाला ।।
सरदार बोला, मजसंगें बाळा हा कां तुम्ही रुसला ।।
मांडीवर घेतलें नाहीं कां रे तुला ।
दुधानें ऊर माझा आवळुन गेला, आवळुन गेला ।।
पाजुं कुणाला, कसलें संकट वेळ तुझ्यावर घडला ।।
तीरानें फाटला नाजुक गळा ।
कसा पडिलास कोंब माझा कवळा, कोंब माझा कवळा ।।

येजिद् काळा, तोंड उघडुन बोल माझ्या तूं बाळा ॥
कसें विसरूं माझ्या तान्या तूं मुला ।
तुझ्या गोऱ्या मुखावर घाम कीं रे आला, घाम कीं रे आला ॥
कुठें पाहूं तुला हरणीच्या बाळा, कां तुम्हि रुसला ॥
उद्रिष्ट ब्रह्म्यानें जे लिहिलेला ।
होणार गत नाहीं कुठें चुकवीला, नाहीं चुकवीला ॥
होणार हुयाला, सांगतों ऐका हो साऱ्या सभेला ॥
दुःखाची बयान बस कर अब्दुल्ला ।
ठिकाणा कागवाडचा तो म्हाणेवाला, तो म्हाणेवाला ॥
सलाम सभेला, शहा अली प्रसन्न होवे आम्हांला ॥

अब्दुल्लाच्या या कवनाची रचनासरणी खास शाहिरी पठडीतील आहे, हे वाचकांना सहजपणाने कळून येईल. शाहिरीतील भेदिक कवनांसारखी कवनेही या मुसलमानी रिवायतींत आढळून येतात. राजे बापू नामक मुसलमान कवीने रचलेल्या भेदिक सवाल-जबाबाचा हा थोडासा नमुना पहा—

प्रश्न : हसन-हुसेन बंधू कोण, श्रीहरि सांगा निवडून ।
आणखी पंडिता, सांगा कोण, प्रश्न उघडावा सुज्ञानं ॥
जगन्माताही कोण व्याली, म्हणावा बाप कोण आली ।
मुलें कैशी हरणी मेली, यजिदें सांगा कोण वाली ॥

उत्तर : हसन-हुसेन बंधू दोन, ब्रह्मांडीं चंद्रसूर्य जाण ।
पिंड जाणावे दोन नयनां, जीवशिव आत्मज्ञानाची खुण ॥
इच्छा मायाही व्याली, निजानंद कंदफळें आलीं ।
कर्म कर्त्रेलीं रणीं मेली, सखा चुलता तो घाला घाली ॥

या शाहिरी वळणाच्या रिवायतींशिवाय मुसलमानांचे मराठी लोकसाहित्य उपलब्ध झाले नाही. अशा प्रकारचे लोकसाहित्य मराठी मुसलमानांनी निर्माणच केले नसावे, असा याचा अर्थ नाही. कोकणातील मुसलमान स्त्रियांनी रचलेली पाच मुसलमानी लोकगीते श्री. हमीद दलवाई यांनी संकलित केली आहेत.[२२] प्रसूती, विवाह, इत्यादी प्रसंगी ती गायिली जातात. अशाच प्रकारची खास मराठी लोकगीतेही मुसलमान समाजात प्रचालित असण्याचा संभव आहे. त्यांचा

साक्षेपाने संग्रह झाल्यास सामान्य मराठी मुसलमानाचे अंतरंग ओळखण्यास त्याचा उत्तम उपयोग होऊ शकेल, यात संशय नाही.

### शहा दत्त अलमाप्रभु

मराठी भक्तिपरंपरेच्या उदार आणि समन्वयशील प्रवाहात अनेक सत्त्वसंपन्न मुसलमानही समरस झाले, हे आपण विस्ताराने पाहिलेच आहे; परंतु दत्तोपासनेच्या क्षेत्रात हा समन्वयाचा प्रयत्न विशेषत्वाने झालेला दिसतो. या समन्वित भक्तिधारेचे उपास्य दैवत म्हणून दत्तात्रेयाने 'शहादत्त अलमा-प्रभु' असे नाव धारण केले.[२३]

दत्तोपासनेच्या क्षेत्रात हिंदू-मुसलमानांच्या समन्वयाचा प्रथम प्रयत्न नरसिंह सरस्वतींच्या काळातच झालेला दिसतो. त्यानंतर जनार्दनस्वामी व एकनाथ यांच्या जीवनकाळातही दत्तोपासनेच्या पार्श्वभूमीवर हिंदू-मुस्लिम समन्वयाचा प्रयत्न झाला. जनार्दनस्वामींचे गुरू चांद बोधले हे सूफींच्या कादरी उपपंथातले होते आणि चांद बोधल्यांचा एक मुसलमान शिष्य शेख महंमद हा योग व भक्ती यांचे विवरण करणारे ग्रंथ मराठीत लिहीत होता, याचा परिचय आपण शेख महंमदावरील प्रकरणात करून घेतला आहे. सूफींच्या कादरी शाखेतीलच आणखी एक श्रेष्ठ मुसलमान संत शहा मुतबजी ब्रह्मणी अथवा मृत्युंजयस्वामी हा नंतर दत्तप्रणीत आनंद संप्रदायाचा अनुयायी बनून परमपदाचा अधिकारी बनला, हेही आपण प्रारंभीच पाहिले आहे. जनार्दन-स्वामी यवनांचे सेवक असूनही त्यांच्या दत्तभक्तीचा प्रभाव मुसलमानांवर, मुस्लिम राज्यकर्त्यांवर सुद्धा पडला होता. त्यांच्या अमदानीत देवगिरीवर सुटीचा दिवस शुक्रवारऐवजी गुरुवार मानला जाऊ लागला. त्यांनी आपल्या दत्ता-वतारी गुरूचे समाधिमंदिर देवगिरीच्या किल्ल्याच्या तळाशी दर्शनी भागी बांधले. माणिकप्रभूंच्या सकलमत संप्रदायात तर मुसलमानांचा भरणा विशेष आहे.

दत्तात्रेयाने मलंगवेशाने दर्शन दिल्याच्या अनेक अद्भुत कथा दत्तो-पासकांच्या पारंपरिक चरित्रांत अंतर्भूत आहेत. 'मलंग' ही संज्ञा सूफी संप्रदायातील आहे. 'मलंग' हा विधिनिषेधातीत अवस्थेत विचरण करणाऱ्या 'अवधूता'चा सूफी पर्याय आहे.

महाराष्ट्रातील आनंद संप्रदायाच्या एका शाखेत दत्तात्रयाचे नाव 'शहादत्त अलमाप्रभु' असे आहे. आनंदप्रभू आणि कान्हो कानडा हे शहादत्ताचे दोन प्रमुख शिष्य समजले जातात. आनंदप्रभूपासून अनुक्रमे सहावे व सातवे सत्पुरुष आत्मारामस्वामी व सदानंदस्वामी यांनी शहादत्ताविषयी वारंवार उल्लेख केला आहे. आत्मारामस्वामी म्हणतात—

चहूं युगांभीतरीं परिपूर्णी । परब्रह्म कैवल्यदानी ।
कलियुगीं निजभक्तांलागुनी । श्रीशहादत्त अलमाप्रभु ॥
जया जाति ना कुळ । परब्रह्म केवळ ।
कलियुगीं प्रकटला सुनीळ । भूमिकेवरी ॥
पराविद्येचा आचार्या । स्वयं परब्रह्म आपणया ।
उपदेशिता जाला गुरुवर्या । आनंदप्रभूसी ॥
कलियुगींचा अवतार । पराविद्येचा दातार ।
परब्रह्म साचार । श्रीशहादत्त प्रभु ॥
नीलांबरधारी । परब्रह्म आलें साकारीं ।
जीवाकारणें संसारीं । उद्धरिता जाला ॥

आत्मारामस्वामींनी एका अभंगात 'देवगिरि देवाचें सिंहासन होये । शहाची पातशाही होईल पाहे ।' असा शहादत्ताच्या स्थानाचा निर्देश केला आहे. सदानंदस्वामींनीही 'शहामदार देश उत्तरीं । दौलताबादीं त्या ॥' असाच नामनिर्देश केला आहे. परंतु अन्यत्र 'भूमिकानगरीं विशेषेंकरूनी । देव सांप्रत नांदती ॥' असा भूमचा महिमा गायिला आहे.

या शहादत्ताच्या उपासकांत आनंदसंप्रदायी, लिंगायतपंथी, मुसलमान आणि दशनामी गोसावी, इत्यादी अनेक पंथांचे लोक आहेत, अशी माहिती या गुरु-शिष्यांनी पुरविली आहे. खानदेशात सिंदखेडे आणि चोपडे या दोन ठिकाणी यांचे मठ आहेत. शहादत्ताचे एक स्थान बिदरजवळील अष्टूर येथेही दाखविले जाते. मुसलमान त्या स्थानाला अहमदशहा बहामनीची कबर मानतात, तर हिंदू शहादत्ताचे स्मारक समजतात.

मला पहायला मिळालेल्या एका हस्तलिखित आरतीसंग्रहातील[२४] दत्तावरील दोन आरत्यांत शहादत्ताचा उल्लेख आहे—

— कलियुगीं अवतार धरला शहादत्त ।
मध्वस्वामी लोळे चरणांकित ॥
— कलियुगीं शहादत्त । जो कां जीवां उद्धरितो ।
मार्गेश्वर पौर्णिमेसी । पूर्णकळा दाखवितो ॥

### तुम्हारा हमारा खुदा एक भाई

हे सर्व समन्वयप्रयत्न व्हावे तितके यशस्वी झाले नाहीत. हिंदूंची प्रवृत्ती मुळातच सहिष्णू आणि समन्वयशील असल्याने त्यांच्या बाजूने सदैव वाट मोकळीच राहिली. परंतु दुसरीकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्याचमुळे ज्या अल्पस्वल्प महात्म्यांनी अत्यंत प्रामाणिकपणाने या प्रयत्नांना गती देण्यासाठी सर्वस्व पणास लावले, त्यांच्याविषयीचा आपला आदरभाव दुणावतो आणि त्यांचे संकीर्तन करताना आपली वाणी उमलून येते.

संत एकनाथांनी 'हिंदु-तुर्कसंवाद' या नावाचे एक महत्त्वपूर्ण स्फुट लिहिले आहे.[२५] या स्फुटात त्यांनी हिंदू आणि मुसलमान यांचा विवाद रंगवून उभय परंपरांतील वैगुण्यांवर बोट ठेवले आहे आणि दोघांनाही शाश्वत एकात्मतेचे भान घडविले आहे. हे भानच विवादाला छेद देऊन संवाद घडवून आणू शकते, असा नाथांचा विश्वास आहे. या स्फुटाचा उपसंहार करताना नाथ म्हणतात—

आम्हीं तुम्हीं केला झगडा । तो परमार्थाचा बोध उघडा ।
प्रबोधावया महामूढां । कर्मजडां उद्बोध ॥ ६४ ॥
शब्दीं मीनला शब्दार्थ । दोहींसी आणला परमार्थ ।
परमार्थ मनोरथ । झाले तृप्त दोहींसी ॥ ६५ ॥
ऐक्यवाक्य विवाद । विवादीं जाहला अनुवाद ।
एका जनार्दनीं निजबोध । परमानंद दोहींसी ॥ ६६ ॥

नाथांचा वारसा समृद्ध करणाऱ्या समर्थांच्या परंपरेतील एक साधू दादेगावचे देवदास यांनीही याच सुरात सूर मिळवून मुसलमानांना सांगितले आहे की—

तुम्हारा हमारा खुदा एक भाई ।
कहे देवदासो नहीं बे जुदाई ॥[२६]

जुदाईचा म्हणजे द्वैतभावाचा निरास करून अद्वयानंदवैभवाची लयलूट करणाऱ्या मुसलमान मराठी संतकवींनी हिंदू संतांना उत्कट सहयोग देऊन महाराष्ट्राची उदार आणि समन्वयशील सांस्कृतिक परंपरा समृद्ध करण्यात मोठा वाटा उचलला आहे. म्हणूनच समग्र मराठी लोकमानस त्यांच्याशी सदैव कृतज्ञ राहिले आहे.

## संदर्भटीपा


१. ‘संशोधनमुक्तावली’ (सर तिसरा): डॉ. वा. वि. मिराशी, पृ. १४९–१७०.

२. ‘सूफी संप्रदाय’: सेतुमाधवराव पगडी, पृ. २२–२३, ५७–६४.

३. ‘विविधज्ञानविस्तार’, जानेवारी १९१४ (पृ. ३५–३७) आणि ‘प्रतिष्ठान’, फेब्रुवारी १९६० (पृ. १४–१७) या अंकांतील अनुक्रमे श्री. ह. रा. पिटके व श्री. न. शे. पोहनेरकर यांची टिपणे.

४. ‘श्रीएकनाथमहाराज यांची गाथा’ (आवटे आवृत्ती, शके १८३०), क्र. ३८९३, पृ. ७८४.

५. ‘दासबोध’, १४. ७. ३२.

६. मल्हार रामराव चिटणीस–विरचित ‘शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र’: संपादक रा. ब. का. ना. साने, १९२४. पृ. १५–१६.

७. ‘तंजाउरचा शिलालेख’: सं. वि. का. राजवाडे, शके १८२८. पृ. ५–६.

८. भा. इ. सं. मंडळ, पुणे, वार्षिक अहवाल, श. १८३८, पृ. १८०–१९३.

९. पहा– ‘महाराष्ट्रधर्म’: भा. वा. भट, पृ. १९३–१९५.

१०. ‘रामदासी संशोधन’ (खंड पहिला), बाडांक ५७.

११. भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, वर्ष २०, अंक २, पृ. ८७–९२.

१२. ‘मराठी ग्रंथांच्या बयाजवार यादीचे अनुबंध’ (सरस्वती महाल ग्रंथ-संग्रहालय), भाग चौथा: सं. जी. नागराज राव. वर्ग १२ वा– ज्योतिष विभाग, क्र. २५४२, पृ. १६२–१६३.

१३. ‘मराठवाड्यातील कलगीतुऱ्याची आध्यात्मिक शाहिरी’: प्रा. प्र. भा. मांडे, प्रस्तावना, पृ. ३९ (‘दुसरा मुजरा शहा अली वस्ताद जालन्या-कडे डंका पिटला।’).

१४. ‘प्रतिष्ठान’, ऑगस्ट १९५५, पृ. २१.

१५. ‘सप्तसिंधु’ (भाषाविभाग, पंजाब, पतियाळा), जून १९६३, पृ. १४.
१६. ‘प्रतिष्ठान’, सप्टेंबर १९५५, पृ. २८-२९.
१७. तत्रैव, पृ. २७–२८.
१८. समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, बाडांक २७९.
१९. श्री. वि. भा. घोलप यांनी पाठविलेले शेख सुलतानांच्या रचनांनी युक्त असे एक बाड.
२०. भा. इ. सं. मंडळाच्या पोथीशाळेतील सरदार आबासाहेब मुजुमदार संग्रहात असलेले एक बाड.
२१. ‘ऐतिहासिक संकीर्ण वाङ्मय साहित्य’ (भा. इ. सं. मंडळ, पुणे–स्वीय ग्रंथमाला, क्र. ५७), पृ. ९–१८.
२२. ‘महाराष्ट्र लोकसाहित्य-माला’, पुष्प पहिले, पृ. १७–२१.
२३. ‘दत्त संप्रदायाचा इतिहास’ : रा. चिं. ढेरे, पृ. १९९–२००, २३१–२३५.
२४. श्री. नारायण गणपत विंचू (पुणे) यांच्या संग्रहातील एक बाड.
२५. ‘श्रीएकनाथमहाराज यांची गाथा’ (आवटे आवृत्ती, शके १८३०), क्र. ३९६७, पृ. ८४०–८४४.
२६. ‘मराठी वाङ्मयाचा इतिहास’ (खंड तिसरा) : ल. रा. पांगारकर, पृ. ७५६.

# सूची

सूचीतील आकडे पृष्ठांचे आहेत. ग्रंथांची नावे अवतरणात दिली आहेत. केवळ संदर्भासाठी म्हणून उल्लेखिलेल्या ग्रंथांचाच सूचीत समावेश आहे. ज्या कवींच्या ग्रंथांचा परिचय पुस्तकात घडविला आहे, त्यांचे ग्रंथ त्यांच्या नांवापुढील पृष्ठांत मिळतील.


अकबरशहा १००
अगर्जीअप्पा ५९
अचळबेट ५९
अनंत चैतन्य ५९
अंबरनाथ हुसेन ४२–४९
— कुल ४२–४५
— काळ ४५
— गुरु ४५–४६
— ग्रंथ ४६–४९
अंबर अंबरखान ४३
'अंबरहुसेनी' ४६-४९
अंबाजीपंत ४३
अब्दुल १७८
अमीनभाई १७८
अलमखान ५१–६५, १४२
— चरित्र ५१–६०
— गुरू ५४–५६
— समाधी ५८–५९
— पदे ६०–६४
अल्लाउद्दीन खिलजी १६०
'अवधूतगीताटीका' (पूर्णानंद) ११, २९
अवंतिका (उज्जयिनी) १२१, १२२, १२६
अष्टूर १८२
आजम ९७, ९९

आतार शिकंदरलाल १७७–१७८
'आत्मप्रकाश' (ब्रह्मानंद) १५
आत्मानंदस्वामी १५
आत्मारामस्वामी (येक्केहाळी) २४, २७, ६०
आत्मारामस्वामी (सिंदखेडे) १८२
आनंदप्रभू १८२
आनंद संप्रदाय ११–१७
आबालाल १७८
आमिना १२१, १२३
आमाई १२१, १२३
आवळीकर (डॉ.) पंडित ५२, ५७
उस्मानभाई १५८–१५९
एकनाथ ८८, १०१, १११–११२–१६२, १८२, १८३
कपाटेश्वरबाबा १२७
कबीर ८४, ९१, ११२, ११३, १३३
करळी ५८–५९
करीम १७८
कल्याणी ४–५, ७–९, ११, २७, ५३–५६, ५७
कादरी संप्रदाय २४–२६, ५७–५८ ८७–८९, ९५
कानोले वि. अं. १५–१७, २६, २९
कान्हो कानडा १८२,
कार्वे ६७
कासम १७८
कुरडे महाराज ६०
केशवस्वामी १३८–१४२
ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती १६१
गरीब अब्दुल १७८
'गुरुगीताटीका' (पूर्णानंद) ११, १३–१७
गोपाळनाथ ६६–७२, ७३
गोपाळनाथ (दुसरे) ७०
'गोपाळनाथचरित्र' ६७–६८,६९
घोलप वि. भा. ६७
चांद बोधले ५७, ८६, ८७, ८८, १०१, १८१
चांदोरकर गो. का. २८
'चिदंबरजयंतीस्तोत्र' ४५
चिमणगाव ४३
चोपडे १८२
जंगली फकीर सय्यद हुसेन १४२–१४५
जनकोजी (शिंदे) ९५
जनाजी १२१, १२२, १२३, १२६
जनार्दनस्वामी ५७, ८७, ८८, ८९ १०१, ११२, १८१
जयरामस्वामी ९३–९४, १०३
जलालुद्दीन गंजरवां १६०
जान महमंद १७६
जोव्हारशा १७८
डोणगाव १६०
तुकनगीर १७०, १७१
त्रिपुटी ६६–६७, ६९, ७३–७४

दयाळदास देवंग ९७, ९९
दलवाई हमीद १८०
दारा १७८
दावतखान सुलतान १७४
दावलजी ९५, ९६, ९७
दावल मलिक १६१-१६४
देवगिरी (दौलताबाद) ४३, ४४, ४५, ८६, ९०, १६०, १८१ १८२
देवदास १८३
धारूर ८६
नबी महंमद १७८
नरसिंह सरस्वती १८१
नागनाथ (वडवाळसिद्ध) ५१, ५४-५६, १४२
'नागेशलीलामृत' ५२-६०
नामदेव १६६–१६७
'नामरत्नमाला' (नामा पाठक) ११२
नामा पाठक ११२
नारायणपूर ७–१०, २७, ५७
निजामशाही ४३, ८८–८९
निजामोद्दीन अवलिया १६०
नुरुद्दीन १६०
पगडी सेतुमाधवराव १६०
'पंचीकरण' (अनंत) १६
पंढरपूर ३–४
परमहंस ७०
'पवनविजय' (ज्ञानेश्वर) १२०
पीरपूजा १६४–१६६
पुणे ७०
पूर्णबोध १४२
पूर्णानंद १०-१२
'पूर्णानंदचरित्र' (हनुमदात्मज) २
पेडगाव १२१, १२२, १२३, १२६
प्रयाग १२१, १२२, १२६
फतिशा १७८
फुलाई ८६, ९६
बंदा फकीर १५४
बऱ्हाणपूर ५९
बहामनीशाही १-२, २४–२५
बाजीद पठाण १३८–१४०
बाबन १७८
बाबासाहेब १७८
बालाशहा १००
बालासाहेब ९५, ९६
बाळाजी कोन्हेर ९०
बुऱ्हानशहा १००, १५५
बेंद्रे वा. सी. ८५, ८६
ब्रह्मानंद १५
'भक्तमंजरीमाला' ७०, ७१
'भक्तविजय' २
'भक्तलीलामृत' १३८, १४०
भवराया ८
भागूजी कुलकर्णी ५६
भानजी त्रिंबक ५२
भूम १८२

मंडूबाई १२१, १२३
मदशा १७४
मनसिंग १२१, १२२, १२३, १२६
मलंगबाबा ९६
महंमद गवान १
महंमद गौस ८७-९८
महंमदशा फकीर १७४
महंमद हनीफ १७८
महागाव ६०
महानुभाव संप्रदाय १२७-१२९
महाराष्ट्रधर्म १२०, १२२
महेंद्राचार्य १७०
मांडे (प्रा.) प्र. भा. १७०-१७१
माणिकमहाराज ६०
माधवनाथ ६८
मालोजीराजे ९०
माहुली ७०
मुकुंदराज १५-१७, १३८
मुगळी ३६-५७, ६०
मुंतजबोदीन ( जर्जरीबक्ष ) १६०
मुंतोजी खलजी १६९, १७०
मुंतोजी ब्रह्मणी ( मृत्यंजयस्वामी ) १-४१, ५७, १८१
कुल १-२
चरित्रसाधने २
चरित्रकथा २-१०
मुमुक्षुता २-३
गुरुबोध ३-५
समाधी ९-१०
गुरुपरंपरा १०-१७
ब्राह्मणत्वप्राप्तीचा प्रयत्न ६-७
नारायणपूरनिवास ७-९
गुरुसेवा ५-६
ज्ञानसागर नांव ९, २०, २१
पुण्यतिथी ९
विवेकसिंधुप्रभाव ४-५, १३-२०
वाङ्मय २१-२४; ३२-३९
मुधया ३०-३२
मुधा पांगूळ ९७, ९८
मुनींद्रस्वामी १२३, १२६
मुरार जगदेव ४४
'मृत्युंजयचरित्र' ( उद्धव चिद्घन ) २२
मोअज्जमशहा १००
मोमिन आरिफ १६०
मोरोपंत ८५
याकुत अंबरखान ४३
रंगबोध १३८, १४२
रघुनाथयोगी ९७
रमावल्लभदास ४३-४४
राजे बापू १७८
राजे महंमद ५७, ८६, ८७, ८८, ९६
रामदासस्वामी १००, १६८-१६९
रुई ९८
लतीफशाह १५०-१५४
लहरी हैदर १७६

लाडनशा १७४
लोकसाहित्य (मुसलमान) १७७–१८१
'वज्रसूचिकोपनिषद' १०२
वाहिरे ९८
विठ्ठलनाथ ७१–७२
'विवेकसिंधू' ४–५, १३-२०
वेरूळ ९०
वैद्यनाथ ४५
शकरगंज १४१
शम्सुद्दीन १६०
शर्फुद्दीन १६०
शहा अली १७०, १८०
शहा आलम १६१
शहागड १२६-१२७
शहाजहान ४४
शहाजी ४४
शहादत्त अलमा प्रभु १८१-१८३
शहादुल रहमान १६०
शहा नवरंग १४२
शहाबावा १२०–१२१, १२२, १२३
१२६
शहावेग १४७–१४०
शहा मुनी ११९–१३५
कुल १२०–१२३
गुरू १२३–१२६
समाधी १२६–१२७
संप्रदाय १२७–१२९
अद्वैतस्वीकार १२९–१३०
ग्रंथ १३१–१३३
शहा शरीफ १६४–१६६
शाह हुसेन १७९
शाह हुसेन फकीर १००, १४५–१४८
शाहिरी ६७–६९
शाहिरी (मुसलमान) १७०–१७६
शिवरामस्वामी ११, १५, १७
'शिवस्वरोदय' १०२
शिवाजी १६८–१६९
शेख दाजी (छोटुभाई) ६९-७०, ७१,
७२-७४
शेख महंमद ५७, ८४–११८, १४९,
१५७, १८१
कुल ८६
गुरुपरंपरा ८७–८९
समाधी ९५
वंशज ९५-९६
शिष्यपरंपरा ९७–१००
शेख मिराजी १७८
शेख शहीद १६०
शेख सरमस्त १६०
शेख सली महंमद १४९
शेख सुलतान ६६–८४
चरित्रकथा ६६–७४
ग्रंथ ७४–८२
समाधी ७१–७२
गुरू ६७–६८
श्रीगोंदे ९०, ९५

सगनभाऊ १७५
सदानंदस्वामी १८२
सयदुलाल १५४
सय्यद महंमद १४८–१४९
सहजानंदस्वामी ४–७, १०–१७
सिंदखेडे १८२
सिद्धटेक १२१, १२२
सुभाननाथ ७०
सुलतानदादा आतार १७८
सुलतानभाई पिंजारी १७६
सूफी संप्रदाय २४–२६, ५७–५८, ८७–८९, १६१–१६१, १७०–१७१
'स्वात्मसुख' (जनार्दन) ११२
हयात कलंदर १६०
हाकीम ९५, ९६
हाफीजबाबा ९६, ९७
हिसामुद्दीन १६०
हुसेन अंबरखान (पहा अंबरखान)
हुसेनखान १७४–१७५
ज्ञानेश्वरी ८६, १०१, १०९–१११

REFBK-0016291